४२

ग्रंथाली


इ-दिवाळी अंक २०१६ - दुबई

अतिथी संपादक

**मेघना अशोक वर्तक**

# वाळवंटातील

# दुबई



isha tours
Lets explore the world...
ईशा टूर्सच्या देश विदेशातील आकर्षक सहली
स्कॅंडिनेविया
नॉर्वे, फिनलॅंड, स्वीडन
(नॉर्दन लाईट्स)
• १४ - २१ डिसें
विंटर लडाख
• २५ जानेवारी • १९ फेब्रुवारी २०१७
अंदमान (स्वा. सावरकर स्मरणयात्रा)
• २५फेब्रुवारी २०१७
भूतान
• १९ मार्च • ९ व ३० एप्रिल • १४मे २०१७
केनिया - टांझानिया
• १९ मे २०१७ केनिया - टांझानिया
• २८ मे २०१७ टांझानिया
नॉर्थ ईस्ट (आसाम, अरुणाचल, मेघालय)
• १९ एप्रिल २०१७
लेह लडाख २०१७
• २३ व ३० मे, ९ व २२ जून, ४, ११ व २५ जुलै
• १२ व १४ ऑगस्ट, १७ सप्टेंबर
ईशा टूर्सच्या इतर कौटुंबिक सहली :
• राजस्थान • केरळ • मनाली • सिक्किम
• नैनिताल • कर्नाटक • ओरीसा • सिंधुदूर्ग कोकण
इतर वाईल्ड लाईफ सहली :
• पेंच • कान्हा • बांधवगड • रणथंबोर
• सुंदरबन • कार्बिनी • काझिरंगा
info@ishatours.net | © 8080 144 000 | www.ishatours.net
संपर्क कार्यालये ठाणे - १ए, मुरलीधर सोसायटी, ब्राम्हण सोसायटी, गोडबोले हॉस्पिटलच्या मागे, नौपाडा, ठाणे. (प)
© ०२२ २५४३ ७४१७ / २५४३ ७४५८, ९३२०१ ३१९१० दादर - लक्ष्मी सदन, भारत पेट्रोलियम पंपच्या शेजारी,
गोखले रोड (नॉर्थ), दादर, मुंबई २८ © ९३२००३१९१० बोरीवली - १०३, साई आदर्श, लिंकविहू रेस्टॉरंटच्या मागे, ऑफ लिंक रोड,
सायली हॉस्पिटलच्या समोर, बोरीवली (प). © ९३२४५३१९१० पुणे - गीतांजली : ९३२०१३१९१०



**॥ग्रंथाली॥**

## दुबई इ-दिवाळी अंक

ऑक्टोबर २०१६

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

अतिथी संपादक : **मेघना अशोक वर्तक**

सह संपादक : **अजित आचार्य**

मुखपृष्ठ : **शैलेंद्र साठे**

मांडणी : **अनिरुद्ध गद्रे**

**कार्यालयीन संपर्क**

कॉम्प्युटर युनिट – **अनिरुद्ध गद्रे / योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com

मुंबई प्रतिनिधी – **धनश्री धारप / मधु भोसले**
granthaliruchee@gmail.com

इ-जाहिरात प्रसिद्धी – **संजीवनी पाटील**

वितरण – **हरिप्रसाद जयस्वाल**

**पत्रव्यवहारचा पत्ता**

ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प.),
मुंबई ४०००१६ ☎ 24306624/24216050
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

मेघना अशोक वर्तक
पी.ओ.बॉक्स ८७७६
दुबई, यु.ए.ई.
meghana.sahitya@gmail.com
meghana_vartak@yahoo.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तींची. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.



## संपादकीय

नमस्कार मंडळी! प्रथम तुम्हा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा! नूतनवर्ष आपणा सर्वांना सुखसमृद्धीचे, भरभराटीचे आणि स्वप्नपूर्तीचे जावो!

गेली ४२ वर्षे मराठी प्रकाशन क्षेत्र आणि साहित्यासाठी कार्यरत असलेल्या 'ग्रंथाली' या संस्थेने यापूर्वी अमेरिका, कॅनडा, सौदी अरेबिया आणि दुबई येथील मराठी जीवनशैलीवर इ-दिवाळी विशेषांक काढला आहे. या अंकांच्या माध्यमातून, मराठी अक्षरांच्या देवाणघेवाणीतून त्या त्या देशातील मराठी बांधवांच्या कार्याची, जीवन पद्धतीची एकमेकांना ओळख होऊन मराठी मने खचितच जवळ आली, मनाने आणि साहित्याने! आणि म्हणूनच साहित्यरूपी धाग्यांनी मराठी मनांना एकत्र गुंफणाऱ्या 'ग्रंथाली'चे त्यांच्या या आगळ्या वेगळ्या उपक्रमाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन!

मराठी साहित्यासाठी वाहून घेतलेल्या 'ग्रंथाली'ने गेली दोन वर्षे म्हणजे २०१४ आणि २०१५ मध्ये 'वाळवंटातील वटवृक्ष' हे दोन, 'इ-दिवाळी दुबई विशेषांक' प्रकाशित केले. या दोन दिवाळी अंकांना आपल्या सर्वांकडून जो उदंड प्रतिसाद मिळाला, त्यातून स्फूर्ती मिळून २०१६ चा इ-दिवाळी दुबई अंक तयार झाला. 'वाळवंटातील वटवृक्ष' या अंकाचे तिसरे पुष्प आपल्या हाती देताना अतिशय आनंद होत आहे, कारण त्यानिमित्ताने शब्दरूपाने का होईना जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेल्या मराठी मनांशी संवाद साधता येतो, विचारांचा मेळ जमतो आणि ऋणानुबंधांच्या गाठी घट्ट होतात!

२०१६च्या इ-दिवाळी दुबई अंकाचे वैशिष्ट्य आहे- अनुभवांच्या चष्म्यातून पाहिलेले चार लेख! जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत प्रथितयश प्राप्त केलेली अनेक मराठी मंडळी दुबईला भेट देऊन गेली. त्यांची दुबईविषयीची मते जेवढी वाचनीय आहेत तेवढाच गप्पांच्या ओघात त्यांनी वर्णिलेला त्यांचा स्वत:चा जीवनप्रवासही उद्‌बोधक, पुढील पिढीला मार्गदर्शक आहे आणि म्हणूनच या लेखातून तो वर्णिला आहे. त्यायोगे जगभराच्या



मराठी वाचकांपर्यंत त्यांच्या कार्याची माहिती होईल. सामान्य, मध्यमवर्गीय घरात जन्म घेतलेल्या, प्राप्त परिस्थितीवर मात करून उत्तुंग भरारी घेणाऱ्या मराठी माणसाची आणि वाळवंटाचे रूपांतर नंदनवनात करणाऱ्या दुबईची पाऊलवाट एकच आहे.

वाळवंटातील वटवृक्षाच्या पारंब्या जमिनीपर्यंत पोहोचून, आलेले नवांकुर सूर्यप्रकाशाकडे झेपावत आहेत. पुढे पडलेल्या मराठी पावलांचा पायरव या वटवृक्षाच्या सावलीत मनामध्ये गुंजत राहतो आणि आणखी पुढचे पाऊल टाकण्याची प्रेरणा देतो. बुद्धिमत्ता, चिकाटी आणि परिश्रम या त्रयींच्या बळावर दुबईच्या जीवनातील सर्व क्षेत्रात मराठी माणसाने आपले नाव कोरले आहे. मराठी मातीची, महाराष्ट्राची छाप पाडली आहे. दुबईच्या जडणघडणीमध्ये सर्वच क्षेत्रात मराठी माणूस अग्रभागी आहे. मागील दोन अंकरूपी मालेत काही व्यवसायरूपी पुष्पे गुंफली, काही फुले ह्या मालेत गुंफत आहे. आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या या व्यावसायिकांचे अनुभव दुबईत येणाऱ्या नवीन व्यक्तींना नक्कीच दिशा दाखवतील!

व्यावसायिक दुबईबरोबर सांस्कृतिक दुबईही मराठी माणसाने संपन्न केली आहे. महाराष्ट्र मंडळ ह्या परदेशातील माहेराच्या सान्निध्यात दुबईची मराठी रंगभूमी संपन्न झाली. रंगभूमीची परंपरा जतन करण्यासाठी नाट्यवेडे अवलिये उदयाला आले. साहित्यप्रेमींना वाचन कट्टा मिळाला. हळुवार कवीमनाला पालवी फुटली. गायनवादन, सणवार जपले गेले. नवीन पिढीसाठी संस्कार वर्ग सुरू झाले आणि आध्यात्माच्या छायेखाली मन विसावले! आकाशाला गवसणी घालणाऱ्या आपल्या स्वप्नांच्या पूर्तीसाठी, आज अनेक मराठी पावलं दुबईच्या दिशेने पडत आहेत. बघता बघता मराठी लोकांची संख्या वाढत आहे. नवीन सांस्कृतिक ग्रुप तयार होत आहेत. वाळवंटाच्या सावलीत मराठी संस्कृतीला तडा जाऊ न देता सर्वांनी एकोप्याने राहावे हीच सदिच्छा!

अशा या दुबईच्या आयुष्यात भारतीयांना स्वतःच्या भारतीयत्वाचा अभिमान वाटेल अशी घटना घडली. ती म्हणजे गेल्यावर्षी, तब्बल ३५ वर्षांनी म्हणजे १७ ऑगस्ट २०१५ रोजी भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यूएईत आले! दुबई क्रिकेट स्टेडियमवर ५०,०००हून अधिक जनसमुदायासमोर त्यांचे भाषण झाले. या भेटीमुळे यूएईने भारताबरोबर गुंतवणुकीचे अनेक करार केले. त्यामुळे दोन देशांतील नाते दृढ होण्यास नक्कीच मदत झाली. दुबईत राहणाऱ्या भारतवासीयांच्या दृष्टीने २०१५तील हे क्षण अविस्मरणीय होते!

मोदींच्या या भेटीतच यूएई सरकारने अबुधाबीमध्ये मंदिरासाठी जागा देण्याचे वचन दिले आणि आत्ता नुकतीच ऑक्टोबर २०१६ मध्ये यूएई सरकारने वचनपूर्ती केली. अबुधाबी शहरापासून ३० मिनिटांवर असलेल्या, अबुधाबी अलेन रोडवर, हायवेला लागून अलवाथबा येथे सुमारे पाच एकर जागा, मंदिर समितीकडे सुपूर्द केली. हे मंदिर एक वर्षाच्या आत पूर्ण होईल. अबुधाबीचे होणारे हे मंदिर यूएईतील सर्वात मोठे मंदिर असेल. यूएईमध्ये अनेक स्थित्यंतरे होत आहेत. ४० वर्षाहून अधिक काळ येथे वास्तव्य करणारे आमच्यासारखे अनेक भारतीय या बदलांचे साक्षीदार आहेत. जीवनशैली, राहणीमान, धार्मिक जीवन या सर्वात झपाट्याने बदल होत आहेत. एकेकाळी लपतछपत होणारे गणपती उत्सव, विसर्जन आज खुलेपणाने होऊ शकते! येथील सरकारचे हे सहिष्णुतेचे धोरण आहे की जगाच्या नकाशावर बदललेल्या भारताच्या प्रतिमेचा हा परिणाम आहे, की बदलत्या काळाची पावले ओळखून उचललेले धूर्त पाऊल आहे हे येणारा काळच ठरवेल!

यूएई आणि भारताचे हे मित्रत्वाचे नाते दृढ होत असतानाच भारत सरकारने उचललेले पुढचे पाऊल हे अधिकच प्रेरणादायी आहे. भारत भूमीच्या ६७व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अबुधाबीचे क्राऊन प्रिन्स शेख अब्दुल अझिझ बिन झाएद अल नाहियान यांना आमंत्रित केले आहे. यापूर्वी अमेरिका, चीनसारख्या बलाढ्य आणि शक्तिशाली राष्ट्रांचे अध्यक्ष प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आज त्यांच्या पंक्तीत बसण्याचा मान यूएईच्या crown प्रिन्सला दिला आहे, हे नक्कीच स्वागतार्ह आहे. एक पाऊल पुढे टाकलेल्या मैत्रीच्या पावलाचा अर्थ आणि दिशा भविष्याचा वेध घेईल हे निश्चित!

या अंकाच्या निमित्ताने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार आणि पुन्हा दीपावलीच्या शुभेच्छा

मायबोली मराठीला दुबईकरांचे शतशः प्रणाम

जय महाराष्ट्र !!

■ मेघना वर्तक

# अनुक्रम




- **अनुभवांच्या चष्म्यातून दुबई...!**

१. अचूक वेध - दीपक घैसास / ७

२. शिल्पकार - प्रमोद लेले / १९

३. पाऊलवाट दुबई आणि सुकन्याची - सुकन्या कुलकर्णी / ३१

४. राजाय तस्मै नमः...! शिबानी जोशी / ४४

- **मी आणि माझा व्यवसाय**

५. व्रतस्थ - प्रदीप केसकर / ५०

६. मुखवटा - प्रशांत मुळावकर / ५७

७. गुणवत्ता तज्ज्ञ - डॉ. सुनील मांजरेकर / ६६

८. स्वप्नवेडा - शिरीष पटवर्धन / ७२

९. भंगारातून भाग्याकडे - संजीव-मनीषा फडके / ७४

- **वाळवंटातील किचन**

१०. बॉम्बे बाइट्स ते मुंबईकर्स - विनता अभय पाटणे / ८०

११. दुबइचे पेशवा - श्रीया सचिन जोशी / ८६

- **दुबईची मराठी रंगभूमी**

१२. माझा दुबईतील नाट्यप्रवास - डॉ. प्रज्ञा प्रसाद पाठारे / ९२

१३. ही रेती / सांभाळ रे राजा - प्रसाद पाठारे / ९७

१४. नाट्यवेडा अवलिया - नीलेश देशपांडे / ९८

- **दुबईतील वाचन कट्टा**

१५. A Liberty On Wheels - मधुरा कुंटे / १०३

- **आध्यात्मिक दुबई**

१६. आध्यात्मिक डॉक्टर - डॉ. किशोर निमखेडकर / १०८

- परंपरा महाराष्ट्र मंडळ दुबईची - मेघना वर्तक / १११
- वाळूचे दुःख - मेघना वर्तक / ११४















# अनुभवांच्या चष्म्यातून दुबई...!

**२०१६,** जगाच्या नकाशावर आवडता टुरिस्ट स्पॉट कोणता असे विचारले तर दुबईचे नाव अग्रभागी येईल. अंगाची काहिली करणारा उन्हाळा असला तरीही दुबईचे एअर पोर्ट टूरीस्टने भरलेले असतात. कोणी दुबई बघायला येतात, तर कोणी काही कामानिमित्त तर कित्येकजण Visit Visa काढून नशीब आजमावयाला येतात, नोकरीच्या संधी शोधतात.
कोणते का कारण असेना, चुंबकाप्रमाणे दुबईची ओढ सर्वांना लागलेली आहे. ओढ एकच आहे पण प्रत्येकाला येणारे अनुभव वेगवेगळे आहेत आणि पाहिलेल्या, आलेल्या अनुभवाप्रमाणे सर्वांची दुबई विषयीची मतेही वेगवेगळी आहेत. एवढे सगळे असले तरी दुबईने गेल्या तपात केलेल्या प्रगतीविषयी सर्वांच्या तोंडून 'अहो आश्चर्यम' असे उद्गार निघाल्याशिवाय राहात नाहीत. जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत प्रथितयश प्राप्त केलेली अनेक मराठी मंडळी दुबईला भेट देऊन गेली. त्यांची दुबईविषयीची मते जेवढी वाचनीय आहेत तेवढीच गप्पांच्या ओघात त्यांनी वर्णिलेला त्यांचा स्वतःचा जीवनप्रवासही उद्‌बोधक, पुढील पिढीला मार्गदर्शक आहे आणि म्हणूनच या लेखांतून तो वर्णिला आहे. त्यायोगे जगभराच्या मराठी वाचकांपर्यंत त्यांच्या कार्याची माहिती होईल. सामान्य, मध्यमवर्गीय घरात जन्म घेतलेल्या, प्राप्त परिस्थितीवर मात करून उत्तुंग भरारी घेणाऱ्या मराठी माणसाची आणि वाळवंटाचे नंदनवनात रुपांतर करणाऱ्या दुबईची पाऊलवाट एकच आहे. भारतात ज्याप्रमाणे मुंबईचे आकर्षण असते, त्याप्रमाणे आज जगाच्या नकाशावर दुबईचे आकर्षण आहे. मुंबईप्रमाणेच दुबईतही, जीवनात यशस्वी होण्यासाठी, जात-धर्म कोणताही भेद न बाळगता अनेक संधी उपलब्ध आहेत, त्याचा तुम्ही कसा फायदा करून घेता हे तुमच्यावर अवलंबून आहे आणि म्हणूनच बघू या, मुंबईत यश प्राप्त झालेल्या काही उल्लेखनीय मान्यवरांच्या चष्म्यातून दुबई!

– मेघना वर्तक





# अचूक वेध

■ दीपक घैसास

■ मुलाखतकार : मेघना वर्तक

**प्र**त्येक जिवाला परमेश्वराने काही चांगले गुण दिले आहेत. ते शोधून त्याचा योग्य तो वापर करण्याचे काम प्रत्येकाचे आहे. माकड अतिशय हुशार प्राणी आहे. बुद्धीचे माप परमेश्वराने त्याच्या पदरात टाकले आहे. ते सतत ह्या झाडावरून त्या झाडावर उड्या मारत असते. ते एका जागी कधीही स्वस्थ बसत नाही. तो त्याचा स्वभावच नाही. उंच उंच झाडांवर ह्या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारत झाडाच्या शेंड्यापर्यंत पोहोचते! प्रत्येक उडी मारताना ते माकड केवढी 'risk' घेत असते! अंदाज चुकला, उडी चुकली तर कपाळमोक्षच व्हायचा. केवढे धैर्य हवे यासाठी आणि तो एवढासा जीव ते दाखवते. प्रत्येक उडी मारताना त्या उडीचा अंदाज घेणे, फांदीची ताकद बघणे, शरीराची चपळता... अक्षरशः थक्क करणारे असते. केवढा दुर्दम्य विश्वास हवा. केवढे धैर्य हवे!

असा हा आत्मविश्वास, असे हे अतुलनीय धैर्य प्रसिद्ध उद्योगपती श्री. दीपक घैसास यांच्या ठिकाणी दिसते. यांचा जीवन प्रवासही या उद्योगातून त्या उद्योगात, त्या उद्योगातून आणखी कुठे असा चालू आहे. एखाद्या उद्योगात स्थिरस्थावर झाले असतानासुद्धा दुसऱ्या उद्योगात उडी घेताना त्यांनी घेतलेली risk, त्यांचा अंदाज, बुद्धीचातुर्य, त्यांचा अचूक वेध हे लक्षवेधी आहे. त्यांची प्रत्येक भरारी ही उत्तुंग ठरली! त्यावेळचा त्यांचा आत्मविश्वास, त्यांची जिद्द, नवीन काही करण्याची इच्छा तरुण पिढीने आदर्श ठेवावा अशीच ही भरारी आहे. ही भरारी घेत असताना सामाजिक बांधिलकीचे भानही त्यांनी ठेवले आहे आणि म्हणूनच आठवड्यातील एक दिवस ते आदिवासी मुलांना जाऊन गणित शिकवतात, त्यांच्याशी समरस होतात, त्यांच्याबरोबर त्यांचा संवाद जुळतो आणि आदिवासी मुलांची जीवनशैली बघून त्यांचं संवेदनशील मन भारावून जातं! IT क्षेत्रासारख्या एका रुक्ष विषयातील एक उद्योगपती आणि संवेदनशील मन हे समीकरणच जुळत नाही! पण दीपक घैसास यांच्याबाबतीत हे समीकरण जुळले आहे. बालवयात आईवडिलांनी केलेले संस्कार आणि नंतर बहिणाबाईंच्या काव्याचा सखोल अभ्यास यामुळे त्यांचे संवेदनशील मन अधिकच तरल झाले.

अशा चौफेर व्यक्तिमत्त्व असलेल्या दीपक घैसास यांच्या व्यावसायिक कारकीर्दीबद्दल Wikipedia वर भरपूर माहिती उपलब्ध आहे. परंतु बालपणापासून त्यांच्यावर घडलेले अगदी बारीक सारीक संस्कार, मध्यमवर्गीय घरातून सुरू झालेला त्यांचा जीवन प्रवास, अनुभव, त्यातील खाचखळगे हे सर्वांनाच अपरिचित आहे. दुबईविषयी त्यांचे अनुभव किंवा मत जाणून घेत असताना, त्यांचा प्रवाससुद्धा वाचकांपुढे ठेवला तर सर्वांनाच त्यातून बरेच काही शिकता येईल आणि म्हणून मी म्हटले, घैसाससाहेब, बालवयात तुमच्यावर घडलेल्या संस्कारातून घडलेला तुमचा mindset तुमच्या पुढच्या प्रवासात तुम्हाला कसा मार्गदर्शक ठरला त्याचे वर्णन कराल का? तुमच्या या अनुभवांच्या शिदोरीतून



तरुण उद्योजकांना बरंच काही शिकता येईल.


गेली २५ वर्षे IIM अहमदाबाद सारख्या management स्कूल्सना आणि त्याचबरोबर खेड्यातील आदिवासी मुलांना आठवड्यातील एक दिवस गणित शिकवणाऱ्या दीपक घैसास यांचा चेहेरा प्रसन्न झाला आणि अतिशय उत्साहाने ते सांगू लागले.

मुंबईच्या पार्ल्यामधील आमचे typical मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंब! आईवडील, बहीण असे आमचे कुटुंब! आईला गाण्याची आवड खूप होती. मी जेव्हा जन्माला आलो तेव्हा आई गाणे शिकायची. त्यावेळी ती नोकरी करत नव्हती. त्यामुळे गाण्याचा वारसा आईकडून मिळाला. सूर कळले नाहीत, पण लय कळली. मी तबला उत्तम वाजवतो. आजही घरात पेटी, तबला, तंबोरा अशी मैफलीची सर्व साधने ठेवली आहेत. वडिलांना गाण्याची आवड अजिबात नव्हती. इंटरपर्यंत ते Wilson कॉलेजमध्ये होते. इंटरला असताना १९४२ च्या 'चले जाव चळवळी'त ते रस्त्यावर आले. चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. त्यावेळचा काळच असा होता की देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा होम करण्यासाठी तरुण रक्त सळसळत होते. सर्वत्र स्वातंत्र्याचे वारे वाहत होते. साहजिकच माझे वडीलही अपवाद नव्हते. स्वातंत्र्य चळवळीत त्यांचा सहभाग पाहून आजोबांनी वडिलांना सांगितले की, शिक्षण करायचे नसेल तर नोकरी कर! वडिलांनी चळवळीत घेतलेला भाग त्यांना आवडला नव्हता. अखेर कॉलेज सोडून शिक्षणाला रामराम ठोकून १९४२ ते १९८२ अशी ४० वर्षे मुंबई महानगरपालिकेत वडिलांनी नोकरी केली. १९८३ मध्ये ते निवृत्त झाले. नोकरी करत असतानाच स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावर, त्यांनी पुन्हा शिकायला सुरुवात केली, कारण शिक्षणाची इच्छा त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्याकाळी डहाणूकर कॉलेज सुरू झाले होते. तिथे मॉर्निंग कॉलेज होते. सकाळचे कॉलेज करून नंतर ते बांद्रा येथून हार्बर ट्रेनने फोर्टमध्ये ऑफिसला जायचे. ट्रेनमध्ये अभ्यास करायचे. कधी कधी पुन्हा ट्रेनने उलटे यायचे आणि पुन्हा जायचे वाटेत अभ्यास करत. कारण घरी आल्यावर आम्ही मुले लहान असल्यामुळे अभ्यास होत नसे. तसेच घरात अभ्यासाला जागा पण नसे. अशाप्रकारे त्यांनी आपले graduation पूर्ण केले. कळत-नकळत शिक्षण किती महत्त्वाचे आहे, त्यासाठी केलेली धडपड, शिक्षणासाठीची तळमळ ह्या गोष्टी मनावर कोरल्या गेल्या आणि ते संस्कार होत गेले. आयुष्यात एखादी गोष्ट जर आपल्याला मिळवायची असेल तर त्यासाठी किती मेहनत घ्यावी लागते, याचा जणू आदर्शच माझ्या वडिलांनी माझ्यासमोर घालून दिला!

आईला विशेष हिंदी येत नव्हते. ती गायनाच्या विशारद परीक्षेला बसणार होती. त्याकाळी गांधर्व महाविद्यालायात गाण्याची जी पुस्तके होती ती सर्व हिंदीत होती आणि ते हिंदी तर नॉर्थचे हिंदी होते. त्या चारी पुस्तकांचे मराठीत भाषांतर वडिलांनी स्वतः करून दिले. वडील म्हणाले, मी आणखीन काही मदत करू शकत नाही; पण एवढी मदत करीन. त्यावेळी पेपर मराठीत लिहायची सोय होती. अशाप्रकारे आई विशारद झाली. आजही माझ्याकडे त्या वह्या मी ठेवून दिल्या आहेत. कारण माझ्या दृष्टीने तो एक फार मोठा खजिना आहे संस्कारांचा! आपल्या कुटुंबासाठी काही केले पाहिजे हे शिकवणारा! त्यावेळी माझ्या मनावर ठसले गेले की, आयुष्यात शिक्षण किती महत्त्वाचे आहे. त्यावेळी कळले नाही; पण आता कळते नवरा-बायकोचे नाते म्हणजे काय ते! how devoted he was! त्यावेळी मला value system म्हणजे काय ते कळले! मी पाचवीत गेल्यावर आईने नोकरी सुरू केली संगीत शिक्षिका म्हणून!

दुर्दैवाने आजी-आजोबांचे प्रेम मिळाले नाही. पण माझ्या लहानपणात आई घरीच होती त्यामुळे घरी जे संस्कार होतात ते सर्व झाले. आमची पार्लेश्वर सोसायटी ही मध्यमवर्गीय लोकांची सोसायटी होती, तिथे आपोआपच संस्कार व्हायचे. मोठे मैदान होते मुलांना खेळायला. घरून हाक मारली गेल्याशिवाय घरी जायचे नाही हा जणू अलिखित नियम होता!

इतके आम्ही सर्व रमून जायचो, सणवार एकत्र साजरे व्हायचे, मुलांच्या निरनिराळ्या स्पर्धा व्हायच्या, भांडणेही व्हायची. पण एकमेकांशिवाय करमायचे नाही हेही तितकेच खरे होते. आयुष्यात ह्या सर्वातूनसुद्धा तुम्ही बरेच काही शिकत असता. आमच्या घरी संध्याकाळी ७ वाजता शुभंकरोती, परवाचा म्हणणे हे एकदम कडक असायचे. त्यामुळे अजूनही पाढे पाठ आहेत. business साठी ७५ देशांत हिंडलो. पण अजूनही हिशेब करताना किंवा percentage काढताना इतक्या वेगाने काढतो की सर्वांना आश्चर्य वाटते. पण मला वाटते की ते पर्वच असे होते. केवळ माझ्याच घरात नव्हे तर सर्वांच्या घरी ही पद्धत होती. पण तरीही आईवडील समाधानी नव्हते. माझी आई ८५ वर्षांची होती. ती जायच्या आधी एक महिना आम्ही तिची मजा


शुभ दीपावली
आमचे सर्व सभासद, ग्राहक
व सर्व हितचिंतकांना
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !
सारस्वत
बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
मिले यहाँ दोनो जहाँ !
कॉर्पोरेट सेंटर: एकनाथ ठाकूर भवन, ९५३, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई -४०० ०२५. दूरध्वनी - (०२२) ६६०० ५५५५
www.saraswatbank.com | Email: corporatecenter@saraswatbank.com

करत होतो. पण वयाच्या ८५व्या वर्षी पावकी, निमकी, अडीचकी, औटकी तिने सर्वांना म्हणून दाखवली. माझ्या वडिलांचे गणित उत्तम होते त्यामुळे घरात गणित प्रत्येकाला यायला हवे हा नियम होता. हिशेब म्हणजे तोंडावर हवा. दुर्दैवाने आमच्या मुलांच्या बाबतीत आम्हाला हे करता आले नाही. ते इंग्रजी मीडियममध्ये शिकतात, मी मराठी मीडियममध्ये शिकलो. त्यांच्याजवळ calculater आहेत. अर्थात त्यांचाही दृष्टिकोन बरोबर आहे, ते म्हणतात तुमच्या वेळेला calci नव्हते!

मी त्यांना मधेच पटकन म्हटले, म्हणजे तुम्ही तरुणांच्या मतांचाही आदर करता तर! ते उत्तरले हो नक्कीच! जर त्यांचा दृष्टिकोन बरोबर असेल तर तुम्ही मान्य करण्यात गैर काहीच नाही. काळ बदलत आहे, नवनवीन शोध लागत आहेत. बदलत्या काळाची पावले ओळखून तुम्ही स्वतःलाही बदलायला पाहिजे, नवीन विज्ञानाची माहिती करून घ्यायला पाहिजे.

गेली २५ वर्षे मी management school ला शिकवायचो. त्यांचे regular sylabas घ्यायचो. आता आठवड्यातून एक दिवस झोपडपट्टीतील आदिवासी मुलांना शिकवतो तसेच IIM अमदाबादलाही शिकवतो. बरेच वेळा प्रश्न विचारतात $(A+B)^2$ आम्ही केले तर त्याचे पुढे उत्तर काय झाले? बहुतेक तरुण पिढीचा हा प्रश्न असतो. माझे उत्तर असे-वडील तुम्हाला ज्युडो, कराटे किंवा व्यायामशाळेच्या क्लासला पाठवतात, ते रस्त्यावर जाऊन मारामारी करायला नव्हे तर तुमचे शरीर सशक्त व्हावे, शारीरिक व्यायाम व्हावा म्हणून पाठवतात. तसेच आपण जे अल्जिब्रा किंवा रायडर्स शिकतो ते way of exercise म्हणून शिकतो. कोणताही प्रॉब्लेम solve करताना आपला approach कसा हवा हे आपण गणितातून शिकतो आणि त्या दृष्टिकोनातून विचार करून नेहमीच्या व्यवहारातील प्रॉब्लेम्सचे निवारण करतो. कोणाला हा विचार पटतो कोणाला नाही.

आमच्या घरी कोणत्याही गोष्टीसाठी आमच्यावर इतरांची मते लादली गेली नाहीत. तू हेच कर तू तेच कर असा कोणाचाही अट्टाहास नव्हता. मी आठवीत असताना माझ्या बहिणीचे लग्न झाले. मग मी घरी एकटाच होतो, म्हणून मग त्या काळात मी तबला शिकलो. SSC ला मी बोर्डात आलो. मग कॉलेज म्हणजे जवळच असलेले पार्ले किंवा डहाणूकर ठरलेले होते. पण मी वडिलांना म्हटले, मला चर्चगेटच्या सिडनेहम कॉलेजमधे जायचे आहे. वडील पटकन् म्हणाले जा! मला आश्चर्य वाटले. कारण डहाणूकर तर मला ५ मिनिटांवर होते. सिडनेहम लांब चर्चगेटला! दररोज ट्रेनने जायचे यायचे. पण आई-वडिलांनी अजिबात अडवले नाही.

पण तिथे गेल्यामुळे माझ्यात खूप फरक झाला. त्या कॉलेजमध्ये वातावरण कॉस्मोपोलीटन! मी डहाणूकरला गेलो असतो तर 'I was a king'. SSC ला बोर्डात आलेला मुलगा म्हणून, पण इथे nobody cares! You have to prove again! माझे शिक्षण मराठी मीडियममधून झाले होते. प्रथम इंग्लिश मीडियमचा थोडासा त्रास व्हायचा. तिथे गाडगे म्हणून इंटरला maths ला प्रोफेसर होते. त्यांनी mensuration शिकवायला सुरूवात केली. मी तर हा शब्दच कधी ऐकला नव्हता. म्हणून पहिल्या बेंचवर जाऊन बसलो नीट लक्ष द्यायला म्हणून! त्यावेळी त्यांनी पाणी असलेल्या बालदीत बॉल टाकला आणि पाणी उडवले, तेव्हा लक्षात आले अरे हे तर घनफळ! नंतर त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला माझे उत्तर तयार असे. फक्त मीडियमचा फरक होता. तुमचे जर गणित चांगले असेल तर जगात सर्वकडे त्याचा फायदाच होतो. गणितामुळे logic आणि speed दोन्ही चांगले होतात. विचार करण्याच्या पद्धतीतच फरक पडतो.

मी रत्नागिरीत, मराठवाड्यात, गडचिरोलीत जातो. तेथील मुलांकडून पाढे पाठ करून घेतो. ही मुले अतिशय गरीब आहेत. नुसत्या चड्डीत असतात. शर्ट घ्यायलाही पैसे नसतात. पहिल्या दिवशी वेगळ्या, माझ्या पद्धतीने गणिते समजावून सांगितली. जेणे करून त्यांच्या मनात गणिताबद्दल आवड निर्माण होईल आणि सांगितले की मी आठ दिवसांनी येईन तेव्हा तुम्हाला पाढे विचारीन. ते पाठ करायला सांगितले होते. ८चा पाढा म्हण, ९चा म्हण असे नाही तर वेगळ्या पद्धतीने विचारीन. ८ दिवसांनी गेलो आणि त्यांना विचारले की सांगा ९६ कोणकोणत्या पाढ्यात येतात? माझ्या वडिलांनी मला अशा पद्धतीने शिकवले होते. ते सांगायचे की idea ही की ९६ ने तुला सांगायला पाहिजे की मी १६ च्या १२ च्या पाढ्यात आहे. हे जेव्हा ९६ तुला सांगेल तेव्हा तुला गणित समजले, त्यातील गंमत कळली. गंमत अशी की २५ पैकी ८ मुलांनी तरी हात वर केला. त्यातील एका मुलाला मी विचारले, त्यांनी न घाबरता इतके व्यवस्थित उत्तर दिले की मला राहवले नाही. मी त्याला खिशातून १०० रुपये काढून बक्षीस दिले. आमचा NGO चा माणूस

आला आणि मला म्हणाला, साहेब त्याला पैसे देऊ नका कारण त्याचा बाप त्याला पैशासाठी मारेल, ठार पण मारेल! मी त्या मुलाला विचारले की या पैशाचे तू काय करणार? तेव्हा तो म्हणाला, सर या पैशातून मी पुस्तके विकत घेईन. तेव्हापासून दरवर्षी २५/३० शाळांना मी पुस्तकांचा संच पाठवतो. या मुलाला उद्या खायचे काय माहीत नाही; पण तो पैसे मिळताच पुस्तके घेईन असे सांगतो! ही त्याची वाचनाची आवड! शहरातल्या मुलांना वाचा वाचा म्हणून सांगतो, पण त्यांना त्याची value नाही. ज्याच्याकडे नसते त्यालाच त्याची किंमत असते. आणि म्हणूनच मी दरवर्षी ह्या मुलांना पुस्तके देतो.

फक्त एकच अट असते की ह्या मुलांनी स्वतःच्या हस्ताक्षरात पुस्तके कशी वाटली ते लिहून कळवायचे. अभिप्राय म्हणून! स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिले की लिहिण्याची कला अवगत होते, अक्षर पण सुधारते.

दीपक घैसास आठवणीत दंग झाले होते. त्यांचे विचार ऐकताना मी मनात म्हणत होते की IT सारख्या रुक्ष क्षेत्रात स्वतःची कंपनी सुरू करणाऱ्या ह्या माणसाजवळ एवढे संवेदनशील मन आलं कुठून? एक एवढा मोठा उद्योगपती स्वतःचा वेळ देऊन आदिवासी भागात जातो, तेथील मुलांना गणित शिकवतो, गणितातील त्यांची प्रगती पाहून, त्या मुलाचा बोलण्यातील आत्मविश्वास पाहून आणि दुसऱ्या दिवशी जेवायला काय हे माहीत नाही, पण पैसे मिळताच त्याची पुस्तके घेईन असे त्याचे उत्तर ऐकून भावनाविवश होणारे दीपक घैसास! माझ्या मनात आले की बालवयात मुलांवर जे संस्कार होतात, ते किती महत्त्वाचे असतात. आज त्या संस्कारांमुळेच एका अशिक्षित आदिवासी मुलाचे मन, त्याला पुस्तक मिळाल्यामुळे होणारा आनंद ते समजू शकले!

मी भानावर आले आणि त्यांच्या आठवणी ऐकू लागले. अशा प्रकारे माझे कॉलेज शिक्षण चालू होते. B.Com. करत असताना सकाळी सहा वाजता उठून ट्रेनने जायचो. साडेसात ते नऊ क्लास असायचा. साडेनऊला सिडनेहमला जायचो. आमचा चौघांचा group होता. आज सर्वजण जगामध्ये कुठे कुठे मोठ्या पोस्टवर आहेत. जाताना आम्ही law discuss करत जायचो. मी मराठी माध्यम ते इंग्रजी माध्यम! मला समजायला वेळ लागे. I have to read three times more than them. विशेषतः law! पण discussion मध्ये पटकन समजायचे. VT वरून Churchgate ला क्रॉस मैदान पार करून दररोज यायचो! सर्व zest! maths, तबला, मित्रमैत्रिणी त्यामुळे isolated राहिलो नाही कधी! प्रत्येक group वेगळा! खरंच खूप wonderful दिवस होते!

मी ११ वर्षे मराठी माध्यमातून शिकलो. माझे इंग्रजी चांगले नव्हते. पण एखादी गोष्ट जेव्हा तुम्ही मनापासून करता त्यासाठी मनापासून मेहनत घेता, तेव्हा it works out! नाहीतर त्याकाळी सर्वसाधारणपणे मराठी मुले सिडनेहमला जात नव्हती. मी सिडनेहमला गेलो आणि मनापासून मेहनत घेतली. पण आज मी अभिमानाने सांगू शकतो की, उद्योगधंद्याच्या निमित्ताने मी जगभर हिंडलो; पण मराठी मीडियममध्ये शिक्षण झाल्याने काहीही फरक पडला नाही.

मनापासून केलेली गोष्ट – it works! तुमचे गुण, तुमची बुद्धिमत्ता, ती चमक कुठेही लपत नाही. त्याचे कौतुकही होते. फक्त प्रश्न असतो, तुम्ही स्वतःला present कसे करता!

घैसास यांचे विचार ऐकले आणि माझ्या मनात आले की आज आपल्याकडे असे दिसते की मुलांना इंग्रजी मीडियमलाच घालायचे असा पालकांचा अट्टाहास असतो, मराठी मीडियममध्ये मुलांना घालणे म्हणजे त्यांना कमीपणा वाटतो! एका मध्यमवर्गीय कुटुंबातील, मराठी माध्यमातून शिकलेला मुलगा यशाचे शिखर कसे गाठतो याचे उत्तम उदाहरण म्हणजेच दीपक घैसास! आपल्या आयुष्यात मिळणारे यश हे शिक्षणाच्या माध्यमावर अवलंबून नाही तर तुमची जिद्द, मेहेनत, आत्मविश्वास आणि एखाद्या गोष्टीसाठी झोकून देण्याचा स्वभाव यावर आणि तुमच्यावरील संस्कारांवर अवलंबून आहे, हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून लक्षात येते आणि खरोखर ह्यातून सर्वांनीच बरेच काही शिकण्यासारखे आहे.

दीपक घैसास बालपणीच्या आठवणींचा खजिनाच जणू उघडून रीता करत होते! आणि त्यातून सुख-दुःखाच्या आठवणी वाचकांसाठी गोळा करण्याचे काम मी करत होते.

आमच्या कॉलेजमध्ये सिडनेहॅममध्ये मोहिनी वर्दे नावाच्या एक मराठीच्या प्रोफेसर होत्या. एकदा त्यांनी मला विचारले, प्रबंध लिहिशील का? मी पार्ले टिळक विद्यालयात शिकलो होतो. मराठीचा पाया पक्का होता! त्यावेळी 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'साठी 'अर्वाचीन काळातील मराठी कवयित्री' या विषयावर तीन महिने अभ्यास करून मी एक

प्रबंध नव्हे; पण बराच मोठा निबंध लिहिला. खरं म्हटलं तर माझा तो विषय नव्हता, पण त्यासाठी मी ज्या पद्धतीने मेहनत घेतली त्याचा फायदा मला आजही पुढच्या आयुष्यात होत आहे. ती reference books शोधणे, चाळणे, त्याच्या notes काढणे, त्यावर चिंतन-मनन करणे! मला पुढे ती सवय लागली की एखाद्या विषयाच्या मुळाशी जाऊन त्याचा शोध घेणे! बहिणाबाईपासून इंदिरा संतांपर्यंतच्या कवयित्रींची माहिती झाली. त्यांच्या काव्याचा सखोल अभ्यास केला. दोघींच्याही काव्यातील संवेदनशीलता अनुभवली. बहिणाबाई म्हणजे त्याकाळातील एक मोठे आश्चर्य होते! सुसंस्कृतपणाला, विचारांना शिक्षणाची गरज नसते हे बहिणाबाई यांचे काव्य वाचल्यावर लक्षात येते. सोपानदेव चौधरी यांना जेव्हा त्यांच्या कवितांचा संग्रह सापडला, तेव्हा ते आचार्य अत्रे यांच्याकडे घेऊन गेले आणि त्यांना म्हणाले, माझ्या आईच्या ह्या कविता आहेत. तिच्या काव्यसंग्रहासाठी मला तुमची प्रस्तावना द्याल का? त्यांनी म्हटले ठीक आहे. आठ दिवसांनी घाबरत घाबरत ते त्यांच्याकडे गेले की आता अत्रे काय म्हणतील म्हणून! पण त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. अत्रे म्हणाले, हिऱ्याचा हंडा तुम्हाला सापडला आहे. बहिणाबाई यांचे काव्य म्हणजे मराठी साहित्यातील अनमोल ठेवा आहे.

स्त्री म्हणून बहिणाबाई काय किंवा इंदिरा संत काय जास्त संवेदनशील आहेत. आणि ती संवेदनशीलता पुरुषाकडे नसल्याने त्याला कल्पनाही करता येणार नाही. सर्व कवयित्रींच्या काव्यात दुःख हा जो समान धागा आहे, तो काव्यात खोलवर रुतल्यासारखा वाटतो.. रामदासाना पटशिष्या होती हे मला तेव्हा समजले. आपण आज जे समान हक्क म्हणून म्हणतो ते रामदासांनी तेव्हाच सांगून ठेवले होते. स्वतः ते ब्रम्हचारी होते. मराठी साहित्यातील काव्य मला अतिशय भावले. माझा तो विषयही नव्हता, commercially त्याचा काही फायदा झाला नाही; पण माझा mind set घडविण्यामध्ये ह्या काव्याचा फार मोठा वाटा आहे आणि पुढच्या आयुष्यात मला याचा फार मोठा फायदा झाला.

दीपक घैसास पुढे आठवणी सांगतच होते. पण मी मात्र विचार करत होते की हे असे नारळाप्रमाणे बाहेरून खडबडीत आणि आतून हळुवार कविमन असलेले असे हे व्यक्तिमत्त्व कसे घडले! एक उद्योगपती आणि एक कविमन समीकरणच जुळत नाही! मराठी कवयित्रींच्या काव्याच्या तळाशी जाऊन त्यातील गर्भितार्थ शोधून, त्यावर मनन चिंतन करून जीवनाच्या पुढच्या प्रवासात वापर करणारे घैसासांसारखे व्यक्तिमत्त्व क्वचितच आढळते!

यथावकाश माझे B.Com. झाले. नंतर मी CA-झालो, पुढे कंपनी सेक्रेटरी झालो आणि मग नोकरी सुरू झाली. एका फार्मा कंपनीत! ज्या MD ने मला select केले होते तो भेटला की अजूनही मला सुनावतो की now i think it was a right decision! कारण त्यावेळी बरेच CA-interview ला आले होते. आणि त्यांनी एवढ्या लोकातून मला select केले होते. त्याच कालावधीत माझ्या मित्राचे



वडील गेले होते आणि एक अगदी वेगळा असा उद्योग त्याने सुरू केला होता. ship shanting चा ! म्हणजे ship जेव्हा बंदरात उभी असते तेव्हा त्याला सर्व अन्नधान्याचा पुरवठा करायचा. तांदूळ, चिकन, डाळींपासून सर्व food supply, raw material किचनचे सर्व सामान! अन्नधान्याचा सर्व साठा भरुन ते ship दोन-तीन महिने बाहेर जायचे. माझ्या मित्राला मदत करायला आणखीन कोणी नव्हते. मी त्याच्या कामात मदत करायला सुरुवात केली आणि मी ते काम अक्षरशः enjoy केले.

नंतर याचवेळी मग आम्ही कॅटरिंग पण सुरू केले. मला ह्या धंद्यातील काहीच माहिती नव्हती; पण एकदा सुरू केले, त्यातील खाचखळगे अनुभवले आणि मग त्या कामात रस निर्माण व्हायला लागला. त्याचे असे झाले की Bombay High ला platforms बांधत होते. Hitachi म्हणून फॉरिन कंपनी होती ती हे काम करत होती. त्यावेळी तेलाचा नुकताच शोध लागत होता. ती जी लोकं होती त्यांना offshore ला कोणीतरी catering supplier हवा होता. मग आम्ही विचार केला की catering service का सुरू करू नये! manpower आमच्याकडे होतीच. आणि बघता बघता ५ वर्षांत हा आमचा business खूप मोठा झाला. मला kitchen, red wine बरोबर कोणते meat चालते, कशाबरोबर काय चालत नाही असे अनेक अनुभव आले. आमच्या घरात तर अंडे पण चालत नव्हते. pantry, galley design कसे करायचे ते शिकलो. पहाटे ४ वाजता उठून रेती बंदरावर जाऊन मासे खरेदी करायचे, फळे खरेदी करायची. लहानपणी घरातसुद्धा अशाप्रकारचे काम कधी केले नव्हते! तिथे oetions असतात माश्यांचे! हातावर हात मारून टाळी मारायची असते. बाजूच्याला समजता कामा नाही की गड्डा कितीला गेला ते! भर पावसात ही सर्व गंमत करून बघितली.

त्याचवेळी जगभरच्या वेगवेगळ्या कंपन्यांशी, त्यांच्या लोकांशी माझा संबंध आला. Hitachi हे जॅपनीज पार्टनर, हुंडाई कुरिअन होते, NDST जर्मन होते, IPM म्हणून इटालिअन कंपनी होती, टेक्सासमध्ये झपाटा अशा अनेक अग्रगण्य कंपनीज होत्या. अशाप्रकारे जगभरातील लोकांशी संबंध आला! प्रत्येक देशाची style वेगळी, त्यांच्या पद्धती वेगळ्या, विचार वेगळे! पण तेव्हा एक गोष्ट लक्षात आली की if you are honest and upfront असाल तर सर्वांबरोबर जमते. जॅपनीज लोकांना काही द्यायचे झाले तर वाकून द्यावे लागते, US मध्ये visiting card बसून देता येते. प्रत्येक देशाची पद्धत निरनिराळी असते. Culture वेगळे असते. हळूहळू त्यांच्याशी deal करण्याची पध्दत समजत गेली. आम्ही एकेक गोष्ट समजून घेत होतो. त्यावेळी आम्ही आमच्या व्यवसायात एवढे मग्न होतो की आम्हाला समजले नाही की आम्ही नकळत सर्व गोष्टी शिकत आहोत. पण पुढे लक्षात आले की जगभरच्या वेगवेगळ्या लोकांशी संबंध आल्यामुळे खूप काहीतरी आम्हाला मिळाले आहे. आमचे विचारांचे क्षितीज रुंदावले आहे.

साधारण ५वर्षे तिथे खूप अनुभव घेतले, business वाढवला आणि मग माझ्या मनात आले की आता काहीतरी दुसरे करू या. मग मी IT क्षेत्रात जायचे ठरवले. धंदा सोडला, गाडी वगैरे चैनीच्या सर्व गोष्टी काढून टाकल्या आणि IT त आलो. Tata मध्ये ५ वर्षे नोकरी केली. मला हे शिकायचे होते की How Tata manages! माझ्या सुदैवाने JRD Tataच त्यावेळी बोर्डावर होते. दिनू मोदी, रुसी मोदी, चंद्रकांत गरवारे हे सर्व होते. ही सर्व मोठी मोठी लोकं ज्या पद्धतीने विचार करायची- त्यावेळी समजायचे नाही, पण आज जेव्हा corporate governance हा शब्द किंवा value system, ethical standard- यावर मी जेव्हा सह्या करून घेतो, तेव्हा त्यांचे विचार लक्षात येतात! JRD was far above that!

नंतर एकदा मी आणि जे इराणी एका corporate seminar च्या event ला बसलो होतो, तेव्हा मी सहज त्यांना म्हटलं की आता तुम्ही टाटा मधून retired झाला आहात, मीसुध्दा टाटामध्ये नोकरी करत होतो. मला असे वाटते की you missed the growth because your ethical standard was very high. पण काहीजणांची growth fast झाली. आता आज जेव्हा तुम्ही पाठी वळून बघता तेव्हा तुम्हाला पश्चात्ताप होतो का? तेव्हा त्यांनी उत्तर दिले की not even by one inch. -I lived long life- but what did he give me- it was much more valued आणि ते म्हणाले ते खरेच होते!

मला आतासुध्दा कोणी विचारतं, माझा interview घेतात तेव्हा, की तुम्हाला घरून काही कॅपिटल मिळालं होतं का? मी सांगतो की हो मोठे कॅपिटल मला मिळाले आहे आणि ते म्हणजे value system! आणि हे संस्कार कुठेही फ्री मिळत नाहीत. हे संस्कार तुम्हाला बाहेर कुठेही मिळणार नाहीत! वंशपरंपरागत हेरिडीटरी तुमच्याकडे येतात.

माझे वडील ४० वर्षे मुंबई महानगरपालिकेत नोकरी करत होते. मी वडिलांना सांगायचो की तुम्ही जेव्हा नोकरी करत होता तेव्हा जर आतासारखी परिस्थिती असती तर तुम्ही खूप लवकर निवृत्त झाला असता. त्या मानसिकतेने आता काम करणे बिलकुल कठीण आहे. स्वतःची तत्त्व, values याला आयुष्यात फार मोठे स्थान आहे.

दीपक घैसास यांचे JRD विषयींचे मत, इराणी यांनी दिलेले उत्तर, वडिलांना त्यांनी सांगितलेले विचार ऐकले आणि लक्षात आले की, दीपक घैसास यांच्या नसानसात, रक्तात नैतिकता, तत्त्वनिष्ठता, values यांचे संस्कार भिनले आहेत, जणू त्यांच्या विचारांचा ते एक अविभाज्य भाग झाले आहेत.

दीपक पुढे सांगत होते– ५ वर्षांनी मला अमेरिकेला जायचा योग होता. मी त्यावेळी electronics च्या factories पाहिल्या. त्यावेळी software companies पण पहिल्या. आम्ही तीनजण एकत्र आलो. स्वतःचे काहीतरी सुरू करायचे ठरवले, फक्त ठरवले की सर्व्हिस कंपनी नको. कारण अगोदरच ३०० सर्व्हिस कंपनीज होत्या, म्हणून काहीतरी made in India product करायचे ठरवले. आधीच्या finance background मुळे ४०% finance citi venture मिळाले. मिलिअन डॉलर capital ने सुरुवात केली. ६०% आम्ही जमवले. We started citi cob information tech– मग लक्षात आले की हे city नाव काढून टाकणे लाभदायक आहे म्हणून ते Iflex मध्ये convert केले. पैसे नव्हते म्हणून अमेरिकेला जाऊन product विकणे शक्य नव्हते. मग सर्व जगभर फिरलो. सर्व मार्केट्स tap केली. आफ्रिकेतील २३ देशांमध्ये फिरलो. शाळेत ज्यावेळी मी भूगोल शिकलो आणि समजला त्यापेक्षा कितीतरी पट अधिक चांगला भूगोल मी त्यावेळी शिकलो. अक्षरशः भूगोल मी अनुभवला! मला तो देश आवडला. तेथील लोकं, त्यांचा स्वभाव– negotiative, understanding, progressive लोकं होती. मला लोकांना समजून घ्यायला, त्यांचे विचार, त्यांची philosophy समजून घ्यायला आवडते. नंतर फिलिपिन्स, इंडोनेशिया येथे products विकली. २००२ नंतर आम्ही IPO बनवला. १ मिलियन डॉलर IPO चे ५३० मिलिअन डॉलर केले आणि नंतर २००८ मध्ये आम्ही Oracle ला आमची कंपनी विकली. Great value generation in the world from India. इंडियातील एक युनिक उदाहरण म्हणावे लागेल.

ज्यांनी शेअर्स घेतले होते, ती लोकं कोट्याधीश झाली. अजूनही भेटले की कृतज्ञता व्यक्त करतात आणि त्यामुळे समाधान वाटते.

आम्ही core banking solutions हे जे product तयार केले होते ते ६०० बँक वापरत होत्या. Citi banks ९० देशांमध्ये, UBS सिंगापोर, जपान, ADCB – ३ अबुधाबी आणि ६ दुबई. –Absay साऊथ आफ्रिका, गल्फ बँक, कुवेत, मस्कत, बहारिन, इजिप्त– ४०% इजिप्तची अर्थव्यवस्था ही आमच्या सॉफ्टवेअरवर अवलंबून होती. सौदी, जेव्हा लिबिया open झाली तेव्हा लीबियात गेलो, इस्लामिक बँकिंगमध्ये आम्ही गेलो.

वय ५० शी कडे झुकत होते. तेव्हा वाटले आता दुसरे काही करू या. एक option होता तो म्हणजे Citi buy करणे. पण १९८७ ते २००६ पर्यंत IT झाले होते. दुसरे काही करायचे डोक्यात घोळत होते आणि अचानक योग आला. वयाच्या ४८ व्या वर्षी मी एका फार्मा कंपनीच्या बोर्डावर गेलो. त्यावेळी मला Health Care विषयी बरेच काही शिकता आले. माझी बायको जिनेटिक्समध्ये होती, त्यामुळे मला त्या विषयाची माहिती होती.

एकदा मी France ला गेलो होतो, त्यावेळी तिथे एक फ्रेंच न्यूरो scientist भेटला. तो फ्रेंच होता; पण त्याला इंग्रजी उत्तम येत होते. त्यावेळपर्यंत आपल्याकडे dental stem cell बद्दल कोणालाही फारसे माहीत नव्हते. त्याने मला या विषयाबद्दल खूप माहिती दिली, शिकवले. १९८७ च्या काळात भारतात IT क्षेत्राबद्दल लोकांना काहीही माहीत नव्हते. त्यावेळी भारताची जी अवस्था होती, तीच अवस्था आज भारताची BioTechnology ह्या क्षेत्रात आहे. फरक एवढाच आहे की आपण त्यावेळी पाश्चिमात्य मार्केटवर अवलंबून होतो,कारण There was no consumption in India. पण मला असे वाटते की biotechnology साठी भारतात आज भरपूर scope आहे, स्टफ आहे. कारण life expectancy वाढते आहे आणि आताची जी मेडिकल सिस्टीम आहे ती disease cure करत नाही तर तो disease chronic करते. एकदा रोग क्रॉनिक झाला की फार्मा कंपनी खूष असतात, कारण त्याचा फायदा त्यांना मिळतो.

पण आता जगभर लोकांच्या हे लक्षात आले आहे. त्यांना रोग लवकर बरा व्हायला हवा असतो. जेव्हा आयुष्यमान वाढत आहे तेव्हा ७०/९० च्या वयामध्ये आपण काय typeचे quality life जगतो आहोत ते महत्त्वाचे आहे.



सेंट्रल बँक ऑफ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India
1911 पासून आपल्यासाठी ''केंद्रित''
www.centralbankofindia.co.in
"CENTRAL" TO YOU SINCE 1911
सणासुदीच्या हंगामासाठी
भव्य बोनान्झा ऑफर
पुढील कर्जावर
प्रक्रिया शुल्कामध्ये पूर्ण सूट
होम
सेंट व्हेईकल
वाहनांसाठी कर्ज
सेंट मॉर्गेज
संपत्तीच्या मॉर्गेज समोर कर्ज
रेन्टल्स
सेंट पर्सनल गोल्ड लोन
सोन्यावर कर्ज / ओवरड्राफ्ट
सेंट ट्रेड स्कीम
व्यापाऱ्यांसाठी ओवरड्राफ्ट सुविधा
सेंट शॉप योजना
पर्सनल लोन
आम्हाला लाइक करा: https://www.facebook.com/CentralBankofIndiaMumbai
आम्हाला फॉलो करा: https://twitter.com/centralbank_in
आमच्या ग्राहक अनुरुप उत्पादने आणि सेवांविषयी अधिक माहितीकरिता आमच्या जवळच्या शाखेशी संपर्क करा किंवा आमच्या वेबसाइट www.centralbankofindia.co.in वर लॉग ऑन करा
उत्सव ऑफर
मर्यादित कालावधी साठी उपलब्ध

विशेषतः जेव्हा तुम्हाला चालता येत नाही, डोळ्यांना दिसत नाही, गोड खाता येत नाही, मीठ खाता येत नाही आणि डॉक्टर मेडिसिन देऊन तुम्हाला जिवंत ठेवतात, मरू पण देत नाहीत. प्रत्येक माणसाला ज्या dignity ने आयुष्य जगलेले असतो त्याच dignity ने जगायचे असते, लाचार होऊन जगायला कोणालाही आवडत नाही. अशावेळी biotechnology मध्ये मेडिसिन सापडते. अशावेळी any reflective problem, there is a regenerative therapy from stem cells!

आज आपण जे काही मिळवतो त्यातील १/३ हिस्सा health care साठी राखून ठेवला पाहिजे. खर्च केला पाहिजे. आज डॉक्टर तुमच्या health ची काळजी घेत नाहीत तर, तुमच्या रोगाची काळजी घेतात. आज जगामध्ये अशाप्रकारची health care सिस्टिम हवी की त्यामुळे आधीच diagnosis होऊन डॉक्टरने तुम्हाला तुमच्या खाण्याच्या habits, तुमचे diet, तुमची lifestyle ह्याबद्दल advice द्यायला हवा. सर्व routine check up नंतर सांगायला हवे. त्यामुळे heart attack किंवा तत्सम रोगाचे प्रमाण काही अंशी तरी कमी होईल. heart attack आला की डॉक्टरकडे धावायचे नाही तर त्याची काळजी आधीच घ्यायची. सर्वसाधारणपणे काही व्हायला लागले की आपण डॉक्टरकडे धाव घेतो, तब्येत चांगली असताना जात नाही. आज जगाला Health Careची जरूर आहे. तिथे preventive medicine आहे, curative medicine आहे. this is got to be curable. उदा. Knee replacement मध्ये your own stem cells helping you in regenerating decayed bone.

मी मधेच त्यांना म्हटले आणि या खोलवर झालेल्या अभ्यासातूनच तुमच्या अध्यक्षतेखाली २००९ मध्ये Gencoval Strategic Services Pvt. Ltd. या कंपनीची स्थापना झाली का? स्मितहास्य करत त्यांनी दुजोरा दिला.

एका सामान्य मध्यमवर्गीय मराठी घरात जन्माला आलेल्या, मराठी माध्यमात शालेय शिक्षण झालेल्या एका मुलाची chartered accountant ते chairman ही भरारी पहिली की लक्षात येते, की प्रत्येक भरारी किती आत्मविश्वासपूर्वक, जिद्दीने आणि अचूक वेध घेऊन घेतलेली होती!

आणि... आणि मनात कुठेतरी दुबईच्या प्रगतीची भरारी आठवली आणि दीपक घैसास यांचे दुबईविषयीचे अनुभव आणि मत ऐकायला कान उत्सुक झाले .

मी त्यांना म्हटले, कामानिमित्ताने तुम्ही अनेक वेळा दुबईला भेट दिली, दुबईविषयी तुमचे काय मत आहे? कारण जगभरच्या अनुभवांच्या मुशीतून, दुबईबद्दल तुमचे मत तयार झाले असेल आणि म्हणूनच ते विचारणीय आणि मार्गदर्शक असेल!

दीपक घैसास सांगू लागले, कामाच्या निमित्ताने माझे दुबईला येणे-जाणे झाले, त्यामुळे थोडीफार माहिती होती. पण खरी माहिती मिळत होती ती पेपरातून! आखातात तेल सापडले आणि पेपरमध्ये दररोज काहीना काही बातम्या येऊ लागल्या आणि स्वतःच्या व्यवसायाच्या निमित्ताने जगात कुठे काय चालले आहे याची मी सर्व माहिती मिळवत होतो. यापूर्वीच बुद्धिजीवी वर्गाचा ओघ अमेरिकेकडे चालू झाला होता. पण तेल सापडले आणि आखाती देशात आलेल्या पैशामुळे प्रगतीला सुरुवात झाली. बुद्धिजीवी आणि कामगार वर्ग मोठ्या प्रमाणावर दुबईत जाऊ लागला.

१९७०-७५ चा काळ असेल. त्याचवेळी जगभर तेलाच्या किंमती भडकू लागल्या होत्या आणि त्यामुळे सर्व जगाचे लक्ष हळूहळू आखाताकडे जाऊ लागले होते. आतापर्यंत मागासलेला, अशिक्षित, गरीब, चाचेगिरी करणारा, तस्करी करणारे देश म्हणून सर्व आखाती देश ओळखले जात होते. पण देवाने तेलाचे माप त्यांच्या पदरात घातले आणि आखाताचे रूपच पालटले. त्यातही दुबई, कुवेत अशा काही देशांमध्ये भारतीय, पाकिस्तानी लोकं हळूहळू जायला लागली. कारण तेलामुळे पैसा आला आणि सुधारणा व्हायला सुरुवात झाली. त्यातही दुबईकडे सर्वात जास्त ओढा होता. त्याकाळी दुबईबद्दल अनेक अपप्रवाद होते. प्यायला पाणी मिळत नाही. बायकांना राहायला अजिबात सुरक्षित नाही. बायकांना बाहेर हिंडता येत नाही. एक ना अनेक! त्यात भर म्हणून आपले भारतीय बांधव एजंट बनून लोकांना दुबईत नोकरीचे आमिष दाखवून, पैसे घेऊन नंतर पद्धतशीरपणे फसवत होते. पण तरीही पैशाच्या आशेने लोकं दुबईत जाऊ लागली.

त्याकाळात दुबईत प्रगती व्हायला सुरुवात झाली होती, त्यामुळे जो मेहनत करील त्याला भरपूर कामे मिळत होती. पैसा मिळत होता. मिळणाऱ्या पैशावर taxes नव्हते. जे मिळवाल ते तुमचेच होते. अर्थातच त्या काळात जी लोकं इथे आली आणि त्यांनी मेहनत केली त्याला खरं तर तोड नव्हती कारण त्यावेळी इथले जीवन अतिशय कष्टदायक होते, कोणत्याच सुधारणा नव्हत्या, घरेदारे नव्हती, रस्ते

नव्हते. मेट्रो बसेस नव्हत्या. दळणवळणाची साधने नव्हती. होत्या त्या शेअर टॅक्सी आणि अब्रा! कायदेकानून, नीतिनियम काही नव्हते. त्यामुळे येथील लोकांशी, सरकारी ऑफिसेसमधून जमवून घेऊन काम करणे म्हणजे तारेवरची कसरत होती. आणि म्हणूनच आजच्या दुबईच्या यशामध्ये त्यांचा वाटा नक्कीच आहे.

ह्या काळात आलेल्या भारतीयांनी पुढच्यांसाठी पाऊलवाट नक्कीच सोपी करून ठेवली. अशा प्रकारे साधारण १९८५/९० पर्यंत दुबईच्या प्राथमिक सुधारणा झाल्या होत्या आणि नंतर दुबईने अशी उंच भरारी घेतली की सर्व जग आश्चर्याने थक्क झाले. वाळवंटाचे रुपांतर नंदनवनात केले. एक रखरखीत वाळवंट tourist spot म्हणून ओळखले जाऊ लागले. खरोखर कल्पनेच्या पलीकडची अशी ही प्रगती आहे. आणि ह्याचे सर्व श्रेय आहे ते तेथील शेख आणि त्यांचे सहकारी! त्यांची कल्पकता, दूरदृष्टी, नियोजन क्षमता, मेहनत करण्याची तयारी, मिळालेल्या परिस्थितीवर रडत न बसता सकारात्मकतेने मार्ग काढण्याची वृत्ती! जबरदस्त आशावाद!

ही जी प्रगती झाली तिचा वेग जबरदस्त होता. तिचा आलेख बघता बघता उंचावत गेला आणि आकाशाला भिडला. साधारण २००० पासून ही सुरुवात झाली. पण गेल्या तपातील ह्या वेगाने मनात भीती निर्माण केली. अक्षरशः एका पाठोपाठ एक अशी शिखरे पादाक्रांत करत दुबईने जगाच्या नकाशावर मानाचे स्थान मिळविले. ह्या वेगाने खरोखर विचार करायला लावले की ही प्रगती पचनी पडणार ना! कारण कोणताही नवीन बदल असतो तो समाजाच्या पचनी पडायला थोडा काळ जावा लागतो. प्रगती ही नेहमी टप्प्याटप्प्याने व्हावी लागते. आणि एकदा झालेली प्रगती sustain करण्याची ताकद असणे आवश्यक असते. जसे यश मिळविणे सोपे असते, पण ते टिकवणे कठीण असते. हे जितके मानवी जीवनात सत्य आहे तेवढेच एखाद्या देशाच्या बाबतीतही सत्य आहे.


आखाती देशात तेलाचे साठे सापडले, पण दुबईत नाही. दुबईची हुशारी यात आहे की आजूबाजूच्या आखातातील संधीचा फायदा मोठ्या हुशारीने दुबईने स्वतःसाठी करून घेतला. आज आखाती देश म्हटले की फक्त दुबईचे नावच दिसते. तेल मिळाले इतरत्र आणि प्रगती झाली दुबईची! पण म्हणूनच आता दुबईपुढे मोठे आव्हान आहे ते ही प्रगती टिकवण्याचे! तेलाचे साठे संपल्यावर काय? त्यातही दुबईला स्वतःला तेल सापडलेले नाही. आणि म्हणूनच पैसा उपलब्ध करण्यासाठी काही उपाय करावेच लागतील... हातपाय हलवावेच लागतील. आज दुबई tax free आहे म्हणून कौतुक आहे; पण लवकरच taxes लावल्याशिवाय पर्याय नाही. कारण नाहीतर पैसा येणार कुठून?

आणि हळूहळू दुबईत direct नव्हे, पण indirect taxes यायला सुरुवात झाली आहे. घरे, खाद्यपदार्थ महाग झाले आहेत. पार्किंग फ्री राहिले नाही, हायवेवर टोल भरावा लागतो. कोणतेही सरकारी काम, पदार्थांची आयात-निर्यात, उद्योगधंद्यांचे परवाने अशा बारीकसारीक अनेक गोष्टींवर सरकारने 'कर' लावले आहेत. दुबईमध्ये स्थानिक लोकांपेक्षा बाहेरच्या देशातील लोकांची संख्या जास्त आहे, तसेच हे tourist center झाले आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या व्हिसाची फी सरकारने वाढवली आहे. म्हणजेच जनता indirect taxes भरते आहे. पण याशिवाय पर्याय नाही.

ही प्रगती sustain करण्यासाठी, पैसा उपलब्ध करण्यासाठी tourism वर भर द्यायला पाहिजे. दुबई सरकारने हे काम सुरू केले आहेच. त्यासाठी tourist attractions वाढवायला हवीत. बाहेरच्या जगात पाश्चिमात्य देशात जी attractions आहेत ती सर्व जर इथेच उपलब्ध झाली तर Asia आणि आफ्रिकातील लोकांचा ओघ इथे वाढेल. कारण जवळ असल्यामुळे सर्वच दृष्टीने सोयीस्कर असेल. Tourism वाढल्याने देशाला मदत होईल.

Expo 2020 चे आव्हान दुबईने स्वीकारले आहे, आणि पैसे उपलब्ध करण्याच्या दृष्टीने त्यांचे हे उचललेले पाऊल योग्यच आहे.

त्याचबरोबर security चा विचारही सरकारला करावा लागेल. देशात जेव्हा tourism वाढते, तेव्हा तीन गोष्टी प्रामुख्याने आवश्यक असतात. पहिली म्हणजे safety. येणाऱ्या टुरिस्टच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही सरकारची असते आणि त्यामुळे सरकारचे लक्ष असणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट खाद्यपदार्थ! आज दुबईत अक्षरशः जगातील सर्व ठिकाणचे cousine मिळते. तिसरी गोष्ट म्हणजे cleanliness! आज दुबईइतकी स्वच्छता जगात कुठेही आढळत नाही. पण ज्यावेळी शहर मोठे होत जाते त्यावेळी security, food, cleanliness ह्या सर्व गोष्टींवर लक्ष ठेवणे कठीण होते. जेव्हा दुबई छोटे शहर होते तेव्हाच्या दुबईत आणि आताच्या दुबईत फरक झाला आहे. ती सुरक्षितता



# DEEPAK GHAISAS

- Deepak Ghaisas, the Chairman of Gencoval Strategic Services Pvt Ltd.
- Stemade is first venture in market.
  Stemade is proud to be Indias first private dental stem cell bank. By pioneering this technology. Stemade will help in building an entire generation, that will be able to face their future confidently. (To know more please visit - www.stemade.com )
- He was the CEO - India Operations and CFO of I-flex Solutions Ltd., India until Aug. 2008.
- He has worked in the software industry since 1987.
- In 1993, Ghaisas joined as the Chief Financial Officer of I-flex Solutions Ltd., India for its global operations. In 1997, he added the role of the Chief Executive Officer (India Operations), while retaining the CFO position.
- He was the recipient of the CFO Asia Award in 2001, the first Indian to win the award.
- He has been involved in the software industry in a number of roles, including:
- Executive Member of The Nasscom Executive Council
- Vice President of the Maharashtra Economic Development Corporation (MEDC), a governing body who actively participates in the decision-making process for the economic development of the State of Maharashtra, India
- Member of Executive Council of Western India CII
- Member of the Committee of the Indian Institute of Bankers constituted for the purpose of drafting the curriculum for Information System Audit course for bankers.
- Member of the Internet Banking Committee of the Reserve Bank of India, which formulated guidelines on Internet banking and security in India.

ती स्वच्छता आज दिसत नाही आणि म्हणूनच ह्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

दुबईने ही जी देदीप्यमान प्रगती केली त्यामुळे दुबईचाच नव्हे तर भारताचाही फायदाच झाला आहे. लाखो लोकं दुबईत गेली, केवळ कामगारवर्गच नव्हे तर professionals पण गेले, तिथे वर्षानुवर्षे राहिले, मेहनत केली, आपल्या बुद्धीसामर्थ्यावर आपले व्यवसाय स्थापित केले, दुबईच्या प्रगतीला हातभार लावला तसेच भारताच्या प्रगतीलाही मोठा हातभार लावला आहे. भारताच्या तिजोरीत परकीय चलनाची सर्वात अधिक भर पडते ती दुबईतून येणाऱ्या ओघामुळे. लाखो भारतीयांच्या घरात आज आशेचा प्रकाश पसरला किंवा त्यांच्या स्वप्नांना आकार आला तो दुबईमुळेच! आणि म्हणूनच दुबईचे हे ऋण तर आपल्याला मानलेच पाहिजे.

भारतात सरकारी नियम जाचक होते, निर्बंध कडक होते, भारताची बाजारपेठ खुली नव्हती, अर्थव्यवस्था त्याकाळी मुक्त नव्हती. आता हळूहळू बदल होत आहे, पण आधी व्यावसायिकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर exposure मिळत नव्हते. याउलट दुबईची बाजारपेठ खुली बाजारपेठ आहे आणि म्हणूनच त्याकाळात दुबईत गेलेल्या व्यावसायिकांसाठी आंतरराष्ट्रीय ज्ञानाची आणि अद्ययावत संशोधनाची दालने उघडली गेली. जगाच्या कानाकोपऱ्यातून लोकं दुबईत येतात. येथील बाजारपेठेत जगातून येणारा माल बघायला मिळतो, वेगळ्या देशातील लोकांशी संबंध येतो, त्यांच्याकडून बरेच काही शिकता येते, आपले vision रुंदावते. आणि या मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या देशासाठी करता येतो.

आणि म्हणूनच आपले शहाणपण यात आहे की दुबईची प्रगती किती फास्ट झाली, हे योग्य की अयोग्य, आता ही प्रगती sustain होईल की नाही, प्रगतीचा हा जो बुडबुडा आहे bubble आहे, तो अजून किती मोठा होणार, की त्याआधीच तो फुटणार, ह्या गोष्टींचा काथ्याकूट करण्याऐवजी प्राप्त परिस्थितीत आपल्याला जी संधी मिळाली आहे त्या संधीचे सोने कसे करता येईल याचा विचार करण्यात शहाणपण आहे. कारण त्यामुळे स्वतःबरोबर भारताचेही हित होणार आहे!

■ दीपक घैसास
GhaisasD@gmail.com



# शिल्पकार

## प्रमोद लेले

मुलाखतकार : मेघना वर्तक

'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार आणि म्हणूनच नेहमी सकारात्मक राहा' हे वामनराव पै यांचे उद्गार ज्यांच्या बाबतीत यथार्थ ठरले ते अविरत असे व्यक्तिमत्त्व म्हणजेच श्री. प्रमोद लेले! जीवनाच्या शर्यतीत दुसरा नंबर कधीच नसतो, असतो तो पहिला नाहीतर १०वा नंबर, अशी खूणगाठ मनाशी पक्की बांधून पहिल्या नंबरसाठी जिद्दीने प्रयत्न करणारे प्रमोद लेले! आणि म्हणूनच असे तत्त्वज्ञान ज्यांच्या विचारांचा पाया आहे त्या प्रमोद लेले आणि दुबई शहर यांच्यात एक अनामिक असा भावबंध तयार झाला. परमेश्वराने वाळवंटाचे माप दुबईच्या पदरी घातले, पण त्यामुळे रडत न बसता सकारात्मक दृष्टी ठेवून, आपल्यात असलेले गुण शोधून, त्यांचा विकास करून जिद्दीने, मेहनतीने, दुबईने त्याच वाळवंटाचे रूपांतर नंदनवनात केले. दुबई स्वतःच स्वतःची शिल्पकार झाली आणि जगाच्या नकाशावर स्वतःचे असे स्थान निर्माण केले.

तद्वतच आयुष्याच्या प्रत्येक वळणावर येणाऱ्या परिस्थितीशी सामना करत, अन्यायाला सामोरे जात, सकारात्मकतेने जिद्दीने वाटचाल करत प्रमोद लेले स्वतःच स्वतःचे शिल्पकार झाले आणि स्वतःचे असे स्थान निर्माण केले आणि म्हणूनच एकच पाऊलवाट असलेल्या दुबईत व प्रमोद लेले यांच्यात एक ऋणानुबंध तयार झाला. आपल्या माणसाला भेटायला जावे त्याच आत्मियतेने, त्याच ओढीने ते अनेक वेळा दुबईला येतात!

मी त्यांना म्हटले, लेले साहेब आम्ही दुबईत गेली ४० वर्षे राहात आहोत. दुबईची स्थित्यंतरे, चढउतार, बरे-वाईट अनुभव हे सर्व आम्ही प्रत्यक्ष अनुभवले आणि म्हणूनच आज दुबईची प्रगती बघून खूप आनंद होतो. दुबईच्या समांतर रेषेतच तुमच्याही आयुष्याची वाटचाल झाली आहे आणि म्हणूनच तुमचे अनुभव नक्कीच सर्वांनाच आवडतील, वाचकांना मार्गदर्शक ठरतील!

Parke Davis ह्या अमेरिकन कंपनीचे Chairman, मुंबईतील प्रतिथयश हिंदुजा हॉस्पिटलचे CEO, Johnson Johnson ह्या अमेरिकन कंपनीचे VP आणि बालवयातच समाजसेवेचे व्रत घेतलेल्या, प्रमोद लेले यांच्या चेहेऱ्यावर स्मितहास्य तरळले आणि त्यांचे मन बालपणीच्या आठवणीत मुंबईतील ग्रँटरोडच्या शास्त्री हॉलच्या घरात पोहोचले. ते सांगू लागले, मध्यमवर्गीय मराठी लोकं आम्ही! प्रामाणिकपणा हा आत्मा! आजोबा 'मराठा हायस्कूल'चे प्रिन्सिपॉल आणि वडील income tax ऑफिसमध्ये नोकरीला. आंब्याची एक पेटी पण कधी भेट म्हणून घरात आली नाही. Honesty, Integrity रक्तात भिनलेली! आता income tax म्हटले की 'अरे वा' असे म्हटले जाते. पण तो काळ वेगळा होता. माझ्या वडिलांचे कौतुक नव्हे तर सर्व लोकच वेगळ्या विचारांची होती. तत्त्वनिष्ठ होती. शास्त्री हॉलमध्ये २०० कुटुंबे राहात होती. इथेच समाजाचे आपण काही देणे

लागतो हे बीज मनात पेरले गेले. आमच्या सोसायटीत गणेशोत्सव साजरा व्हायचा, निरनिराळे सण साजरे व्हायचे. सुखदुःखं वाटली जायची. तिथे माझ्या वडिलांनी एक सहकार योजना सुरू केली. दर महिन्याला प्रत्येकाकडून घरातील सामानाची- गहू तांदूळ, दाणे, डाळी अशी यादी घ्यायची. सामानाची बेरीज करायची. दाणाबंदरहून सामान एकदम आणायचे, साहजिकच सामान थोडे स्वस्तात मिळायचे आणि सर्व रहिवाशांना त्याचा फायदा मिळायचा. महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सामान आणायचे, ऑर्डरप्रमाणे पिशव्या भरायच्या, वाटप करायचे. पहिल्या आठवड्यात लोकांनी पैसे द्यायचे आणि दुसऱ्या आठवड्यात आम्ही दुकानदाराला payment करायचो. १५ दिवसांचे क्रेडिट दुकानदार आम्हाला द्यायचा. त्याकाळी कॉम्प्युटर नव्हते, हाताने बिले बनवायची. ना नफा ना तोटा! थोडाफार फायदा झालाच तर बचत खात्यात ठेवायचा, कधी तूट आली तर त्याचा वापर करायचा! अशा प्रकारे १० वर्षे वडील हे काम करत होते आणि मी त्यांना मदत करत होतो. सहकारी तत्त्वावर काम कसे करावे ह्याचा पहिला धडा मी इथे घेतला, त्याचप्रमाणे माणसाच्या स्वार्थी स्वभावाची पहिली ओळखही इथेच झाली.

सुरुवातीस सर्वांना उत्साह होता. पुढे सर्वांची मुले शिकत गेली. हातात पैसा खेळू लागला. गरज कमी झाली. फुकटात घरी सामान येत आहे ना मग काय हरकत आहे, अशी भावना येऊ लागली. काम करायला येणारी माणसे कमी झाली. नंतर नेहमीच्या जरुरीच्या वस्तूंऐवजी seedless द्राक्ष आणा, अमुक आणा तमुक आणा अशी मागणी काहीजण करू लागले. तोपर्यंत मी CA- पूर्ण करण्याच्या मार्गावर होतो. १२० वे वाटप होते,१८० घरे होती. सर्व वाटप मी, आई, बहीण आणि वडील या सर्वांनी मिळून केले. लोकं मदतीला सुद्धा येईनाशी झाली होती. माझे CA- त्यावेळी पूर्ण होत होते. माझ्या लक्षात आले की लोकांना आता गरज उरलेली नाही. आपणच उगीच passionate होत आहोत. अपात्री दान देत आहोत. सामान घेऊन जाण्यासाठी वेळ रात्री ८ ते ९ अशी ठेवली होती. प्रथम लोकं वेळेत येत होती. त्याच वेळी tv सुरू झाले. घराघरातून लोकं tv सीरिअल्स बघून आरामात दहानंतर सामान न्यायला येऊ लागली. वडिलांना वयाप्रमाणे याचा त्रास होऊ लागला. माणसाच्या स्वार्थीपणाचा एक नमुना बालवयातच माझ्या मनावर कोरला गेला. खरं म्हटले तर आम्ही हे कार्य काहीही फायदा न घेता सर्व लोकांसाठी करत होतो; पण लोकं मात्र स्वार्थीपणाने वागत होती. शेवटी आम्ही हे बंद केले. लहान वयात असे अनेक प्रसंग घडत असतात आणि कळत-नकळत आपण त्यातून बरेच काही शिकत असतो. जे आपल्याला पुढच्या आयुष्यात मार्गदर्शक ठरते!

माझे शिक्षण ६वीपर्यंत मराठी माध्यमातून म्युन्सिपल स्कूलमध्ये झाले. पुढे ११वी S.S.C. झालो. त्याकाळात CA-- चे खूप अप्रूप होते, त्यामुळे माझ्या वडिलांचीही इच्छा होती की मुलाने CA- व्हावे. मी सिडनेहॅमला ॲडमिशन घेतली. B.Com झालो. articleship केली. तीन वर्षांनी CA-- झालो. त्याचवेळी cost accountancy पण केली. त्यानंतर नोकरी सुरू झाली. drafting करताना legal language उपयोगी पडते, म्हणून त्याचवेळी LLB ही केले. हे सर्व करत असताना सोसायटीतील मुलांना कंपनी सेक्रेटरीचा अभ्यास शिकवायचो! त्यांच्या आग्रहाखातर मी CS पण केले. हा काळ असा होता की मित्रांना शिकवताना पण आनंद मिळायचा. अशाप्रकारे दुसऱ्यांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे हे बालपणीच मनावर रुजले होते.

त्यांना मी मधेच म्हटले म्हणजे लेलेसाहेब, समाजसेवेचा धडा अगदी लहान वयातच तुमच्या वडिलांनी तुम्हाला शिकवला. आज बघता बघता जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये तुमच्या समाजसेवेची पाळेमुळे पसरली आहेत आणि त्याचा लाभ अनेक गरजू लोकं घेत आहेत.

लेल्यांच्या चेहऱ्यावर एक सात्त्विक समाधान तरळत होते, पण मन मात्र अजूनही भूतकाळात रेंगाळत होते. मी त्यांना वर्तमानाची आठवण देत हळूच म्हटले लेलेसाहेब, म्युन्सिपल शाळेतला, मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेला एक मुलगा, स्वकर्तृत्वावर उच्चपदी पोहोचतो, समाजामध्ये स्वतःचे असे स्थान निर्माण करतो, ही गोष्ट आजच्या पिढीने, पालकांनी नक्कीच लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण शिक्षणाचे माध्यम किंवा शाळा या गोष्टी गौण आहेत. महत्त्वाचे आहे ती तुमची मेहनत, तुमचे संस्कार! प्राप्त परिस्थितीवर रडत न बसता त्याला सामोरे जाऊन स्वतःच स्वतःचे शिल्पकार बनणे हा एक मोठा आदर्श तुम्ही घालून दिला आहे.

तुमच्या मते एक तर पहिला नंबर असतो किंवा दहावा! लहान वयात तुमचे स्वप्न तर नेहमी पहिल्या नंबरचे होते. मग करिअरमध्ये पण तेच स्वप्न होते का?

माझा प्रश्न ऐकून लेलेसाहेब कटू आठवणींच्या गुंत्यात अडकले, पण तितक्याच तत्परतेने त्यातून बाहेर येत ते

म्हणाले, स्वप्न तर होते MD व्हायचे; पण ते स्वप्न पूर्ण होण्यासाठी बराच काळ लोटावा लागला. नोकरीच्या प्रत्येक वळणावर माझ्यावर अन्याय झाला, माझा अधिकार डावलला गेला, कधी कंपनीतील राजकारण तर कधी माणसाचा स्वार्थीपणा! पण एक सांगतो प्रत्येक टप्प्यावर मला ठेच बसली, जखम झाली; पण म्हणून मी रडत बसलो नाही. प्राप्त परिस्थितीला जिद्दीने सामोरे जायचे आणि आपणच आपल्या आयुष्याला आकार द्यायचा हे माझे सूत्र होते आणि मी ते कायम पाळत आलो आहे.

१९७१ साली पहिला जॉब सुरू झाला. एका फार्मा कंपनीत management ट्रेनी म्हणून. ५ वर्षे factory administrator म्हणून काम केले. लग्न झाले होते. घर खूप लहान होते, मला एक भाऊ-बहीण पण होते. लक्षात आले की दुसरे घर घ्यायचे तर नुसती नोकरी करून चालणार नाही. पैसे कमवायचे तर देशाबाहेर जायला हवे. आहे ती परिस्थिती स्वीकारली आणि East आफ्रिकेला जायचा निर्णय घेतला. दारेसलाम टांगा येथे ३ वर्षे होतो. तिथे Board Of Internal Trade म्हणून होते, तिथे Chief Accountant म्हणून १९७६ ते ७९ पर्यंत काम केले. त्यानंतर भारतात परत आलो.

१९८० ते ९६ पर्यंत Johnson & Johnson या अमेरिकन कंपनीत काम केले. मुलाखतीच्या वेळी कंपनीचे MD पालेकर यांनी मला विचारले, कोणते काम करशील? मी अतिशय स्पष्टपणे सांगितले की मला MD व्हायचे आहे. तेव्हा त्यावर हसून ते म्हणाले, की मी काही एवढ्यात निवृत्त होणार नाही, मी अजून यंग आहे, १० वर्षे लागतील तुला MD व्हायला. तू branch manager होशील का, distribution आणि पूर्ण logistic बघावे लागेल. मग मी branch manager झालो, पण मनात स्वप्न कायम होते की MD व्हायचेच! जॉन्सनच्या वेस्टर्न इंडियाची महाराष्ट्र, गुजराथ, गोवा अशी supply chain होती. तिथे काम केले. दुसऱ्या वर्षी bombay branch मध्ये काम केले. ती शाखा लहान होती. १०/१५ लोकं होती. मी महिन्यातून एकदा मीटिंग घ्यायचो. कोणाचे काही प्रॉब्लेम्स असतील तर ते solve करायचे. दोन मीटिंग झाल्यावर मी माझ्या dy. manager ला सांगितले की आता तू मीटिंग घे. हेतू हा की सर्व नुसते बसून ऐकतात. त्यांच्यावर जबाबदारी टाकली की ते पण शिकतील. त्याने मीटिंग घेतली, कामगारांनी कॅरम बोर्डाची मागणी केली. आम्ही हो म्हटले. minutes of meeting वगैरे लिहायचे शिकविले. पुढच्या महिन्यात पुन्हा मीटिंग झाली, पण कॅरम बोर्ड काही आला नव्हता. मागणाऱ्याने असेच मागितले, देणाऱ्यानेही हो म्हटले, पण नंतर कोणीच follow up केले नाही. पण तेव्हा मी त्यांना दाखवून दिले की साहेबांनी नाही म्हटले की तुम्ही लोकं संपावर जाता आणि त्रास देता. दुसऱ्या महिन्यात त्यांना कॅरम बोर्ड आणून दिला.

पण या एका प्रसंगाने माणसाच्या स्वभावाचा हा एक नमुना लक्षात आला. मालक आणि नोकर, साहेब आणि स्टाफ यांचे नातेच असे आहे. खुर्चीवर बसल्याशिवाय त्यावरील काटे समजत नाहीत. हा एक नवीन कंगोरा होता. पण या एका प्रसंगाने त्या कामगारांच्या मनात माझ्याविषयी आदर निर्माण झाला. आमच्या कंपनीचे मुलुंड plant मोठे आहे. तिथे संप सुरू होता. मुलुंड plant वर काही कामगार होते ते माझ्या हाताखाली bombay branch ला काम करत होते. त्यांना माझ्या कामाची पद्धत आवडली होती. त्यांनी युनियनला सांगितले की संप मिटविण्यासाठी यांना प्रयत्न करायला सांगू. सर्वजण मला भेटायला आले आणि सांगू लागले दत्ता सामंतच्या कचाट्यातून आम्हाला वाचवा. ४ महिने संप चालू आहे, घरात लहान मुलेबाळे आहेत, पगार मिळत नाही, काही करा, पण हा संप थांबवा. १९८३ मध्ये कामगारांची १२०० रुपयांची मागणी होती. संप चिघळला होता. मी management ला सांगितले की मी यात लक्ष घालतो. प्रथम त्यांचा माझ्यावर विश्वास नव्हता. पण नंतर परिस्थितीच अशी निर्माण झाली की त्यांच्यापुढे पर्याय उरला नाही. HR सोडून गेला. त्याचवेळी Defence Ministry ची ऑर्डर आली की सूचर्स बनवायचे! हे सूचर्स बनायचे धारावीत आणि त्यांचे finishing व्हायचे मुलुंडच्या plant मध्ये. त्यावेळी विशेष टाक्यांचे shortage होते. Labour ministry ने धारेवर धरले होते. मग माझी आठवण झाली, कसेही करून संप मिटवायला हवा होता. शेवटी ४०० रु.वरती सह्या झाल्या. इंडस्ट्रीजच्या भाषेत त्याला Two piece settlement असे म्हणतात! संप मोडला आमच्या terms वर! हा आयुष्यात मिळालेला खूप मोठा अनुभव होता.

पुन्हा मी जानेवारीत finance manager म्हणून परत आलो. त्यावेळी आमचे अमेरिकन accounts असायचे. १४ दिवसात पूर्ण करून submission केले. त्यानंतर Indian accounts चे challenge घेतले होते. ६ महिन्याऐवजी २


AAMRUS
• केशर
• हापूस
१ कि आणि
५०० ग्रॅ पॅक्स
शुभ
AAMRUS
दीपावली
आंबे आता ३६५ दिवस उपलब्ध!*
१००% प्राकृतिक
टिकवण्यासाठी द्रव्ये मिसळलेली नाहीत
कृत्रिम स्वाद घातलेले नाहीत
कृत्रिम रंग घातलेले नाहीत
असे रुचकर पदार्थ तयार करा
बर्फी
मिल्कशेक
आइसक्रीम
आम्रखंड
फिरनी
कुल्फी
www.aamrus.in
आमरस खिलाओ, खुशियाँ मनाओ।
Jain Farm Fresh
Manufactured & Packed By :
care@jainfarmfresh.com; www.jainfarmfresh.com; www.aamrus.in

महिन्यात पूर्ण करायचे! ते पूर्ण केले. मार्चमध्ये मला managerने विचारले की HR Incharge व्हाल का? माझ्या आयुष्यातील best decision होता तो! १९८४ ते ८९ हा सुंदर काळ होता. दत्ता सामंतबरोबर पुन्हा agreement झाले. दस्तूर, राजा कुलकर्णी, RC Mehta हे सर्व त्याकाळातील मोठे union लीडर होते. ह्या सर्वांबरोबर settlement करताना, मानवी स्वभाव, कंपनीतील राजकारण, union मधील politics, कामगारांचे होणारे हाल, सरकारी दडपणे अशा नानाविध गोष्टींचा अनुभव या काळात अगदी जवळून घेता आला. त्यावेळी Johnson च्या सहा factories होत्या. २५०० नोकर होते. Johnson Tiles म्हणून magazine काढले. Reach Out म्हणून field staff साठी एक मासिक काढले. Johnsoniyan म्हणून त्रैमासिक सुरू केले. Preserve what you want ही कामगारांसाठी पुस्तिका काढली. कामगारांना त्याकाळात माहीत पण नसायचे की त्यांच्या provident fund मध्ये किती पैसे आहेत. या पुस्तिकेत PF किती, NSS मध्ये किती पैसे आहेत हे लिहून ठेवायला शिकवले. त्यामुळे त्यांना एके ठिकाणी सर्व माहिती मिळायला लागली. त्याकाळात Johnson & Johnson म्हणजे known as a tension & tension असे होते. कारण त्यांची नीती होती higher fier! दर शुक्रवारी सर्वांना पिंक स्लीप मिळायची आणि त्यातून पुढचे भवितव्य समजायचे!

जॉन्सन कंपनीत १६ वर्षे वाहून घेतलेले प्रमोद लेले कंपनीच्या कटू-गोड आठवणीत दंग झाले होते. मी त्यांना मधेच म्हटले, साहेब कंपनीत कामगारांसाठी, स्टाफसाठी तुम्ही विविध मासिके काढलीत, त्यांच्या बारीकसारीक सोयींचा विचार केलात, काम करता करताच तुम्ही त्यांना अनेक गोष्टी शिकवल्या, त्यांच्या मनात तुमच्याबद्दल विश्वास निर्माण केलात. हे पाहून लक्षात येते की दुसऱ्यांसाठी, समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ, समाजसेवेची मुळे तुमच्यात किती खोलवर रुजली होती!

त्यावर प्रमोद लेले म्हणाले, आपण समाजाचे काही देणे लागतो हे मी अतिशय मानतो आणि त्याप्रमाणे प्रयत्न करतो. फळाची पर्वा कधीच करत नाही. ते पुढे सांगू लागले.

जॉन्सन ॲण्ड जॉन्सन एक अमेरिकन कंपनी होती. ७५% शेअर्स अमेरिकन कंपनी आणि २५% सुशील प्रेमचंद (मुंबईतील सुप्रसिद्ध राजाभाई टॉवर वरील घड्याळ ज्याच्या मालकीचे आहे त्या किशोर प्रेमचंद यांचा मुलगा) यांचे होते. त्यामुळे ही एक फॉरेन कंपनी होती आणि त्यांची नीती वेगळी होती. मी HR Head झालो, पण जॉन्सनचा नं. १ कधीच झालो नाही. ५ वर्षांनी पालेकर निवृत्त झाले. तोपर्यंत मी consumer handle केला होता. sales and marketing चा पूर्ण अनुभव घेतला. कंपनीचा turnover २५ चा ३० कोटी -३० चा ५०- ५० चा ७५- ७५ चा १५० डबल केला. १९७९ ते ९६ ही १६ वर्षे मी कंपनीसाठी वाहून घेतली, अनेक चांगली कामे केली. कंपनीसाठी तसेच कामगारांसाठी! पालेकर retired झाले, वाटले होते आता MD होणार- पण नाही. माझाच एक सहकारी इंडोनेशियात काम करत होता, त्याला भारतात परत यायचे होते. त्याचे इंटरनॅशनल networking होते, माझे तर काहीच नव्हते कारण मी इंडियात होतो. मला डावलून त्याला MD केले. स्वतःच्या स्वार्थासाठी मैत्रीच्या नात्याची, किंवा नैतिक जबाबदारीची पर्वा न करणाऱ्या मानवी स्वभावाचा आणखी एक अनुभव घेतला.

१ जानेवारी ९७ रोजी मी पार्क डेव्हीस या अमेरिकन फार्मा कंपनीत MD म्हणून जॉईन झालो. जॉन्सनमध्ये १६ वर्षे घालवली होती, पण MD कधी झालोच नाही. इथे पहिल्या दिवशीच MD झालो. पार्क डेव्हीस ही Warner Lambert US ची सबसिडीअरी होती. बेनाड्रील, जेरुसील ही त्यांची मेजर products होती. वॉर्नर क्लोरेक्स, सिप्लेक्स, अशी आमची फार्मा कन्फेक्शनरी डिव्हिजन होती. नंतर याच कंपनीत २००२ मध्ये मी MD चा Chairman झालो . त्याचवेळी Pfizer कंपनीने worldwide Warner Lambert acquire केले, त्यामुळे आमची कंपनी पार्क डेव्हीस पण घेतली- साहजिकच I had to step down! त्याचवेळी पार्क डेव्हीस आणि Pfizer merj होऊन New India Pfizer चे presentation करायला मी USA जाणार होतो. त्यावेळी कंपनीच्या चेअरमनने मला प्रॉमिस केले होते की डिसेंबर मध्ये मी MD होणार म्हणून! आम्ही merger च्या सर्व process तयार केल्या. पण प्रत्यक्ष ऑगस्टमध्ये मी जेव्हा presentation द्यायला USA ला गेलो. तिथे मला अचानक सांगितले आम्ही प्रॉमिस केलेच नव्हते. तुम्ही MD होऊ शकत नाही. आमच्या कंपनीतील एका मोठ्या पोस्टवर असलेल्या ऑफिसरचा मुलगा MD झाला. मी फायझर सोडले. पुन्हा एकदा अन्याय! मानवी स्वभावाचे आणखी एक प्रत्यंतर!



ह्याचवेळी माझ्या मनात social work सुरू करायचे विचार येत होते. मी पार्क डेव्हिसला असताना, कोणीतरी legal माणूस हवा माझ्या बोर्डावर, म्हणून crawford villagers पार्टनर असायचे. त्यांना हलवून मी जसलोकमधील cardiologist डॉ. अश्विन मेहेता ह्यांना घेतले. आमची फार्मा कंपनी होती आणि कोणीतरी डॉक्टर असणे गरजेचे होते. तसेच कोणीतरी public servant हवा म्हणून मी त्यावेळचे retired police commissioner श्रीकांत बापट यांना board वर घेतले. कारण मला नेहमी वाटते की आपण नेहमी government ला नावे ठेवतो; पण त्यातील चांगल्या लोकांना appreciate मात्र करत नाही आणि ते आपण केले पाहिजे.

आणि इथूनच सुरुवात झाली. नंतर श्रीकांत बापट यांनी पार्क डेविस सोडले आणि ते हिंदुजा foundation ला जॉईन झाले. त्याकाळी प्रत्येक हॉस्पिटलमध्ये पद्धत होती की हॉस्पिटलचा CEO हा कोणीतरी मिलिटरी, आर्मीतील ब्रिगेडियर, कर्नल कोणीतरी असायचे. जसे ब्रीच केन्डीला मेजर जनरल कृष्णा, जसलोकला कर्नल मसंद होते. पण हिंदुजा हॉस्पिटलचे श्रीचंद हिंदुजा यांना ही पद्धत बदलायची होती. तेव्हा श्रीकांत बापट यांनी हिंदुजा हॉस्पिटलच्या CEO पदासाठी माझे नाव सुचवले.

त्यावेळी मी लंडनला काही कंपन्यांची consultancy करत होतो. त्यावेळी मला काही चांगले सल्ले मिळाले. consultancy करताना जे फी देऊ शकतात त्यांच्याकडून व्यवस्थित फी घे आणि जे देऊ शकत नाहीत त्यांच्याकडून अजिबात घेऊ नकोस. कारण तुझी फी म्हणजे तुझी मार्केट मध्ये काय value आहे ते दाखवते. कोणावर उपकार म्हणून जर तू कमी फी घेतलीस तर तुझी धंद्यातील किंमत कमी होते. दोन वर्षे मी कन्सल्टन्सी केली. १०/१२ जणांची. त्यातील ४/५ जणांनी व्यवस्थित फी दिली. दोनजण देऊ शकत नव्हते, तेव्हा ते म्हणाले, आता थोडी फी देतो म्हणजे तुमची commitment राहील. मी त्यांना सांगितले आता अजिबात फी देऊ नका, तुम्ही बघालाच माझी कमिटमेंट आहे की नाही! एखादे काम हाती घेतले किंवा कोणाला शब्द दिला तर कोणतीही किंमत देऊन शब्द पाळायचा ही तर शिकवण नसानसात भिनली आहे. ते जेव्हा पुढे मोठे झाले तेव्हा त्यांनी आठवण ठेवून फी दिली. दोन जणांनी दिली नाही.

मी मधेच म्हटले हाती घेतलेले काम पूर्ण करणे किंवा दिलेला शब्द पाळणे हे अतिशय मोलाचे संस्कार आईवडिलांनी तुमच्यावर केले आहेत. त्यावर प्रमोद लेले अभिमानाने म्हणाले, ह्या संस्कारांच्या शिदोरीवर तर आयुष्यभर वाटचाल केली.

जेव्हा मला हिंदुजाच्या offer बद्दल कळले तेव्हा मनात आले की माझ्या social work साठी हिंदुजाचा platform उत्तम आहे. हिंदुजा foundation चे श्रीकांत बापट यांनी माझे नाव सुचवले होते. खरे म्हटले तर हॉस्पिटल management चा मला zero experience होता. पण Parke Davis pharm co.चा, जॉन्सनचा अनुभव मोठा होता. अनेक हॉस्पिटल्सची माहिती होती. हिंदुजातला माझा अनुभव खूप वेगळा होता. २००३ ते २०१४ मी हिंदुजात होतो आणि खरोखरच तो सुंदर काळ होता. ह्या काळात मी एक वेगळे जग पहिले. हिंदुजाचा व्याप खूप मोठा होता आणि तो सांभाळताना खूप खाचखळगे पण येत होते आणि त्यातून शिकता पण बरेच आले. मी ते आव्हान enjoy करत होतो. मुंबईसारख्या शहरात पेशंटचे होणारे हाल, डॉक्टर आणि पेशंटचे नाते, सर्व जवळून पाहिले. तिथे काम करताना एक वेगळा आनंद मिळत होता.

ह्या काळात म्हणजे २०१० मध्ये मी चित्पावन संघाची स्थापना केली होती. पण आता मला हिंदुजा हॉस्पिटलच्या व्यापातून, social work साठी वेळच मिळत नव्हता. वयाची ६५ वर्षे झाली होती. समाजसेवेची इच्छा काही केल्या स्वस्थ बसू देत नव्हती. म्हणून मग मी २०१४ मध्ये हिंदुजा सोडले. आता एक पूर्ण दिवस मी चित्पावनला देतो. दोन दिवस नानावटी हॉस्पिटलमध्ये जातो. अर्धा दिवस lufkin म्हणून फार्मा कंपनी आहे. त्याचे मालक माझे मित्र आहेत. आता त्यांचे वय झाले आहे. त्यांच्या मुलांना CSR वर मार्गदर्शन करतो.

सामाजिक कार्याची आवड तर बालवयातच निर्माण झाली होती आणि म्हणूनच एका ठरावीक वयापर्यंत नोकरी करून नंतरचे आयुष्य समाजकार्याला वाहून घ्यायचे हे तर मनाशी पक्के ठरले होते. कारण समाजाचे आपण देणे लागतो ही भावना स्वस्थ बसू देत नव्हती.

Lufkin ह्या कंपनीच्या सहकार्याने TB ह्या रोगावर कॅम्प घेतो. रोटरी क्लब ऑफ मुंबई पार्लेश्वरमध्ये रोटरीयन आहे. आतापर्यंत आम्ही २०० कॅम्प केले आहेत. एकाच दिवशी एकाच वेळी हे कॅम्प होतात. त्यांना आम्ही protocol घालून दिला आहे. प्रत्येक ठिकाणी तीन डॉक्टर्स आणि नर्सेस! पेशंटचा check up होतो. Digital x-ray काढायची व्यवस्था आहे. कॅम्पमध्ये काही ठिकाणी sites open ठेवल्या आहेत. तेथील रेडिओलॉजिस्ट x-ray काढतात, काही संशय आला तर त्या पेशंटना एक NGO आहे, त्यांच्याकडे सोपवतात. मग ते पुढचे सोपस्कार करतात. टीबीची टेस्ट होते आणि नंतर DOTS (daily observed therapy) मध्ये पाठवतात. हा एक government चा short course आहे. नंतर सरकारचा revised national TB control programme आहे तिथे पाठवतात. सरकार टीबीसाठी सर्व उपचार फ्री देते. तिथे नाव registered करायला लागते, notifiable disease म्हणून! टीबी घ्यायचे कारण म्हणजे दरवर्षी ३ लाख माणसे आपल्या देशात टीबीने मरतात. साधारण उच्चभ्रू लोकात हा रोग होत नाही, गरीब लोकांत होतो. टीबीचा रोग सांसर्गिक असल्याने कोणी सांगत नाही, बोलत नाही, इतकेच काय टीबीचा कॅम्प म्हणून सांगितले तर कोणी येत नाही, म्हणून आम्ही lung health camp म्हणून सांगतो. अमिताभ बच्चनला brand ambassador केले आहे. तो या रोगाशी झुंज देत होता; परंतु उपचारानंतर आता पूर्ण बरा झाला आहे, अशी जाहिरात करून लोकांमध्ये या रोगाबद्दल जागृती निर्माण करत आहोत. अमिताभमुळे सर्व गोष्टींना वजन आले.

मी म्हटले, म्हणजे अशाप्रकारे TB या सांसर्गिक रोगाबद्दल तुम्ही जनजागृती पण करत आहात, तसेच विनामूल्य उपचार पण होत आहेत. त्यावर लेले म्हणाले, आपल्या समाजात लोकांमध्ये जागृती करणे अतिशय आवश्यक आहे.

आज २१व्या शतकातसुद्धा अशिक्षित समाजात खेडोपाडी या रोगाबद्दल लोक अनभिज्ञ आहेत.

ते पुढे सांगू लागले, आजही खेड्यांमध्ये डॉक्टर नाहीत किंवा हॉस्पिटल्स नाहीत. कल्याणपासून फक्त १५ किलोमीटर अंतरावर टिटवाळा येथे गणपतीचे मोठे देवालय आहे. हजारो भाविक तिथे जात-येत असतात. त्या परिसरात एकही M.B.B.S. डॉक्टर नव्हता.

तिथे राहणारा एक बापट नावाचा मुलगा न्यूरो सायन्समध्ये व्हिडिओ मॉनेटरिंग करण्यासाठी दररोज टिटवाळ्याहून हिंदुजा हॉस्पिटलमध्ये येत होता. त्याने एक अभिनव कल्पना सुरू केली. सुमारे ७ वर्षांपूर्वी त्याने एक पाच मुलांचा creative group केला. त्या सर्वांनी मिळून एक बेडरूमचा फ्लॅट घेतला आणि polyclinic सुरू केले. एका रूममध्ये dental chair, एका रूममध्ये x-ray machine, एका रूममध्ये pathological lab. कल्याणहून दररोज वेगळा डॉक्टर यायचा. अशाप्रकारे ५ वर्षे झाली. एकदा ह्या मुलांचेच तीन नातेवाईक वारले. एक heart attack ने, एक ब्रेन

हॅमरेजने, एकाला काय झाले हे कळायच्या आतच तो वारला. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की हॉस्पिटल असणे आवश्यक आहे. आतापर्यंत तिथे फक्त तपासणी व्हायची आणि अधिक serious असेल तर कल्याणला घेऊन जायचे. पण अशी पाठोपाठ माणसे वारली तेव्हा ते माझ्याकडे आले आणि मला ह्या गोष्टीत लक्ष घालण्याची विनंती केली.

हिंदुजा हॉस्पिटलचे डॉ. भालेराव आणि JJ Hospitalचे dean डॉ. दावर यांना घेऊन मी तिथे गेलो. कारण मी medical डॉक्टर नाही आणि तिथे डॉक्टरच्या मार्गदर्शनाची आवश्यकता होती. प्रथम आम्ही ग्रामस्थांची सभा बोलावली. १५० लोकं उपस्थित होती. त्यांना रोगराईविषयी समजावले. प्रथम त्यांना भीती वाटली की हिंदुजा करणार म्हणजे आम्हाला परवडणार नाही. तेव्हा त्यांना समजावले की आपण सर्वजण मिळून करणार आहोत. ह्या कार्यात लोकसहभाग हवा. ११ रुपयांपासून १०१ रु. पर्यंत अनेकांनी पैसे दिले. रिक्षावाल्यांनी कोणी १०००/२००० दिले. ४५ मिनिटांत ७५,००० रु. जमले. त्यानंतर तेथील देवस्थानाचे ट्रस्टी होते सुभाष जोशी म्हणून त्यांना भेटलो. प्रथम ही मुलेपण त्यांना भेटली होती, परंतु ती पोरसवदा होती त्यामुळे ते तयार नव्हते. परंतु हिंदुजाचे नाव ऐकल्यावर ते तयार झाले. त्यांनी १ कोटी २५,००,००० रु. दिले. आम्ही सर्वांनी मिळून ६ कोटी जमवले. Creative group च्या नावावर चॅरिटी कमिशनचे approval घेतले आणि सर्व व्यवस्थित चालू झाले, पण लॉसमध्ये!

भारतात सर्वत्र जे दुःखद चित्र दिसते तेच इथेही दिसले. इथे काही दोनचार डॉक्टर, कोणी होमिओपाथ, कोणी compounder झालेले डॉ. अशांचे एक racket आहे. ते पेशंटला आमच्याकडे न पाठवता कल्याणला पाठवतात. तिथे बिलातील ३०% ह्यांचा cut असतो. Medical field किती पोखरले आहे त्याचा प्रत्यय इथेही येतो. आता मी राजीव गांधी जीवनदायी योजनेला अर्ज केला आहे आणि त्याच्या नावाखाली परवानगी घेतो.

हे हॉस्पिटल चालवण्यासाठी श्रीकांत बापटांनी हिंदुजातील नोकरी सोडली. बापट हे स्वातंत्र्य सैनिक सेनापती बापट यांचे वंशज, त्यामुळे समाजसेवा त्यांच्या रक्तात भिनली आहे. दररोजचे सर्व व्यवहार ते बघतात. आता ५० बेडचे ते हॉस्पिटल आहे. तीन M.B.B.S. डॉक्टर, १३ नर्सेस, एक MD सर्व टीम तयार आहे. २५,००,००० लाख रु. खर्च आणि २०,००,००० रु. income! पण तीन वर्षांत जो लॉस झाला आहे तो भरून निघेल अशी आशा आहे. माझे मित्र आणि LT चे CFO श्री. देवस्थळी म्हणून आहेत त्यांनी वैयक्तिक २ कोटी आणि कंपनीने मदतीचा मोठा आधार दिला आहे.

आतापर्यंत टिटवाळ्यात डायलिसीस करता लोकांना कल्याणपर्यंत जावे लागे. हे अतिशय त्रासदायक होते. आता तिथे तीन मशिन्स उपलब्ध केली आहेत. गेल्या तीन वर्षांत तिथे ३०० बालके जन्माला आली. प्राथमिक उपचारांची सर्व सोय केली आहे. एकदा एका माणसाला हार्ट attack आला, कोणाला हॅमरेज झाले, तेव्हा प्रथम औषधे देऊन clot dilute करून कल्याणला पाठवले. अशाप्रकारे हॉस्पिटल झाल्याने लोकांचे प्राण वाचवले जाऊ लागले. हॉस्पिटलसाठी एक Medical ambulance देणगी म्हणून मिळाली आहे. आता डॉक्टरांनी नोकरी करण्यासाठी टिटवाळ्या सारख्या छोट्याशा गावात यावे यासाठी त्यांना मुंबईएवढा पगार द्यावा लागतो. इथे दोन operation theaters बनवली आहेत. हळूहळू लोकं यायला लागली आहेत. आम्ही आमचे योगदान देतच आहोत तसेच माझे मित्र ucross laboratory ने ५०,००,००० रु. दिले. तसेच रोटरी क्लब ऑफ इंडिया आणि रोटरी क्लब Huston USA यांचे joint Global Grant Project म्हणून आहे. त्यांच्याकडून ५०,००,००० रु. दिले, त्याची equipments घेतली. रोटरी international चे प्रेसिडेंट त्यासाठी तिथे आले होते.

रत्नागिरी वृद्धाश्रम हा आमचा आणखी एक प्रकल्प! ह्या प्रकल्पात उद्योजक दीपक घैसास, सुभाष दांडेकर, म्हैसकर, राम भोगले, श्रीकांत परांजपे आणि भाऊसाहेब केळकर या सर्वांचा सहभाग आहे. आपल्या मराठी माणसात एवढे कर्तृत्व आहे, इतरांसाठी आपण एवढे करतो, आपापल्या व्यवसायात आपण यशाचे शिखर गाठले आहे, आणि म्हणूनच मला असे वाटते की असं असताना आपण मी हिंदुजाचा उजवा हात, मी टाटांचा उजवा हात अशा चुकीच्या बाबतीत अभिमान बाळगतो. आपण स्वतःच टाटा-बिर्ला कधी होणार? आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार आहोत तर मग तो अभिमान का नाही? माझ्या जीवनाचे हेच सूत्र आहे, की परमेश्वराने तुम्हाला जे काही गुण दिले आहेत ते शोधून त्यांचा विकास करा. सकारात्मक दृष्टीने जीवनाला सामोरे जा. ध्येय पूर्ण नाही झाले तरी ध्येयाजवळ नक्कीच पोहोचाल!

मी म्हटले, लेलेसाहेब आणि म्हणूनच तुमचे दुबईशी


बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक
घर असो वा कार
आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर
आम्ही तुमचे साथीदार....
महासुपर गृह कर्ज @ 9.60%
कर्ज परतीची मुदत ३० वर्षे
दरमहा हप्ता
प्रत्येक लाखासाठी रु. 849*/-
* प्रक्रिया शुल्क नाही.
शुभ दीपावली
महासुपर वाहन कर्ज @ 10.10%
कर्ज परतीची मुदत ७ वर्षे
दरमहा हप्ता
प्रत्येक लाखासाठी रु. 1665*/-
व्याज दरामध्ये ०.५०% पर्यंत सवलत उपलब्ध*
* प्रक्रिया शुल्क नाही.
आजच आपल्या जवळच्या शाखेत संपर्क करा.
ऑनलाईन अर्ज @ www.bankofmaharashtra.in संपूर्ण भारतभरासाठी टोल फ्री नं. 1800-233-4526
फोन वा ई-मेलच्या माध्यमातून इंटरनेटवरून केलेले बँकिंगचे व्यवहार,
यूजर आयडी / पासवर्ड किंवा क्रेडिट / डेबिट कार्डचे नंबर सीव्हीव्ही/ओटीपी कुणालाही कळू देऊ नका / कोणालाही सांगू नका.*

एक अनामिक नाते जुळले का? ते म्हणाले, अगदी खरे आहे.

दुबईच्या पदरात ईश्वराने रखरखीत वाळवंटाचे माप घातले. पण दुबई स्वतःच स्वतःची शिल्पकार बनली आणि जगापुढे एक आदर्श निर्माण केला. आमच्या दृष्टीने दुबई, अबुधाबी, मस्कत, कुवेत, शारजा सर्व आखाती देश म्हणजे एकच! अशा या आखाती देशांत कामानिमित्ताने म्हणून अनेक वेळा येणे झाले. प्रत्येकवेळी या देशाबरोबर असलेले नाते घट्ट होत गेले, कारण विचारांचा बंध एक होता. तसेच दुसरा एक योगायोग म्हणजे माझ्या आयुष्यात मी माणसांच्या स्वभावाचे, स्वार्थीपणाचे अनेक अनुभव घेतले आणि तसेच अनुभव येथील वास्तव्यातसुद्धा आले.

आखाती देशात सर्वत्र केरळी लोकांचे प्राबल्य दिसते. त्यांनी पण स्वतःच केरळ राज्याला घडवले आहे. ते केरळी सोडून इतर लोकांना, भारतीयांना खड्यासारखे बाजूला काढतात, पण केरळी लोकांना मात्र वर खेचतात. तो एक वेगळाच अनुभव मला आला. मस्कतच्या शेखकडे मला consultant म्हणून काम मिळाले होते. ह्या शेखला त्याच्या ऑफिसमध्ये एक HR आणि एक Finance मधील माणूस हवा होता. म्हणून मी एक CA आणि एक HR ला घेऊन मस्कतला गेलो होतो. तिथे जाण्यापूर्वी आम्हाला सांगितले होते की ४०% अरबांना हिंदी येते, तेव्हा बोलताना जपून बोला. ते दिवस होते रमझानचे. उन्हाळा मी म्हणत होता. अक्षरशः घामाच्या धारा लागल्या होत्या. पण लोकं त्या भयानक गरमीमधेही रोझा पाळत होते. तिथे रोझा हा आपल्या नातवाईक किंवा मित्रांबरोबर सोडतात. या शेखने एक दिवस आम्हाला बोलावले रोझा सोडायला. आम्ही तिघेजण त्याच्या घरी गेलो. घर कसले राजवाडाच होता तो. पन्नास जणांचे टेबल होते ते, पण त्यावर आम्ही चोघेच जण बसलो होतो. सर्वच भव्यदिव्य होते. श्रीमंती म्हणजे काय ते कळले! अस्खलित हिंदी तो बोलत होता आणि त्याचे वागणे-बोलणे एकदम सुशिक्षित होते. ह्या शेखची स्वतःची हॉटेल्स होती. फार्मसिंची चेन होती. शेखचे आणि माझे वैयक्तिक संबंध एकदम चांगले, मित्रत्त्वाचे होते. I was supposed to join with him along with Central Bank of Muscat आणि तिथल्या रिझर्व बँक गव्हर्नरबरोबर direct काम होते. शेख तर अगदी मोकळेपणाने गप्पा मारत होता. पूर्वीचे त्याचे दिवस, ते स्मगलिंग कसे करायचे, वाळूत पुरून कुठे ठेवायचे इ. अनेक गप्पा तो अशा पद्धतीने सांगत होता की जणू आम्ही त्याचे पूर्वपरिचित जिवलग मित्र आहोत. सर्व काही छान जुळून आले होते. मी त्याच्याबरोबर काम करावे म्हणून तो खूपच उत्सुक होता.

पण इकडे माझ्याबरोबरच्या दोघांनी, शेखचा जो executive assistant होता जॉर्ज म्हणून त्याच्याबरोबर आमच्या सर्व गोष्टी openly share केल्या. आमचा प्लॅन काय आहे, आम्ही कशासाठी आलो आहोत ह्याची अगदी मनमोकळेपणाने त्याच्याबरोबर चर्चा केली. हा जॉर्ज केरळी होता. त्याला काय वाटले कोणास ठाऊक की आम्ही तिथे काम करू लागलो तर त्याचे स्थान डळमळीत होईल किंवा त्याला कोणी त्याच्या केरळी माणसाला आणायचे होते! पण लक्षात आले की त्याच्या वागण्याचा एकदम नूरच बदलला आणि त्यानंतर जॉर्जने पद्धतशीरपणे आम्हाला शेखपासून लांब ठेवले. परिणाम असा झाला की माझ्या बरोबरच्या दोघांनाही जॉब मिळाला नाही आणि माझी consultancy पण बंद झाली. शेखने माझी सर्व फी दिली, वरती एक थैली पण पाठवली. पण जॉर्जने आम्हाला शेखपासून दूर केले आणि स्वार्थीपणाचा मानवी स्वभावाचा अनुभव माझ्या गाठी आला.

केरळी लोकांचे हे प्राबल्य मला संपूर्ण आखाती देशात जाणवले आणि अनेक अनुभवही आले. पण ते आपल्याला बाजूला ठेवतात, त्यांच्यामुळे आमचे नुकसान झाले हे मान्य करूनसुद्धा एका गोष्टीबद्दल मला केरळी लोकांचे कौतुक वाटते. मराठी माणसाप्रमाणे ते एकमेकांचे पाय खेचत नाहीत, तर एकमेकांना मदत करून वरती यायला आधार देतात. आज एक केरळी आखाती देशात गेला तर पाठोपाठ दहा जणांना घेऊन जातो. तिथे जाऊन दिवस-रात्र जे मिळेल ते काम करून कष्ट करतात. आज केरळ राज्याचे चित्रच त्यांनी बदलून टाकले आहे. केरळी लोकं स्वतःच केरळ राज्याची शिल्पकार झाली आहेत. आपण मराठी लोकांनी बरेच काही ह्यातून शिकण्यासारखे आहे. आज महाराष्ट्रात मराठी माणसाला नोकरी नाही म्हणून ओरडाआरडा होतो, पण मराठी माणूस आळशी आहे, तो मेहेनत करायला तयार नसतो हे सत्य मात्र आपण नाकारतो. देशाच्या बाहेर न जाता डबक्यातच बुड्या मारत बसतो आणि म्हणूनच आखाती देशात गेल्यामुळे व्यक्तीशः मला जरी केरळी लोकांचा वाईट अनुभव आला तरी त्यांच्या ह्या गुणांकडे डोळेझाक करता आली नाही.

अबुधाबीला बी.आर. शेट्टी म्हणून प्रसिद्ध उद्योजक आहे, तो माझा मित्र होता. ही १९८९-९० मधील गोष्ट

आहे, त्यावेळी शेट्टी एक सामान्य माणूस होता; पण आज दुबईतील मोठ्या उद्योगपतींमध्ये त्याचे नाव घेतले जाते. त्यावेळी मी जॉन्सनमध्ये consumer चा incharge होतो. शेट्टी baby milk powder तिथे विकत घ्यायचा आणि आखाती देशात आणून विकायचा. अपार कष्ट केले आणि देवाने त्याच्यात जे काही गुण दिले होते त्याचा शोध घेऊन, स्वतःच स्वतःच्या जीवनाचा तो शिल्पकार झाला. त्याने जेव्हा NMC (new medical center) सुरू केले तेव्हा ते बघायला मला मुद्दाम अबुधाबीला बोलावले. तिथे – Abu Dhabi chartered accountant forum होता तिथे माझे lecture ठेवले. तसेच Dubai Healthcare City जेव्हा तयार झाली तेव्हाही बोलावले होते. मस्कतला शेखच्या मालकीची मेडिकल केमिस्ट शॉपची चेन होती, तिथे सुरेश गांधी म्हणून व्यवस्था बघत होते. त्यांनी मला advisor म्हणून बोलावले. अशा प्रकारे अनेक वेळा दुबई, अबुधाबी, मस्कत अशा सर्व आखाती देशात माझे जाणे झाले.

आखाती देशांच्या आठवणीत रमलेल्या लेल्यांना मी विचारले, आखाती देशातील हॉस्पिटल्स आणि मुंबईतील हिंदुजासारखी हॉस्पिटल्स यामध्ये तुम्हाला काय फरक जाणवतो?

आखाती देशातील हॉस्पिटल्स आणि हिंदुजासारख्या हॉस्पिटल्समध्ये फरक म्हणजे हिंदुजा म्हणजे state of art equipped आहे. तर आखातात अजूनही गोऱ्या कातडीचे कौतुक आहे. त्यांचा आपल्यावर विश्वास नाही, गोरे त्यांना जवळचे वाटतात. कदाचित गोरे त्यांच्यावर राज्य करत होते म्हणूनही असेल कदाचित! आणि हेच मला टांझानियातही जाणवले. खरे म्हटले तर आफ्रिकन लोकांना लुबाडले युरोपिअन, अमेरिकन लोकांनी; पण त्यांचा राग मात्र आहे Asians वर! त्यांना राजकारण कळत नाही. दररोज एकत्र राहतात, भांडणं होतात. आफ्रिकन मागासलेले आहेत आणि आपण उच्चभ्रू , सुशिक्षित! तिथे पटेल community आहे. उद्योगधंदा त्यांच्या हातात आहे. त्यामुळे आफ्रिकन लोकांना वाटायचे ही लोकं सर्व उद्योग grab करत आहेत. त्यांच्या नोकरीच्या संधी जात आहेत. हॉटेल पटेलचे, दुकान पटेलचे, पेट्रोल पंप त्यांचा, थिएटर त्यांचे. त्यामुळे दररोजच्या व्यवहारात प्रत्येक गोष्टीसाठी त्यांना पैसे द्यावे लागत होते एशियन लोकांना.

मला आठवतंय टांझानियात Board of internal trade मध्ये होतो. तेथील Trade Minister बरोबर त्याच्या हेलिकॉप्टरमधून गेलो कारण तिथे आपण मोठे होतो. तिथे एक वेगळाच अनुभव आला. जर्मनीने टांझानियाला एक प्रकल्प दिला तो फ्री होता. पण दुर्दैवाने तो प्रकल्प चुकीचा fertilizer base होता. नंतर जर्मनीने त्यांना पिळले असे की तो प्रकल्प दुरुस्त करायला त्यांचे जे technicians आले ते टांझानियातच राहिले. त्यांचा सर्व खर्च, पगार हे सर्व आफ्रिकेनेच केले. जर्मनीने देशाला काही वर्षे मागे नेले. Nothing comes free! असे जे म्हणतात ना त्या विधानाची सत्यता पटली. पण एवढे होऊनसुद्धा या आफ्रिकन लोकांचा राग मात्र Patel you and me! सामान्य माणसाला नेहमी जवळचा माणूस नकोसा असतो आणि असे हे गोऱ्या कातडीचे कौतुक काही प्रमाणात आखाती देशातही आढळते. कदाचित त्यांच्यावरही पूर्वी गोरे लोकच राज्य करत होते म्हणून असेल!

आफ्रिकेतील अनुभव सांगणाऱ्या लेलेसाहेबांना मी मधेच विचारले, तुम्हाला हिंदुजा हॉस्पिटलचा एवढा अनुभव आहे, हॉस्पिटलतर्फे जवाहर, विक्रमगड, मोखाडा येथे मोबाईल हॉस्पिटल्स सुरू केली आहेत. त्याच तत्त्वावर तुम्हाला दुबईमध्ये mobile हॉस्पिटलचा concept कसा वाटतो? रिमोटठिकाणी किंवा labour कॅम्पमध्ये हजारो कामगार राहत आहेत. त्यांच्याकडे गाड्या नसतात. taxi परवडत नाही, मेट्रो किंवा बसेस असल्या तरी त्या सर्व लेबर कॅम्पपासून लांब असतात. येथील हवामानामुळे पेशंटला चालत नेणे पण शक्य नसते. अशा परिस्थितीत मोबाईल हॉस्पिटल उपयुक्त ठरतील का?

मुंबईच्या सुप्रसिद्ध हिंदुजा हॉस्पिटलचे CEO असलेले लेलेसाहेब आपल्या अनुभवातून विचार मांडू लागले.

प्रत्येक गावात हॉस्पिटल करायच्या ऐवजी एकेका गावात दोन-दोन दिवस डॉ. असतील, असा प्रस्ताव मी जेव्हा मुंबईत मांडला तेव्हा हिंदुजांची एवढी तयारी नव्हती. पण अखेर त्यांनी मान्यता दिली. आता सध्या एक मोबाईल van आहे. त्यात नर्स, डॉक्टर, radiologist असतात. तिथल्या तिथे x-ray घेतला जातो . त्या van मधे laboratory आहे. नर्स-पेशंटसाठी examination couch आहे. window असलेला tv बाहेरून दिसेल असा आहे. tv वर स्वच्छता, हात कसे धुवाल, TB हा curable रोग आहे, डायबिटीसची काळजी कशी घ्याल अशी सर्व health related film दाखवतो. त्याला कॅनॉपी पण केली आहे, कारण कित्येक वेळा सूर्यकिरणांमुळे दिसत नाही. म्हणजे अगदी बारीकसारीक गोष्टींचा विचार करून crafted अशी ही van

# PRAMOD LELE

- Consultant & Management Advisor.
- Chairman & Managing Director
  Parke Davis India Ltd.
- CEO Hinduja Hospital Mumbai.
- Executive VP Johnson & Johnson.
- Member of Rotary club of Parleshwar.
- Member of court -
  Indian Institute of Science.
- Trustee- Marathi Vidnyan Parishad.
- Brahman Sahayak Sangh.

बनवली आहे. तिची किंमत आहे ४० लाख रुपये. बेळगावला मोहन कामत म्हणून आहेत, त्यांनी ही तयार केली आहे. आता त्यांनी proto type dye तयार केला आहे आणि २० vans ते १५ दिवसात तयार करू शकतात. गेली ५ वर्षे ही मोठी van आठवड्यातून ४ दिवस जवाहर, विक्रमगड आणि मोखाडा येथे जाऊन थांबते. सोमवार ते गुरुवार तिथे एके ठिकाणी असते. त्याला supplementary दोन छोट्या vans दिल्या आहेत. त्यात एक डॉक्टर आणि एक नर्स असते. ते पेशंटला घरातून आणतात, check up झाला की घरी सोडतात. शुक्रवारी डॉ. कल्याणला जातात आणि fresh supply घेऊन परत जातात.

अशा प्रकारची van डायलिसिसच्या पेशंट्ससाठी केली आहे. कारण ही treatment आठवड्यातून तीनदा करावी लागते. जेव्हा लक्षात येते की आता आयुष्यभर डायलिसिस करावे लागणार, ह्या विचारानेच, डिप्रेशन येऊन माणसे मरतात. -lternative उपाय म्हणजे फक्त दुसऱ्याची किडणी मिळाली तर ठीक, नाहीतर तो माणूस गलितगात्र होतो. या van साठी फक्त पाण्याचे connection लागते.

प्रमोद लेले पुढे सांगू लागले मला वाटते दुबई आणि जवळपासच्या भागामध्ये अशा प्रकारचे mobile hospital उपयुक्त ठरेल. ह्याचा सर्वात मोठा फायदा होईल तो कामगार वर्गाला! आज दुबईची प्रगती अतिशय जोरात चालू आहे. साहजिकच तिथे कामगार वर्ग फार मोठ्या प्रमाणावर आहे. मोठ्या हॉस्पिटलमध्ये जाणे हे सर्वच दृष्टीने त्यांना गैरसोयीचे आहे. आणि त्यामुळे अशा प्रकारचे मोबाईल हॉस्पिटल किंवा डायलिसीस van म्हणजे कामगारांना वरदानच ठरेल.

बाकी दुबईचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे स्वच्छता! आज मी जगभर हिंडलो आहे; पण दुबईएवढी स्वच्छता जगात कुठेही आढळत नाही. इथे लोकं कायदा पाळतात, law binding आहेत. याबद्दल खरोखर कौतुक करावे तेव्हढे कमी आहे. फक्त मनात प्रश्न येतो हीच भारतीय लोकं जेव्हा भारतात येतात तेव्हा कायदे का पाळत नाहीत? स्वच्छता का ठेवत नाहीत? दुबईत रात्री १२ वाजता एकटे हिंडायला भीती वाटत नाही, तेथील security चांगली आहे. लंडनमध्ये तुम्हाला इंग्लिश येत असेल तर फिरायला comfortable वाटते, तसे इथे हिंदी येत असेल तरी चालते. इथे क्वचितच कोणी आरडाओरडा करताना दिसते. इथे discrimination आढळत नाही. तसेच लोकांमध्ये hospitality आढळते, जे युरोप, अमेरिकेत आढळत नाही. कदाचित त्याचे असेही कारण असू शकेल की युरोप, अमेरिकेप्रमाणे people are not under pressure day to day life! या सर्वाचे श्रेय जाते वर्षानुवर्षे इथे settle down झालेल्या भारतीयांकडे! येथील सोनाबाजार म्हणजे एक स्वप्ननगरी आहे. अक्षरशः साड्यांचा ढीग दाखवतात त्याप्रमाणे दागिने दाखवतात. कोणतीही भीती नाही. चोरीमारीचे भय नाही.

मला असे वाटते की साधारण ६०/७० चा काळ असा होता की दुबईचे नावच बदनाम होते. smugglers चा देश म्हणून ओळखला जायचा. इथे बायकांना राहायला असुरक्षित आहे, पिण्याचे पाणी मिळत नाही, मुसलमानांचा देश तिथे तुम्हाला पूजाअर्चा करता येत नाही, असे एक ना अनेक गैरसमज होते. आपलेच भारतीय बांधव एजंट, लोकांना दुबईत नोकरीचे आमिष दाखवून फसवत होते आणि दुबईचे नाव आणखीन खराब करत होते.

पण या सर्वांवर मात करत, प्राप्त परिस्थितीवर रडत न बसत सकारात्मकतेने दुबई अन्यायांना सामोरी गेली आणि ईश्वराने तेलाचे जे माप तिच्या पदरात घातले, त्याचा उपयोग करून स्वर्ग दुबईत आणला. आज दुबईकडे केवळ tourist spot म्हणून न पाहता, आपल्या कृतीतून दुबईने जो आदर्श जगापुढे ठेवला आहे, ती शिकवण आपण आपल्या वैयक्तिक आयुष्यातही अंगिकारली तर स्वतःच स्वतःचे शिल्पकार बनू शकू!

■ प्रमोद लेले
lelepramod@yahoo.com



# पाऊलवाट दुबई आणि सुकन्याची



## सुकन्या कुलकर्णी-मोने

■ मुलाखतकार : मेघना वर्तक

''आता उद्यापासून कामावर जायला लाग. मला तुझा खर्च परवडणार नाही. तुझे बाबा अंथरुणाला खिळले आहेत दोघांचा खर्च मी करू शकत नाही. एक तर तू कामाला सुरुवात कर, चार पैसे मिळवून आण, नाहीतर तुझे तू बघ घराबाहेर जा.'' आईचे हे कठोर शब्द ऐकले आणि पायाखालची जमीनच सरकली. हादरून गेले मी, असे वाटले ही माझी जन्मदात्री आईच बोलते आहे का? आत्तापर्यंत खंबीरपणे माझ्या पाठीशी उभी राहणारी माझी आई असे निर्वाणीचे सांगू शकते? भावभावनांनी संमिश्रित असा, अंगावर काटा आणणारा तो क्षण होता.

भावविवश झालेल्या सुकन्याला मधेच मी म्हटले, पण त्याच क्षणाने तुला उभे केले आणि तुझा पुढचा प्रवास सुरू झाला आणि आज २०१६च्या 'मानाचा मुजरा' ह्या पुरस्कारासाठी तुझी निवड झाली.

सुकन्या म्हणाली खरे आहे ह्याच क्षणांनी मला बळ दिले. ह्याच्या पुढचा प्रवास तर जास्तच खडतर होता. खाचखळग्यांचा होता. कारण मला जो अपघात झाला त्यामुळे संपूर्ण शरीर paralyzed झाले होते, वाचा गेली होती. त्यावेळी डॉक्टरांनी मला जी steroids दिली त्याचे परिणाम नंतर हळूहळू दिसू लागले. मी जेव्हा मुंबईच्या हिंदुजा हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते, तेव्हा जी माझी नर्स होती तिचा मला एक दिवस फोन आला. मी दररोज तुम्हाला TV वर बघते, मला तुमच्यात काहीतरी बदल जाणवतोय. तुम्ही एकदा check up करून घ्या! मी तपासण्या केल्या आणि त्यात Thypro Thyroid निघाले. त्यामुळे माझे वजन खूप वाढत गेले. अपघातानंतर दिलेल्या shock treatment मुळे माझा जबड्याचा आकार बदलला होता, माझा आवाज बदलला होता.

माझ्यातील ह्या झालेल्या फरकामुळे मला नायिकेच्या भूमिका मिळणे बंद झाले. २०१५ मध्ये मी दुबईच्या 'महाराष्ट्र मंडळा'मध्ये आले होते. तेव्हा माझी 'जुळून येती' ही टीव्ही मालिका चालू होती. साहजिकच कार्यक्रमाच्या वेळी मला कोणी विचारले की तू आता आईच्या भूमिका कशी काय स्वीकारतेस? एखाद्या कलाकाराला नायिकेच्या भूमिकेतून एकदम आईच्या भूमिका स्वीकारणे सोपे नसते! तारुण्य संपले की ही गोष्टसुद्धा जड जाते तर मग तरुण वयात तर काय! पण माझ्यापुढे पर्यायच नव्हता. आईने सांगितले होते की आपल्याला जगायचे आहेच, मग रडत

बसायचे नाही काहीतरी चांगले करून, प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण करून मरायचे आहे! मग काय परिस्थितीचा स्वीकार केला आणि निश्चय केला त्या भूमिकेतही स्थान निर्माण करायचे आणि 'जुळून येती रेशीम गाठी' ही टीव्ही सीरियल चालू झाली. त्यातील माझी माईची म्हणजेच त्यातील आईची भूमिका सर्वांना खूप आवडली. गिरीश ओक यांच्या दादांच्या आणि माझ्या माईच्या भूमिकेने ती सीरिअल खूप गाजली.

माझी आई मला नेहमीच सांगायची जी प्राप्त परिस्थिती आहे त्याचा हसतमुखाने स्वीकार करून काहीतरी चांगले निर्माण करायचा प्रयत्न आपण केला पाहिजे. हे माझे संस्कार आहेत आणि म्हणूनच दुबई मला भावते. कारण याच संस्कारातून दुबईने आपले स्थान निर्माण केले .

मला दुबई अतिशय जवळची वाटते याचे दुसरे कारण म्हणजे माझ्या व्यवसायात मी जशा अनेक भूमिका जगले, त्या त्या भूमिकेत स्वतःला झोकून दिले, गुंतून गेले आणि त्यामुळे प्रेक्षकही मला त्याच भूमिकेतून ओळखू लागले, आवडती झाले. तद्वतच दुबईसुध्दा अनेक भूमिका जगते, त्या भूमिकेत स्वतःला झोकून देते. तिच्याशी एकरूप होते. समांतर रेषेत चालू असलेली आमची वाटचाल एकमेकींना जवळ आणते.

सुकन्या सांगू लागली, मी एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आलेली सामान्य मुलगी. वडील कमर्शिअल आर्टिस्ट, एक भाऊ, बहीण, आई असे खाऊन-पिऊन सुखी असलेले आमचे कुटुंब! नाचाचे, गाण्याचे क्लास करायचे छंद आम्हाला परवडण्यातले नव्हते. पण एक दिवस अचानक कळले की, दादरला 'वनिता समाज'मध्ये सुचेता चाफेकर-भिडे नाचाचे क्लास घेणार आहेत आणि फी फक्त २५ रु. मी त्यावेळचा चित्रपट सरगम यातील गाण्यावर हजारवेळा dance करताना आईने पहिले होते. माझी नाचाची आवड आईच्या लक्षात आली होती. त्यामुळे माझे नाव तिथे घातले गेले आणि नाच सुरू झाला. त्यावेळी नाटकाचा विचारसुद्धा मनाला कधी शिवला नव्हता.

त्याच सुमारास अरविंद सुलभा देशपांडे यांच्या आविष्कार चंद्रशालेची जाहिरात आली होती की एक नृत्यनाट्य करावयाचे आहे, पालकांनी आपल्या मुलांना पाठवावे. मैत्रिणींच्या आग्रहाखातर मी तिथे गेले. ५०० मुली होत्या. माझ्या गुरूंचे गुरू श्री पार्वतीकुमार तिथे होते. लांब पांढरीशुभ्र दाढी, धोतर-कुडता! त्यांचे व्यक्तिमत्त्वच असे होते की ते साधू वाटायचे! मी बाजूला उभी होते. त्यांनी मला सांगितले तू पण नाचायला सुरुवात कर, इथे नुसते कुणी उभे राहायचे नाही. त्यांनी ३०० मुली निवडल्या. सुलभाताईंनी आम्हाला एक गोष्ट सांगितली आणि त्यावर अभिनय करायचा होता. तुम्ही मासे आहात, समुद्रात फिरताय, अचानक कोणी जाळे टाकले, पकडलाय, गुदमरलात, शेवटी पुन्हा त्याने पाण्यात सोडून दिले. अशा तऱ्हेने सुलूताईने गोष्टीच्या द्वारे अभिनयाचे सुंदर धडे पण दिले. तिथे मला निवडले आणि 'दुर्गा झाली गौरी' या नृत्यनाट्याला सुरुवात झाली. इथूनच माझ्या आयुष्याला नवीन वळण लागले.

रात्री दोन वाजेपर्यंत आम्ही प्रॅक्टिस करायचो. पार्वतीकुमारांनी आमच्यापुढे आपल्या वागणुकीने एक मोठा आदर्श उभा केला होता. तिथे आम्हाला शिस्तही लागली. दादा नेहमी सांगायचे की एकजण नाच करत असताना इतरांनीही नाचायचे. म्हणजे एकीला काही झाले तरी दुसरी तयार असते. किशोरी शहाणे, निशिगंधा वाड, शिल्पा तुळसकर या सर्व त्यावेळी 'दुर्गा झाली'मध्ये होत्या. त्यावेळी घरून पोळीभाजी, वरणभाताचा डबा आणायचो. छबिलदासच्या मोठ्या हॉलमध्ये गोल करून बसायचो आणि दोन्ही बाजूच्याला आपल्या डब्यातले थोडे थोडे द्यायचे. हा नियमच घालून दिला होता. दादांची बायको रोज सर्वांसाठी कोशिंबीर नाहीतर उसळ आणायची आणि सर्वांना चमचा चमचा मिळायची. आजही मी शूटींगच्या वेळी सवयीने सर्वांसाठी डबा घेऊन जाते. नंतर अर्धा तास आराम, गप्पा. मग पुन्हा रिहर्सल! जेणेकरून कंटाळा यायचा नाही. असे करत प्रयोगाची तारीख आली. १९८२ला आमचा पहिला प्रयोग झाला आणि त्यानंतर पूर्वी लोकं म्हणायची ना की तोंडाला एकदा रंग लागला की तो उतरत नाही, ते माझ्याबाबतीत खरे ठरले. तिथे छबिलदासमध्ये नसरुद्दीन शहा, सोनी राजदान, रोहिणी हत्तंगडी, गिरीश कर्नाड अशी अनेकजण यायची. चर्चा व्हायच्या. ते पाहून गंमत वाटायची. आपण नेहमी लंगडी-लगोरी तेच तेच खेळ खेळतो, पण ही लोकं निरनिराळ्या कलाकृती सादर करतात. हळूहळू मला हे सर्व आवडायला लागले, मी त्यात रमायला लागले.

आठवणींच्या भूतकाळात रमलेल्या सुकन्याला मी मधेच म्हटले, म्हणजे 'दुर्गा झाली गौरी' या नृत्य नाट्याने तुझे कलाक्षेत्रात पदार्पण झाले आणि त्याचबरोबर सेटवर शूटिंगच्या वेळी वागण्याची शिस्तही लागली तर!

त्यावर सुकन्या म्हणाली, हो अगदी खरे आहे आणि ही शिस्त केवळ त्या युनिटपुरती लागली नाही, तर आमच्या जीवनालाही आज लागली आहे .

दुर्गा चालू असतानाच मला 'ईश्वर' चित्रपटासाठी विचारले. मला तर कॅमेराच माहीत नव्हता तर काम कसे करणार? पण सुलूताईने सांगितले तू तुझे काम कर, कॅमेरा बघील काय करायचे ते! मी तर कधी फोटोसेशन, इंटरव्ह्यू पण दिले नव्हते. शेवटी 'ईश्वर'च्या शूटिंगसाठी गेले. डायरेक्टर होते के विश्वनाथन! त्यांचा 'शंकराभरणम' गाजला होता. भारती आचरेकर, अनिल कपूर, सदाशिव अमरापूरकर, विनोद मेहेरा अशा सर्वांना सेटवर पाहून माझी बोबडीच वळली. पण मी मनाचा निश्चय केला आणि कामाला सुरुवात केली. सर्व टीमने मला comfort zone मध्ये नेले. सिनेमात माझे नाव चुटकी होते, एरवीही मला सर्व चुटकी म्हणत. मी लहान असल्याने सर्व लाड करत.

एकदा आमचे outdoor शूटिंग होते. हीरो पेटलेल्या कोळशावरून चालतो. मैदानात चार-पाच हजार माणसे जमली होती. लोकांना कळले सुकन्या येतेय. सर्वजण सुकन्याको बुलाओ म्हणून जोरजोरात ओरडत होती, कोणीही ऐकायला तयार नव्हते. अनिल कपूर मला सांगायला लागला बाहर आईये, लोग आपको बुला रहे है । शेवटी तो मला बाहेर घेऊन गेला आणि लोकांना म्हणाला, ये सुकन्या है । नंतर कळले त्यावेळी south मध्ये सुकन्या नावाची खूप प्रसिद्ध नटी होती. विजयशांतीने सांगितले. मग अनिल कपूरने मला अक्षरशः बकोटीला मारून बाहेर काढले. गाडीत बसल्यावर मी त्याला म्हटले, मेरी चप्पल उधर रही है और मेरे पिताजी भी उधर ही है । त्याने समजावले. नंतर बाबा घरी आले. ही १९९५ची गोष्ट आहे. दुसऱ्या दिवशी मी त्या घरी गेले आणि सांगितले की काल माझी चप्पल राहिली आहे. तेथील बाई म्हणाली हा है न उधर, आईये! तिच्यापाठून मी जात होते. ३६ खोल्या, एकामागून एक खोली जात होती. १६व्या खोलीच्या इथे देवघर होते. मी म्हटले, मुझे कुछ नही चाहिये सिर्फ चप्पल चाहिये. तिने म्हटले,चप्पल ही तो देती हूं. त्यांच्याकडे कलाकार म्हणजे देव असतो. त्यांनी माझी कोल्हापुरी चप्पल धुऊन पुसून बॉक्समध्ये ठेवून त्याची पूजा केली होती. रामाच्या पादुकांनंतर माझ्या चपला! मला हसावे की रडावे तेच कळेना. असे हे अनुभव कायमचे लक्षात राहतात. मनात कायमचे घर करतात.

अजूनही कोल्हापुरी चप्पल आणि ते देवत्त्व ह्या सर्व विचारांमध्ये गढलेल्या सुकन्याला मी म्हटले, प्रेक्षक एखाद्या कलाकारावर किती प्रेम करतात ह्याची प्रचीती साऊथच्या सुकन्यावरून तुला आली तर!

त्यावर ती म्हणाली, ते प्रेम पाहून तर मन भरून आले आणि असे वाटले प्रेक्षकांचे हे असे प्रेम मिळवण्यासाठी भूमिकेमध्ये झोकून दिले पाहिजे. आणि हे असे वेडे प्रेम लवकरच 'झुलवा' ह्या माझ्या नाटकाला प्रथम मिळाले.

हळूहळू 'आविष्कार'मधून मी छोटी छोटी कामे करायला सुरुवात केली होती. एक दिवस वामन केन्द्रेचा फोन आला की नाटकाचे वाचन करायचे आहे, ताबडतोब ये. 'झुलवा' नावाचे नाटक होते. वाचन ऐकल्यानंतर मी म्हटले जो कोणी करील त्याला सॉलिड रोल आहे. तो म्हणाला, तोच तर तुला करायचा आहे. मी म्हटलं मला नाही जमणार, ह्यात तर शिव्या आहेत, आनिपानीची भाषा आहे. वामन म्हणाला, मी तुला विचारतच नाहीये. १५ दिवसात हे नाटक 'संगीत अकादमी'साठी करायचे आहे. तेव्हा मी बारावीत होते. आवडायला तर लागले होते, त्यामुळे मी ह्या नाटकात काम करायला तयार झाले. हे नाटक ८६ मध्ये प्रथम केले. उत्तम तुप्यांच्या कादंबरीवर, देवादासींवर हे नाटक आधारित आहे. 'जंगनी' नावाची मुलगी असते. तिला देवाशी लग्न मान्य नसते! ती म्हणते मला शिकायचे आहे, नर्स व्हायचे आहे. ती आईला सारखे विनवित असते. ह्यासाठी तिला अनेक गोष्टींना सामोरे जावे लागते. तिच्या लढाईचे सुंदर दर्शन ह्या नाटकाद्वारे दाखवले आहे.

रात्री दोन दोन वाजेपर्यंत नाटकाच्या तालमी चालायच्या. उत्तम तुपे एकीकडे चेतन दातारला कथा सांगायचे, त्यावरून तो संवाद लिहायचा. नंतर देवदत्त साबळे गाणी, म्युझिक अरुण चांदविलकर, डान्स गौरी केंद्रे आणि सयाजी शिंदे मला भाषा शिकवायचे. कारण ती सर्व साताऱ्याकडची आनीपानीची भाषा होती. ते मेहनत घ्यायचे, पण मला शिव्या कळायच्याच नाहीत. आपल्याकडे घरात 'ऐला' म्हटले तरी कानाखाली मिळायची. वामन सांगायचा मी ज्या फोर्सने म्हणतो त्या फोर्सने म्हण, बास! त्या नाटकात एक प्रसंग असा दाखवला आहे की ती प्रेमात पडते गावाच्या पाटलाच्या मुलाबरोबर. लग्न करायचे ठरते, पण अचानक तो दुसऱ्या मुलीबरोबर लग्न करतो. गावातील एक मुलगा तिला वाचवतो, कारण ती प्रेग्नंट असते, तो तिच्याशी लग्न करतो. दुसऱ्या गावात जाताना तिच्यावर रेप होतो. हल्लीच्या मुलांना सर्व माहीत असते. पेपर, टीव्ही,




आपणा सर्वांना दिपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
Supreme©
People who know plastics best
पाईपिंगचे संपूर्ण समाधान
पाईपिंगच्या प्रत्येक गरजांसाठी 'सुप्रीमची' दर्जेदार,
पर्यावरण पूरक उत्पादने...
aqua Gold
उच्च दाबाची प्लंबिंग प्रणाली
Lifeline
गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लंबिंग प्रणाली
indo green
गरम व थंड पाण्यासाठी अद्यावत प्लंबिंग प्रणाली
AQUAKRAFT
बाथ फिटिंग्स्
SILBOND
सॉलव्हंट सिमेंट uPVC आणि C-PVC
SILTANK
ओव्हरहेड वॉटर टँक्स्
S.W.R.
ड्रेनेज प्रणाली
SKY RISE
हाय-टेक, लो नॉईज, एस.डब्ल्यू.आर. ड्रेनेज प्रणाली
Nu-Drain
भूमिगत ड्रेनेज प्रणाली
SAFEGARD
सेप्टीक टँक्स्
आयुष्यभराची साथ...
दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि. मुंबई/जळगाव फोन : 0257- 3050541,42,43,44,49 • www.supreme.co.in

पिक्चर्स याद्वारे, पण तो काळ असा होता की शब्द उच्चारला तरी थोबाडीत बसायची. शेवटी वामनने सांगितले की तुझ्या पोटात जंत झालेत, त्यामुळे पोट खूप दुखत आहे अशी कल्पना कर आणि ओरड. अखेर भोपाळला संगीत अकादमीसाठी प्रयोग झाला.

कोणतीही भूमिका करताना त्या भूमिकेशी एकरूप झालात तरच ती भूमिका जिवंत होते. 'झुलवा'ला प्रथम पारितोषिक मिळाले. या नाटकात प्रथम दोन वेण्या, परकर-पोलका घातलेली मी दाखवली आहे. नंतर नऊवारी साडी, अंबाडा घातलेली मी तिची आई म्हणून आहे. शेवटी ती बंड पुकारते की माझ्या मुलीला देवदासी होऊ देणार नाही, मला तिला शिकवायचे आहे. ती सर्व मुखवटे तोडून मोडून टाकते. प्रत्येक प्रयोगाला एक किलो हळद उडवायचो. शो झाल्यानंतर मी माखलेली असायची. भोपाळला प्रयोग झाल्यानंतर ८० वर्षांचा माणूस धावत आला, पाया पडला. म्हणाला साक्षात देवी दिसली तुमच्यात!

अस वाटलं आपल्या भूमिकेशी लोकं किती एकरूप होतात आणि लोकांचं असं involved होणं हीच कलाकाराच्या कलेची पावती असते.

एकदा सातारला प्रयोग होते. अचानक makeup room मध्ये पोलीस आले आणि सांगू लागले की, ताबडतोब शो बंद करा. कारण बाहेर जोखीणी आल्या आहेत आणि त्या म्हणतात तिला बाहेर बोलवा, आम्हाला तिचे डोळे फोडायचे आहेत. आमच्या देवीचा मुखवटा तिने फोडला आहे. नाइलाजाने प्रयोग रद्द करावा लागला, मला बाहेर आणूच शकत नव्हते.

एकदा backstage ला जाताना मला लागले आणि भळाभळा रक्त वाहू लागले, पण मला जाणवतच नव्हते. डॉक्टर सांगतात प्रत्येक भूमिकेपासून थोडे दूर राहा. पण तसे होत नाही. परकाया प्रवेश म्हणजे काय हे प्रत्येक प्रयोगाला जाणवायचे. त्यानंतर असे दाखवले आहे की सरस्वती माझ्या मागे येऊन उभी राहते, हे काम आदिती देशपांडे करायची. 'झुलवा'च्या अनेक आठवणी आहेत. त्या वर्षातील महाराष्ट्रातील सर्व पुरस्कार मला मिळाले. त्या काळी इंटरनेट नव्हते. हे माझे पहिले नाटक! 'झुलवा'मुळे लोकं मला ओळखायला लागली.

'झुलवा'च्या भूमिकेशी, आठवणींशी एकरूप झालेल्या सुकन्याला मी म्हटले, म्हणजे तुझ्या भूमिकेच्या दोन्ही अंगांनी विचार करणारे अनुभव तुला आले तर! एका वृद्ध भाविकाचे आणि जोखिणींचे पण! अंधश्रद्धेची दोन रूपे वेगळ्या अर्थी!

सुकन्या म्हणाली अगदी खरे आहे तुम्ही म्हणत आहात ते! दोन वेगळे दृष्टिकोन सापडले मला! भक्तीच पण वेगवेगळ्या अर्थांनी! आपल्या समाजात ही जी अतिशय वाईट प्रथा आहे, त्यामुळे त्या स्त्रियांना किती संघर्ष करावा लागतो, याचे सुंदर चित्रण या नाटकात केले आहे!

त्यानंतर माझी नाटकांची कारकीर्द सुरू झाली. १९९० साली विजय जोशी दिग्दर्शित 'जन्मगाठ' या नाटकात काम केले. याच नाटकावर पुढे 'काकस्पर्श' हा सिनेमा निघाला. विनय आपटे, शशांक पोंक्षे, माधुरी भागवत, उदय सबनीस इ. सर्वांच्या भूमिका होत्या. या नाटकात शेवटी मी आकडी येऊन पडते. मी स्वतःला झोकून द्यायचे आणि माझ्या पाठी असलेल्या लालन सारंग आणि सुमित्रा जोगळेकर मला पकडायच्या असे दृश्य होते. ४० प्रयोग व्यवस्थित झाले. नंतर replacement आल्या. एका प्रयोगाच्या वेळी त्यांनी मला पकडलेच नाही. संकष्टी सुरू होणार होती म्हणून त्या आधीच आत निघून गेल्या. कोपऱ्यावर माझे डोके दोनदा आपटले. मी खाली पडले. पण मनात जागृत होते की मी बोलल्याशिवाय विनय त्याचे पुढचे संवाद बोलू शकत नव्हता आणि त्याच्या संवादाशिवाय पडदा पडू शकत नव्हता. अखेर मी काहीतरी बडबडले, विनयचे स्वगत झाले आणि मला आत नेले.

प्रथम वाटले सॅरीडॉन घेतले की बरे वाटेल कारण उलटी वगैरे झाली नव्हती. मी पुण्यातच हडपसरला मैत्रिणीकडे राहिले. दुसऱ्या दिवशी जाग आली तर डोक्यात कोणीतरी हातोडे मारत आहे असे वाटले. मी मैत्रिणीला म्हटले तर ती म्हणाली, अग इथे कोणीच नाही. मी म्हटले, असं कसं तू लाईट लाव बघू. ती म्हणाली, अग सकाळचे ९ वाजले आहेत. मला दिसतच नव्हते. नंतर दोन दिवस under observation ठेवले. नंतर डॉक्टरांनी सांगितले की brain concussion झाले आहे. ऐकायला येत नव्हते, दिसत नव्हते, बोलता येत नव्हते, तोंडाला चव नव्हती, वास येत नव्हता. पुण्यातील डॉ. काझींनी छोटेसे ऑपरेशन केले. कारण सारखे blood clots होत होते. त्यानंतर दर दोन महिन्यांनी check up साठी मला पुण्याला जावे लागे. सोलापुरी चादर डोक्यावर हेल्मेट सारखी घ्यायची हलू नये म्हणून आणि इंद्रायणीने मी जायचे.

या माझ्या अपघातामुळे मी घेतलेल्या कामांमध्ये व्यत्यय

येत होता. निसर्गाने मला धक्का दिला; पण माझ्या सहकाऱ्यांनी मात्र मला वेळोवेळी साथ दिली. अपघातामुळे माझी डाव्या गालाकडील बाजू खूपच sensitive झाली होती. फोटो काढला तर तो भाग लाल होऊन सुजायचा. एकदा विनयचे शूटिंग थांबवावे लागले. 'माणूस' नावाची विक्रम गोखले यांच्या बरोबर सीरिअल केली होती. शूटिंग चालू असताना मी विक्रम काकांना म्हटलं, मला ह्या कानांनी ऐकायला येत नाही, तुम्ही तेव्हढा पॉझ घ्याल का? खरं तर त्यांचा अर्धा scene झाला होता, तीच position ठेवायला लागणार होती, पण त्यांनी कट म्हटले कारण त्यांनी पाहिले होते की माझा तो भाग सुजला होता.

त्याचवेळी मी डॉ. श्रीराम लागू यांचे 'चाणक्य विष्णुगुप्त' हे नाटक करत होते. त्यांना मी सांगितले की मला हा त्रास होत आहे, मी नाही करू शकत हे काम. पण त्यांनी मला सांगितले की एकदम तडकाफडकी असा निर्णय घेऊ नकोस. मी डॉक्टरांशी बोलतो मग ठरवू या. डॉक्टरांनी सांगितले की दोन महिन्यांनंतर ही reaction जाईल. पण डॉ. लागू तेव्हढे थांबले आणि नंतर नाटक पूर्ण झाले. माझे सर्व श्रेष्ठ, ज्येष्ठ कलाकार मला खूप सांभाळून घेत होते, पण नियती मात्र माझी सारखी परीक्षा घेत होती. खरोखर या सर्व कलाकारांनी मला सांभाळून घेतले नसते तर कलाकार म्हणून माझी कारकीर्द कधीच संपुष्टात आली असती.


'मृत्युंजय' नावाची सीरिअल मी करत होते. आठ दिवस त्याचे शूटिंग फिल्म सिटीला झाले आणि अचानक एक दिवस वारा सुटला, गारा पडल्या. तो सेट होता त्याला आठ खांब, लाकडी पायऱ्या, घुमट असा होता. आख्खा सेटच कोसळला. माझे वजन तेव्हा ४२ किलो होते. मला वाटले की मी उडून जाणार! मी खांबाला धरून उभी होते आणि वाऱ्याच्या वेगामुळे खांबासकट खाली पडले. घुमट डोक्यात, खांब पोटावर, पाय भोकात! मला चक्कर आली. पण एवढं आठवत होते की मी कोणाला तरी वाचवले होते. जागी झाले ती गोकुळधामच्या हॉस्पिटलमध्ये आणि शुद्धीवर आल्यावर सर्वांना विचारत होते की कुठे कुठे फ्रॅक्चर झालेय? मला accidents ची इतकी सवय झाली होती! डॉ. म्हणाले, नशीबवान आहात फारसे काही झाले नाही. आम्ही मुंबईला परतलो. पण तेव्हा माहीत नव्हते पुढे काय वाढून ठेवले आहे ते!

घरी पोचलो आणि ड्रायव्हर म्हणाला, मॅडम उतरताना ना, माझे आपले एक नाही आणि दोन नाही. त्यांनी मागे वळून पाहिले तर मला हलताच येत नव्हते. माझी डावी बाजू paralyzed झाली होती. मला घरात उचलून नेले आणि मी जोरात किंचाळले. माझी वाचा गेली होती. त्याचवेळी माझ्या वडिलांना alzheimer झाला होता, त्यांना हिंदुजात admit केले होते, आई तिथे होती वडिलांजवळ. घरात दादा होता त्याने आमच्या family डॉक्टरांना बोलावले. त्याला प्रश्न पडला होता की आधीच आई बाबांच्या काळजीत आहे तिला हे सांगू कसे? मी नेहमी शूटिंग संपले की आईला भेटायला जायची. दोन दिवस झाले मी गेली कशी नाही म्हणून आईला शंका आली आणि आईच आली घरी बघायला. Police केस झाली होती. त्यामुळे मला हिंदुजात admit करून घेत नव्हते. आईने बरेच बोलून मला admit करायला लावले. तिथे दस्तुर म्हणून डॉक्टर होते. त्यांनी आईला सांगितले की ही काही बरी होणार नाही, हिला तुम्ही घरी घेऊन जा. आईने सांगितले जोपर्यंत ही बरी होत नाही तिला नेणार नाही, काहीही करा.

मला shock treatment दिली तेव्हा मेमरी आणि वाचा आली. पण तू कशी आहेस हे बोलायला मला सहा महिने लागले. जोपर्यंत श्वास चालू आहे तोपर्यंत एक शब्द चालू असायचा कारण मेंदूकडून काही सूचनाच येत नव्हती. नंतर steroids दिल्या vain मधून, त्यामुळे मी थोडीशी चालू लागले तोपर्यंत व्हीलचेअरवरच होते. या सर्व प्रकारात माझा confidence गेला. मी काम करायला घाबरत होते. तेव्हा मला आईने 'ते' निर्वाणीचे शब्द ऐकवले होते. त्यामुळेच मी पुन्हा उठून उभी राहिले !

सुकन्या खूपच भावविवश झाली होती. तिच्या पाठीवर हलकेच थोपटत मी तिला म्हटले, अगं आयुष्यात कधीतरी अशी परिस्थिती निर्माण होते की कठोर बोलावे लागते, कधी वेळ प्रसंगी एखादी थोबाडीत देऊन समोरच्या माणसाला परिस्थितीची जाणीव करून द्यावी लागते. त्यावेळी तुला आईच्या ह्या कटु आणि कठोर बोलण्याबद्दल खूप दुःख झाले; पण आज समजत असेल की म्हणूनच आजची सुकन्या दिसते आहे!

डोळ्यांतील अश्रूंना मोठ्या प्रयत्नाने थोपवत सुकन्या म्हणाली, आज जेव्हा मी एका मुलीची आई झाले तेव्हा मला त्यावेळच्या तिच्या मनाची कल्पना करता येतेय! वडील हॉस्पिटलमध्ये, त्यांची ती अवस्था, माझी ही अशी अवस्था, खरंच हे कठोर बोलण्याचे बळ तरी तिने कुठून आणले असेल? नक्कीच ह्दयावर दगड ठेवून ती हे बोलली



प्रक्रिया शुल्क संपूर्ण माफ
31 डिसेंबर 2016 पर्यंत
व्याज दर 9.35%
BOI
आनंदाचं नवं घरकुल
बीओआय होम लोन
ईएमआय ₹830/- प्रती लाख
परतफेड 30 वर्षां पर्यंत
पूर्व - भरणा शुल्क नाही
नि:शुल्क व्यक्तिगत अपघाती बीमा*
होम लोन वर ओव्हरड्राफ्ट सुविधेचा पर्याय उपलब्ध आहे
कॉल
1800 103 1906/1800 220 229
www.bankofindia.co.in विझिट करा
वर फॉलो करा
बँक ऑफ इंडिया
नातं बँकिंग पलिकडचं

होती! मी कमवून आणलेल्या पैशाने घरात चूल पेटणार नव्हती, पण माझ्या कलेच्या प्रवासाला प्रकाशाचा मार्ग नक्कीच सापडणार होता! आणि तसेच झाले.

या दरम्यान 'जमिन आस्मान' सिनेमासाठी महेश भट यांनी विचारले. 'लेकुरे उदंड झाली'साठी सुधीर भट यांनी विचारले, पण मी नाही म्हणून सांगितले. तेव्हा आईने महेश भट यांना माझी सर्व कहाणी सांगितली. मी विजयाताई मेहेता यांच्याबरोबर केलेले 'नागमुंडण' हे नाटक त्यांनी पहिले होते. ते म्हणाले, हिला नक्की जमणार हे काम! शेवटी मी कामाला उभी राहिले. हातात कागद घेतला आणि हात थरथर कापायला लागला. मी लाल झाले. ते म्हणाले, एका दिवसात दोन scene झाले तरी चालतील; पण आपण पूर्ण करायचेच! अशा प्रकारे तो सिनेमा पूर्ण झाला.

नंतर लेकुरे करायला घेतली. त्यावेळी प्रशांत दामले याने मला जे सहकार्य केले ते मी कधीच विसरू शकत नाही. नाटक सुरू झाले. त्यात गाणी होती. मी काही गाणे शिकले नव्हते. सुनेत्रा साठ्यांकडे नाचापुरते जेवढे गाणे लागते तेवढेच शिकले होते. अशा प्रकारे नाटकाचे दहा प्रयोग झाले आणि मला खोकला यायला लागला, उलट्या व्हायच्या. आतासारखी तेव्हा गाणी रेकॉर्ड व्हायची नाहीत. अशोक पत्की म्हणाले, तू म्हण. येतील. पण मला म्हणताच येईनात. डॉक्टर म्हणाले, एक वाक्य जरी बोललीस तरी वाचा जाईल. मी म्हटले replacement घ्या. पण प्रशांत कधीच replacement घेत नाही. तो मला म्हणाला, तुझी तयारी आहे ना, बाकी सर्व मी बघतो. नंतर प्रत्येक प्रयोगाला तो लोकांना सांगायचा की सुकन्या आहे; पण तिचा हा प्रॉब्लेम आहे, त्यामुळे तिची वाक्ये मी बोलतो. म्हणजे तो असं म्हणायचा, सुकन्या तुला काय म्हणायचं आहे की आमच्या घरी पाहुणे येणार आहेत असं ना? असं करून तो आख्खा प्रयोग करायचा, मी नुसते expressions दाखवायचे. असे आम्ही १० प्रयोग केले. त्यावेळी तो सांगू शकत होता की replacement घ्या. पण त्याने तसे केले नाही.

पुन्हा एकदा लक्षात आले की तुमचे सहकलाकार जर तुम्हाला सांभाळून घेत असतील, तर तुमचा आत्मविश्वास वाढतो आणि सेटवर एक कुटुंब असल्याप्रमाणे वातावरण असणे किती आवश्यक आहे तेही पटले. कारण तरच सुख-दुःखं वाटली जातात.

मी म्हटले, सुकन्या, आयुष्यातील एखादा चांगला-वाईट कोणताही प्रसंग माणसाला बरेच काही शिकवून जातो नाही का! समोरच्या माणसाची किंमत कळते!

सुकन्याच्या चेहेऱ्यावर कृतज्ञतेचे भाव दाटून आले होते. ती सांगू लागली, त्यामुळे माझ्यात आत्मविश्वास आला व पुन्हा सुरुवात झाली. मग मात्र मी थांबले नाही. 'शांती' नावाची सिरिअल आली. सकाळी ६ ते रात्री २ असे काम केले. या दरम्यान दोनदा फिल्म फेअर award, एकदा स्क्रीन, दोनदा स्टेट award मिळाले. सर्वकडे सत्कार, कौतुक झाले. 'दुर्गा झाली गौरी', 'झुलवा', 'शांती' हे माझ्या प्रवासातील महत्त्वाचे टप्पे! नंतर आले 'कुसुम मनोहर लेले' हे नाटक! विनयने जेव्हा मला विचारले तेव्हा एक वेगळी संहिता, एक वेगळा विषय म्हणून मी ते वाचले. त्यावेळी संजय मोने आणि गिरिश ओक यांनी विनयला विचारले की हे दोन्ही रोल तोडीस तोड आहेत. आम्हाला ते आलटून पालटून करायचे आहेत. राजा पोटे आणि मनोहर लेले! त्यामुळे मला पण दोन सुजाता करायला मिळाल्या. काहीतरी वेगळे करायला मिळाले. ते दोघे बदलायचे; पण मला एकाच भूमिकेतून दोन वेगळ्या reactions द्याव्या लागत. संजयला वेगळ्या आणि गिरीशला वेगळ्या!

या नाटकालाही 'झुलवा'सारखाच प्रतिसाद पण मिळाला आणि प्रत्यय पण आला. १० प्रयोग झाले आणि नंतरचा प्रयोग बालगंधर्वला होता. एक बाई आली आणि म्हणाली, तुम्ही भेटलात का सुजाताला? मी म्हटले, हो भेटायचे आहे; पण ती वर्ध्याच्या आश्रमात आहे. ती भ्रमिष्ट झाली आहे त्यामुळे तिला भेटायची परवानगी नाही मिळाली. ती म्हणाली, पण अशा अनेक सुजाता असतील ना? अशी एखादी सुजाता तुमच्या समोर आली तर तुम्ही काय कराल? मी म्हटले, मी लहान आहे, मी काहीच करू शकणार नाही; पण आमचे विनय आपटे काही करू शकतील कारण त्यांच्या बऱ्याच ओळखी आहेत. त्यावर ती म्हणाली, मग मला त्यांच्याकडे न्या. प्रथम माझ्या लक्षातच येईना ती काय बोलते आहे ते, पण मग मात्र अंगात थरथर भरली. माझ्या मामानेच मला फसवले आणि माझे मूल माझ्या मामाकडेच आहे त्याच्यापासून झालेले. सख्खा मामा! मामीला मूल होत नव्हते. मला माझे मूल हवे आहे.

त्यानंतर गोपीनाथ मुंडे आणि नीलम गोऱ्हे यांनी मंच पण काढला महिलांसाठी! त्यानंतर ज्यांच्या बाबतीत असे घडले, अशा अनेक बायका आम्हाला भेटल्या. या नाटकाचे




नाशिक, भुसावळला प्रयोग केले. प्रत्येक वेळी लोकं भेटायला यायची, आपली कहाणी सांगायचे. कुणाची मुलगी तर कुणाची बहीण! कुठे बोलू आम्ही आमची व्यथा? आमचे परिसंवाद व्हायचे आणि त्यावेळी जाणीव झाली आपले नाटक हे नुसते नाटक राहिले नाही तर आपण या भूमिका जिवंतपणे जगलो. त्यामुळे समाजात घडलेल्या अशा अनेक दुःखांना वाचा फुटली.

पण त्याच बरोबर असेही झाले की दोन मैत्रिणी, दोघीही घटस्फोटित आमच्याकडे आल्या आणि म्हणाल्या, आमचे नातेवाईक आमच्या मागे आहेत की पुन्हा लग्न करा म्हणून! पण तुमचे नाटक पाहिल्यावर असे वाटते की आपल्या बाबतीत असे घडले तर? दोन्ही व्हायला लागले आणि लक्षात आले की आपण जे नाटक करतो ते नुसते नाटक म्हणून न राहता लोकं त्यात स्वतःला शोधतात. आजही तो मनोहर लेले पुण्यात Telco मध्ये नोकरी करतोय. आमच्या नाटकाला पण तो येऊन गेला. पुराव्याअभावी पोलीस त्याला पकडू शकत नाहीत. ती मुलगी मात्र वर्ध्याच्या आश्रमात भ्रमिष्टावस्थेत राहत आहे.

७५० प्रयोग झाले या नाटकाचे! खरे म्हटले तर प्रथम हे नाटक चालत नव्हते. कसेबसे १५० प्रयोग झाले तेव्हा विनयने ठरवले आता हा प्रयोग फुल झाला नाही तर नाटक बंद करायचे. शृंगारपुरी गावात नाटक होते. आणि काय आश्चर्य! गावात लोकं ३५००. पण १५००० बुकिंग झाले. दुसऱ्या दिवशी demand show झाला. आणि त्यानंतर मात्र ह्या नाटकाची घोडदौड सुरू झाली. प्रभाकर पणशीकर म्हणाले पण की 'तो मी नव्हेच' या नाटकाचे आम्ही एवढे प्रयोग केले नाहीत एवढे पाठोपाठ तुम्ही प्रयोग केलेत. आमच्या नाटकाच्या स्टेजसाठी वगैरे गवळी म्हणून contractor होता. आमच्या नाटकामुळे त्याला पण फायदा झाला आणि त्याने गावात एक तीन मजली बिल्डिंग बांधली. त्याच्या गाडीवर नाटकाचे cut outs लावून तो हिंडायचा. आज तो या जगात नाही; पण गाडीवर cut outs मात्र तसेच आहेत.

कुसुम लेलेंच्या भूमिकेतून तिला बाहेर काढण्यासाठी मी म्हटले की 'कुसुम मनोहर लेले' या नाटकाद्वारे समाजातील हीन वृत्तीचे दर्शन घडले आणि लोकजागृतीही झाली नाही का? त्यावर सुकन्या म्हणाली, खरं सांगू का की अशावेळी आपल्या कलाकृतीद्वारे आपण समाजासाठी काहीतरी करतो ह्याचा एक वेगळाच आनंद मिळाला.

त्याच दरम्यान संजयचे आणि माझे जमले. सर्वांनाच आश्चर्य वाटले. आईवडील दहा वेळा विचारत होते, कारण स्वभाव एकदम भिन्न, पण मी आईला सांगितले काय करणार, प्रेमात तर पडले आहे. मी त्याला सांगितले की, आपले हे शाळा-कॉलेजातील प्रेम नाही. तू मोठा आहेस, मी मोठी आहे. कोणी कोणामुळे उद्याला आलो नाहीत. किती वर्षे एकत्र राहायचे हे ज्याने त्याने ठरवायचे! कोणावरही

जबरदस्तीला अर्थ नाही.

पहिली anniversary आमची iccu मध्ये झाली. पुण्यात होतो आम्ही. तीन प्रयोग होते. श्रीरंग गोडबोल्यांकडे होतो. अचानक संजयला कसेतरी होऊ लागले. Check up केले. ९०% blocks होते. सर्व प्रयोग रद्द केले. डॉक्टरांनी सांगितले की आज जर त्यांनी प्रयोग केला तर एकतर फोटोमध्ये किंवा कोमात किंवा paralyzed! हिंदुजाला नीतू मांडके यांच्याकडे नेले. त्यांनी विचारले, मी ऑपरेशन करीन पण नंतर तू सर्व पथ्य पाळणार का? तसे असेल तर माझा वेळ फुकट घालवू नकोस. मर तू! सुकन्याला काय समजावयाचे ते मी समजावीन! पण आजच्या क्षणापर्यंत तो आपली शपथ पळत आहे. आज आम्ही छान आयुष्य जगतोय.

'आभाळमाया' हा माझ्या प्रवासातील आणखी एक मोठा टप्पा! खरं म्हटलं तर ही गोष्ट होती अनुष्का आणि आकांक्षा या दोघींची! पण मी काम करायला लागल्यानंतर ती गोष्ट झाली सुधा जोशीची! विनय आपटेने दिग्दर्शन केले होते. त्यातील माझ्या सुधा जोशी या चेहेऱ्यामुळे मी अनेक गरजू मुलांना शाळेत ॲडमिशन मिळवून दिली. मी त्यावेळी मुलांसाठी व्हाईस चॅन्सेलरपर्यंत गेले. चार वर्षे मी 'आभाळमाया' केली. मुलीच्या जुलीयाच्या जन्मानंतर पुन्हा लोकाग्रहास्तव पुन्हा ही सीरिअल सुरू झाली.

'कुसुम मनोहर लेले', 'जन्मगाठ', 'आभाळमाया' यांतील सर्व भूमिकांनंतर मी त्या भूमिकांशी एवढी एकरूप होत गेले की मला त्या भूमिकांचा विचार करायची सवय लागली. ही आत्ता अशी का वागली? तिने आत्ता काय उत्तर द्यायला हवे होते? आपण त्या ठिकाणी काय केले असते?

आणि हळूहळू मला या गोष्टींचा त्रास व्हायला लागला. डॉक्टर सांगायचे की प्रत्येक भूमिकेपासून तुम्ही भावनिकदृष्ट्या दूर राहायला शिका, पण जे काम करायचे ते झोकून देऊन करायचे, काम करताना बरोबरच्या सहकलाकारांना आपल्या सोबत घेऊन पुढे जायचे ही शिकवण होती. तुम्हाला अर्ध्या तासाचा एपिसोड दिसतो; पण त्यामागे खूप मोठी तपश्चर्या असते. अनेक गोष्टी एडिटिंगमध्ये कट होत असतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःला खूप शिस्त लावून घेणे आवश्यक असते अगदी सुरुवातीपासून! 'दुर्गा झाली गौरी'च्या वेळी गुरु पार्वती कुमारांनी आम्हाला जी शिस्त लावली ती नंतरही अंगीकृत केली आहे. याचवेळी सुलभाताई देशपांडेंनी शिस्त लावली होती की तुमचा scene




झाला की बाहेर जाऊन बसायचे आणि अभ्यास करायचा. तुमची एन्ट्री आली की हाक मारली की पुन्हा यायचे!

विजयाबाईंचे lifeline करत होते. तेव्हा मी बी.ए.च्या शेवटच्या वर्षाला होते आणि रेणुका शहाणे करत होती. नानावटी हॉस्पिटलमध्ये शूटिंग चालू होते. आम्ही दोघी अभ्यास करायचो, आम्हाला हाक मारली की खाली जायचो आणि आपला रोल करायचो. परीक्षेत जर कमी मार्क्स मिळाले असते तर सुलू मावशीला ते आवडले नसते हे सारखे डोक्यात असायचे. आजही पहाटे ४ वाजता उठून साग्रसंगीत डबा करून घेऊन मी शूटिंगला जाते. प्रतीक्षा लोणकर, मुग्धा गोडबोले अशांसारखी कितीतरीजण मुंबईबाहेरचे असायचे, घरचे जेवण नाही, मग मी त्यांच्यासाठीही डबा करून न्यायचे. पूर्वी जी म्हण होती ना की ह्रदयापर्यंत जायचे असेल तर पोटातील मार्ग सर्वात चांगला! त्यामुळे कोणालाही आपलेसे करता येते आणि हळूहळू सर्व युनिटलाच शिस्त लागायची. हळूहळू विचारांची देवाणघेवाण होते. कोणाचे काही प्रॉब्लेम्स असतील, डेट्सचे प्रॉब्लेम असतील तर सर्व मिळून solve करायचा प्रयत्न होतो. खेळीमेळीचे वातावरण तयार होते, युनिट म्हणजे एक कुटुंब बनते.

पूर्वी अशाप्रकारचे वातावरण सेटवर दिसायचे, पण आजकाल दिसत नव्हते. बऱ्याच कालावधीनंतर 'जुळून येती रेशीम गाठी'च्या सेटवर हेमंत देवधरने ते केले होते.




'जुळून येती'च्या सेटवर कुकर मागवायचो. डाळ, तांदूळ, आंबोळी पीठ सर्व काही होते. कारण दररोज वडापाव, मिसळपाव खाऊन चालणार नव्हते. मी माझ्या माणसाला सर्व शिकवले. तो थालीपिठापासून सर्व करायचा. तिथेही मी सर्वांना समजावून सांगायचे की जे काही मनात येत असेल ते स्पष्टपणे बोला, पाठून कोणी बोलायचे नाही. आपण सर्व इथे दिवसभर एकत्र काम करतो, फक्त चार तास घरी जातो. मग कशाला एकमेकांची उणीदुणी काढायची? हेमंतने हे खेळीमेळीचे वातावरण त्याच्या सेटवर निर्माण केले होते. लेखिका अरुणा जोगळेकर यांचे संवाद अतिशय सोपे होते. आपण जेव्हा प्रत्येक रोल करतो तेव्हा त्या लेखकाचा मोठेपणा समजतो. 'ती फुलराणी' केली तेव्हा पुल म्हणजे काय ते समजले, 'लेकुरे' केली तेव्हा कानेटकर समजले !

'जुळून येती' जेव्हा चालू होते, तेव्हा मला बायकांचे फोन यायचे, त्या सांगायच्या आम्ही सर्व कुटुंब 'जुळून येती' एकदम बघतो आणि आम्हीसुद्धा झाडांशी बोलतो. माझी आई नेहमी झाडांशी बोलताना मी लहानपणी पाहिले होते. आई म्हणायची, झाडांना पण श्वास असतो. त्यांना आपली भाषा समजते. नेमके हेच सूत्र मी पकडले आणि 'जुळून येती'मध्ये मी झाडांशी बोलले. एका प्रसंगात माई घरात एकटीच असते, प्रत्येकजण आपल्या कामाला निघून गेलेला असतो. कोणालाही तिच्यासाठी वेळ नसतो. ती रडत असते, मुलगा येतो आणि विचारतो, तेव्हा ती त्याला सांगते, अरे दोन मिनिटे तरी बोल रे माझ्याशी! एपिसोड संपला आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री, निर्माती माझी मैत्रीण स्मिता तळवलकरचा फोन आला. माझ्याकडे काम नाही. नातवंडं, सून, मुलगा बाहेर गेली आहेत, घर खायला येते, पण कोणाकडे वेळ नाही. तुझ्या आणि गिरीशसाठी मी ही सीरिअल बघते. अगं माझ्या आयुष्यात हे असेच घडतंय!

आयुष्याच्या सायंकाळी अशी अवस्था झालेल्या स्मिता आपल्याला आज घराघरांतून दिसतात. आपल्याला वाटते या सीरिअलमधून काहीतरी दाखवतात; पण तसे नसते. फेसबुकवर मला ह्युस्टनहून एका मुलीचा फोन आला, आजचा आपला एपिसोड पहिला आणि मला खूप guilty वाटले. मी दिवसभर खूप कामे करते. पण भारतात असलेल्या माझ्या आईला नेहमी गृहीत धरते. तिला कधी फोन करत नाही. आजपासून ठरवले आहे की दररोज फोन करायचा आणि आईला विचारायचे की तू कशी आहेस? खरंच किती बरे वाटेल तिला माझ्या एका वाक्याच्या चौकशीने! तुमचे खरोखर खूप खूप आभार! तुमचे विचार खूप काही शिकवून गेले. कोणतीही सीरिअल म्हणजे जीवनाचे त्यात प्रतिबिंब दिसते. हा केवळ नुसता time pass नाही. आपल्या मराठी सीरिअल्स reality च्या जवळ असतात, त्याचे चित्रण वास्तव असते.

अशा ह्या क्षेत्रामध्ये मला उभे केले माझ्या आईवडिलांनी! त्यांनी एकच शिकवले की आयुष्यात काहीतरी चांगले करायचे आहे आणि नंतरच मरायचे आहे. तुझ्या कामावर आपले घर चालत नाही, चूल पेटत नाही, त्यामुळे कुठेही पैशासाठी तडजोड नको करूस! आम्हाला मान खाली घालायला लागेल असे कोणतेही पाऊल उचलू नकोस. लग्नानंतर सासूबाई आणि संजयचा पूर्ण पाठिंबा होता म्हणूनच आज मी इथपर्यंत पोहोचू शकले.

सुरुवातीच्या काळात शाम बेनेगल यांची एक सीरिअल होती. त्यातील costumes वापरायला मी नकार दिला. मला सांगितले गेले की मग तू हे काम करू शकणार नाहीस. मी सांगितले काही हरकत नाही. एकदा हे establish झाले आणि नंतर अशा प्रकारचे रोल माझ्याकडे आले नाहीत.

आत्ता नुकतेच आमचे 'सेल्फी' हे नाटक आले. ३५ वर्षे आम्ही जुन्या मैत्रिणी. शिल्पा नवलकर, सुचित्रा बांदेकर, पूर्वा गोखले, मधुरा वेलणकर, सोनाली सर्वांना समान रोल द्यायचे होते, कोणी वरचढ होता कामा नाही. त्यातून

# Selfie सेल्फी



'सेल्फी'चा विषय सुचला. Waiting room मधला सीन म्हणजे हे नाटक! पहिला अंक वाचला. सर्वांना आवडला. मग दुसरा अंक लिहिला, आणि हे नाटक जन्माला आले. नेहमीचा दिग्दर्शक नको होता, म्हणून मग अजित भुरेला नाटक वाचून दाखवले. तोच प्रोड्युसर झाला आणि त्यानेच दिग्दर्शनही केले. ३ ऑक्टोबरला इंदूरच्या लोकांनी प्रयोग करायला सांगितले. सलग ५ प्रयोग केले. आज ५३ प्रयोग झाले. हे फक्त स्त्रीचे नव्हे तर व्यक्तीचे नाटक आहे. 'सेल्फी' म्हणजे स्वतःकडे वळून बघणे. आपल्या वागण्याचा दुसऱ्यावर परिणाम होतो म्हणून स्वतःकडे त्रयस्थपणे बघायला हवे. आयुष्यात एखादा क्षण असा येतो की तो पकडून स्वतःला बदलायचे असते. प्रत्येक माणसात काही ना काही अवगुण असतात आणि त्याचा परिणाम दुसऱ्यावर होत असतो. स्वतः बदला, बाजूची परिस्थिती बदलते. दुसऱ्यांकडे, समाजाकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन बदलतो, तसेच समाजाचा आपल्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. इथे कोणी रडूबाई नाही, प्रत्येकीला आपले प्रॉब्लेम्स कळले आहेत आणि ती ते सुधारतेय!

'सेल्फी' या नाटकानेसुद्धा बरेच काही शिकवले. नुसते नाटकातच नव्हे तर प्रत्यक्ष स्वतःच्या आयुष्याचा विचार करायला लावले या नाटकाने! माझ्या आयुष्यात संजय आला आणि नाटकाकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन बदलला. आमची दोघांची जीवनपद्धती वेगळी आहे. तो अतिशय साधा आहे. माझ्यापेक्षा ८ वर्षांनी तो मोठा आहे. अजूनही तो ट्रेनने प्रवास करतो. मला असे राहाता येत नाही. जुलिया झाल्यावर मी बदलले. आईने मुलीची मैत्रीण असावे हे म्हणायला सोपे वाटते, पण प्रत्यक्षात त्या भूमिकेत गेल्यावर समजते. विठ्ठल कामत जे म्हणतात ते अगदी खरे आहे– 'आई मुलाला जन्म देत नाही तर मूल आईला जन्म देते!' कंप्युटर म्हणजे काय ते ज्युलियामुळे समजले. त्यांचे विचारही खूप छान आहेत, त्यांचा, त्यांच्या पिढीचा आदर केला पाहिजे! स्वातंत्र्य आणि स्वैराचार ह्यात एक thin line आहे ती त्यांना समजावून दिली पाहिजे! आम्ही सर्वजणी बघता बघता त्या भूमिकेशी एकरूप झालो आणि स्वतःचा विचार करू लागलो.

'सरकारनामा', 'मारिया डिसुझा', 'परवाने', 'सरफरोश', 'जिगर', राम गोपाल वर्मा 'रक्त चरित', 'आभाळमाया', 'lifeline', 'शांती', 'रंग बदलती ओढणी', 'कम या ज्यादा' असे अनेक सिनेमे झाले.

'Time and tide wait for none' असे जे म्हणतात ते करमणुकीच्या क्षेत्रात तर अगदी खरे आहे. एखादा कलाकार कलेमध्ये जेव्हा एवढा व्यग्र होतो, तेव्हा त्याला समजतही नाही की किती तपे, किती वर्षे होऊन गेली काम करता करता! ही गोष्ट सुकन्याच्या बाबतीत खरी आहे. ३० वर्षांपूर्वी 'वारसा लक्ष्मीचा' हा मराठी चित्रपट तिने केला. मराठी थिएटर, हिंदी थिएटर, मराठी रंगभूमी अशा विविध ठिकाणी तिने आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. या अभिनयाच्या प्रवासात अनेक खाचखळगे आले, पण मोठ्या जिद्दीने ते पार करत येणाऱ्या प्रत्येक भूमिकेशी ती समरस झाली. तिने प्रत्येक भूमिकेत स्वतःला एवढे झोकून दिले की सुकन्या म्हणते परकाया प्रवेश म्हणजे काय ते मला समजले. सुकन्या म्हणते म्हणूनच माझे आणि दुबईचे काहीतरी अव्यक्त नाते

असावे. दुबई मला एवढी भावते त्याचे कारण विचारातील सारखेपणा आणि कोणत्याही भूमिकेत झोकून देण्याचा स्वभाव! परमेश्वराने जे दिले त्यात समाधान मानून, प्राप्त परिस्थितीचा स्वीकार करून जिद्दीने, मेहनतीने, दुबईने शून्यातून जग निर्माण केले. माझ्या आयुष्याची वाटचालसुद्धा ह्याच पाऊलवाटेवरून नाही का गेली? अपघातांच्या धक्क्याने माझे अभिनयाचे विश्वच हादरले. पण त्याही परिस्थितीचा हसतमुखाने स्वीकार करून पुढील यशस्वी वाटचाल केली.

सुकन्या सांगू लागली, मी प्रथम दुबईत आले साधारण ८६ मध्ये! मंगला खाडिलकर, त्यागराज खाडिलकर, शिरीष कणेकर असा कार्यक्रम होता. त्यानंतर अनेकदा कधी कार्यक्रमासाठी तर कधी pleasure trip म्हणून मी दुबईत येऊन गेले आणि प्रत्येक वेळी दुबईतील स्थित्यंतरे पाहिली. ८०/९० मधील दुबई म्हणजे एक छोटेसे कुटुंब होते. भारतीय आणि पाकिस्तानी लोकं जास्त दिसत होती. शहर आरशाप्रमाणे लख्ख असायचे. एखादे तांब्या-पितळ्याचे भांडे लखलखीत घासून वाळत घालावे तसे शहर वाटायचे. औषधालासुद्धा कागदाचा चिटोरा रस्त्यात पडलेला सापडणार नाही, पानाची पिचकारी तर दूरची गोष्ट! रात्री-बेरात्री एकटे हिंडायला भीती वाटत नव्हती. खूप safe वाटायचे. रस्त्यावर trafic नव्हते किंवा horn चा कलकलाट नव्हता. कुठे कोणत्याही गोष्टींसाठी मारुतीच्या शेपटासारख्या रांगा नव्हत्या. दुबईला तर भारतात सुवर्ण नगरी म्हणूनच ओळखतात. पण आपल्या इथे जे वाटते त्याप्रमाणे मात्र इथे नाही की झाड हलवले की पैशाचा पाऊस पडला. दिवस-रात्र लोकं कष्ट करतात. आणि हे पैसे मिळवण्यासाठी आपल्या कुटुंबापासून वर्षानुवर्षे दूर राहतात. विशेषतः दुबईतील कामगार वर्ग! मिळणाऱ्या पगारात कुटुंबासह दुबईत राहणे शक्य नसते. दोन-तीन वर्षांत घराकडे भेटायला जाणेही कित्येकांना शक्य होत नाही.

पण हळूहळू दुबईचे रुप पालटू लागले. छोट्याशा शहराचे रुपांतर आता मोठ्या शहरात होऊ लागले आहे. दुबई आणि माझ्यातल्या आणखीन एका साम्याची आठवण झाली. प्रथम दुबईत भारतीय, पाकिस्तानी लोकं दिसत होती; पण आता २०१५ पर्यंत अक्षरशः जगातील सर्व देशांतील जात-धर्म-पंथाची माणसे दुबईत दिसतात. दुबई सर्वांना आपल्यात सामावून घेते. आधी ती कधी भारतीय, तर कधी पाकिस्तानी भूमिका जगत होती, पण आता निरनिराळ्या भूमिका पार पाडते. दुबई कधी चायनीज होते, तर कधी आफ्रिकन, कधी अमेरिकन, तर कधी युरोपिअन भूमिकेत! त्यांच्या चालीरीती, त्यांच्या भाषा, त्यांची वेशभूषा, त्यांचे सणवार, त्यांचे खाद्यपदार्थ सर्व काही दुबईने आत्मसात केले आहे. भारतीय, पाकिस्तानी, बांगलादेशी, फिलिपिन्स, मलेशिअन, कोरिअन, नेपाळी, आफ्रिकन, युरोपिअन, अमेरिकन सर्वांच्या संस्कृतीशी मिळतेजुळते घेते. आज दुबईत सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ मिळतात. खरोखरच दुबई अनेक भूमिका खऱ्या अर्थाने जगते आहे. कित्येक वेळा असे वाटते ती पण माझ्यासारखी 'परकाया प्रवेशाचा' अनुभव घेते? आणि पुन्हा स्वतःचे असे अस्तित्व वेगळे ठेवते? जशी मी पुन्हा सुकन्या असते तशीच ती पण दुबई म्हणून वेगळेपण टिकवते!

दुबईचे हे सर्वांना सामावून घेणे पाहिले की मुंबईची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. ती नाही का तिथे येणाऱ्या सर्वांना आसरा देते, कामधंदा देते आणि सर्वांना आपलेसे करते? मुंबईत pollution आहे, गर्दी आहे, तिथे माणूस माणसाला विचारत नाही, सर्व commercial आहे. हे सर्व अगदी खरे आहे; पण जो मेहनत करील त्याच्या पोटाची खळगी पण ही मुंबईच भरते! आता दुबईसुद्धा commercial होत चालली आहे, पूर्वीसारखी सुरक्षित राहिली नाही, स्वच्छता कमी होतेय, भपका जास्त झालाय. पूर्वी दिवाळीला कंदील आणि पणत्या दिसत. आता competition मध्ये दिव्यांच्या माळा लावून झगझगाट केलेला दिसतो. सर्वकडे महागाई वाढते आहे. माझ्या प्रत्येक ट्रिपमध्ये मला दुबईची महागाई जाणवते. कळत-नकळत या देशातसुद्धा indirect taxes यायला लागले आहेत.

पण जसजसे शहर मोठे होत जाते तसतशा या गोष्टी अपरिहार्य असतात. पण त्याच बरोबर हेही विसरता येत नाही की आज दुबईने लाखो घरांमध्ये आशेचा किरण निर्माण केला, स्वप्नांना आकार दिला. आपला देश सोडून, आपल्या मायेच्या माणसांपासून दूर परदेशात येऊन, येथील कायद्याच्या चौकटीत राहून जी माणसे मेहनत करतात ती सर्वजण आपल्या कुटुंबाचे जीवन आनंदी करतात आणि म्हणूनच सर्वांना सामावून घेणाऱ्या, प्राप्त परिस्थितीवर मात करून स्वर्ग फुलवणाऱ्या दुबईची प्रत्येक ट्रिप नात्यांचे बंध अधिक दृढ करते!

■ सुकन्या कुलकर्णी-मोने
sukanyamone@rediffmail.com






# राजाय तस्मै नमः...!

## ■ शिबानी जोशी

■ मुलाखतकार : मेघना वर्तक

हसरा चेहेरा, शांत पण धारदार आवाज, स्पष्ट शब्दोच्चार, मराठी भाषेवरील प्रभुत्व आणि या सर्वांना साजेलशी अशी बातम्या सांगण्याची स्वतःची अशी खास लकब! बातम्या सांगताना दर्शकांना आवडेल अशा पद्धतीने आवाजातील चढउतार, मध्ये घेतलेली अर्ध्या क्षणाची विश्रांती, ठरावीक शब्दांवर दिलेला जोर आणि दर्शकांना बातम्या संपेपर्यंत खुर्चीला खिळवून ठेवणारी एक वृत्त निवेदिका म्हणजेच शिबानी जोशी! १९८९ साली प्रथम 'सह्याद्री' या दूरदर्शन वाहिनीवर तिने कामास सुरुवात केली. त्यावेळी आजच्या इतक्या वाहिन्या पण नव्हत्या. तेव्हापासून आजतागायत गेल्या २५ वर्षांहून अधिक काळ ती घराघरात आणि दर्शकांच्या मनात घर करून राहिली आहे.

१९९० सालापासून मुंबई आकाशवाणीवरसुद्धा वृत्त निवेदिका म्हणून ती कार्यरत आहे. अदृश्य, पण आपल्या धारदार आवाजाने श्रोत्यांच्या मनाचा वेध घेणारी, दीर्घकाळपर्यंत श्रोत्यांच्या मनात स्थान मिळवलेली अशी शिबानीसारखी एखादीच निवेदिका असेल.

'लोकसत्ता', 'नवशक्ती', 'सामना', 'लोकप्रभा', 'गावकरी' इत्यादी वृत्तपत्रांतून गेली १५ वर्षे अव्याहतपणे सामाजिक विषयांवर लिखाण करणारी लेखिका म्हणजे शिबानी जोशी!

अशाप्रकारे दूरदर्शन, आकाशवाणी आणि वृत्तपत्रे अशा मीडियाच्या तिन्ही प्रवाहांद्वारे दर्शक, श्रोते आणि वाचकांपर्यंत पोहोचणारी शिबानीसारखी स्त्री विरळाच!

शिबानी जोशी आणि 'आभाळमाया', 'रेशीम गाठी', 'कॉमेडी एक्सप्रेस' या सुप्रसिद्ध लोकप्रिय मालिकांचे लेखक अनिल हर्डीकर हे दोघे मिळून 'अरे प्रश्न अरे प्रश्न' असा जीवनातील विविध प्रश्नांचा वेध घेणारा कार्यक्रम सादर करतात. आयुष्यात प्रत्येक पावलावर प्रश्न पडत असतात. प्रश्नांचे उत्तर मिळणे खूप अवघड असते. पण त्याकडे कानाडोळा न करता सकारात्मक दृष्टिकोन ठेवून त्यांना सामोरे जायचे. मेहनत करायची, प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढायचा अशी शिकवण या कार्यक्रमाद्वारे ते देतात आणि म्हणूनच जीवनाचे नेमके हेच तत्त्वज्ञान तिला दुबईच्या प्रगतीमध्ये दिसले. ईश्वराने वाळवंटाचे माप दुबईच्या पदरात घातले, पण त्यावर रडत न बसता प्राप्त परिस्थितीत सकारात्मकतेने मार्ग शोधला, संधी मिळताच तिचे सोने केले! आणि म्हणूनच तिने जेव्हा दुबईला भेट दिली तेव्हा तिच्या मनात आपल्या देशाबरोबर झालेली तुलना तिने शब्दांकित केली आहे. आणि म्हटले दुबईने मोठा आदर्श जगापुढे घातला आहे, आपल्याला काय योग्य आहे ते आपण त्यातून शिकायचे आहे.

शिबानी म्हणते, दुबई, जगातील एक महान आश्चर्य! २१व्या शतकातील सर्वांचा आवडता टूरिस्ट स्पॉट म्हणजे दुबई! वाळवंटाचे नंदनवनात रूपांतर केलेला देश म्हणजे दुबई! आपल्या भारतात तर समज आहे, पैशाचे झाड असलेला देश म्हणजे दुबई! झाड हलवले की पैशाचा पाऊस पडतो. दुबईत गेले की फक्त बॅग भरून सोने आणायचे. सर्व सुखे हात जोडून तुमच्यापुढे तत्पर असतात आणि म्हणूनच कोणी दुबईतून आले की सर्वांच्या त्याच्याकडून अपेक्षा असतात.

पण खरंच हा समज खरा आहे का? माझ्या दुबईच्या छोट्याशा भेटीत अनेक गोष्टी माझ्या लक्षात आल्या. भारतात आपल्या समाजात जसा अल्प, मध्यम, उच्च मध्यम, श्रीमंत असे गट आहेत तसेच दुबईत पण आहेत. कामगार, नर्सेस, मॉल किंवा इतरत्र सेल्समन म्हणून काम करणारे असा मोठा वर्ग इथे आहे. तसेच आयटी, मॅनेजमेंट क्षेत्रात काम करणारा नोकरदार वर्ग आहे तो मध्यम किंवा उच्च मध्यमवर्ग आहे. तिथे जाऊन स्वतःचा उद्योगधंदा सुरू करून पैसे कमावणारा श्रीमंत वर्ग तिथेही आहे. त्यामुळे दुबईत गेले की मालामाल झाले असं म्हणण्याची गरज नाही. ज्याप्रमाणे भारतात नोकरी धंद्यासाठी सर्वांचा ओघ मुंबईकडे असतो, कारण जो मेहेनत करील त्याला तिथे संधी आहेत, त्याचप्रमाणे दुबईतही नोकरीच्या भरपूर संधी आहेत फक्त काम करण्याची तयारी हवी. पैशाचे झाड कुठेही नसते आणि पाऊस तर कधीच पडत नसतो! साधारण गुजराथी, सिंधी वर्ग धंद्यात असतो. काहींचा धंदा तिथे उत्तम चालतो; पण अनेक जण धंदा चालत नसल्यामुळे परत येतात. माझ्या माहितीत एक लखनवी कपड्यांचा धंदा करणारा गुजराथी माणूस आहे, सर्व गुंडाळून परत आला. जगाच्या पाठीवर कुठेही जा येणाऱ्या संधीचा फायदा घेऊन मेहेनत केलीत तर मुंबई काय, दुबई काय दोन्ही सारखेच !

पूर्वी दुबई म्हणजे स्मगलिंग, ब्लॅक मनी यासाठी प्रसिद्ध होते. पण आता तसे राहिले नाही. आता जगात सर्वांचा आकर्षण बिंदू आहे दुबई!

खरं तर ४५ डिग्रीच्या वर तपमान असलेला हा देश आहे. आपण इथे ३७-३८ डिग्रीच्या वर तपमान गेले की 'ग्लोबल वॉर्मिंग' म्हणून चिंता व्यक्त करतो. पण दुबईमध्ये हे रुटीन आहे. लोकांच्या राहणीमानावर त्याचा परिणाम दिसत नाही. त्यांचे रुटीन व्यवस्थित असते. ज्यावेळी अरबी लोकांकडे पैसे नव्हते तेव्हाही आणि आज पैसे आलेत तेव्हाही!

तिथे वाळवंट आहे, पण वाळवंटात नंदनवन बनवण्याची कला त्यांनी आत्मसात केली आहे. आपल्याकडे असलेल्या अनेक गोष्टी तिथे नाहीत; पण तरीही तो चकचकीत देश वाटतो. सर्व पायाभूत सुविधांनी युक्त असा देश वाटतो. मुख्य म्हणजे या देशाचे आकर्षण असलेला देश वाटतो, याचे कारण एकच तिथले प्रशासन! तिच्यामुळे दुबई आपल्यापेक्षा वेगळी ठरली आहे. नागरिकांना राहण्यासाठी जे जे लागते ते दिलेच पाहिजे ही वृत्ती आणि कडक शिस्त! प्रशासनाची ही वृत्तीच जगात जे जे काही चांगले आहे ते दुबईतील नागरिकांना देण्यास कारणीभूत झाली. खाणेपिणे, जगातील सर्व ठिकाणचे शिक्षण, वैद्यकीय उपचार, दळणवळणाची साधने, सर्व प्रकारच्या सुखसोयी, स्वच्छता, करमणुकीची साधने आणि ह्या सर्वांसाठी केलेले कडक नियम! हे सर्व तिथल्या हुकूमशाहीमुळे शक्य झाले आहे.

आपल्या भारतातल्या कारभाराला कंटाळून कधी कधी आपण म्हणतो, ह्या लोकशाहीपेक्षा हुकूमशाही परवडली! त्याचा प्रत्ययही इथे येतो. 'आले देवाजीच्या मना' ह्या म्हणी ऐवजी 'आले राजाजींच्या मना' ही म्हण दुबईला यथार्थ लागू पडते. राजाच्या मनात आले की इथे रस्त्याची गरज आहे की तिथे रस्ता झालाच म्हणून समजा! मग त्या

An initiative by Thane Municipal Corporation
and Dr. Uppal's ENT Hospital

# Every Ear Can Hear

Do you know a child
with hearing loss and not getting
any benefit with hearing aids?

Cochlear implants can open up a

## world of opportunities!



Financial assistance up to

**Rs. 4.5 lakhs**

is available

No cost for cochlear implant surgery

For further details, please contact audiologists

**Shejal: 9987588008 | Sonal: 9869371462**

**Kanchan: 9819862424**

रस्त्याच्या कामात येणाऱ्या सर्व अडचणी सहज दूर केल्या जातात. तिथे रस्त्याचे कामही पद्धतशीरपणे होते. मालात भेसळ नाही. त्यामुळे चार महिन्यांतच खड्डे पडलेत, कुठे मधेच खचले आहेत असले प्रकार नाहीत. उंच टॉवर्स असू देत किंवा मोठमोठे ब्रिज असू दे. वर्षवर्ष नुसते पेपर वर्क चालू आहे, त्यानंतर चार-पाच वर्षे काम चालू आहे, ट्रॅफिकची कोंडी होतेय, रस्त्यावर सामान पडले आहे असे प्रकार नाहीत, इतके पद्धतशीरपणे सर्व काम होते. तिथे नाही कोर्ट-कचेरी, नाही तक्रारी. नाही संप नाही मोर्चे! अर्थात स्वातंत्र्य कोणालाही हवे असते. पण कधी कधी 'सिधी उंगलीसे घी नही निकलता, तो उंगली टेढी करनी ही पडती है' असे म्हणतात. त्याप्रमाणे काही कामे अशीही होऊ शकतात. इथे प्रत्येक घर, दुकान मॉल, कार सर्व सेन्ट्रली एअर कंडिशन्ड आहे. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली आहेत, त्यांना नियोजन करून पाणी घातले जाते. कारण इथे पडणारा पाऊस म्हणजे नगण्य आहे!

प्रत्येक दुकान, मॉल, हॉटेल्स, ऑफिसेस सर्वकडे राजाचा फोटो लावलेला असतो. 'राजाय तस्मै नमः' दुसरे काय! अर्थात दुबईत मूळ नागरिक अरबी लोकांची संख्या खूप कमी आहे. सर्व पायाभूत सुविधा बनवणारे आणि वापरणारे परदेशी लोकंच आहेत. पर्यटक यायचा सीझन आला की फुलझाडे इम्पोर्ट करून लावली जातात अशी माहिती तेथील एका बँक अधिकाऱ्याने मला दिली. बराचसा भाजीपाला भारताकडून इम्पोर्ट केला जातो. हा वाळवंटाचा देश त्यामुळे पाण्याची कमतरता असेल असे आपल्याला वाटते. एकेकाळी हे खरे होते पण तेलामुळे जेव्हा पैसा आला तेव्हा अद्ययावत विज्ञानाच्या सहाय्याने येथे पाण्याचे मोठे प्लांट्स बनवले आहेत. त्यामुळे इथे लोकांना पाण्याची एक बालदीसुद्धा भरून ठेवावी लागत नाही. सांडपाण्याचासुद्धा योग्यप्रकारे वापर केला जातो. त्यावर रासायनिक प्रक्रिया करून नंतर ते पाणी झाडांसाठी वापरले जाते. सर्वकडे स्प्रिंकलर्सचे जाळे पसरले आहे. भर उन्हाळ्यातही हे २४ तास चालू असतात आणि म्हणूनच तापमान जरी ५० डिग्रीपर्यंत गेले तरी हिरवीगार हिरवळ डोळ्यांना गारवा देते.

आज भारतात पूर येतात, एवढा पाऊस पडतो; पण तरीही भारतभर पाण्याचा तुटवडा असतो. त्यामुळे पाणीकपात, वीजकपात चालू असते. पाण्याचा प्रश्न तर एवढा गंभीर झाला आहे की शेते ओस पडली आहेत, शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत आणि ते कर्ज चुकवता येत नाही म्हणून आत्महत्या करत आहेत. आम्ही निसर्गाने दिलेली झाडेच कापून टाकतो आणि पर्यावरणाचा ऱ्हास करतो. भारतात नैसर्गिक सौंदर्य एवढे आहे की खरोखर भारताला मिळालेले हे एक मोठे वरदान आहे. टूरिस्टसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या तर भारत मोठे टूरिस्ट सेंटर होऊ शकेल. पण हे जर-तर झाले! त्यासाठी आधी आपली सीस्टिम बदलली गेली पाहिजे!

दुबईत चोऱ्यामाऱ्या होत नाहीत. सोन्याच्या दुकानात गेलात तर साडीच्या दुकानात दाखवतात त्याप्रमाणे दागिन्यांचे ढीग आपल्यासमोर ठेवतात. चोरी करताना पकडले गेलात तर शिक्षा अतिशय कडक आहेत. हातच तोडतात. रस्त्यात कचरा टाकताना दिसलात तर जबरदस्त fine होतो. गाडी चालवताना ट्रॅफिकचे नियम तोडलेत तरी खूप मोठा fine भरावा लागतो. मुळात ५०० ची नोट सरकवली की ड्राइव्हिंग लायसन्स मिळत नाही.

मनात विचार आला, भारतात जर अशा कडक शिक्षा आल्या तर? चोऱ्यामाऱ्यांचे भय नाहीसे होईल. दररोजच्या लोकल प्रवासात, रस्त्यातून येता-जाता पाकीट मारले का, गळ्यातून चेन खेचली का, असे भय राहणार नाही . सरकारला स्वच्छता अभियान राबवावे लागणार नाही, रस्ते आणि लावलेल्या टाइल्सवरती पानाच्या पिचकाऱ्यांची रांगोळी दिसणार नाही, लाल सिग्नलच्या पुढे येऊन थांबणाऱ्या गाड्या दिसणार नाहीत की ५०० रुपयांत लायसन्स मिळणार नाही.

आणि म्हणूनच दुबई बघताना माझ्या मनात विचार आला, आज भारतात हुकूमशाही असती तर आज भारताचे चित्र कदाचित वेगळे असते का? उत्तर मिळाले, हो चित्र वेगळे असते; पण मग लोकशाहीमुळे मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या स्वातंत्र्यावर गदा आली असती. व्यक्तीस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य! कोणताही विषय असो, तुमचा संबंध असो नसो, स्वतःचे मत मांडायचे, बोंबाबोंब करायची ह्यावर पण बंदी येईल.

पोपट जेव्हा स्वैर आकाशात विहारतो, तेव्हा स्वातंत्र्याचा आनंद त्याच्या विहारण्यात दिसतो. पण तो जेव्हा पिंजऱ्यात अडकतो, मग भलेही तो पिंजरा सोन्याचा असो, त्याला तो पिंजराच आहे हे कळते आणि स्वातंत्र्याची किंमत कळतेच. त्यामुळे लोकशाही ही आपल्याला मिळालेली आहे, पण लोकशाहीत अधिकाराबरोबरच कर्तव्य पण असतात हे विसरून चालता कामा नये.



# शिबानी जोशी

- १९८९ पासून दूरदर्शनवर निवेदिका.
- १९९० मुंबई आकाशवाणीवर वृत्तनिवेदिका म्हणून कार्यरत.
- 'छान छान गोष्टी' या पुस्तकाची लेखिका.
- १५० एपिसोडमध्ये 'अँकर' म्हणून काम केले आहे.
- १००० हून अधिक कार्यक्रमांचे निवेदन.
- १०० डॉक्युमेंटरीजना आवाज दिला आहे.
- महाराष्ट्राची लोकपरंपरा असलेल्या 'भोंडला', 'हादगा', 'फुलाबाई'चे १०० हून अधिक देशविदेशांत प्रयोग केले आहेत.
- 'लोकसत्ता', 'नवशक्ती', 'सामना', 'लोकप्रभा', 'गावकरी' इत्यादी वृत्तपत्रांत गेली १५ वर्षे लिखाण करत आहे.
- अनेक दिवाळी अंकात महिलांविषयी लिखाण.
- नाट्यदर्पणाचा अभिनयासाठी पुरस्कार.
- महाराष्ट्र वैभव, महाराष्ट्र कलादर्पण पुरस्कार.
- गुणवंत कामगार पुरस्कार.
- राज्यनाट्य स्पर्धा, बालनाट्य विभाग, मुंबई महानगरपालिका एकांकिका स्पर्धा, कामगार कल्याण मंडळ, मुंबई एकांकिका स्पर्धा ह्या सर्वांसाठी तीन वर्षे परीक्षक म्हणून काम केले .
- 'अरे प्रश्न अरे प्रश्न' हा जीवनातील विविध प्रश्नांचा सकारात्मकतेने हसरा वेध घेणारा कार्यक्रम, शिबानी जोशी आणि 'आभाळमाया', 'रेशीम गाठी', 'पिंपळपान', 'किमयागार', 'कॉमेडी एक्सप्रेस' या लोकप्रिय मालिकांचे लेखक अनिल हर्डीकर हे दोघे सादर करतात. मुंबई, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, दिल्ली, इंदूर अशा ६० ठिकाणी हा कार्यक्रम सादर केला आहे .
- शिबानी जोशी आणि दूरदर्शनवरील वृत्तनिवेदिका दीपाली केळकर यांचा मराठीतील सुप्रसिद्ध साहित्यिकांवर आधारित 'मनोरंजन किस्स्यांचा हास्य संजीवनी' हा कार्यक्रम लोकप्रिय झाला आहे.
- ३०० प्रयोग झालेल्या आपल्या सासऱ्यांच्या, म्हणजेच सुप्रसिद्ध सदानंद जोशी यांच्या 'मी अत्रे बोलतोय' ह्या एकपात्री नाटकाचे संपादन शिबानी जोशी यांनी केले आहे. हे पुस्तक नोव्हेंबर २०१६ मध्ये त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी, 'व्यास क्रिएशन' ही संस्था प्रकाशित करत आहे.

थोडक्यात काय जर-तर अशा बऱ्याच गोष्टी आहेत. प्रत्येक देशाची अशी एक खासियत असते. आपण जेव्हा दुसऱ्या देशात जातो, तेव्हा साहजिकच आपण आपल्या देशाबरोबर त्याची तुलना करतो. प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतात. बरे-वाईट. दोन्ही कुठेही गेले तरी असतेच. त्यातून जिथे जिथे जे जे काही चांगले दिसते ते आत्मसात करण्यातच शहाणपण आहे!

दूरदृष्टी, कल्पकता, मेहेनत यांच्या साहाय्याने, सकारात्मक दृष्टी ठेवून, प्राप्त परिस्थितीत ईश्वराने दिलेल्या संधीचे दुबईने सोने केले. ह्यातून आपण काही शिकलो तर?

▪ **शिबानी जोशी**
joshishibani@yahoo.com





# मी आणि माझा व्यवसाय

मराठी माणूस हा खरं तर नोकरी धार्जिणा! आपली नोकरी बरी आणि आपला संसार बरा अशा वृत्तीचा! आपण एखाद्या व्यवसायात उतरावे असे शंभरातील दोन टक्के लोकांना वाटते! त्यामुळे इतके मोठे धारिष्ट्य कसे करू, या प्रश्नाने सदैव ग्रासलेला! तरीसुद्धा काही मंडळींनी साहस दाखविले आणि ते सिद्धही केले.
परदेशात जिद्द, मेहेनत आणि दूरदृष्टी या त्रिगुणांच्या बळावर, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, परदेशातील कायदे आणि नियमांचा बडगा सांभाळत, त्यातून मार्गक्रमणा करत यशस्वी झालेल्या काही व्यावसायिकांचा अनुभव 'मी आणि माझा व्यवसाय' या सदरात समाविष्ट केला आहे, तो पुढील पिढीसाठी नक्कीच उद्बोधक ठरेल! यात सहभागी आहेत प्रदीप केसकर, प्रशांत-लीना मुळावकर, सुनील-स्नेहा मांजरेकर, संजीव-मनीषा फडके, शिरीष पटवर्धन.

– मेघना वर्तक






# व्रतस्थ

## ■ प्रदीप केसकर

■ मुलाखतकार : मेघना वर्तक

**अ**सं म्हणतात, केरळी माणूस आखाती देशात गेला की आपल्याबरोबर आणखी दहा जणांना घेऊन जातो. एकमेकांना मदत करून केरळ राज्याचे चित्रच त्याने बदलले आहे. एकेकाळचा गरीब प्रांत आज भारतातला श्रीमंत प्रांत झाला आहे. पण मराठी माणूस मात्र एकमेकांना मदत करत नाही!

पण मराठी माणसाबद्दल असलेला हा समज खोटा ठरवणारे, एका मध्यमवर्गीय घरात जन्माला आलेले मराठी व्यक्तिमत्त्व म्हणजेच प्रदीप केसकर! दुबईतील 'रमादा ग्रुप'चे चीफ फायनान्स कंट्रोलर आणि दुबईतील 'जिप्सी चायनीज रेस्टॉरंट'चे पार्टनर! स्वतःला तरुण वयात नोकरीच्या ठिकाणी जो अनुभव आला तो इतर मराठी बांधवांना येऊन द्यायचा नाही, या विचाराने प्रेरित होऊन दुबईत आल्यानंतर जवळपास १५० लोकांना मदतीचा हात दिला आणि त्यांच्या घरात आशेचा दिवा प्रज्वलित केला.

मी त्यांना म्हटले प्रदीप, दुसऱ्यांना मदत करण्याचे तुम्ही घेतलेले व्रत म्हणजे सर्वांपुढे मोठा आदर्श आहे. कोणत्याही प्रकारच्या फळाची अपेक्षा न धरता, निःस्वार्थी भावनेने तुम्ही करत असलेल्या व्रतामुळे अनेक जणांच्या स्वप्नांना आकार मिळाला. ह्या तुमच्या व्रतातून प्रेरणा घेऊन ह्या मदत केलेल्या तरुणांनी आणखी अनेकांना मदत केली तर मदतीची ही शृंखला अधिक दृढ होईल आणि म्हणूनच तुमची प्रेरणादायी यशोगाथा तुमच्याच शब्दांत वाचकांपर्यंत पोहोचवायची आहे.

त्यावर प्रसन्न मुद्रेने त्यांनी आपल्या बालपणापासूनच्या आठवणी सांगायला सुरुवात केली. अतिशय सामान्य अशा मध्यमवर्गीय घरात माझा जन्म झाला. वडील रेल्वेत होते, घरात पाच भावंडे होती. वसईला भाड्याच्या घरात राहत होतो. शालेय शिक्षण मराठीत झाले. मोठी बहीण नोकरीला लागली म्हणून आमची पुढची शिक्षणे झाली. घरात गरिबी

एवढी होती की ११ वीत गेलो तेव्हा फुल पॅन्ट मिळाली. पण आहे त्या परिस्थितीत आनंदाने राहायचे आणि त्यातून मार्ग काढायचा ही शिकवण होती. फायनान्समध्ये डिग्री घेतली, पण खरे तर मला कॉम्प्युटरची आवड होती. एका कॉम्प्युटर कंपनीत मला नोकरी लागली. तिथेही त्यांनी मला सांगितले की कॉम्प्युटरचे शिक्षण आवश्यक आहे. त्यावेळी म्हणजे १९८१ साली फायनान्ससाठी cobol programming वापरले जायचे! प्रोग्रॅम शिकण्याकरिता मी चर्चगेटचे KC कॉलेज जॉईन केले. संध्याकाळी सहापर्यंत ऑफिस आणि नंतर रात्री नऊ वाजेपर्यंत कॉलेज. घरी पोचायला ११ वाजायचे कारण वसईला राहत होतो. पुन्हा सकाळी सहा वाजता घर सोडायचे! एक वर्ष ही कसरत केली. डिस्टिंक्शनमध्ये पास झालो. माझ्याबरोबर ऑफिसमधलाच दुसरा एकजण पण परीक्षा पास झाला. मी आनंदात होतो की माझे मार्क्स चांगले असल्यामुळे मला नक्की नोकरी मिळणार! पण मला डावलून त्या दुसऱ्या मुलाला नोकरी मिळाली. आमच्या कंपनीचा मालक गुजराथी होता आणि हा मुलगा पण गुजराथी होता. खूप निराश झालो. तिथे एक मराठी सीनिअर सुपरवायझर होता, त्याला शक्य असूनसुद्धा त्याने मदत केली नाही. घरी येऊन वडिलांना विचारले, मराठी माणसाला मराठी माणूसच मदत करत नाही, तर इतर कोण मदत करणार?

प्रदीप क्षणभर थांबले. त्यावेळी त्यांना झालेले दुःख इतके खोलवर होते की आज एवढ्या काळानंतरसुद्धा त्यांच्या बोलण्यातून ती बोच जाणवत होती. त्यांना त्या कटू आठवणीतून बाहेर काढण्यासाठी मी मध्येच विचारले, या प्रसंगानेच तुम्हाला शिकवले का इतरांना मदत करायला?

त्यावर ते म्हणाले हो! मला नोकरी मिळाली नाही याचे दुःख नव्हते, ती दुसरी पण मिळाली असती; पण दुःख याचे होते की आपण मराठी माणसे एकमेकांना मदत करत नाही. त्याक्षणी मनात कुठेतरी खोलवर रुजले की आपल्याला जेव्हा संधी मिळेल तेव्हा केवळ मराठी माणसांनाच नव्हे तर इतरांनाही मदत करायची, त्यांचे भविष्य उज्ज्वल करायचे!

मी पटकन् म्हटले, या प्रसंगातूनच तुम्ही मदतीचे व्रत घेतलेत आणि एक व्रतस्थ जन्माला आला नाही का?

समाधानाचे हास्य त्यांच्या चेहेऱ्यावर तरळले आणि ते पुढे सांगू लागले. या सर्वातून एकच गोष्ट चांगली झाली ती म्हणजे मला जीव लावणारे मित्र मिळाले. ती कंपनी आम्हाला फर्स्ट क्लासचा पास द्यायची. ठरावीक ट्रेनने जायचे यायचे, पत्ते खेळायचे, गाणी म्हणायची, सणवार साजरे करायचे, एक वेगळे नाते निर्माण झाले होते ते आजतागायत टिकून आहे. अशी ही जी मैत्री असते, हे जे नाते निर्माण होते, इथेच सुखदुःख वाटली जातात.

दुसऱ्या नोकरीच्या शोधात होतो, तेवढ्यात 'बॉम्बे मर्कंटाईल बँके'तून मुलाखतीसाठी बोलावले, पण मला पहिल्यापासून बँकेत नोकरी करायची नव्हती. ९ ते ५ ऑफिस, वर्षानुवर्षे सिनिऑरिटीने प्रमोशन असे करत, पाट्या टाकत मला आयुष्य ढकलायचे नव्हते, काहीतरी वेगळे धडाडीचे करायचे होते. गाडीतला माझा एक ख्रिश्चन मित्र होता फ्रेंडी बॅप्टीस्ता म्हणून त्याला मी हे सांगितले. तो 'ओबेरॉय'मध्ये काम करत होता. तो म्हणाला 'ओबेरॉय'मध्ये येतोस का? त्यावेळी 'ओबेरॉय' म्हणजे टॉपचे हॉटेल होते. हॉटेल इंडस्ट्री म्हणजे ग्लॅमरस फील्ड होते. एक maths ची टेस्ट होती, ती दिली तेव्हा त्यांनी कॅशिअरऐवजी अकाउंटंट म्हणून जॉब ऑफर केला आणि पुन्हा कॉम्प्युटरवरून मी अकाउंटंट झालो, फ्रेंडीने मला केलेली मदत मी आयुष्यात विसरू शकत नाही कारण मराठी माणसाचा पण कोणी वाली या जगात आहे, ह्याची मला खात्री पटली. भारतभर फिरती होती. सरकारी ऑफिसप्रमाणेच तिथे कामाचे कल्चर होते आणि तोच पायंडा होता की सिनिऑरिटीने प्रमोशन होते. ही गोष्ट नोकरी करायला लागल्यावर नंतर कळली. Frying pan to fire असे माझे करिअर झाले होते. मी अस्वस्थ होतो. मला माझे करिअर स्पॉईल करायचे नव्हते. जॉब सोडायचा विचार मनात चालू होता, पण समोर पर्याय दिसत नव्हता!

१९८२ मध्ये माझे लग्न झाले आणि माझ्या आयुष्याला गती आली. मी काय करावे या संभ्रमात होतो आणि त्याचवेळी ऑफिसने मला सांगितले की 'ओबेरॉय'ची 'अल रशिद' आणि 'बाबिलॉन ओबेरॉय' अशी दोन मोठी हॉटेल प्रोजेक्ट्स इराकमध्ये आहेत आणि त्यासाठी प्रमोशनवर मला तिथे पाठवणार होते. त्याचवेळी इराक-इराण वॉर चालू झाले होते, परिस्थिती गंभीर होती. मुद्दाम उठून तिथे जाणे म्हणजे मोठी risk होती. पण आयुष्यात कुठेतरी अशा risk घ्याव्याच लागतात हे पक्के माहीत होते. असे तर जगायचे नाही, माणूस काय रस्त्यावरसुद्धा मरतो! बायकोने पाठिंबा दिला त्यामुळे निर्णय घेतला आणि मी इराकला पोहोचलो. वॉर अक्षरशः धुमसत होते. वाईट वातावरण होते. तेहेरान ते बगदाद १२०० किलोमीटर अंतर होते. दररोज एक तरी स्कड मिसाईल इराकवर फेकले जायचे.




एवढे अंतर ते मिसाईल ४ मिनिटात कापायचे. एअर पॉकेटप्रमाणे वेग आणि दिशा थोडी बदलायची. आम्ही अमेरिकन कॉन्सुलेटच्या एरियात राहत होतो; पण मिसाईलची दिशा वाऱ्यावर अवलंबून असायची. ज्या बिल्डिंगवर मिसाईल पडायचे ती बिल्डिंग अक्षरशः जमीनदोस्त व्हायची.

एक दिवस आम्ही सकाळी ऑफिसला पोहचतोय तोच जवळच कानठळ्या बसवणारा आवाज झाला. वाटले संपले सर्व! डोळे आपोआप गच्च मिटले मिटले गेले आणि बायका-मुले डोळ्यांसमोर आली. डोळे उघडले तर डॉलरच्या नोटांचा पाऊस पडत होता. विश्वास बसत नव्हता. 'अल रशिद' हॉटेलचे जे छप्पर होते ते मोडून त्यातून हा नोटांचा वर्षाव होत होता. त्यांच्या 'रिझर्व्ह बँके'च्या बिल्डिंगवर मिसाईल पडले होते. 'छप्पर फाडके' म्हणजे काय ह्याचा अर्थ त्यावेळी समजला! पण सद्दाम हुसेनचा धाक एवढा होता की कोणाचीही शामत नव्हती की त्यातील एकाही नोटेला हात लावायची. तो दररोज तेथील रेस्टॉरंटमध्ये यायचा मिलिटरी ड्रेसमध्ये. तो आला की कोणी खात असले तरी सोडून सर्व निघून जायचे. त्याची माणसे किचनमध्ये स्टेन गन घेऊन उभी राहायची आणि मग शेफ सद्दामला हवे ते बनवून द्यायचा. त्याच्या काळात एकदाही कांदा-बटाट्याचे भावसुद्धा वाढले नाहीत हा त्याचा धाक होता. खरोखर एक थरारक आणि अविस्मरणीय अनुभव होता तो! त्यावेळी इराक ही developed country होती. सर्व जर्मन ब्रिजेस, मर्सिडीज वगैरे तिथे होत्या. खरं तर तिथे इंडियन्सना respect होता कारण त्यांच्या आर्मीला इंडियन्सनी trained केले होते. तीन वर्षे मी तिथे होतो, त्यानंतर मुंबईला परतलो. त्याकाळात जे पैसे जमवले त्यातून मुंबईत स्वतःचे घर घेतले. एक स्वप्न पूर्ण झाले! त्यावेळी ऑफिसने सांगितले आता एक महिना तुम्ही रजा घेऊ शकता, त्यानंतर पुन्हा अकाउंटंट म्हणून जॉईन व्हा, प्रमोशन फक्त इराकपुरते होते.

पुन्हा एक धक्का बसला. आपण ठरवतो काय आणि होते काय! मनात विचार आला पुढच्या भविष्यासाठी म्हणून जीव धोक्यात घातला, पण काय उपयोग? पण त्याही वेळी निराश न होता मोठ्या जिद्दीने 'लीला पेन्टा'मध्ये interview दिला आणि क्रेडिट मॅनेजर म्हणून जॉईन झालो. लीलाच्या कॅप्टन नायर यांच्याबरोबर काम करणे म्हणजे एक मोठे चॅलेंज होते, पण मी ते स्वीकारले आणि सहा महिन्यांतच त्यांचा विश्वास संपादन केला. त्यावेळी 'लीला ग्रुप'कडे पैसे नव्हते. ते डबघाईला आले होते. क्रेडिट मॅनेजर म्हणून माझी जबाबदारी होती की एअरलाईन्स, टूर ऑपरेटर्स

यांच्याकडून पैसे रिकव्हर करण्याची! सकाळी ७ ला जाऊन रात्री ११ वाजता घरी यायचो. १००० banquet व्हायचे दररोज! रोख पैशाचा व्यवहार होता. प्रामाणिकता ही माझ्या नसानसांत भिनली आहे त्यामुळे इमाने इतबारे हे काम चार वर्षे केले. त्यांचे मत माझ्याबद्दल एवढे चांगले झाले की त्यांनी कांदिवली ते अंधेरी दररोज रिक्षाने जाण्या-येण्याचे पैसे मला देऊ केले. आज ही गोष्ट आठवली तरी हसू येते, पण त्याकाळात माझ्या दृष्टीने ही खूपच मोठी गोष्ट होती! 'लीला'मध्ये काम करताना मी बरेच काही शिकलो जे मला माझ्या पुढच्या प्रवासात उपयोगी पडत आहे.

त्याचवेळी अशोक कल्याणपूर म्हणून एक मराठी माणूस मार्केटिंग जनरल मॅनेजर म्हणून 'लीला'मध्ये जॉईन झाला.

हळूहळू मैत्री जमली. एक दिवस तो म्हणाला, मी नोकरीसाठी दुबईला जात आहे. तू पण येतोस का? दुबईला 'दुबई मरीन बीच क्लब' आहे, तिथे chief accountant ची पोस्ट आहे. पुन्हा एकदा मनात प्रश्न पडला की ही जी घडी आता बसते आहे ती पुन्हा मोडायची आणि नवीन रिस्क घ्यायची का? संगीताने माझ्या पत्नीने प्रवासाच्या प्रत्येक पावलावर मला पाठिंबा दिला, तसाच आताही दिला आणि मी ठरवले की पुन्हा एकदा उडी मारायची! आणि मी दुबईत आलो.

मी म्हटलं खरंच घरच्यांचा पाठिंबा माणसाला एखादी risk घ्यायला केवढे बळ देते नाही का?

त्यावर प्रदीप उत्तरले, ते बळ, तो मानसिक आधार एक नवीन उमेद निर्माण करते! आणि या बळावरच मी राजीनामा दिला. त्यावेळी कॅप्टन नायर USA ला गेले होते, त्यांच्या मुलाने माझा राजीनामा स्वीकारला.

२० जुलै १९९२ मध्ये मी दुबईत पहिले पाऊल टाकले आणि 'दुबई मरीन बीच क्लब'मध्ये जॉईन झालो आणि त्यावेळी कॅप्टन नायर यांचा फॅक्स आला की ताबडतोब परत ये, तू असा कसा काय सोडून जाऊ शकतोस! त्यांच्या माझ्यावरच्या विश्वासाची, माझ्या कामाची ती पावती होती! अक्षरशः माझा उत्साह ह्यामुळे खूप वाढला! एका नवीन उमेदीने मी दुबईत पहिले पाऊल टाकले.


मी म्हटले, प्रदीप आणि दुबईने तुम्हाला मराठी तसेच इतर गरजू माणसांना हात द्यायची संधी दिली. ते म्हणाले अगदी खरे आहे. दुबईत पाऊल टाकल्यापासून जवळ जवळ १५० लोकांना मी इथे आणले आणि जीवनात यशस्वी व्हावयाला मदत केली.

'दुबई मरीन बीच क्लब'मध्ये लेबनीज मॅनेजमेंट होती. ह्या लोकांचा कोणावरही विश्वास नसतो. ह्यांच्याबरोबर काम करणे खूप कठीण असते. आयुष्यात काम करताना माझे एकसूत्र ठरलेले आहे, जो पैसा आपला नाही त्याच्याकडे बघायचे नाही. काळा पैसा, कमिशन घ्या ह्या गोष्टी कधी केल्या नाहीत. समोरच्याने चांगले कमावले म्हणून त्याचा कधी द्वेष केला नाही. हे लहानपणापासूनचे संस्कार होते आणि म्हणूनच नेहमी peace of mind मिळते, रात्री शांत झोप लागते. ह्या संस्कारांमुळेच त्यांचा माझ्यावर विश्वास बसला, साडेपाच वर्षे तिथे काम केले IT, purchase सर्व प्रकारचे काम सांभाळले. 'दुबई मरीन'चे एक गारमेंट शॉप 'वाफी मॉल'मध्ये होते. 'वाफी'चा फायनान्स कंट्रोलर एक दिवस आला आणि म्हणाला, आम्हाला high end 'वाफी क्लब' सुरू करायचा आहे, मला क्लबची काहीच माहिती नाही. मला तू क्लबचे सॉफ्टवेअर शिकव. मी काम सुरू केले. नंतर तो अचानक न्यूझीलंडला गेला, पण जाण्यापूर्वी माझे पेपर्स 'वाफी'च्या मॅनेजमेंटकडे देऊन गेला.

त्याचवेळी कुवेतच्या 'रिजन्सी' हॉटेलमधून ऑफर आली, पण 'दुबई मरीन' मला नोकरीमधून सोडत नव्हते. पण मी मात्र मनाशी आता नोकरी सोडायचे पक्के केले होते. त्यानंतर सहा महिन्यांनी मला 'वाफी'मधून ऑफर आली. मी 'दुबई मरिन'मध्ये सांगितले मी नोकरी सोडत आहे. 'दुबई मरिन'च्या मालकाने मला सांगितले, 'तू दुबईत परत आलास तर तुला माझ्याकडेच काम करावे लागेल, तू दुसरीकडे जॉईन केलेस तर मी बॅन करीन.' मी त्याला म्हटले, 'परत आलो तर तुमच्याकडे पुन्हा नाही जॉईन करणार. कारण ती माझी हार असेल. इतर कुठे काम मिळत नाही म्हणून पुन्हा आलो असे होईल.' तेव्हा त्या लेबनीज माणसाने समजून घेतले. आठ दिवसांतच मी परत आलो, त्याला भेटलो आणि आजही तो माझा उत्तम मित्र आहे.

मी म्हटले, ह्याचे कारण एकच तुम्ही मिळवलेला विश्वास! शेवटी आयुष्यात माणसाला दुसरे काय हवे असते, पैसे तर काय सर्वच मिळवतात; पण ही विश्वासाची शिदोरी अमूल्य आहे.

प्रदीप म्हणाले, खरोखर ह्या विश्वासावर तर मैत्रीचे नाते टिकून राहते. ते पुढे सांगू लागले ह्यानंतर मी 'वाफी' जॉईन केले आणि माझ्या आयुष्याचे एक नवीन पर्व सुरू झाले. 'वाफी' कामाचा हा एक वेगळा पॅटर्न होता. खूप अनुभव घेतले, खूप काही शिकलो. 'वाफी' हे शेख माना



अल मक्तुम यांच्या मालकीचे आहे. तो दररोज ऑफिसमध्ये यायचा. त्याच्याबरोबर सर्व मॉलमध्ये फेरी मारायची. त्याचे वागणे–बोलणे एकदम सुशिक्षित होते. त्याच्याबरोबर डायरेक्ट काम करायची संधी मिळाली. त्यांचे 'रॅफल्स' हॉटेल, 'क्लिओपात्रा स्पा', 'Food Beverages ची outlets', सुप्रसिद्ध गायिका आशा भोसले यांचे 'आशाज' हे रेस्टॉरंट माझ्या कारकीर्दीत सुरू झाले. शेख मानाला, goodies हा लेबनीज concept 'वाफी'त आणायचा होता. त्याचा अभ्यास करण्यासाठी मी लेबनानला जात होतो. 'वाफी'चे हे एक मोठे यशस्वी venture आहे. आता त्याचे नाव बदलून 'Wafi Gourmet' असे केले आहे. 'अरेबियन पार्क', 'सॉमरसेट' हॉटेल manage केली. 'वाफी'मध्ये मी १३ वर्षे काम केले आणि हा माझ्या प्रवासातील उत्तम काळ होता. खूप काही शिकता आले.

मला विकत घ्यायचा प्रयत्न करू नका. कारण पैशासाठी मी हे करत नाही. तुम्हाला जेव्हा गरज लागेल तेव्हा मला सांगा, मी येईन.

अबुधाबीच्या आठवणीत दंग झालेल्या प्रदीपना मी म्हटले, शेवटी पैशाने सर्व सुखं मिळत नाहीत हे तर खरेच! त्यावर ते म्हणाले आणि मी दुबईत परत आलो आणि US च्या 'रमादा ग्रुप'ला जॉईन झालो. मी 'रमादा'ची सर्व managed हॉटेल्स बघतो. Franchise मी बघत नाही. JBR आणि शारजा येथील managed रमादा मी बघतो. ह्या ग्रुपबरोबर काम करणे हा एक आणखीन वेगळा अनुभव आहे. दुबईत पाऊल टाकल्यानंतर हॉटेल इंडस्ट्रीमध्ये मला जे शिकता आले, जे अनुभव आले ते माझ्या आयुष्याची शिदोरी आहे.

मी विचारले, ह्या अनुभवातूनच 'जिप्सी चायनीज' हे रेस्टॉरंट सुरू करायची कल्पना तुम्हाला सुचली का?



ह्याचवेळी अबुधाबीला '–Forsan International sports Resort' सुरू होणार होते. त्यांना त्याच्या pre opening साठी finance मधील अनुभवी माणूस हवा होता. तिथे ५८६ व्हिलाज, ४०० रूम्स, सर्वात मोठे man made lake, १६० घोडे होते, त्यांची निवड करण्यासाठी फिनलँड येथे जावे लागे. खूपच मोठे प्रोजेक्ट होते आणि अतिशय सुंदर अनुभव येत होता, अनेक गोष्टी शिकता आल्या, पण इतर अनेक commitments होत्या त्यामुळे एका वर्षाने मी परत दुबईत आलो. त्यांनी सॅलरी दुप्पट करायची तयारी दाखवली; पण मी त्यांना एकच सांगितले की माझी किंमत करू नका,

त्यावर प्रदीप म्हणाले, तसे माझे ते स्वप्न होतेच. प्रथम एक रेस्टॉरंट सुरू केले होते. पण अनेक कारणांमुळे ते बंद करावे लागले. पण म्हणतात ना अपयश ही यशाची पहिली पायरी आहे! ह्या अनुभवातून मी बरेच काही शिकलो आणि आज 'जिप्सी'साठी हे अनुभव उपयोगी पडत आहेत. अचानक संधी चालून आली. मुंबईतील दादरच्या 'जिप्सी'चे मालक लिमये यांच्याशी भेटीचा योग आला आणि यातूनच दुबईच्या 'जिप्सी चायनीज'चा जन्म झाला. दुबईतील आमचे मित्र महेश शुक्ल ह्यांनी आणि मी मिळून पार्टनरशिपमध्ये २०१२ मध्ये 'जिप्सी' हे रेस्टॉरंट सुरू केले. आता हे



देवाच्या कृपेने उत्तम चालते. त्याचे चांगले नाव झाले आहे.

दुबईत 'Grand Excelsior' हॉटेलमध्ये' जिप्सी चायनीज' हे आमचे रेस्टॉरंट आहे. हे इंडियनाइज्ड चायनीज रेस्टॉरंट आहे. आमच्याकडे दररोज ताज्या नूडल्स बनवल्या जातात, त्यासाठी मशिन्स आहेत. आम्ही MSG, कोणतेही artificial colours वापरत नाही. चायनीजमध्ये food cost अतिशय कमी आहे, पण ह्या धंद्यामध्ये chef ची consistency is a key! आज चार वर्षे होऊन गेली पण आमच्याकडे तेच शेफ आहेत. आमच्याकडे पाच शेफ आहेत. दोन मुख्य आहेत. एखादा शेफ सोडून गेला तर ताबडतोब मुंबईहून दुसरा शेफ येतो. contract sign करतानाच आम्ही याची काळजी घेतली आहे. अगदी प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर आमच्या 'जिप्सी'मधला बार disadvantage आहे. मुंबईला बार आहे म्हणून आमच्याकडे बार आम्हाला ठेवावा लागला आणि म्हणून आम्हाला असे हॉटेल शोधावे लागले की तिथे बार ठेवता येईल. बार असल्यामुळे आमच्याकडे लोकल्स कमी येतात. खरं म्हटलं तर they are good spenders! आमचा ८०% धंदा हा आमच्या फूडवर चालतो. आम्हाला बार promote करायचा नाही. आम्हाला हे फॅमिली रेस्टॉरंट म्हणून व्हायला हवे आहे. इथे कित्येक रेस्टॉरंटसमध्ये डान्स बार आहेत, पण आम्हाला ह्यात पडायचेच नाही. एक शरीफ रेस्टॉरंट म्हणूनच ह्याचे नाव व्हायला हवे आहे. Grand Excelsior Hotel च्या management ने आम्हाला सर्वात clean business करणारी माणसं म्हणून पावती दिली. म्युन्सिपल ऑडिट झाले. त्यांनीसुद्धा म्हटले की आतापर्यंत आम्ही केलेले सर्वात उत्तम ऑडिट! मी फायनान्सचा माणूस आहे त्यामुळे books क्लीन ठेवायची हे पहिल्यापासूनच सूत्र आहे. आणि आज 'जिप्सी चायनीज'चे सर्वत्र नाव आहे.

आता आम्ही अबुधाबीला मॉलमध्ये फास्टफूड (concept) मॉडेल सुरू केले आहे. आम्हाला दोन्ही options होते; पण मुख्य म्हणजे सुरुवातीला आम्हाला एका मॉलमध्ये एन्ट्री हवी होती, ती मिळाली. आता आम्ही दुसऱ्या मॉलमध्ये जाऊ शकतो. आमच्याकडे संपूर्ण middle east चे rights आहेत. कॉन्ट्रॅक्ट करतानाच आम्ही ही काळजी घेतली होती. आता आम्ही management मॉडेलवर भर दिला आहे. UAE मध्ये स्वतः manage करू शकू तेवढे outlets सुरू करायचा प्रयत्न आहे. आता आमचा ब्रँड झाला आहे.

बघू या कसा काय response येतोय! आशावादी असलेले प्रदीप सांगू लागले, या दुबईने मला खूप काही दिले. मी आणि माझा मेहुणा अवधूत चित्रे याने मिळून एक प्रिंटिंग प्रेस सुरू केला आहे. आज त्याला १० वर्षे पूर्ण झाली. मी फायनान्स सांभाळतो, बाकी सर्व व्यवहार अवधूत सांभाळतो. रेस्टॉरंट हे माझे passion आहे आणि आता मला rooms चे हॉटेल करायचे आहे, ते माझे एक स्वप्न आहे. मला retirement हा शब्द आवडत नाही, तो माझ्या शब्दकोशातच नाही. या दुबईने मला पैसा दिला, मानमरातब दिला आणि सर्वात जर काही दिले असेल ते म्हणजे मराठी माणसाला तसेच इतरांना मदतीचा हात द्यायची संधी दिली. मी दुबईत आल्यानंतर 'दुबई मरीन बीच क्लब', 'वाफी', 'रमादा' हॉटेल्स इ. ठिकाणी मी त्यांना नोकरी दिली आणि ह्यातून मला जे समाधान मिळाले आहे ते जीवनाच्या अंतापर्यंत राहील! त्यांचे जे आशीर्वाद मिळतात ते लाखमोलाचे असतात!

मी त्यांना मधेच विचारले, पण ह्या सर्वांना मदतीची जाणीव आहे का? तुम्हाला आलेले बरे-वाईट अनुभव सांगाल का?

प्रदीप पुन्हा आठवणींच्या कोशात गुरफटले आणि सांगू लागले, मी 'लीला'मध्ये नोकरीला होतो तेव्हा गणेश

नावाचा एक उडिपी मुलगा होता. दररोज चहा घेऊन यायचा. एक दिवस मला म्हणाला, साहेब मला पण दुबईला घेऊन चला! मला भांडी घासायचे काम दिलेत तरी चालेल. त्याकाळी दुबईची जबरदस्त क्रेज होती. मी त्याला आणले आणि 'लेबनीज किचन'मध्ये भांडी घासायचे तो काम करू लागला. पुढे खबुस बनवायच्या भट्टीमध्ये त्याला काम दिले. तीच शेवटची त्याची माझी भेट होती. मध्ये बराच काळ गेला. सहा महिन्यांपूर्वी अचानक त्याचा फोन आला. साहेब तुम्हाला भेटायचे आहे. मी त्याला म्हटले, काही अडचण आहे का? ये घरी ये. तो घरी आला आणि दारातच पायावर डोके ठेवून रडू लागला. म्हणाला, साहेब तुम्ही मला मदतीचा हात दिलात आणि म्हणूनच आज मी Fairmont हॉटेलचा sous chef झालो आहे. मी तुमचे उपकार कधीच विसरू शकत नाही. मी त्याला म्हटले, अरे मी फक्त निमित्त झालो, खरा कर्ता करविता तो आहे!

मुंबईला आमचा एक ड्रायव्हर होता. तो मागे लागला म्हणून त्याला 'वाफी'मध्ये स्विमिंग पुलावर lifeguard ची नोकरी दिली. थोड्या दिवसांनी मला म्हणाला, माझ्या बायकोला पण जॉब द्या ना. त्याच्या बायकोलाही 'लेबनीज किचन'मध्ये नोकरी दिली. चार-पाच वर्षांनी तो परत गेला. सहा महिन्यांपूर्वी मी वसईत गाडीतून जात होतो, तेव्हा अचानक कोणीतरी गाडी थांबवली बघतो तर हा ड्रायव्हर होता. तो म्हणाला, साहेब फक्त एकदा तुमचे पाय माझ्या घराला लागू देत. मला त्याचा आग्रह मोडवेना. मी घरी गेलो. सर्वांनी माझ्या पायावर डोके ठेवले आणि त्याची बायको आम्हाला त्यांच्या देवघराकडे घेऊन गेली आणि म्हणाली, आमच्या घरात दोन देवांचे फोटो आहेत. एक गणपती आणि एक तुम्ही! आज तुमच्यामुळे घरात आनंद आहे. आज हा ड्रायव्हर वसईतला बिल्डर झाला आहे. खरोखर ऐकून योग्य ठिकाणी मदत केल्याचा आनंद मला झाला.

एखादा वाईट अनुभव पण गाठीशी आहे. एका मुलाची परिस्थिती खूप वाईट होती. तो B.Com. होता. त्याला मी कॅशिअर म्हणून नेले, पुढे त्याला 'वाफी'मध्ये अकाउंटंट केले. नंतर त्याने finance director शी हातमिळवणी केली आणि माझ्या विरुध्द बोलायला सुरुवात केली. अशा प्रकारचा एखादा अपवाद सोडला तर बाकी सर्वांनीच जाण ठेवली. त्यांनी मला चांगले म्हणावे यासाठी मी मदत करत नाही किंवा पैसे घेऊन हे काम करत नाही. 'ओबेरॉय'मध्ये नोकरी मला माझ्या मित्राने, फ्रेंडी बॅसीस्ताने दिली, तसेच आज मी दुबईत आलो ते अशोक कल्याणपूरमुळे! त्यांच्या मदतीची मला जाणीव आहे आणि म्हणूनच आपल्याला कोणी मदत केली आहे, आपणही दुसऱ्याला मदत केली पाहिजे हे मनात पक्के रुजले आहे. डाळभात खाणारी माणसे आपण! शेवटी माणसाला काय हवे? सर्व सुखे पैशानी नाही मिळवता येत. हे आपले संस्कार ही आपली शिकवण!

ह्या संस्कारांमुळेच मी आज सुखी आहे. आज आमचे एकत्र कुटुंब आहे. कॉम्प्युटरमध्ये शिक्षण घेण्याचे माझे जे स्वप्न अपूर्ण राहिले होते, ते आज माझी मुले पूर्ण करत आहेत. मोठा मुलगा सनीप याने कॉम्प्युटरमध्ये post graduation केले असून धाकटा रोहननेही डिग्री घेतली असून त्याला आता MB- करायचे आहे. सून मयुरी ही पण पोस्ट ग्रॅज्युएट असून छोटा नातू आर्यन हा आमच्या घराचा आनंद आहे. आपण जसे पेरतो तसे उगवते असे जे म्हणतात त्यावर माझा पूर्ण विश्वास आहे.

परदेशात आपली संस्कृती जतन करून, मराठी परंपरेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोचवण्यासाठी कार्यरत असलेले महाराष्ट्र मंडळ, परदेशातील माहेरघर म्हणून ओळखले जाते. आणि अशा दुबईच्या महाराष्ट्र मंडळाचा पाच वर्षांपूर्वी मी अध्यक्ष होतो आणि आता ट्रस्टी म्हणून काम करताना अतिशय आनंद होतो.

माझ्या करिअरच्या सुरुवातीला माझ्यावर जो अन्याय झाला होता त्यामुळे मला ही जाणीव झाली की आपण मराठी लोकांनी एकमेकांना मदत केली पाहिजे तरच मराठी समाज वर येईल. आणि देवाने मला दुबईत येण्याची संधी दिली त्यामुळे मी इतरांना मदत करू शकलो, ह्याबद्दल मी देवाचा शतशः ऋणी आहे. देवाला प्रार्थना एवढीच आहे की ह्या सर्वांना, इतरानां मदत करायची सद्बुद्धी दे आणि मदतीची ही शृंखला बळकट कर.

मी म्हटले, प्रदीप, सर्व मराठी दुबईवासीयांचे ईश्वराला सांगणे आहे की प्रदीपचे हात एवढे बळकट कर की स्वतःच्या उन्नतीबरोबर इतर कित्येक बांधवांची उन्नतीही त्यांच्या हातून घडेल!

▪ **प्रदीप केसकर**

pradeep.keskar@ramadaplazajbr.com



# मुखवटा

## प्रशांत मुळावकर

■ मुलाखतकार : मेघना वर्तक

**मा**नवी मनाचा आरसा म्हणजेच त्याचा चेहेरा! मनातील भावभावना या आपल्या चेहेऱ्यावर प्रतिबिंबित होतात! कधी ह्या भावना जगापासून लपवून ठेवण्यासाठी मुखवटे धारण करावे लागतात. तसेच इमारतींचे रूप सजवण्यासाठीसुद्धा मुखवट्यांचा आधार घेतला जातो. ॲल्युमिनियम, ब्रॉन्झ, ब्रास असे विविध धातू कलात्मकतेने वापरून त्यातून इमारतीचे स्वरूप मनमोहक करून दाखवणाऱ्या प्रशांत मुळावकर यांच्यासारखी व्यक्ती दुर्मिळच!

१९८२ साली दुबईत प्रथम पाऊल टाकलेल्या प्रशांतने आपल्या व्यवसायाची सुरुवात ॲल्युमिनियमची दारे, खिडक्या फसाड बनवण्यापासून केली. त्याकाळात दुबईत ग्लासच्या इमारती नव्हत्या. पूर्वीची दुबईतील घरे ही साधी होती. दगड-विटांची; पण हळूहळू तेलाचा शोध लागून इतर सर्व क्षेत्रात दुबईची जशी प्रगती झाली, दुबईचे रूप बदलत गेले तसे इमारतींचे रूपही बदलत गेले. इमारतीच्या बाह्यदर्शनी पूर्वी दगड लावले जायचे किंवा मार्बल, पेंट लावला जायचा, पण ॲल्युमिनियमचे पत्रे लावण्याची कल्पनाच नवीन होती. Fasade Business हा त्याकाळात नवीन होता. ग्लास industries ची प्रगती होत होती आणि त्याचवेळी प्रशांतने ह्या क्षेत्रात पाऊल टाकले आणि यश मिळवले.

त्यांच्या यशाच्या मागे कारणीभूत आहे त्यांची मेहनत, कलात्मकता आणि त्यांची दूरदृष्टी! कोणतेही काम आले की त्या कामाचा सखोल अभ्यास करायचा, क्लायंटचे विचार जाणून घ्यायचे आणि सर्वात मुख्य म्हणजे कामाची सुरक्षितता आणि सौंदर्याबरोबर भविष्यात मेंटेनन्स करताना खर्च आणि त्रास होणार नाही याची काळजी घ्यायची, स्वतः design बनवायचे, त्यासाठी लागली तर मशिनरी बनवायची, या त्यांच्या कामाच्या पद्धतीमुळे वादळांवर स्वार होऊन त्यांनी यशश्री खेचून आणली!

ॲल्युमिनियम, ब्रास, ब्रॉन्झ अशा विविध धातूंशी, ग्लासशी संबंधित प्रशांतचा व्यवसाय! या स्वच्छ, निर्मल अशा काचेमध्येच प्रशांतच्या असंख्य गुणांचे प्रतिबिंब पडत गेले आणि विविध प्रकारचे जॉब आपणहून त्यांच्याकडे चालत आले. प्रत्येक जॉबचे design, drawing स्वतः बनवणाऱ्या प्रशांतना मी विचारले की, तुमचे या विषयात शिक्षण झाले आहे का? की तुमच्या घरात कोणी या विषयात तज्ज्ञ आहेत? कारण बालवयात घडलेले संस्कार फार महत्त्वाचे असतात.

माझी प्रश्नावली ऐकून प्रशांत मुंबईतल्या गिरगावमधल्या त्यांच्या हेमराज चाळीतील आठवणी सांगण्यात दंग झाले. ते म्हणाले, आमच्या दोन खोल्या होत्या. एकत्र मध्यमवर्गीय कुटुंब होते. वडील BARC मध्ये सायंटिफिक इंजिनीअर होते. आई शिक्षिका होती. चिकित्सक समूह शाळेत माझे शिक्षण झाले. लहानपणी गणपतीचे डेकोरेशन, मखर वगैरे करायची खूप आवड होती. कदाचित माझ्या अंगात असलेल्या या सुप्त गुणाला तेव्हा खतपाणी घातले गेले.

मखर बनवतानासुद्धा मी बारीकसारीक बारकावे लक्षात घ्यायचो. त्याचे आधी drawing बनवायचो, मग रंगसंगतीचा विचार करायचो, पूर्ण झाल्यावर ते कसे दिसेल हे मनापुढे चित्रित करायचो. आत्ताही प्रशांत बालपणातील गणपतीच्या मखराच्या सुखद स्मृतींमध्ये दंग झाले!

त्यांना त्या आठवणींतून जागे करत मी म्हटले, प्रशांत, परमेश्वराने प्रत्येक माणसाच्या अंगी काही गुण दिले आहेत. फक्त ते गुण शोधून त्यांना पैलू पाडण्याचे काम आपले असते. माणसात जे गुण असतात त्याची झलक त्याच्या वागण्या-बोलण्यातून, त्याच्या कृतीतून बालपणापासूनच दिसत असते. त्यालाच आपण बाळाचे पाय पाळण्यात दिसतात असेही म्हणतो! भविष्यातील तुमच्या व्यवसायाचे मूळ थर्माकोलच्या मखरामध्ये होते तर!

त्यावर प्रसन्न मुद्रेने प्रशांत म्हणाले, खरं आहे तुमचे म्हणणे. आज जेव्हा मागे वळून मी भूतकाळात डोकावतो, तेव्हा माझ्याही मनात येते की ही बारीकसारीक विचार करण्याची सवय मला बालपणीच लागली आणि गणपतीचे मखर करताना त्याला खतपाणी मिळाले आणि आज मला त्याचा फायदा होत आहे. खरंच बालवयात मुलांवर होणारे संस्कार किती महत्त्वाचे असतात नाही का?

पुढे सायन्स शाखेत दोन वर्षे केली आणि मी ITI मध्ये प्रवेश घेतला आणि आठ महिने मी भाभा मध्ये power इंजिनीयरिंग dept. ला काम केले. नंतर ड्राफ्टस्मन म्हणून १९८२ मध्ये मी दुबईत आलो.

Alico कंपनीत ड्राफ्टस्मन म्हणून माझा जॉब सुरू झाला. मी प्रथम ऑफिसमध्ये बसून drawing बनवायचो. पण नंतर ऑफिसमध्येच खालती workshop होते तिथे जाऊन drawing प्रमाणे प्रॉडक्ट्स पण बनवायचो. काम म्हणून नव्हे, तर एक छंद म्हणून, नवीन काहीतरी शिकण्याची जिज्ञासा म्हणून! मला मशिनरीची माहिती होती. लहानपणापासून केवळ उत्सुकता म्हणून मी मशिन्सची माहिती करून घ्यायचो. त्याची रचना, ते चालते कसे, काय फायदे आहेत इ. जाणून घेत होतो. माझी ही उत्सुकता मला नोकरीच्या ठिकाणी सुद्धा स्वस्थ बसू देत नव्हती. मालकाच्या हे लक्षात आले की हा माणूस इतरांपेक्षा वेगळा आहे. त्याने मला विचारले की तू workshop चा मॅनेजर होशील का? आणि मग पहिली दोन वर्षे वरती drawing office ते खालती workshop असे jumping चालू होते. पहिली तीन वर्षे मी भारतात घरी पण गेलो नाही. मी जायचे म्हटले की माझ्या हाती increment पडायचे! अर्थातच ह्या गोष्टीचा मला माझ्या पुढच्या व्यवसायात खूप फायदा झाला. पुढे कोणतेही काम मिळाले की मी आधी sample बनवायचो, त्यामुळे त्यात काय कमी-जास्त आहे, काय बदल करायला हवेत हे लक्षात येई. कामाची पूर्ण माहिती झाल्यामुळे क्लायंटशी बोलताना आत्मविश्वास असे आणि मला वाटते ह्याचा नक्कीच परिणाम होतो.


नंतर मालकाशी एवढे जवळचे नाते जमले आहे की मला विचारल्याशिवाय तो कोणतेही काम हाती घेत नव्हता. इतका त्याचा माझ्या कामावर विश्वास बसला होता! आणि त्या विश्वासातूनच मला पोस्ट बॉक्सचे काम मिळाले. जरी मी Alico सोडली तरी माझ्यावरचा त्यांचा विश्वास कमी झाला नाही.

पोस्ट बॉक्स बनवण्याचा हा माझा पहिला जॉब होता. माझ्या Alico च्या मालकाबरोबर मी पोस्ट ॲथॉरिटीला, त्यांच्या हेडला भेटलो. तो अरबी होता, माझा मालकही अरबी होता. दोघांमध्ये बोलणे झाले. मग पोस्टच्या हेडने माझ्यासमोर एक पोस्ट बॉक्स ठेवला आणि मला विचारले की तुला अशा प्रकारच्या पोस्ट बॉक्सेस बनवता येतील का? मी आत्मविश्वासाने त्याला सांगितले की ह्या बॉक्सपेक्षा अधिक चांगला बॉक्स मी बनवून देईन आणि आम्हाला ते काम मिळाले. आज ह्या गोष्टीला एवढा काळ लोटला; पण अजूनही मी design केलेल्या ह्याच पोस्ट बॉक्सेस सर्वांकडे दिसतील. मी -Alico सोडले पण अजूनही आमची कंपनी पोस्ट बॉक्सेसचा पुरवठा करते.

प्रशांत सांगू लागले, कोणत्याही कामाचा बारकाव्यां-सहित खोलवर अभ्यास करणे हे फार गरजेचे असते. त्यामुळे तयार होणारे प्रॉडक्टसुद्धा उत्तम होते आणि अशा या एका कामातून इतर अनेक कामे मिळत जातात.

इमारात पेट्रोल स्टेशनचे काम हा माझ्या आयुष्यातील एक वेगळा अनुभव आहे. ह्या कंपनीचा आर्किटेक्ट UKचा होता. त्याला त्याच्या परिचित कोणाला काम द्यायचे होते. त्यामुळे आमच्या drawing मध्ये चुका काढून त्यांना हे काम जमणार नाही असे सांगून आमच्याबद्दल कंपनीचे मत कलुषित करायचा प्रयत्न करत होता.

मी जेव्हा एखादे प्रोजेक्ट हातात घेतो तेव्हा बारीक-सारीक गोष्टींचा विचार करतो, त्याचबरोबर फक्त तत्कालीन विचार न करता पुढे भविष्यात मेंटेनन्स करताना काय काय प्रॉब्लेम्स येतील ह्याचा विचार प्राधान्याने करतो. त्यामुळे



RUTU™
Group of Companies
Built for life... since 1979
तर्फे
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
RIVERVIEW™
CLASSIC
पत्ता: ऋतु रिव्हरसाईड इस्टेट, आधारवाडी मार्ग,
के. एम. अग्रवाल कॉलेज जवळ, कल्याण (प).
०२५१ ६५१४९९९ | SMS <RUTU> ५६१६१
rutugroup.com | rutugroup1

ह्या प्रोजेक्टवर मी आधी सखोल अभ्यास केला, त्याची drawings बनवली. मुख्य मुद्दा होता, की जर कव्हर काढता आले नाही तर गेलेली ट्यूब बदलणार कशी? आणि ह्या सर्वासाठी खर्च किती येईल! त्यासाठी मी त्यांच्या लंडनच्या ऑफिसला भेट दिली. त्यांचे म्हणणे आधी ऐकून घेतले. तिथे मला कळले की त्यांनी Shell ह्या कंपनीच्या जगभरातील शाखांसाठीही प्रॉब्लेम solve न करता, हेच design वापरले! मग मी त्यांना माझ्या सर्व कल्पना स्पष्ट केल्या. त्याचे एक sample करून दाखवले. ते ऐकल्यावर आणि पाहिल्यावर त्या इंजिनिअरचे मत बदलले आणि अखेर मला काम मिळाले.

दुबईमध्ये इमारात नावाचा सरकारी पेट्रोल पंप आहे. इमारात पेट्रोल पंपाच्या मोठ्या खांबावर इमारातचे चिन्ह आहे. शेंड्यावर फाल्कन पक्ष्याचा चेहेरा आहे. त्याच्या पाठी ट्यूबलाईट्स लावलेल्या आहेत. त्यातील एखादी ट्यूब गेली आणि ती बदलायची झाली तर त्याला scaffolding लावावे लागते. कारण तो खांब कमीतकमी ६/८ मीटर तरी उंच आहे. ते पॅनल काढा, उघडा, ट्यूब बदला असे सर्व खर्चिक काम होते. कारण ट्यूबची किंमत असते ५ दिरहॅम आणि scaffolding ची त्यापेक्षा कितीतरी जास्त होते! त्यामुळे होते काय की एक ट्यूब बदलण्यासाठी कोणीही हा खर्च करत नाही. लावलेल्या सर्व ट्यूब जाईपर्यंत थांबतात. पण त्यामुळे त्या लोगोची पण शोभा कमी होते. कंपनीचे जे एक स्टँडर्ड असते, नाव असते, ती प्रतिमा खराब होते.

मी पूर्ण अभ्यासाअंती त्यावर एक उपाय शोधून काढला. इमारातच्या खांबामध्ये दोन पिलर घातले. त्यात एक फ्रेम तयार केली. त्याला दोन वायर टाकल्या आणि त्याला counter weight दिल्या. फ्रेमच्या weight पेक्षा याचे वजन जास्त होते. त्यामुळे तुम्ही रस्सी सोडली की ते आपले आपले वरती जाणार आणि थांबणार! खाली आणायचे असेल तर रस्सी खेचा, ट्यूब बदला आणि सोडून द्या, आपले आपले वरती जाऊन ते थांबेल! scaffolding ची जरुरी नाही. अशा अतिशय साध्या, कमी खर्चिक गोष्टी मी त्यांना सांगितल्या, त्यांना त्या पटल्या. आज इमारातच्या सर्व पेट्रोल पंपावर मी हे design वापरून काम करून दिले.

त्यामुळे त्यांनी मला Shell कंपनीच्या लोगोमध्येसुद्धा ह्या पद्धतीचा वापर करायला सांगितले. Shell च्या लोगोमध्ये blue रंगाचा आत एक पट्टा असतो, त्यात आत ट्यूबलाईट असतात. UK च्या आर्किटेक्टने तो पट्टा फिलिप्स कंपनीतून स्पेशल ट्यूबचे प्रॉडक्ट बनवून वापरायला सांगितले. फिलिप्सचा चार्ज साहजिकच जबरदस्त होता! अर्थात शेल कंपनीसुद्धा मोठी आहे, त्यांच्याकडे पैसा आहे, ते afford करू शकतात! पण आपले संस्कारी विचार! same effect देऊन जर कमी खर्चात काम होत असेल, पैसे वाचवता येत असतील तर का वाचवायचे नाहीत? मी त्यावर एक साधा नॉर्मल ट्यूबलाईटचा उपाय सांगितला.

मी ट्यूबलाईटस् थोड्याशा overlapping लावल्या आणि त्यावर grue blue म्हणजे acrylic cover लावले आणि लाईट सुरू करायला सांगितले. वेळेची बचत झाली. खर्च खूप कमी झाला. ही एका वेळची cost नसते. कारण मेंटेनन्स करताना तुम्हाला ट्यूबलाईटस् पुन्हा विकत घ्यायच्या झाल्या, तर कदाचित सेम टाईप, सेम मटेरियल, युएईत मिळणारही नाहीत. यूके, जर्मनीहून कुठून तरी आणावी लागेल. ट्यूबची किंमत पाच दिरहॅम आणि सर्व बाकी cost १०० दिरहॅम! मी सर्व गोष्टी त्यांना पटवून दिल्या आणि मला काम मिळाले.

काटकसर करणे ज्यांच्या रक्तात भिनले आहे त्या प्रशांतना मी म्हटले, कोणतेही काम करताना तुम्ही कंपनीचा, क्लायन्टचा खर्च कसा कमी होईल याची पण काळजी घेता. या प्रत्येक गोष्टीचा नवीन कामे मिळताना फायदा होत असतो. त्यावर प्रशांत पटकन उद्गारले, आपल्या खिशातून पैसे जावो किंवा client च्या, फुकट का घालवायचे? आणि हेच आपले संस्कार आहेत!

यानंतर भारतात भारत पेट्रोलियमवाल्यांनी विचारले, त्यांचे ५०,००० पेट्रोल पंप आहेत. इथे इमारातचे तर फक्त २०० होते. भारत पेट्रोलियमची माणसे मला भेटायला आली. मी जे जे काही शिकलेलो होतो, ते त्यांना समजावून सांगितले, drawings बनवून दाखवली. माझ्या ideas स्पष्ट केल्या आणि अखेर भारतात वेगवेगळ्या प्रांतात १२ स्टेशन्सवर ही पद्धत आम्ही वापरली. पण इंडियात काम करताना अनुभव फार वेगळे आले. विशेषतः इतकी वर्षे इथे राहिल्यानंतर, काम केल्यानंतर तेथील कामाची पद्धत पचनी पडायला फार वेळ लागतो. इथे दुबईत सर्व straight आहे. पण भारतात प्रत्येकाचे इंटरेस्ट वेगळे, किती कुणाचे cuts असतात, त्यांचीच लोकं ठरलेली असतात, कोणी काय करायचे, कुणाला काय द्यायचे, त्याशिवाय file पुढे सरकतच नाही. तिथे economic agenda मोठा असतो. १२ स्टेशन्स केली. दिल्लीच्या स्टेशनचे उद्घाटन त्यावेळचे पंतप्रधान





मनमोहन सिंग यांच्या हस्ते झाले तेव्हा मी उपस्थित होतो.

मी स्टँडर्ड, ठरावीक पद्धतीचे jobs कधी केले नाहीत. माझ्या कामात वैविध्य आहे. अर्थात त्यासाठी मला मेहनत घ्यावी लागते, पण त्यामुळे नवीन अनुभव मिळतात, अभ्यास होतो, अक्षरशः एका कामाचा दुसऱ्या कामाशी काहीही ताळमेळ नसतो. Engineer to order अशी अवस्था असते. प्रत्येक वेळी काम जेव्हा इतरांना जमत नव्हते तेव्हा माझ्याकडे आले, आणि मी ते यशस्वी केले. पण म्हणूनच मिळालेल्या अनुभवातून ज्ञानात तर भर पडलीच; पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेव्हा एखादे काम इतरांना जमत नाही आणि त्यावेळी ते तुम्ही केलेत तर तुमची किंमत नक्कीच वाढते. ह्या सर्वांमुळेच २००८च्या रिसेशनच्या काळातही मी वाचू शकलो.

एक जॉब होता. मला सहा ठिकाणांहून enquiry आल्या. जॉब होता अबुधाबीत! सौदी, UK दुबई अशा वेगवेगळ्या ठिकाणाहून enquiry आल्या. त्यांनी मला फक्त जॉब मिडिल ईस्टमध्ये आहे असे सांगितले. कारण त्यांना त्यांचा शेअर हवा होता. पण जेव्हा मी drawings पाहिली तेव्हा माझ्या लक्षात आले. शेवटी असे झाले की त्या client ला कळले की माझ्याकडे enquiries आहेत, त्याने पण माझ्याजवळ चौकशी केली. शेवटी तो माझ्याकडेच आला. त्याने मला कामाचे स्वरूप सांगितले.

Sheet metal work चा जॉब होता, जॉब कठीण होता. tools आणि dyes असल्याशिवाय होऊ शकणार नव्हता. माझ्याकडे जी टीम आहे, ती कामात एकदम dedicated अशी आहे. एकदा सांगितले की वाट्टेल ते करून ते अर्ध्या तासात प्रिमिटिव्ह मॉडेल बनवून देतात. तसे त्यांनी आत्ता पण करून दाखवले. client ला आश्चर्य वाटले. कारण इतरांनी त्याला सांगितले होते की तुम्ही ऑर्डर द्या मग आम्ही sample बनवू! त्यांनी मला विचारले, तुम्हाला हे कसे काय शक्य होते?

मी त्यांना सांगितले, एक sample सांगितलेत तर माझी टीम तुम्हाला ते अर्ध्या तासात बनवून देऊ शकते. हजार सांगितलेत तर मशिनरी लागेल, प्रॉडक्ट फास्ट आणि परफेक्ट होण्यासाठी! मी एकाच मेटलमध्ये काम करत नाही, तर वेगवेगळ्या ब्रास, स्टील, ब्रॉन्झ, ॲल्युमिनियम कोणत्याही धातूत बनवतो, design creat करतो आणि नवीन सिस्टिम पण बनवतो. त्यांच्या लक्षात आले की हा माणूस व्यवस्थित जॉब करणार आणि तो जॉब मला मिळाला.

शिक्षण घेत असताना पुस्तकी ज्ञानाबरोबरच मशिनरीची माहिती करून घेणाऱ्या प्रशांतना मी म्हटले, तुम्ही केवळ उत्सुकता म्हणून मशिन्सची माहिती करून घेत होतात, पण मला वाटते तुमच्या ह्या गुणामुळे व्यवसायात यशस्वी होण्यास मदत झाली आहे. कारण जॉब मिळण्यापूर्वीच तुम्ही सिस्टिम बनवता, तुमच्या मार्गदर्शनाखाली तुमचे कामगार सॅम्पल बनवतात, जे दुसरी कंपनी बनवत नाही. कामाबद्दलचे तुमचे ज्ञान, कामाची पद्धत आणि सर्व टीमचे dedication ह्यामुळे यशप्राप्ती होते.

त्यावर ते पटकन म्हणाले, खरंच ह्या सर्वांचे श्रेय माझ्या टीमला आहे. आज त्यांच्याशिवाय २००८च्या जागतिक मंदीच्या काळात कंपनी उभी राहू शकली नसती! पुन्हा आठवणींच्या जगात जात ते एक अनुभव सांगू लागले.

एकदा अशीच एक सुंदर संधी चालून आली. ते काम फ्रान्समध्ये होते. तिथे सरकारने नवीन नियम केला होता की बॅकयार्डमध्ये स्विमिंग पूल असेल तर लहान मुलांच्या दृष्टीने, सुरक्षितता म्हणून पुला सभोवताली रेलिंग लावणे आवश्यक आहे. मी client ला भेटायला गेलो, त्यांच्या ideas ऐकल्या, विचार केला आणि त्यांना सांगितले की, जर रेलिंग लावले तर त्यामुळे संपूर्ण स्विमिंग पुलाची शोभा जाईल. कोणतीही वस्तू बनवताना सुरक्षिततेच्या बरोबर ती वस्तू झाल्यावर कशी दिसेल हे बघणे पण आवश्यक असते.

मी एक सिस्टिम design केली. मुद्दाम त्यासाठी मी एक ॲल्युमिनियम प्रोफाइल बनवून तो तळाशी लावला. मी ते अशा पद्धतीने design केले की जमिनीत खाच होऊन ग्लास आत ठेवून बोल्ट केले. त्यामुळे काच हळूहळू अधिक दाबली जाऊन घट्ट बसेल आणि उभी राहील. ती उभी राहिलेली ग्लास म्हणजेच bariar होईल. ग्लास खाली LED Lights लावले की रात्रीच्या वेळी ती ग्लास चमकेल आणि स्विमिंग पूल अतिशय सुंदर दिसेल. माझे काम झाले. मी त्या सिस्टिमचे patent घेतले. त्यानंतर अनेकजणांनी त्यात थोडासा बदल करून ते कॉपी केले, पण प्रथम पेटंट मी घेतले.

मी म्हटले, सुरक्षितता आणि सौंदर्य यांचा किती सुंदर मेळ घातलात तुम्ही! ते म्हणाले, अगदी खरे, या माझ्या वेगळ्या विचारसरणीमुळेच मला व्यवसायात विविध कामे मिळत गेली आणि अगदी कठीण परिस्थितीतही मी तरून गेलो.

मी दुसरे एक वेगळे असे काम केले. प्रत्येक थिएटरमध्ये anti slippery असतात. स्टेपवर खाली lights असतात. वरती ॲल्युमिनियम शीट असतो आणि पाठी कार्पेट असते! काम असे होते की कार्पेंटर चौकोन करून बॉक्स बनवणार, electrician त्यात लाईट टाकणार. मग वरून मी angel लावणार! त्यात तीन जणांचे मोठे काम होते. कार्पेंटर, इलेक्ट्रिशियन आणि मी! पण मी त्यांना सांगितले की मी हे काम सोपे करीन. मी Carpaintary, इलेक्ट्रिकल असे वेगवेगळे काम नाही करणार, तर मी असा ॲल्युमिनियम profile design करीन की त्यात तुमच्या सर्व गरजा पूर्ण होतील. मी section मध्ये grue creat करीन आणि त्यात लाईट बसवीन! बस झाले काम!

ह्या अशा प्रकारच्या innovation मुळे बाजारात कितीही मंदी आली तरी त्यातून माझ्या कंपनीला वाचवू शकलो. माझ्यासारख्या मेटल work करणाऱ्या अजूनही कंपनीज दुबईत आहेत. स्पर्धेऐवजी ते काही प्रॉब्लेम असेल तर त्या सल्ला घ्यायला माझ्याकडे येत असतात.

आता दुबईत Bulgari या प्रसिद्ध italian कंपनीचे villas आणि बिल्डिंग असे प्रोजेक्ट चालू आहेत.- Armani ची जशी prestigious building आहे त्या स्टँडर्डची Bulgari ची बिल्डिंग आहे. सर्व रूम्समधून सर्व furniture built in आहे. त्यांना कपाटात त्यांच्या स्टँडर्डप्रमाणे, त्यांच्या style ने लक्झरी असा हँगर लावायचा हूक लावून हवा होता. त्यांनी design दिले. त्याआधी चार लोकांचे design त्यांनी नाकारले होते. मी अभ्यास केला आणि सांगितले, तुमच्या design ने काम होणार नाही, तसे केले तर मी पाचवा माणूस असेन fail होणारा! मी त्यासाठी चार वेगवेगळी सॅम्पल्स बनवली आणि दाखवली आणि सांगितले, आता तुम्ही सिलेक्ट करा. सहा महिने ते लढत होते. जाऊन येऊन rejections इ. शेवटी मी UK ला गेलो. त्यांनी विचारले ही सॅम्पल्स कशी केलीत? उत्तर देण्याचे टाळून मी फक्त सॅम्पल्स दाखवली. अतिशय आत्मविश्वासाने सर्व काम हाताळले. जॉब मिळाला. मला खात्री होती त्यामुळे मी आधीच मशीन बनवले होते. त्यानंतर त्यांच्याच compound मध्ये असलेल्या दुसऱ्या कंपनीनेसुद्धा मला काम दिले.

३३ वर्षांच्या व्यवसायात विविध अनुभव घेतलेल्या, २००८ च्या जागतिक मंदीच्या काळात अतिशय कष्टाने कंपनीला त्यातून सावरणाऱ्या, अनेक चढउतार पाहिलेल्या, पण बुद्धी, कल्पकता आणि मेहनत या त्रयींच्या सहाय्याने यशस्वी झालेल्या प्रशांतना मी म्हटले, आजच्या तरुण पिढीला तुम्ही काय मार्गदर्शन कराल ?

ते सांगू लागले, २००५ मध्ये मी आलिको सोडले. त्यानंतर मी शोभा group ला जॉईन झालो. त्याचा chairman हा माझा पार्टनर होता. Full fledged company होती आमची. आठ वर्षांच्या काळात ६०० पर्यंत कामगारांची संख्या गेली. ७५ ऑफिस स्टाफ होता. माझ्या पार्टनरचे आणि माझे विचार जुळत होते, सामंजस्याने आमचा व्यवसाय सुरू होता. पुढे दुसरा भागीदार आल्यानंतर मला त्याची काहीही माहिती नसल्याने मी माझा शेअर विकला आणि आम्ही वेगळे झालो. मला असे वाटते, की भागीदारीत व्यवसाय करत असताना दोघांची wavelength जुळणे अतिशय महत्त्वाचे असते!

दोन वर्षांपूर्वी मी माझ्या Prime Metal Craft ह्या कंपनीची सुरुवात केली. आता माझ्या कंपनीत ४० कामगार

*With Best Compliments From*

**Balaji R. Jaybhaye**
**Managing Director**

www.ankitaengg.com

# Ankita Technologies (I) Pvt. Ltd.

**( Plant & Equipment Engineers )**

www.ankitatechnologies.com

**Masters in:**
**Filtration, Drying, Scrubbing, Evaporation & Conveying Systems made out of : Titanium, Tantalum, Nickel, Duplex Steel, Alloy 904L, Alloy 20 & Stainless Steel.**

**Office : Plot No. PAP R/24, M.I.D.C. Rabale, Navi Mumbai, Maharashtra - 400 701.**
Tel. : +91 22 2760 1515, 2769 1515.
Mob.: +91 9820 32 72 63.
E-mail: info@ankitaengg.com
info@ankitatechnologis.com

## Manufacturers of :

**Filters:**
Rotary Vaccum Drum Filters.
Agitated Nutsche Filters.
Horizontal Leaf Filters.
Side Stream Filters.
Activated Carbon Filters.
Sand Filters.
Bag Filters.

**Srubbers:**
Packed Bed Scrubbers.
Ventury Type Scrubbers.

**Dryers:**
Spin Flash Dryers.
Flash Dryers.
Rotary Vaccum Paddle Dryers.
Agtited Nutsche Filter Dryers.
Twin Screw Dryers.
Fluidized Bed Dryers.
Drum Dryers, Drum Flakers.

**Conveyors:**
Pneumatic Conveyors.
Screw Conveying Systems.

**Evaporators:**
Fauling Film Evaporators.
Rotary Evaporators.
Tripple Effect Evaporators.

**Process Equipments:**
Reactors & Hydrogenators.
Chemical Mixers.
Hot Air Generators.
Heat Exchangers.
Distillation Columns.
Pressure Velssels.

**Reg.Office:** RH. No. C-112, Sec-4, Airoli, Navi Mumbai, Maharashtra - 400 708.

काम करतात आणि पाच जण ऑफिसात आहेत. माझे सर्व कामगार, आमची टीम प्रशिक्षित आहे. सर्वात मुख्य म्हणजे कधीही त्यांना सांगितले की ह्या design प्रमाणे प्रॉडक्ट बनवून द्या तर रात्रभर बसून, जागून ते काम पूर्ण करून देतात. असे कामगार मिळणे हे खरोखर भाग्य म्हटले पाहिजे. आपल्या स्वतःच्या मेहनतीप्रमाणेच कामगारांच्या मेहनतीवर कंपनीचे यश अवलंबून असते. आणि ही गोष्ट लक्षात घेणे खूप महत्त्वाचे असते! कारण आपल्या एकट्याच्या मेहनतीवर कंपनी चालू शकत नाही. हे एक टीम वर्क असते आणि सर्वांना सांभाळून घेऊन काम करावे लागते.

ज्यावेळी शोभा सोडून मी नवीन कंपनी सुरू केली, त्यावेळी तेथील कामगार मला येऊन भेटायला लागले आणि सांगू लागले की, आम्हाला तुमच्या कंपनीत घ्या. तुमच्या बरोबरच काम करायचे आहे. मी त्यांना समजावत होतो, असे बरोबर नाही. एकतर मी भांडून बाहेर पडलो नव्हतो. दुसरी गोष्ट म्हणजे ती कंपनीसुद्धा मीच सुरू केली होती. शून्यातून वर आणली होती आणि त्यासाठी रक्ताचे पाणी केले होते. आपला व्यवसाय म्हणजे आपले एक कुटुंब असते. मुलाप्रमाणे असते. ते कामगार माझ्या नवीन कंपनीत आले असते तर मला खूपच फायदा झाला असता कारण ते खूप अनुभवी skilled कामगार होते; पण मला असे वाटते की नैतिकतेच्या दृष्टीने पहिले तर अशाप्रकारे कामगारांना फोडणे हे बरोबर नाही आणि मी ह्या मताशी ठाम राहिलो. शेवटी नीतिमत्ता हा पण एक संस्कारच आहे नाही का?

माझ्या मनात आले, हल्लीच्या जगात नैतिक जबाबदारीची जाणीव ठेवून व्यवसाय करणारी, प्रशांतसारखी माणसे विरळच दिसतील! मी त्यांना म्हटले, एवढे मात्र नक्की की कामगारांचे प्रेम पाहून तुम्हाला त्यांच्या बरोबरच्या नात्याची पावती मिळाली असेल!

आपल्या आठवणींची शिदोरी उघडत ते म्हणाले, ह्या कंपनीत अनुभव बरेच आले, चांगले आणि वाईट दोन्हीही. खूप काही शिकता पण आले. कामगारांबरोबर संबंध सलोख्याचे होते. त्यांना आदरयुक्त भीती होती. मी त्यांना सांगितले होते जर तुम्हाला काही प्रॉब्लेम्स असतील तर प्रथम तुम्ही HR कडे जाऊन त्याला सांगा. १५ दिवसात तुमची अडचण त्याने दूर केली नाही तर मग तुम्ही माझ्याकडे या. शक्य असेल ती सर्व मदत आमच्याकडून तुम्हाला मिळेल. यामुळे त्यांच्या मनात एक विश्वास निर्माण झाला होता.

आमच्या कंपनीचा मोठा लेबर कॅम्प होता. तिथे cook ठेवले होते. सर्वांना तीन meals मिळायची. ब्रेकफास्ट, लंच आणि डिनर! तिथे सर्व माल खरेदी करण्यासाठी एक मॅनेजर ठेवला होता. सर्व व्यवस्था तो बघायचा. पण तरीसुद्धा आमचे लक्ष असायचे. Non-Veg खाणाऱ्यांना वेगळे जेवण, जे Veg आहेत त्यांना डाळ, भाजी, कोशिंबीर सर्व नीट मिळते ना, स्वच्छता आहे ना, खायच्या ज्या वस्तू आणल्या जातात त्या ताज्या असतात ना, अशा बारीक सारीक गोष्टीत स्वतः लक्ष देत असू. इतकेच नव्हे तर अचानक कधीही कॅम्पला भेट देऊन बनलेल्या जेवणाची चव घेऊन बघत असू, त्यांच्याबरोबर बाजूला बसून जेवत असू! साहजिकच एकमेकात आपुलकी निर्माण होते. कॅम्पमध्ये कौटुंबिक वातावरण तयार होते. रात्रभर बसूनसुद्धा ते काम करायला तयार होतात. पण जर तुम्ही त्यांच्याशी अरेरावी केलीत तर ते सरळ सांगतात, नही जमेगा आणि निघून पण जातात. आपण त्यांच्या पुढे humble राहिलो तर ते पण humble असतात. हे नेहेमी लक्षात ठेवले पाहिजे की आज त्यांच्यामुळे आपण आहोत. त्यांना जेवढी पैशाची गरज आहे, तेवढीच आपल्याला त्यांची आहे!

आपली कंपनी म्हणजे एक कुटुंब आहे, त्यांची सुखदुःखं समजून घेतली पाहिजेत, त्यांच्याशीसुद्धा आदराने बोलले पाहिजे ह्याची जाणीव असणाऱ्या प्रशांतना मी म्हटले, तुमचे हे विचार लाख मोलाचे आहेत आणि व्यवसाय करणाऱ्या प्रत्येकाने ह्याचे अनुकरण करावे कारण ही तर यशाची गुरुकिल्ली आहे. आज जगाच्या पाठीवर कुठेही जा, प्रत्येक उद्योगधंद्यात आपण ऐकतो की man power is the biggest problem!

त्यावर प्रशांत म्हणाले, पण ह्या सर्व गोष्टी मी आत्ता शिकलो. लहानपणी business ची पार्श्वभूमी नव्हती, त्यामुळे हा अनुभव नव्हता. आपल्या स्टाफशी वागण्याचीसुद्धा एक कला आहे आणि कधी रागावून, कधी प्रेमाने कामे करवून घ्यावी लागतात. सलोख्याचे संबंध असणे हे केव्हाही चांगले असते. मग काय वाट्टेल ते सांगा, रात्र रात्र जागूनसुद्धा काम पूर्ण करून देतात. हे आता एवढ्या वर्षांच्या अनुभवातून कळत आहे.

२००८ च्या वर्षी जेव्हा जागतिक मंदीची लाट आली तेव्हा एवढी वाईट परिस्थिती होती की, दुबईत कित्येक कंपन्या बंद झाल्या, अनेक ठिकाणी स्टाफ कमी केला, कितीजण ४/६ महिने पगारच देत नव्हत्या. आम्ही पगार

देत होतो, पण एक महिना असा आला की आम्हालाही पगार देणे शक्य नव्हते. मी स्टाफला बोलावून सांगितले, पैसे येणे आहेत, पण हातात कॅश नाही. सर्वांनी खूप support दिला. नंतरच्या महिन्यात दोन महिन्यांचा पगार एकदम दिला आणि त्यांना छोटीशी पार्टी पण दिली. मला स्वतःलाच अपराधी वाटत होते, कारण आपले ते संस्कार असतात! पण माझ्या स्टाफने खूपच सांभाळून घेतले.

आता मी माझी स्वतःची Prime Metal Craft ही दोन वर्षांपूर्वी जी कंपनी सुरू केली आहे ती मुख्यतः माझ्या मुलासाठी– सिद्धेशसाठी– केली आहे. तो आता इंजिनीयर झाला आहे आणि आता जास्त काम बघायला, अनुभव घ्यायला तो तयार होत आहे. ७००० sq. feet ची फॅक्टरी आहे. सर्व प्रकारच्या मशिनरीने सज्ज आहे. ४० कामगार आहेत आणि पाच जण ऑफिसात असतात. माझी पत्नी नीना आधी ऑफिसमध्ये येत नव्हती; पण आता HR सर्व ती बघते. कामगारांचे visas, इतर permissions, बाकी ऑफिसची सर्व व्यवस्था इ. ती बघते.

मला आता थोडा वेळ मिळाला की मी माझा छंद जोपासतो. drawing, painting, oil painting's culpture बनवतो आणि मला त्यातून आनंद मिळतो, त्यातून ऊर्जा मिळते. मी आपली आवड छंद म्हणून जोपासायला वयाच्या ४५व्या वर्षी सुरुवात केली. आयुष्याच्या अर्ध्या प्रवासात हातात प्रथम पेंटिंगसाठी ब्रश धरला, १० दिरहॅमचा पांढरा शुभ्र कॅनव्हास पेपर आणला; पण मला धीर होत नव्हता की एवढा सुंदर शुभ्र पेपर खराब करायचा, आणि १० दिरहॅम फुकट घालवायचे! कारण एकच होते, की मनात असलेला न्यूनगंड आणि आपल्या अंगात ही कला आहे याविषयी अनभिज्ञता!

मी म्हटले, कदाचित तुम्हाला तुमच्या या छंदातूनच व्यवसायासाठी सुद्धा नवनवीन ideas सुचत असतील. त्यावर प्रशांत म्हणाले, अगदी खरे आहे, त्यातून मला प्रेरणा मिळते!

मी विचारले, गेली कित्येक वर्षे दुबईतील महाराष्ट्र मंडळाचे नाटकाचे सेट तुम्ही बनवता. लहानपणी तुम्ही गणपतीची आरास करत होतात, मखर बनवायचात, थर्माकॉलशी तुमचे नाते लहानपणीच जुळले का?

स्मितहास्य करत प्रशांत म्हणाले, हो. पांढऱ्या शुभ्र थर्माकॉलचे आकर्षण लहानपणापासून होते. मी त्यानेच मखर बनवायचो, कदाचित त्याचवेळी माझ्यातील सुप्त कलात्मक दृष्टीला खतपाणी मिळाले, तेव्हाच मी एखाद्या कामावर खोलवर विचार करायला शिकलो, जी सवय आज माझ्या व्यवसायाचा अविभाज्य भाग झाली आहे.

दुबईच्या महाराष्ट्र मंडळाच्या नाटकांच्या वेळी, त्यावेळचा अध्यक्ष विकास म्हात्रे याने मला एकदा विचारले की, नाटकाचा सेट उभा करायचा आहे, तू मला मदत करशील का? स्वतः विकासही आर्किटेक्ट होता. मी त्याला म्हटले, चालेल मी मदत करतो आणि मी थर्माकॉलचा सेट उभा करायचा प्रस्ताव मांडला. कोणाचाच विश्वास बसत नव्हता. प्रत्येकाला काळजी एकच होती की हा सेट उभा कसा काय राहू शकेल. पण माझी खात्री होती, मी आत्मविश्वासाने सांगितले की ती जबाबदारी माझी!

मी नाटकाचा थोडासा अभ्यास केला. दरवाजे, खिडक्या, बाल्कनी, किचन कोणाची कोठून entry, कधी कोणता scene आहे आणि त्याप्रमाणे design केले. थर्माकॉलला पेंटिंग केले, नंबर घातले. रंगसंगती केली. आडवे–उभे सर्व तुकडे बार्बेक्यु स्क्युअर्सने जोडले. कुठे चिकटवाचिकटवी नाही. अशाप्रकारे सुप्रसिद्ध 'सुयोग' या नाट्यकंपनीचे श्री. सुधीर भट यांच्या व्यावसायिक नाटकाचा सेट मी प्रथम दुबईच्या रंगमंचावर उभारला. आत्तापर्यंत लाकडाचा सेट उभारून, एकदा वापरून नंतर तो फेकून दिला जाई. पण थर्माकॉलचा वापर करून मी खर्च अर्ध्यावर आणला आणि तेव्हापासून दरवर्षी मी नाटकाचे सेट उभारतो माझी हौस म्हणून!

मी त्यांना पटकन म्हटले, म्हणजे व्यवसायातील तुमची दूरदृष्टी, सखोल अभ्यास, काटकसर इ. सर्व अनुभव दररोजच्या जीवनातसुद्धा वापरता का?

ते हसून उद्‌गारले, नाही दररोजच्या जीवनातील अनुभव मी व्यवसायात वापरतो, ते तर आता माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहेत. लहानपणी गणपतीचे मखर करताना विचार असायचा की पुढच्या वर्षी हे मखर पुन्हा वापरता येईल का, ते माळ्यावर जपून कसे ठेवता येईल, उरलेले इतर साहित्य पुढच्या वर्षी कसे वापरता येईल! मध्यमवर्गीय परिस्थिती होती, त्यामुळे पै–पै वाचवणे हे संस्कार मनावर पक्के मुरले होते. वर्षातून एकदाच बनणारे गणपतीचे मखर, पण मला माझ्या आयुष्याचा मुखवटा घडवायला शिकवून गेले! माझ्या fasade च्या व्यवसायाची प्रेरणा देऊन गेले!

■ **प्रशांत मुळावकर**
primemetalcraft@outlook.com




# गुणवत्ता तज्ज्ञ

## ■ डॉ. सुनील मांजरेकर

■ मुलाखतकार : मेघना वर्तक

**शां**त आणि सौम्य मूर्ती, गोड वाणी, पण शब्दाला असलेली धारदार किनार आणि त्यातून जाणवणारा जबरदस्त आत्मविश्वास! या गुणांच्या जोरावर समोरच्या माणसाचे मन जिंकण्याची, माणसे जोडण्याची कला अवगत असलेले एक आगळे वेगळे व्यक्तिमत्त्व म्हणजेच डॉ सुनील मांजरेकर!

माणसे जोडणे आणि प्राप्त परिस्थितीतून संधी शोधणे हा त्यांच्या व्यवसायाचा गुरुमंत्र आहे. प्रत्येक माणूस हा जीवनाच्या अंतापर्यंत विद्यार्थी असतो आणि घेतलेले शिक्षण कधीही फुकट जात नाही तर आयुष्याच्या कोणत्यातरी टप्प्यावर तुम्हाला ते उपयोगी पडत असते. तुमचे जीवन हीच तुमची शाळा आहे आणि इथे मिळणारे शिक्षण, होणारे संस्कार तुमचे व्यक्तिमत्त्व घडवते असे त्यांचे ठाम मत आहे. जिद्द, मेहेनत आणि जबरदस्त आत्मविश्वास या त्रिगुणांच्या बळावर स्वतःच स्वतःच्या जीवनाला आकार देणाऱ्या डॉ. सुनील मांजरेकरांना मी म्हटले, खेडेगावातील एका दगडी शाळेत शिक्षण घेतलेला मुलगा परदेशात जाऊन Sanbook Quality Consultancy सारखी चाकोरीपेक्षा निराळ्या क्षेत्रातील आणि हळूहळू आपले पंख जगभर पसरविणारी स्वतःची कंपनी सुरू करतो हे मराठी माणसाला खचितच अभिमानास्पद आहे आणि तरुण पिढीसमोर मोठा आदर्श आहे आणि म्हणूनच तुमची जीवन गाथा, त्यातील अनुभव तुम्हीच उलगडाल का?

Structured Training च्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांनी आपल्या जीवनाच्या structure बद्दल मोठ्या उत्साहाने सांगायला सुरुवात केली.

महाराष्ट्रातील अलिबागजवळच्या सारळ ह्या खेड्यात, एका सामान्य मध्यमवर्गीय घरात जन्म झालेल्या माझे प्राथमिक शिक्षण एका दगडी शाळेत झाले. विटा-चुना लावून उभारलेली, कोणत्याही प्रकारच्या सोयी नसलेली खेडेगावातील ती एक मराठी माध्यमाची शाळा होती. पण आज मी सर्वांना अभिमानाने सांगू शकतो की शिक्षणाचे

माध्यम कोणतेही असो किंवा दगडी शाळा असो त्याने काहीही फरक पडत नाही. तुमच्यातील कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी या माध्यमांची आवश्यकता नाही. वडील मुंबईत नोकरीस होते. माझी आई अलिबागच्या एका शाळेत अतिशय शिस्तप्रिय मुख्याध्यापिका म्हणून प्रसिद्ध होती. घरात वातावरणही शिक्षणाचे होते. त्याशिवाय पर्याय नव्हता. संसार चालविण्यासाठी आईवडिलांची चाललेली धडपड बघत होतो. माझ्या करिअरच्या सुरुवातीला दोन वहिनी– शुभदा आणि समीरा तसेच माझी बहीण जयश्री यांनीसुद्धा आईच्या मायेने माझी काळजी घेतली. त्यामुळे आपले कुटुंब, एकमेकांबद्दलचे प्रेम, नात्यांचा अर्थ, शिक्षणाचे महत्त्व, वक्तशीरपणा अशा संस्कारांचा परिणाम बालवयातच कळत–नकळत माझ्या मनावर होत होता आणि बालपणातील याच संस्कारांनी माझे आयुष्य घडवले, आयुष्याला वळण लावले!

वडील मुंबईत नोकरीनिमित्त होते त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षण मी मुंबईत 'पाटकर कॉलेज'मध्ये घेतले. १९८७ साली मी विज्ञान शाखेतील पदवी घेतली. आईवडिलांची मेहेनत बघतच होतो, त्यामुळे घराला आधार द्यायला आपण पण हातभार लावायला पाहिजे हे तर मनात लहानपणीच रुजले होते. म्हणून लागलीच नोकरीच्या शोधात होतो आणि Eupharma Laboratories Ltd. या कंपनीत माझी पहिली नोकरी सुरू झाली. पण मनात पुढच्या शिक्षणाचे विचार चालूच होते. कारण शिक्षण ही यशाची शिडी आहे हे मनात पक्के रुजलेले होते!

नोकरी चालू होती तेव्हाच पदव्युत्तर शिक्षणासाठी मी 'इस्माईल युसूफ कॉलेज', जोगेश्वरी इथे प्रवेश घेतला. नोकरी आणि शिक्षण दोन्ही चालू केले आणि याचवेळी German Remedies Ltd. या कंपनीत quality control officer म्हणून काम करण्याची संधी चालून आली आणि अशा प्रकारे नोकरी करून १९९१ मध्ये मी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले.

माझ्या नोकरीमुळे घरखर्चाला तर माझा हातभार लागला, त्यामुळे मानसिक समाधान तर मिळालेच कारण लहानपणापासूनचे आईवडिलांचे कष्ट बघत होतो! पण त्याचबरोबर ही नोकरी करत असताना मला कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. तसेच वक्तशीरपणा, कामाचे वेळापत्रक, लोकांशी संपर्क अशा प्रकारच्या अनेक गोष्टी शिकता आल्या, ज्या आज स्वतःचे ऑफिस चालवताना मला उपयोगी पडत आहेत आणि म्हणूनच मला नेहमी वाटते की आपण शाळा–कॉलेजमध्ये जे शिकतो, त्याच्याबरोबर प्रत्यक्ष अनुभव घेणे हे तितकेच महत्त्वाचे आहे! म्हणून पदवी प्राप्त केल्यानंतर, किंबहुना शालेय शिक्षण संपल्यानंतर छोटे–मोठे जॉब करत जर शिक्षण घेतले तर त्या अनुभवांचा फायदा जास्त होईल, असे मला वाटते. मी जेव्हा माझे Ph.D. पूर्ण केले, तेव्हाही माझ्या हेच लक्षात आले की थिसिसपेक्षा जास्त लक्ष संशोधनावर द्यायला हवे.

मी म्हटले, सुनील डॉक्टरेट मिळवायची हे तुमचे बालपणापासूनचे स्वप्न होते का? माझ्या वडिलांना डॉक्टरेट मिळाली आहे, त्यामुळे मला अनुभव आहे की पीएच.डी.चा अभ्यास आणि नोकरी या दोन्ही गोष्टींचा मेळ घालणे हे एक किती मोठे आव्हान असते आणि म्हणूनच पीएच.डी. हे एक स्वप्नंच म्हटले पाहिजे!

डॉ. सुनील म्हणाले, तुम्ही म्हणता ते अगदी खरे आहे. ज्याला अनुभव आहे त्यालाच समजेल ही तारेवरची कसरत! १९९५ साली 'मुंबई युनिव्हर्सिटी'तून मला Analytical Chemistry मध्ये डॉक्टरेट मिळाली. माझे एक स्वप्न पूर्ण झाले. माझ्या Ph.D.च्या प्रवासात पहिले दीड वर्ष माझे मार्गदर्शक डॉ. जे.डी. चव्हाण होते. त्याचवेळी बॉम्बे युनिव्हर्सिटीचे रजिस्ट्रार म्हणून त्यांची नियुक्ती झाली. त्यामुळे माझे शिष्यत्व त्यांनी डॉ. ए.पी. अर्गेकर यांच्याकडे सोपवले. या माझ्या दोन गुरुवर्यांमुळेच माझे स्वप्न सत्यात उतरले आणि म्हणून त्यांचा उल्लेख आवर्जून करावासा वाटतो. हा एक जीवन बदलणारा, विलक्षण अनुभव होता. प्रबंध लिहिण्यासाठी घेतलेली मेहेनत, मार्गदर्शकांचे सल्ले, काढलेल्या नोट्स, त्यावर चिंतन–मनन, विषयाच्या तळाशी जाऊन त्यावर केलेले विचारमंथन आणि या सर्वांच्या जोडीला नोकरीतील कामाच्या जबाबदाऱ्या, घराच्या जबाबदाऱ्या! खूप मोठे आव्हान असते ते! पण जर शिस्त, मेहेनत करण्याची तयारी आणि आत्मविश्वास असेल तर ही शिडी तुम्ही सहज चढू शकता आणि पुढच्या आयुष्यात ह्याचा खूप फायदा होतो.

पीएच.डी.च्या अनुभवात पुन्हा गुरफटलेल्या डॉक्टरांना मी म्हटले, त्यानंतर तुम्ही दुबईत यायचा निर्णय कसा काय घेतलात?

त्यावर डॉ. सुनील पटकन् म्हणाले, खरं तर पीएच.डी. मिळाल्यानंतर त्यावेळी अमेरिकेसारख्या प्रगत देशात जाऊन आपले करिअर बनवावे, आणखी पुढील शिक्षण घ्यावे असे मनात होते, पण तत्पूर्वीच दुबईमध्ये नोकरीची एक संधी



चालून आली. लहानपणापासून स्वतःचे एक हक्काचे घर मुंबईत असावे अशी मनात सुप्त इच्छा होती आणि असे वाटले ही इच्छा पूर्ण करण्याचा मार्ग दुबईतून जातो. मग त्या इच्छापूर्तीसाठी, मी दुबईत यायचा निर्णय घेतला आणि १९९८ मध्ये दुबईत माझे पहिले पाऊल पडले.

मी सुनीलला म्हटले आणि आता दुबई ही तुमची कर्मभूमी झाली आहे. ते म्हणाले अगदी खरे आहे, ही माझी कर्मभूमी आहे आणि ह्या दुबईने मला खूप काही शिकविले, खूप काही दिले!

मुंबईत पदवी घेतल्यानंतर, पीएच.डी. होईपर्यंत म्हणजे १९८८ ते १९९८ ह्या दहा वर्षांच्या काळात भारतात मी फार्मा क्षेत्रात कार्यरत होतो. या काळात मला जो अनुभव आला त्या अनुभवांवर आज माझा पुढचा व्यवसाय उभा आहे. कारण मला असे नेहमी वाटते की हे अनुभव हे पायाभूत असतात. पाया मजबूत असेल तरच त्यावरील इमारत मजबूत होऊ शकेल! जीवनाला लागणारी शिस्त, दररोजचे वेळापत्रक, मेहेनत करण्याची सवय, बाहेरच्या जगाशी संबंध आल्यामुळे लोकांचे येणारे बरे-वाईट अनुभव, त्यातून समोरच्या माणसाला पारखण्याचा गुण अशा अनेक अनुभवांची शिदोरी मिळते.

मी म्हटले आणि ती अनुभवांची शिदोरी घेऊन तुम्ही दुबईत पदार्पण केलेत !

स्मितहास्य करत सुनील म्हणाले, अगदी खरे आहे. त्या शिदोरीवर तर आमच्या आजच्या व्यवसायाचा डोलारा उभा आहे. दुबईत आल्यावर माझा पहिला जॉब म्हणजे Unistar International ह्या cosmetics आणि perfumes बनविणाऱ्या कंपनीत Quality Assurance Manager Audit या पदासाठी होता. हा जॉब म्हणजे माझ्या करिअरच्या दृष्टीने एक नवीन क्षेत्र होते. ते एक मोठे आव्हान होते. त्या कंपनीची २२ देशांमध्ये कामे चालू होती आणि सर्व जबाबदारी माझ्यावर होती. मोठ्या उमेदीने मी कामाला सुरुवात केली. त्याचवेळी कंपनीची ownership बदलली आणि दुसरा मालक आला. त्याने सर्व स्टाफ बदलला. साहजिकच नोकरी गेली. त्याचवेळी मी social organizations मध्ये जास्त involve झालो . त्यावेळी Dubai Quality Group म्हणून होता तिथे मी जॉईन झालो. तिथे एका अरबी लोकल माणसाशी ओळख झाली आणि त्याने मला दुबई म्युन्सिपाल्टीत जायला सांगितले .

एक वेगळे पर्व सुरू झाले. मी २०००च्या अखेरीस



बलदियात जॉईन झालो. तिथे पुन्हा माझे कार्यक्षेत्र बदलले. मी-Accreditation Engineer म्हणून काम करू लागलो. खरे म्हटले तर मी जेव्हा नोकरी स्वीकारली, तेव्हा ऑफर लेटर मिळाले, ते होते अरबी भाषेत! मी नीट पहिले नाही की आधीच्या कंपनीपेक्षा ४००० दिरहॅम मला कमी पगार होता. माझ्या हातात फक्त ७००० मिळणार होते. एवढ्या कमी पगारात संसार चालवणे कठीण होते. पण नोकरी सोडता येत नव्हती. आहे ती परिस्थिती संधी म्हणून स्वीकारली आणि तिचा फायदा घेतला. मी पाच वर्षे तिथे काम केले. सचोटीने आणि प्रामाणिकपणे! इतरत्र सरकारी ऑफिसेसमधून, म्युन्सिपाल्टी ऑफिसेसमधून जे वातावरण असते, जी पद्धत असते, तीच पद्धत इथेही होती; पण सचोटीचे माझ्यावरील संस्कार अतिशय पक्के होते. मी इमानदारीने काम केले; पण मला कधीही increment मिळाली नाही. माझा जो बॉस होता तो माझा फायदा घ्यायचा, माझ्या नावापुढे कायम remark होता below average!

आमचा जॉब ऑडिटिंग हा होता. आमच्या हाताखाली ७० कंपन्या होत्या. ज्यांना दुबईत व्यवसाय करायचा आहे त्या सर्वांना टेस्टिंगची जरुरी होती. माझा पहिला जॉब होता तो रोड टेस्टिंग हा. मी scientist आहे. फार्मामध्ये मी biodegradable study केला आणि त्यांनी मला रोड टेस्टिंगला पाठवले! त्यामुळे दुबई म्युन्सिपाल्टीत civil engineering शिकलो. त्यानंतर दुबईत बूम आला आणि construction work जोरात सुरू झाले. आम्हाला सांगितले गेले की आता क्रेन टेस्टिंग करायचे आहे. मी mechanical engineer नाही त्यामुळे ते पण शिकलो. 'एमिरेट्स टॉवर'चे क्रेन टेस्टिंग मी केले आहे. ऑस्ट्रेलियाहून trained लोकं

येऊन आम्हाला शिकवायची. अशा विविध क्षेत्रांत मेहेनत घेऊन शिकावे लागले, त्यामुळे प्रत्येक कामाची जबाबदारी घेऊन ते काम मी आत्मसात केले. माझी cosmetics ची background होती, त्यामुळे संशोधन करून म्युन्सिपाल्टीत पहिली lab सुरू केली. त्यावेळी चायनामधून फेक माल यायचा आणि म्हणून टेस्टिंग आवश्यक झाले.

अशा प्रकारे निरनिराळ्या क्षेत्रांतील ज्ञान मी आत्मसात केले. आज म्युन्सिपाल्टीतल्या कामाचा खूप फायदा होत आहे. तिथे ज्या ज्या गोष्टी शिकलो त्या सर्व आज मी आमच्या ऑफिससाठी वापरतो. आज आमचे ऑफिस क्रेन्चे इन्स्पेक्शन करणाऱ्या सर्व कंपन्यांना ट्रेनिंग देते. तसेच कॉस्मेटिक्स आणि पर्फ्युमच्या सर्व कंपन्या आमच्याबरोबर डील करतात.

मी तिथे पगार खूप कमी घेतला; पण मेहेनत केली, सच्चाईने वागलो आणि आज दामदुपटीने मला त्याचा फायदा होत आहे. म्युन्सिपाल्टीच्या नोकरीतून मी एकच शिकलो, आयुष्यात कोणतीही, कशीही परिस्थिती निर्माण होऊ दे, त्या परिस्थितीला सकारात्मकतेने सामोरे जायचे आणि ती परिस्थिती संधी म्हणून स्वीकारायची!

ह्याच सुमारास कॅनडात जाऊन संधी शोधण्याचा पण प्रयत्न केला, पण मन रमले नाही म्हणून दुबईत परत आलो. दुबईशी ऋणानुबंध जुळले होते!

अचानक NMC च्या डॉ. बी.आर. शेट्टी यांनी मला ऑफर दिली होती general manager म्हणून. त्यावेळी NEO Pharma सुरू होणार होते. पण स्नेहाने माझ्या बायकोने सल्ला दिला की ही ऑफर तू स्वीकारू नकोस कारण एकदा तू जॉब करायला लागलास की आयुष्यभर जॉबच करशील! माझ्या दृष्टीने तिने अतिशय मोलाचा आणि योग्य सल्ला दिला, ज्याने माझे आयुष्य बदलले !

मी डॉ. शेट्टींना सांगितले मी तुमच्याकडे consultant म्हणून काम करीन. अशाप्रकारे सकाळी म्युन्सिपाल्टी तिथे ७०००, पहिल्या नोकरीच्या मालकाने विचारले पार्ट-टाईम जॉबसाठी म्हणून संध्याकाळी त्याच्याकडे २२०० आणि गुरुवार-शुक्रवार दोन दिवस NMC मध्ये अबुधाबीला तिथे २५०० असे तीन जॉब केले आणि खर्च - Adjust केला.

आज मला आवर्जून सांगावेसे वाटते की, डॉ. बी.आर. शेट्टी हे माझे दैवत आहेत. मला त्यांच्याकडून खूप गोष्टी शिकता आल्या. ते एक shrewd businessman आहेत . मी business त्यांच्याकडून शिकलो. त्यांच्या बरोबर मी चार वर्षे काम केले. आज त्यांच्या सर्व प्रोजेक्ट्स सर्टिफिकेशन्सची कामे आमची कंपनी करते.

मी म्हटले, सुनील व्यवसायाच्या प्रवासात अशा प्रकारचा मुरलेला मार्गदर्शक लाभणे ही खरोखर भाग्याची गोष्ट आहे.

प्रसन्न चेहेऱ्याने सुनील म्हणाले, अगदी खरे आहे. माझ्या व्यवसायात मला श्रेष्ठ मार्गदर्शक आणि devoted भागीदारही मिळाला! माझी पत्नी स्नेहा ही आमच्या संसाराप्रमाणे, व्यवसायातही माझी साथीदार आहे. ती खऱ्या अर्थाने माझी सहचारिणी आहे. NMC मध्ये नोकरी न करता तू स्वतःचा व्यवसाय सुरू कर हा तिने दिलेला सल्ला तिच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. २००५ मध्ये Sanbook Quality Consultancy (SOC) या आमच्या कंपनीची सुरुवात केली .

मी विचारले, स्नेहाचे शिक्षण पण याच क्षेत्रात आहे का? ते अभिमानाने सांगू लागले, स्नेहाने पण Analytical Chemistry मध्ये मास्टर्स केले आहे. मुंबईला ती Cipla मध्ये काम करत होती. दुबईत आल्यानंतर २००७ पर्यंत तिने New Medical Center मध्ये फार्मा मार्केटिंगला काम केले. २००७ मध्ये तिने तो जॉब सोडला आणि आता पूर्ण वेळ आमच्या कंपनीत finance, administration logistic आणि इतर सर्व जबाबदारी घेते. मी सर्व technical बाजू सांभाळतो. बहुतेक वेळा मी ट्रॅव्हल करत असतो आणि म्हणूनच ऑफिसची जबाबदारी तिच्यावरच असते.

मी म्हटले, स्नेहा तिचे क्षेत्र सोडून कशी काय इथे आली? आवड म्हणून की गरज म्हणून?

त्यावर सुनील म्हणाले, खरं म्हटलं तर स्नेहाचा कंपनीत आधी सहभाग नव्हता. पण आम्हाला एक वाईट अनुभव आला. अकाउंट्समध्ये एक फिलिपिनो क्लार्क होती आणि ती आम्हाला फसवत होती. कंपनीची सुरुवात होती. टेलिफोनचे बिल आले की सुनील तिच्याकडे पूर्ण रक्कम बिल भरण्यासाठी म्हणून द्यायचा. पण ती त्यातील line चालू राहील एवढी कमीतकमी रक्कम भरायची. उदा. जर बिल १००० दिरहॅम आहे तर ही २०० रुपये भरायची, त्यामुळे light, फोन चालू राहायचे, बाकीची रक्कम स्वतःच्या खिशात टाकायची. एकदा सुनील युरोपमध्ये होता आणि तेव्हा line cut झाली म्हणून त्याने चौकशी केली तेव्हा कळले की न भरलेली बरीच रक्कम accumulate झाल्यामुळे line कट केली होती. स्नेहाने सर्व अकाउंट्स

तपासले आणि सर्व गोष्टी लक्षात आल्या. तिला काढून टाकले आणि तेव्हाच स्नेहाने निर्णय घेतला की आता आपण स्वतःच लक्ष घालायचे!

२००७ मध्ये स्नेहा जॉईन झाली आणि माझ्यावरचा कामाचा भार एकदम हलका झाला. खरं म्हटले तर तिचे क्षेत्र वेगळे होते. आपल्याला ज्या कामात आनंद मिळतो तेच काम केले पाहिजे. पण स्नेहाने ऑफिसचे काम शिकून घेतले आणि त्यात आनंद निर्माण केला. प्राप्त परिस्थितीतून मार्ग शोधला. कोणत्याही ऑफिसच्या काही strategy गुप्त ठेवाव्या लागतात. त्यासाठी विश्वासू सहकाऱ्यांची आवश्यकता असते. आणि मला स्नेहाच्या रूपात तो सहकारी भेटला!


माझ्या मनात आले की, संस्कृत कवी श्रेष्ठ कालिदासाने जे म्हटले आहे की पत्नी म्हणजे ''गृहिणी, सचिवः, सखी मिथया, प्रिय शिष्या ललिते कलाविधौ'' ते स्नेहाच्या बाबतीत अगदी यथार्थ आहे !

पत्नीच्या कार्याचा यथार्थ अभिमान बाळगणाऱ्या डॉ. सुनीलना मी म्हटले, आता इतर देशात तुमची कुठे कामे चालू आहेत ?

ते उत्साहाने सांगू लागले, आता SOC ची दुबईबरोबर कतार, बहारीन, मस्कत इथे पण कामे चालू आहेत. आज आमचे १००० हून अधिक clients असून भारतात मुंबई आणि पुणे इथेही काम सुरू होत आहे. आज आमच्या कंपनीत १८ माणसे काम करत असून त्यात M.Tec. आहेत, फूड Technologist आहेत. Food & Hospitality ह्या क्षेत्रात कंपनीचे नाव प्रसिद्ध आहे.

मार्केटमध्ये जे काही नवीन येते त्यातून आम्ही संधी शोधतो. आत्ता आम्ही हलाल सर्टिफिकेशन करतो, त्यासाठी मी माझा sharia law इ.चा अभ्यास update केला. nische मार्केटवरच आम्ही आमचे लक्ष केंद्रित करतो. इतर सर्वजण करतात ते मी करत नाही. काहीतरी वेगळे नवीन करायची माझी धडपड आहे. त्यासाठी कितीही मेहनत घ्यायला लागली तरी माझी त्यासाठी तयारी आहे .

मला मनापासून ट्रेनिंगची आवड आहे आणि म्हणूनच UK मधील IRC-मधील Lead Tutor चे, जगभर मान्यता असलेले आठ विविध अभ्यासक्रम मी पूर्ण केले आणि आता SOC कोणत्याही क्षेत्रात व्यावसायिक तत्त्वावर ट्रेनिंग देऊ शकते. आज आम्ही मुख्यतः quality control, health, safety, पर्यावरण संबंधातील व्यवस्थापन प्रणाली या क्षेत्रांत

कार्यरत आहोत. दुबई म्युन्सिपाल्टी related product registration ची कामे आम्ही करतो. उदा. perfumery, cosmetics इ.

आता सध्या मी युरोपवर focus केलाय, तिथे जाऊन मी लोकांना ट्रेनिंग देतो. पुढच्या दोन वर्षांत अजून ५० देशांत ट्रेनिंग देण्याचा विचार चालू आहे आणि मला त्यात आनंद मिळतो. इतकी वर्षे या लोकांनी आपल्यावर राज्य केले, आपण त्यांचे ऐकत होतो, त्यांचे गुलाम होतो, आता हे आपल्यासमोर खाली बसतात आणि आपले बोलणे ऐकतात, आपण त्यांना शिकवतो!

मी सुनीलना म्हटले, आज तुम्ही परदेशात गेलात, इतकी वर्षे तिथे राहत आहात, ती तुमची कर्मभूमी झाली; पण तरीही स्वदेशाबद्दलचे प्रेम, भारताबद्दलची नाळ कायम आहे आणि हेच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे.

त्यावर डॉ. पटकन् म्हणाले, कुठेही गेलात तरी दोन प्रकारची माणसे भेटतात. जसे त्यांनी आपल्याला गुलाम बनवले तसेच तिथे कित्येक लोकं अशी आहेत की त्यांना भारतीय संस्कृतीबद्दल आस्था आहे, भारतीयांबद्दल आदर आहे. मी पोर्तुगालला गेलो होतो, तिथे nail paint बनवणाऱ्या कंपनीची आमच्याकडे agency आहे. कंपनीची मालक एक बाई आहे. तिने मला एक गणपतीची मूर्ती भेट म्हणून दिली आणि म्हणाली, गेली १५ वर्षे मी गणेशाची भक्त आहे!

परदेशात गेल्यावर आपल्या कामाबरोबरच भारतीय संस्कृती, मराठी परंपरेची वैशिष्ट्ये जपणाऱ्या डॉ. सुनील मांजरेकरांना मी म्हटले, तुम्ही कामासाठी जगभर फिरता तेव्हासुद्धा तुमच्या मनात आपली संस्कृती लपलेली असतेच! तुमच्या व्यवसायाशिवाय आणखी सामाजिक क्षेत्रात तुमचा सहभाग असतो का?

माझा प्रश्न ऐकून डॉ. सुनील महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात पोहोचले. म्हणाले, खरंच रम्य दिवस होते ते! शाळा–महाविद्यालयाच्या सर्व कार्यक्रमांत माझा सहभाग ठरलेला होता. त्यानिमित्ताने नवीन ओळखी व्हायच्या, माणसे जोडली जायची, मला माणसांना समजून घ्यायला फार आवडते आणि हीच माझी आवड मोठेपणी वाढत गेली आणि आज मला त्याचा फायदा माझ्या व्यवसायासाठीही होत आहे. मी SOC Entertainment या संस्थेची स्थापना केली असून भविष्यात सांस्कृतिक क्षेत्रात पदार्पण करायची इच्छा आहे.


मी डॉक्टरांना विचारले, स्वतःला आलेल्या अनुभवातून आजच्या तरुण पिढीला तुम्ही कसे मार्गदर्शन कराल?

सुनील पुढे सांगू लागले, व्यवसाय म्हटले की बरे–वाईट अनुभव येतातच! सर्वत्र असतो तो कामगारांचा प्रॉब्लेम आम्हालाही आहेच. चांगली माणसे मिळणे आणि नंतर ती टिकून राहणे फार कठीण असते. प्रथम माणसे मिळतात. तेव्हा नोकरी मिळण्यासाठी, दुबईत येण्यासाठी हातापाया पण पडतात. दोन वर्षे टिकतात, शिकून घेतात आणि नंतर इतर स्पर्धकांबरोबर हातमिळवणी करतात आणि स्वतंत्र व्यवसाय सुरू करतात. खरे म्हणजे आपण कोणाला शिकवले, त्याने पुढे मेहेनत घेतली, व्यवसाय सुरू केला तर शिष्याची प्रगती बघून गुरूला नेहमी आनंदच होत असतो! आपल्या शिकवण्याची ती पावती असते. पण माझे तरुण पिढीला सांगणे आहे की जे काम कराल ते इमानदारीने, सचोटीने करा! ज्या घरचे मीठ खातो, त्याच घरचे वासे मोजायचे नाहीत. कृतज्ञ राहा, कृतघ्न होऊ नका!

एवढ्या वर्षांच्या माझ्या प्रवासात निरनिराळ्या धर्मांच्या, जातीच्या, देशाच्या लोकांशी माझा संबंध आला. अनेक माणसे जोडली; पण एक गोष्ट सांगताना वाईट वाटते की, मराठी माणूस सचोटीने वागण्यात कमी पडतो आणि मेहेनतीत मागे पडतो. जी प्राप्त परिस्थिती तुमच्या समोर असते, त्यावर रडत न बसता त्यातूनच संधी शोधा, तीच तुम्हाला यशाचा मार्ग दाखवते! नोकरीच्या सुरुवातीच्या काळात केवळ टेबलावर असणारे काम करण्यात, पाट्या टाकण्यात समाधान मानू नका, तर त्याबरोबर इतर टेबलांवर इतर लोकं जे काम करतात ते पण शिकून घ्या. घेतलेले शिक्षण आणि काम ह्यात जमीन–आस्मानाचे अंतर असते.

मी म्हटले, डॉ. सुनील ईश्वराने दुबईच्या पदरात वाळवंटाचे माप घातले, पण प्राप्त परिस्थितीवर रडत न बसता जिद्द, मेहेनत, आत्मविश्वास या त्रयींच्या जोरावर संधी शोधून दुबईने याच वाळवंटाचे रूपांतर नंदनवनात केले आणि स्वतःच स्वतःची शिल्पकार झाली. तद्वतच तुम्हीसुद्धा प्राप्त परिस्थितीतून संधी शोधलीत आणि जिद्द, मेहेनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्वतःच स्वतःचे शिल्पकार झालात! आणि म्हणूनच कॅनडा, अमेरिका यांच्या पाऊलवाटेवरून न जाता दुबईची पाऊलवाट स्वीकारलीत! खरंच हा एक योगायोगच म्हणायचा का?

■ **डॉ. सुनील मांजरेकर**
manjrekar.sunil@gmail.com





# स्वप्नवेडा

■ शिरीष पटवर्धन

**बा**लपणापासून स्वव्यवसायाचे स्वप्न बघणारी आणि त्या स्वप्नपूर्तीसाठी वयाच्या ४०व्या वर्षी पुन्हा विद्यार्थीदशेत प्रवेश करून, मुंबईच्या सुप्रसिद्ध UDCT मधून पेंट टेक्नॉलॉजीचा अभ्यास पूर्ण करणारी स्वप्नवेडी व्यक्ती म्हणजेच 'Rchemie International FZC' या कंपनीचे मालक शिरीष पटवर्धन! बालवयातच संस्कारांचे बाळकडू मिळाल्याने प्रामाणिकपणा, सचोटी रक्तात भिनली होती. ह्या संस्कारांच्या शिदोरीवर त्यांनी आपल्या करिअरची सुरुवात केली. नावीन्याचा ध्यास ही त्यांची जीवनप्रणाली आहे आणि म्हणूनच कॉम्प्युटरमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करून, त्या क्षेत्रात नोकरीचा अनेक वर्षे अनुभव घेऊन, त्यातील बारकावे शिकून घेऊन, काहीतरी नवीन करावे म्हणून, नंतर पुन्हा chemicalsच्या व्यवसायात उडी मारली. व्यवसायात यशस्वी होण्यासाठी त्या क्षेत्राची सखोल माहिती आवश्यक आहे हे लक्षात घेऊन, मेहनतीची पर्वा न करता MBA तसेच पेंट टेक्नॉलॉजीचा अभ्यास केला. जिद्द, चिकाटी आणि परिश्रम यांच्या बळावर दोन भिन्न क्षेत्र, भिन्न विषयांचा सुंदर मेळ त्यांनी घातला आणि आपल्या व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. बालपणापासून स्वव्यवसायाचे स्वप्न बघणारे शिरीष पटवर्धन नवीन पिढीला संयुक्त अमिरातीत येऊन व्यवसाय सुरू करण्याचे आवाहन करतात आणि स्वतःच्या मार्गदर्शनाचा हात पुढे करतात.

त्यांचा जीवनप्रवास वाचूया त्यांच्याच शब्दात...!

मी शिरीष वसंत पटवर्धन. 'ग्रंथाली'च्या अनुषंगाने मला माझ्या आतापर्यंतच्या आयुष्याचा आढावा घेण्याचे भाग्य लाभले त्याबद्दल 'ग्रंथाली' प्रकाशनाचा मी मनापासून आभारी आहे.

मी आता आहे तिथपर्यंत पोहचण्यासाठी आयुष्यातल्या बऱ्याच गोष्टी कारणीभूत ठरल्या.

माझे बालपण तसे सर्वसाधारण मध्यमवर्गीय कुटुंबातले, पण मजेत आणि सुखकारक होते. आई-वडील जरुरीइतके शिस्तप्रिय आणि प्रोत्साहन देणारे होते. दोघेही नोकरी करत असल्याने त्या वयातही निर्णयक्षमता आणि स्वतःच्या गोष्टी स्वतः करण्याची सवय जडली. घर गिरगावात त्यामुळे मध्यवर्ती असल्याने कोणत्याही क्षणी घरी वास्तव्यास येणारे पै-पाहुणे, आप्तस्वकीय यामुळे तडजोड आणि आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचे संस्कार आपोआपच अंगात बाणले गेले. आईवडिलांमुळे सचोटी, विचारातील स्पष्टता, तसेच नावीन्याची आवड हे गुण आले आणि आपसुकच मनाच्या कक्षा रुंदावत गेल्या. काहीतरी वेगळे नवीन करण्याचे बाळकडूच मिळाले.

गिरगावातल्या प्रथेप्रमाणे माझे शालेय शिक्षण गोखले एज्युकेशनच्या डी.जी.टी. ह्या मराठी माध्यमाच्या शाळेत झाले आणि हिंदुजामध्ये महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. पदव्युत्तर शिक्षण मुंबई विद्यापीठात 'कॉम्प्युटर्स'मध्ये केले.

अर्थार्जनाची खरी सुरुवात 'डेटामॅटिक्स कन्सल्टंट लिमिटेड'मध्ये 'कॉम्प्युटर ट्रेनी' म्हणून झाली. तिथे सतत



दोन वर्षे 'सर्वोत्तम कामगिरीचा' पुरस्कार मिळाला. सुरुवातीलाच अशी कौतुकाची थाप मिळाल्यामुळे उत्साह निश्चितच वाढला.

१९८८ साली आखाती प्रदेशातील बहारीन या ठिकाणी 'मायक्रोग्राफिक्स' ह्या अत्याधुनिक (त्या काळात) क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली व आखाती प्रदेशातील आयुष्याला सुरुवात झाली. त्याच कंपनीत वैयक्तिक उन्नती तसेच नवीन काहीतरी करावे ह्या ऊर्मीमुळे 'मार्केटिंग व सेल्स' ह्या क्षेत्राची निवड केली. त्याचा निश्चितच फायदा झाला. त्यामुळे पुढील १२ वर्षांच्या कालावधीत मायक्रोग्राफिक्स, ऑफिस ऑटोमेशन, सेफ्टी सिक्युरिटी सिस्टिम्स, ॲक्सेस कंट्रोलस, कन्झ्युमर इलेक्ट्रॉनिक्स आणि व्हाइट गुड्स ह्या विविध क्षेत्रांमध्ये काम करण्याचा अनुभव मिळाला. ह्या सर्वांचा व्यवसायाच्या दृष्टीने खूपच फायदा झाला. कारण प्रत्येक 'डिव्हिजन' ही शून्यातून उभी करून वाढवली होती. त्यामुळे प्रत्येक छोट्या-मोठ्या बाबींमधले बारकावे जाणवत गेले आणि त्यातल्या खाचाखोचांची माहिती मिळत गेली.

ह्याच कालावधीत बहारीनमध्ये वेगवेगळी सरकारी टेंडर्ससुद्धा यशस्वीरीत्या सांभाळली.

ह्याच दरम्यान 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज'मधून एम.बी.ए.ची पदवी ग्रहण केली.

एकाच जागी १२ वर्षे काढल्यानंतर वैयक्तिक उन्नती खुंटल्यासारखी जाणवली. म्हणून पुन्हा क्षेत्र बदलण्याच्या आलेल्या संधीचा लाभ घेऊन 'केमिकल' क्षेत्रात पदार्पण केले.

कदाचित, हीच व्यवसायाची खरं तर सुरुवात म्हणायला हरकत नाही. कारण दुबईतील एका मोठ्या उद्योग समूहाबरोबर नफा वाटणी तत्त्वावर सुरुवात झाली.

ह्या क्षेत्रात उडी घ्यायचे ठरवल्यावर पूर्ण माहिती घेण्यासाठी 'UDCT' मधून 'पेन्ट टेक्नॉलॉजी'चा अभ्यासक्रम वयाच्या ४०व्या वर्षी केला.

सात वर्षांनंतर अत्यंत समाधानकारक आणि उत्तमरीत्या व्यवसाय प्रस्थापित झाल्यानंतर काही घटना अशा घडल्या की त्यामुळे स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय आरंभ करायचा विचार मनात बळावू लागला आणि तशा अनेक पोषक आणि अनुकूल गोष्टी घडत गेल्या.

कायम मेहनत आणि सचोटीने काम केल्याने व्यवसायात पहिल्यापासूनच खूप जणांची मोलाची साथ लाभली. सगळ्यांना येतात तसे व्यवसायात अनेक चांगले-वाईट अनुभव मलाही आले. पण प्रत्येक अनुभवातून अधिकाधिक शिकत गेलो आणि विचारांची प्रगल्भता आली.


व्यवसाय उत्तम आणि नेटकेपणाने करण्यासाठी पाळावयाची व्यवधाने म्हणजे संपूर्ण व्यवसायाची माहिती, त्याप्रती असलेली बांधिलकी आणि संपूर्णपणे झोकून देऊन काम करण्याची वृत्ती. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यवसाय आणि कुटुंब यांचा योग्य ताळमेळ बसवणे, ही तारेवरची कसरत अत्यंत जरुरीची आहे. कारण त्यातून मिळणारे मानसिक स्वास्थ्य तुम्हाला यश, सुख आणि समाधान तर देतेच; पण आरोग्याशी कोणतीही तडजोड करावी लागत नाही.

माझ्या अनुभवावरून मी ठामपणे सांगू इच्छितो की, मराठी माणसाने जरूर व्यवसाय/उद्योगधंदा करावा आणि तो वाढवावा.

आखाती प्रदेशात खास करून 'संयुक्त अमिराती' देशात कोणत्याही प्रकारचा व्यवसाय आरंभ करण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य आणि योग्य मार्गदर्शन करण्याचे आश्वासन देऊन माझा अल्प परिचय संपवितो आणि लेखाची सांगता करतो.

'जयहिंद, जय महाराष्ट्र'

■ **शिरीष पटवर्धन**
shirish@rchemie.com





# भंगारातून भाग्याकडे

## संजीव-मनीषा फडके

मुलाखतकार : मेघना वर्तक

भंगार! निरुपयोगी वस्तू! आपल्याकडे महाराष्ट्रात हातगाडी घेऊन भंगारवाला ओरडत येतो. निरुपयोगी अशा पत्र्याच्या, ॲल्युमिनियमच्या, लोखंडाच्या, स्टीलच्या तुटलेल्या-मोडलेल्या वस्तू कचरा म्हणून ज्या फेकून देतो त्याच वस्तू हा भंगारवाला घेऊन जातो.

चाकोरीबद्ध व्यवसाय न करता चाकोरीच्या बाहेर जाऊन, शून्यातून स्वप्न साकारण्याची उमेद बाळगणारे, या भंगाराचाच व्यवसाय बनविणारे एक मराठी दाम्पत्य! स्क्रॅप म्हणजेच मराठीत त्याला भंगार म्हणतात. ॲल्युमिनियम शीट, पत्रे, खिडक्या, पॅनल्स, भांडी, rejected माल, लोखंड, स्टील अशा अनेक प्रकारांचा निरुपयोगी असा कचरा construction site किंवा अन्य ठिकाणी असतो, जो टाकून द्यावा लागतो! या भंगारातूनच आपल्या भाग्याचा शोध घेणारे, आपले स्वतःचे विश्व निर्मिण्याचे स्वप्न पाहणारे, एक दाम्पत्य म्हणजेच संजीव फडके आणि मनीषा फडके!

पती-पत्नी म्हणजे संसाररुपी रथाची दोन चाके आहेत असे म्हटले जाते आणि ही दोन्ही चाके समांतर रेषेतच असावी लागतात. त्यातील एक चाक जरी खिळखिळे झाले तरी रथ चालू शकत नाही. संसारात चढ-उतार हे असतातच आणि म्हणूनच एकमेकांना साथ देऊन, प्रसंगी स्वतःचे असे काही सोडून देऊन त्याग करून संसाराचा रथ हाकावा लागतो. अशा संस्कारामध्ये वाढलेले हे दाम्पत्य. दोघेही सुशिक्षित, उच्चशिक्षित. दोघांचीही कार्यक्षेत्रे एकदम भिन्न! दोघेही आपापल्या क्षेत्रात उच्चपदावर काम करत होती. पण चाकोरी या शब्दाचे वावडे असलेल्या मनीषा-संजीवला चाकोरीबद्ध नोकरीत रस वाटत नव्हता. काहीतरी वेगळे करण्याची धडपड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती आणि म्हणूनच भारतातील सुखासीन आयुष्य सोडून ते दुबईत आले आणि चाकोरीबाहेरचा असा स्क्रॅपचा व्यवसाय त्यांनी सुरू केला.

मी संजीव-मनीषाला म्हटले, मुंबईतले आरामातले जीवन सोडून तुम्ही दोघे शून्यातून स्वप्न साकार करायला दुबईत आलात आणि आजच्या तरुण पिढीपुढे एक मोठा आदर्श घालून दिलात. संजीव तुझ्या बालपणातील अनुभव सांगशील का?

तो त्यावर उत्साहाने म्हणाला, माझे बालपण म्हणजे स्वप्नवत गेले. 'बालपणाचा काळ सुखाचा' असे जे म्हणतात ना ते माझ्या बाबतीत अक्षरशः खरे ठरले. एका सुखवस्तू कुटुंबात जन्माला आलेला मुलगा मी. मध्य प्रदेशातील,




नागदाच्या ग्रासिम स्कूलमध्ये माझे शालेय शिक्षण पार पडले. बिर्लाजींच्या ग्रासिम रेयॉनमध्ये माझे वडील इंजिनीअरिंग डिव्हिजनमध्ये जनरल मॅनेजर होते. आई त्याच शाळेत Biology ची शिक्षिका होती. त्यामुळे घरात वातावरण शिक्षणाचे होते. शिक्षणाशिवाय पर्याय नव्हता. क्रिकेट, स्विमिंग, सायकलिंगची खूप आवड होती. 'भोसला मिलिटरी स्कूल'च्या कॅम्पमध्ये Best Cadet चे award मला मिळाले. त्याच सुमारास इंजिनीअरिंगसाठी ॲडमिशन मिळाली. NCC आणि Flying Club ची मेम्बरशिप मिळाली. Flying Training Pilot च्या कोर्सची स्कॉलरशिप मिळाली.

एकंदरीत सुरक्षित वातावरणात आणि सुखात बालपण गेले माझे. कधी कोणत्याही गोष्टीची चणचण भासली नाही किंवा आयुष्यात येणाऱ्या चढउतारांची, खाचखळग्यांची झळ लागली नाही. आयुष्याची पाऊलवाट सरळ साधी होती. ग्रॅज्युएट झाल्यानंतर 'ग्रासिम रेयॉन फॅक्टरी' नागदा येथे थोडे दिवस काम केले. पण मन काही रमत नव्हते. काहीतरी वेगळे करण्यासाठी मन अस्वस्थ होते, नोकरीपेक्षा स्वतःचे असे काही सुरू करावे अशी इच्छा होती आणि म्हणून मुंबईला मोठ्या भावाकडे माझी रवानगी झाली आणि इथेच एका वेगळ्या आयुष्याला सुरुवात झाली.

करिअरची सुरुवात झाली. Metal Indenting कंपनीमध्ये जॉब सुरू झाला. सर्व नवीन होते. मुंबईचे जीवन होते, एकदम निराळे! त्याच्याशी adjust करायचे, नोकरी करायची, मेहेनतीची तर अजिबात सवय नव्हती. त्याचवेळी 'जमनालाल बजाज कॉलेज'मध्ये MBA- साठी ॲडमिशन घेतली होती. Clients शी इंग्रजीत बोलावे लागत होते, त्याची पण सवय नव्हती! पहिले दिवस खूप त्रासदायक वाटले. बालपण आणि आत्ताचे हे आयुष्य! जमीन-अस्मानाचा फरक होता. पण हळूहळू सर्व गोष्टी अंगवळणी पडल्या. त्या जीवनाशीही मी adjust केले, नोकरीतही स्थिरस्थावर होऊ लागलो आणि ह्याच सुमारास म्हणजे १९८९ मध्ये मनीषाबरोबर माझा विवाह झाला आणि एका वेगळ्या जीवनाला सुरुवात झाली.

संजीव अजूनही बालपणाच्या सुखद आठवणीत रमला होता. मी मनीषाला म्हटले, तुझे बालपणसुद्धा असेच सुखद आठवणींनी समृद्ध होते का?

ती उत्तरली, बालपणाचा काळ खरंच सुखाचा असतो! माझे बालपणसुद्धा साधे-सरळ सरले. दुःख म्हणजे काय ते माहीतच नव्हते. दोन भाऊ, एक बहीण आणि मी! एक वेगळाच बंध असतो! माझे वडील हे मध्यप्रदेशमध्ये डिस्ट्रिक्ट जज होते. त्यामुळे त्यांच्या ठिकठिकाणी बदल्या व्हायच्या. वडिलांच्या बदलीच्या नोकरीमुळे एकाच शाळेत आमचे शिक्षण झाले नाही. वेगवेगळ्या प्रांतात बदली झाली. त्यामुळे इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू अशा निरनिराळ्या माध्यमातून माझे शिक्षण झाले. नववीनंतरचे पुढचे MBBS पर्यंतचे शिक्षण मात्र एके ठिकाणी भोपाळला झाले.

माझी आजी डॉक्टर होती आयुर्वेदाची. आमच्या घरात मी १९वी डॉक्टर होते. माझ्या वडिलांचे मत होते की एखाद्या विशिष्ट क्षेत्राचे जरी शिक्षण घेतले तरी त्याच्याशी संबंधित इतर उपक्षेत्रांचीसुद्धा माहिती हवी. अर्थातच त्यांनी

स्वतःचे कोणतेच मत आमच्यावर लादले नाही.

मी लग्नानंतर मुंबईत आले आणि माझ्या करिअरला आणखी वेगळी दिशा मिळाली. MBBS नंतर त्याचवेळी Naturopathy आणि Nutrition चा कोर्स केला. तसेच डायबिटिसचा 'रहेजा हॉस्पिटल'चा डिप्लोमा कोर्स केला. डायबिटिसच्या पेशंटना डाएट लिहून देताना मला ह्या न्यूट्रीशनच्या कोर्सचा फायदा झाला. माझ्या पेशंटचे वजन कमी होऊन ते जेव्हा मला सांगायला लागले की तुमच्या डाएटचा खूप फायदा होत आहे, तेव्हा मला माझ्या वडिलांच्या बोलण्याची सत्यता पटली. त्यानंतर मुंबईत 'नायर हॉस्पिटल' सायन, 'हिंदुजा', 'लायन्स मेडिकल सेन्टर'



अशा ठिकाणी काम करून अनुभव घेतल्यानंतर स्वतःचे क्लिनिक सुरू करायचे ठरवले. यासाठी वडील, सासरे आणि संजीव यांनी खूप पाठिंबा दिला आणि म्हणूनच ते क्लिनिक उभे राहू शकले. त्यानंतर हॉस्पिटल Administration चा पोस्ट ग्रॅजुएट कोर्स केला. २००३ पर्यंत श्रद्धा क्लिनिक, Elegance body and beauty care, एक pathology lab असे पार्टनरशिपमध्ये मुंबईला गोरेगावमध्ये काही व्यवसाय सुरू केले.

खरे म्हटले तर सर्व काही सुरळीत चालू होते. आपापल्या उद्योगात आम्ही दोघेही जम बसवत होतो, पण आमची दोघांचीही मने अस्वस्थ होती. नेहमीच्या रुटीन कामात रस वाटत नव्हता. काहीतरी वेगळे करावे असे मनात होते. नवीन जग, नवीन अनुभव घ्यायची दोघांनाही इच्छा होती आणि त्यातूनच एकमेकांच्या साथीने दुबईत जायचा निर्णय घेतला. २००४ साली आम्ही दुबईत पहिले पाऊल टाकले. नवीन आयुष्याची सुरुवात करायला, एक मोठी झेप घ्यायला, एक सुंदर स्वप्न साकार करायला! असो. 'हिम्मते मर्दो मदें खुदा' या वचनावर विश्वास ठेवून नवीन जीवनाला सुरुवात झाली.

मी संजीव, मनीषाला म्हटले, तुमच्या दुबईच्या व्यवसायाचा श्री गणेश झाला तर! मनीषा भूतकाळात हरवली होती. संजीव म्हणाला, मी Metal europe international fzc saif zone sharjah, general trading company सुरू केली. कंपनी नवीन होती, दुबई नवीन होती, येथील मार्केट नवीन होते. सुरुवातीला माणसे मिळेपर्यंत 'अपना हाथ जगन्नाथ' या न्यायाने जे पडेल ते काम सुरू केले. आतापर्यंतच्या आयुष्यात अशा प्रकारचे काम कधीच केले नव्हते, सवयच नव्हती. त्यामुळे सुरुवातीला थोडे जड गेले, पण तक्रार कधीच नव्हती. कारण आम्ही दोघांनी स्वेच्छेने स्वीकारलेला हा मार्ग होता! मेहनतीची तयारी होती आणि आत्मविश्वास होता. हळूहळू त्यातून मार्ग निघू लागला. नवीन माणसे कामाला मिळू लागली. त्यांच्यावर विश्वासाने metal trading आणि indenting चे काम टाकू लागलो. २००६-७ च्या सुमारास ॲल्युमिनियम आणि स्टेनलेस स्टीलचे स्क्रॅप यार्ड घातले. त्याचबरोबर steel mills साठी लागणारे raw material, stocking and warehousing सुरू केले. Scrap material आणून sorting, baling, roading करून जगभरात shipment करायला सुरुवात केली. आमच्या यार्डमध्ये ॲल्युमिनियम शीट, खिडक्या, भांडी, पॅनल्स यांचे तुकडे, निरुपयोगी माल आणला जातो. आमच्याकडे स्पेक्ट्रो मशिन्स आहेत, त्याद्वारे त्या त्या गोष्टींमध्ये लोखंड, निकल, तांबे इ. चे किती प्रमाण आहे ते कळते. त्याप्रमाणे त्याचे ग्रेडिंग केले जाते. आमच्याकडे प्लाझमा कटर, गॅस कटर आहे, त्यामुळे quality sort out करता येते. कटर ट्रेंड टेक्निशिअन्स आहेत. सर्व प्रकारची मशिनरी उपलब्ध आहे. हळूहळू सर्व व्यवसाय सेट करत होतो.

मी म्हटले, संजीव म्हणजे तुझा व्यवसाय आता आकार


घेऊ लागला होता तर! मनीषा म्हणाली खरं आहे. बघता बघता संजीव सेट होऊ लागला. मलाही स्कूल क्लिनिकमध्ये आणि Medical Center मध्ये काम मिळाले. मी घर, दोन्ही लहान मुले, त्यांचा अभ्यास, शाळा आणि स्वतःचा व्यवसाय यांचा मेळ घालायचा प्रयत्न करत होते. तारेवरची कसरत होती, पण भारत सोडतानाच मनाची तयारी ठेवली होती.

जरा जम बसू लागला. दुबईतील वातावरणाशी जुळवता येऊ लागले, येथील कायदेकानूंची माहिती व्हायला लागली. इतर देशामधील मार्केटची माहिती व्हायला लागली आणि २००८चे रिसेशन सुरू झाले. दुबई मार्केट पूर्ण down झाले. जगभर हीच परिस्थिती होती. ज्या कंपन्या जुन्या होत्या त्या establish होत्या. त्यांच्यावर पण परिणाम झालाच, पण तरी त्या तग धरून होत्या. पण आमच्यासारख्या नवीन कंपन्यांना या मंदीतून बाहेर पडायला, सावरायला फार त्रास झाला. आम्ही आमचे ॲल्युमिनियम यार्ड आवरते घेतले आणि फक्त ट्रेडिंग चालू ठेवले.

आमच्या दृष्टीने हा खूप मोठा धक्का होता. पण हाच आमचा खरा कसोटीचा काळ होता. येईल त्या परिस्थितीला जिद्दीने तोंड द्यायचे ठरवले आणि जी परिस्थिती समोर येईल त्याला एकत्र तोंड दिले. याच काळात काही वाईट अनुभव आले; पण त्याच काळात जो चांगला अनुभव आला तो फार अनमोल होता. मंदीच्या काळात आम्ही घरातला पैसा ऑफिससाठी खर्च केला. पण स्टाफचा पगार कधी चुकवला नाही किंवा त्यांना कधी अर्धा पगार दिला नाही. ह्यावेळी स्टाफने जो सपोर्ट दिला तो कधी विसरू शकत नाही. त्यांनी आम्हाला सांगितले की फक्त जेवणापुरते पैसे आम्हाला द्या. अर्थातच आम्ही त्यांना कायम संपूर्ण पगार दिला; पण त्यांनी त्या मंदीच्या दिवसात जो मदतीचा हात पुढे केला त्यामुळे आमचे पण मनोबल वाढले. कंपनी म्हणजे आमचे एक छोटेसे कुटुंब आहे. कारण असा आधार फक्त कुटुंबातील माणसेच देऊ शकतात.

तिला साथ देत संजीव म्हणाला, मला इथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो की याचवेळी मनीषाने खूप पाठिंबा दिला. आपल्या संसारासाठी स्त्री काय करू शकते ह्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे मनीषा आहे. त्यावेळी तिने धीर दिला, उमेद निर्माण केली त्यामुळे आजचा दिवस दिसत आहे. दुबईत जेव्हा पुन्हा boom आला तेव्हा दोघांच्या प्रयत्नाने २०१३ साली आम्ही पुन्हा यार्ड विकत घेतले. तसेच warehousing चे कामही चालू केले. आणि त्यावेळी मनीषा नुसती बोलूनच थांबली नाही तर तिने स्वतःची मेडिकल प्रॅक्टिस पार्टटाईम चालू ठेवली आणि कंपनीच्या कामात लक्ष घालू लागली. ती माझी खऱ्या अर्थाने सहचारिणी आहे!

त्यावर मनीषा म्हणाली, मी काही विशेष केले नाही. कंपनीला माझी गरज होती. आयुष्यात चढउतार हे असणारच! पण कठीण प्रसंगी एकमेकांना साथ देणे यालाच तर संसार म्हणतात ना? ज्यावेळी माझ्या लक्षात आले की कंपनीमध्ये दोघांचाही सहभाग असणे आवश्यक आहे. तेव्हा मग मी काही काळापुरती माझी मेडिकल प्रॅक्टिस बंद ठेवावी असा विचार केला. खरं म्हटलं तर माझ्या दृष्टीने प्रॅक्टिस बंद ठेवायचा निर्णय फार मोठा होता. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमची दोघांची क्षेत्रे भिन्न होती. माझी ह्या क्षेत्रात अथपासून सुरुवात होती. खूप मोठे challenge होते ते पण मी ते स्वीकारले. कारण आपल्या संसारासाठी काहीही करायची तयारी होती. घर, संसार म्हटले की कामाला कधीच अंत नसतो. दोन लहान मुले, त्यांच्या शाळा, त्यांना क्लासला सोडणे-आणणे, सर्व चालू होते. पण तरीही मनामध्ये सारखी बोचणी होती की ऑफिसमध्ये पण वेळ देणे आवश्यक आहे. आत्ता ऑफिसला आपली जरूर आहे. संजीवचे कामा-

निमित्ताने इतर देशात सारखे दौरे चालू असायचे. मग अशावेळी बँकांची कामे, इतर महत्त्वाची कागदपत्रे, अचानक उद्‌भवणाऱ्या ऑफिसमधील अडचणी, निर्णय घेण्याची जबाबदारी या सर्वांसाठी माझे ऑफिसला जाणे महत्त्वाचे झाले आणि मी निर्णय घेतला, माझी प्रॅक्टिस पार्टटाईम करायला सुरुवात केली. मी नियमाने ऑफिसला जाऊ लागले .

सुरुवातीला थोडे कठीण गेले कारण माझे क्षेत्रच वेगळे होते. पण मनात जिद्द होती आणि हाती घेतलेले काम तडीस न्यायची शिकवण होती. त्यामुळे मी ते challenge स्वीकारले आणि कामास सुरुवात केली. हळूहळू मला त्या कामात रस वाटू लागला आणि sales and marketing of ferroalloys and administration चे काम हातात घेतले. शिकताना कित्येकदा चुका होत होत्या; पण मला असे वाटते ह्या चुकातूनच माणूस शिकत असतो. ह्या माझ्या सर्व चुकांना समजून घेतले संजीवने आणि आमच्या सर्व स्टाफने! त्या सर्वांच्या support शिवाय मी काम करूच शकले नसते. सुरुवातीला clients सुद्धा जास्त बोलत नव्हते कारण त्यांचा माझ्या कामावर विश्वास नव्हता, त्यांना माझा अनुभव नव्हता; पण आता तेच क्लायंट एखाद्या कामाबद्दल विश्वासाने माझा सल्ला घेतात. आज मागे वळून बघताना लक्षात येते की आपण घेतलेला निर्णय सार्थ होता. ह्यामुळे मला नवीन खूप काही शिकता आले आणि त्याहीपेक्षा समाधान वाटते की खऱ्या अर्थाने मी संजीवला साथ दिली.

आता कंपनी स्थिरस्थावर झाली आहे, मी पण तेथील कामाशी रुळले आहे, मुले मोठी होऊन पुढील शिक्षणासाठी परदेशी गेली आहेत. त्यामुळे आता मेडिकल प्रॅक्टिस आणि कंपनी अशा दोन्ही आघाड्या संपूर्ण वेळ देऊन सांभाळायच्या असे ठरवले आहे. आता सर्व कामाचे वेळापत्रक मी बनवले आहे. पुन्हा मेडिकल सेन्टर, तसेच स्कूल क्लीनिकचे काम पूर्ण वेळ चालू केले आहे. आत्ता नुकतेच Arab children health conferance मध्ये childhood obecity या विषयावर पेपर presentation केले. Z TV, Oman TV, सर्व वर्तमानपत्रांनी याची दाखल घेतली.

आता मोबाईल आणि लॅपटॉपमुळे ऑफिसचे काम करणे सोपे झाले आहे. पण तरीही switch on आणि switch off पद्धतीने मी दोन्ही आघाड्या सांभाळते. संजीव आणि सर्व ऑफिस स्टाफ सांभाळून घेतात. म्हणूनच आता मी मेडिकल आणि मेटल ट्रेडिंगमध्ये सारखेच लक्ष देते.

आज आमच्या कंपनीमध्ये ५० लोकं काम करतात. आमची कंपनी हे एक कुटुंब आहे आणि म्हणूनच कामगारांच्या सुखदुःखाची काळजीही इथे घेतली जाते. तरीसुद्धा कामगारांच्या बाबतीत काही वाईट अनुभवही येतात, अशावेळी समजावून सांगून काही फायदा होत नसेल तर visa कॅन्सल करून त्याला परत पाठवून देतो. कारण ज्याप्रमाणे आंब्याच्या आढीमध्ये एक आंबा खराब निघाला तर तो लगलीच काढून टाकावा लागतो, त्याचप्रमाणे इतर कामगारांची शिस्त कायम ठेवण्यासाठी अशा कामगाराला काढून टाकावे लागते.

आज आमच्या कंपनीची इंटरनॅशनल प्लॅटफॉर्मवर जपान, कोरिया, मिडल ईस्ट, युरोप, अमेरिका सर्वकडे conference, presentation आणि business चालू आहे. आजचे आमचे नवीन यार्ड हे quality आणि straightforward handling साठी प्रसिद्ध आहे. कंपनी trading आणि quality control साठी माहीर आहे. आता इतर नवीन क्षेत्रात कुठे diversification करता येईल का यावर अभ्यास चालू आहे.

जीवनात बरेच चढउतार पाहावे लागले; पण सचोटीचे, प्रामाणिकतेचे जे संस्कार होते ते कधी विसरलो नाही. आज Al Khaleej metals scrap trading llc चा जो मान आहे तो केवळ माणुसकीने वागल्यामुळेच असे मला वाटते. आपल्या आईवडिलांनी आपल्यावर जे संस्कार केले आहेत त्याची किंमत अनमोल आहे. यशाची प्रत्येक पायरी चढण्यासाठी हे संस्कारच आधार आहेत, तेच आपला आदर्श आहेत.

मी संजीव–मनीषाला म्हटले, जेव्हा माणसाकडे काही नसते तेव्हा ते मिळण्यासाठी म्हणून माणूस रिस्क घेतो. पण सुखासीन आयुष्य असताना त्याचा त्याग करून, काहीतरी वेगळे करण्याची जिद्द बाळगणारे, शून्यातून विश्व निर्मिणारे तुमच्यासारखे पती–पत्नी विरळाच! कठीण परिस्थितीत एकमेकांना साथ देणे, पती–पत्नींनी हिमतीने परिस्थितीला सामोरे जाणे, प्रसंगी स्वतःच्या काही गोष्टींचा त्याग करावा लागला तरी आनंदाने करणे, आधार देणे ह्यालाच तर संसार म्हणतात आणि मनीषा तुम्ही हे तुमच्या कृतीतून दाखविले आहे. आजच्या तरुण पिढीने ह्यातून बरेच काही शिकण्यासारखे आहे!

■ **संजीव–मनीषा फडके**
maneesha2605@gmail.com













# वाळवंटातील किचन

दुबई! जगातील मोठे आश्चर्य! एक काळ असा होता की दुबई हे नाव कोणाच्या खिजगणतीतही नव्हते. २ डिसेंबर १९७१ रोजी ब्रिटिशांच्या राजवटीतून स्वातंत्र्य मिळाले. ७०-७५चा काळ होता. तेलाचा शोध लागला आणि आखाती देश समृद्ध होऊ लागले. दुबईचे नाव सर्वत्र ऐकू येऊ लागले, पण ते नकारात्मक! स्मग्लर्सचा देश, स्त्रियांना असुरक्षित, खूप फसवाफसवी चालते असे अनेक अपप्रवाद ऐकू येत होते. पण काळ उलटला आणि १९९० साल उजाडले. आखाती देशांत पैशाचा ओघ सुरू झाला आणि दुबईने कात टाकली. खरं म्हटले तर दुबईत तेल सापडलेच नाही, तेल सापडले इतर आखाती देशांत. पण दूरदृष्टी, कल्पकता, बुद्धिचातुर्य आणि मेहेनत या चौकटीच्या जोरावर येथील शेखने या संधीचा फायदा करून घेतला. दुबईच्या वाळवंटाचे नंदनवनात रूपांतर केले. आज आखात म्हटले की फक्त दुबईचेच नाव येते. जगाच्या नकाशावर टूरिस्ट सेंटर म्हणून दुबईला प्रथम स्थान आहे. अतिशय विलक्षण वेगाने दुबईच्या प्रगतीला सुरुवात झाली आणि नोकरीच्या शोधार्थ लोकांचा ओघ दुबईकडे वाहू लागला. निरनिराळ्या देशांची, धर्मांची, पंथांची, जातीची लोकं दुबईत येऊन स्थायिक होऊ लागली. येताना ते आपली संस्कृती, परंपरा, खाद्यपदार्थ बरोबर घेऊन आले आणि दुबईच्या वाळूशी एकरूप झाले.

मासे आणि भात हे फक्त दोन पदार्थ बनणारे वाळवंटातील किचन आता जगभरातील खाद्यपदार्थांना सामावून घेऊ लागले. दुबईच्या ह्या प्रगतीत भारतीयांचा वाटा फार मोठा आहे आणि म्हणूनच भारतीय खाद्यसंस्कृती या किचनमध्ये अग्रभागी आहे. आणि त्यातही आपले मराठी खाद्यपदार्थ, आपली मराठी संस्कृती, परंपरा जपत रसिकांपर्यंत पोहोचत आहेत.

'बॉम्बे बाइट्स'ची विनिता पाटणे, 'मनीषा किचन्स'ची मनीषा चितळे आणि 'पेशवा'ची श्रीया जोशी या तीन मराठी स्त्रियांनी दुबईच्या किचनमध्ये अस्सल मराठी खाद्यपदार्थांची रेस्टॉरंट सुरू करून मराठी चव जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवली आहे. पुरणपोळी, उकडीच्या मोदकांपासून थालीपीठ, मिसळ, साबुदाणा वडा, वडापाव, कोंबडीवडा असे एकापेक्षा एक चविष्ट अस्सल मराठी पदार्थ अमराठी लोकांतही प्रिय झाले आहेत.

'यशस्वी पुरुषाच्या मागे त्याची पत्नी असते' असे जे म्हटले जाते, ते आज २१व्या शतकात बदलून या तीन स्त्रियांच्या बाबतीत असे म्हटले पाहिजे की 'यशस्वी स्त्रीच्या मागे तिचा पती असतो.' या तिघींनांही त्यांच्या पतीने दिलेली साथ उल्लेखनीय आहे. परदेशात आणि तेही दुबईसारख्या प्रगतशील देशात जिथे कायदेकानून उत्तम प्रकारे प्रस्थापित नव्हते, त्याकाळात इथे येऊन डबे बनवण्यापासून ते रेस्टॉरंट सुरू करण्यापर्यंत धडाडीचे कार्य केले. मुंबईतील डबेवाल्यांनी आपल्या व्यवस्थापन कौशल्यामुळे जगभरात प्रसिद्धी मिळवली, गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये त्यांचे नाव झळकले. दुबईतील या स्त्रियांनी डबे बनवण्यापासून, वाळवंटात घरोघर पोचविण्याच्या पाऊलवाटेवरून रेस्टॉरंटचा नवीन रस्ता सुरू केला. हे करताना अर्थार्जनाच्या मूळ हेतूबरोबरच मराठी खाद्यसंस्कृतीची परंपरा भारताच्या वेशीबाहेर नेऊन तिचे जतन करून जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत तिची चव पसरविण्याचे कार्य या रेस्टॉरंटच्या माध्यमातून या तीन स्त्रियांनी केले आणि पुढील पिढीसाठी आदर्श निर्माण केला!

– मेघना वर्तक






# बॉम्बे बाइट्स ते मुंबईकर्स

■ विनता अभय पाटणे

■ मुलाखतकार : मेघना वर्तक

('लोकसत्ता'च्या सौजन्याने)

दारावरची बेल वाजली, मी दार उघडले आणि बाहेर पाहिले तर कोणीही नव्हते. विनता येणार होती. चारची वेळ ठरली होती. मी कॉरिडॉरमध्ये आले, आजूबाजूला नजर टाकली. विनता ठरल्यावेळीच आली होती, पण बाजूच्या फ्लॅटच्या इथे होती. मला वाटले ती चुकून दुसऱ्या फ्लॅटमध्ये जातेय की काय, म्हणून तिला पटकन् म्हटले, अग विनता इथे ये!

ती आत येत म्हणाली, अगं मी बाजूच्या फ्लॅटमध्ये 'मुंबईकर्स'ची कार्ड टाकून आले. माझ्याकडची मुले पण कार्ड टाकून येतील. पण माझा त्यांच्यावर विश्वास नाही. मी आत्ता तुझ्या २३ मजली टॉवरमधील प्रत्येक फ्लॅटमध्ये कार्ड टाकून आले, ही अशी कामे मी स्वतः जातीने करते! आमचे 'मुंबईकर्स' हे नवीन रेस्टॉरंट आहे ना!

मी तिला म्हटले, धन्य आहे, साष्टांग नमस्कार घातला पाहिजे तुझ्यापुढे! मनात विचार आला, काय हा उत्साह, किती ही मेहेनत, काय हे devotion! २००८ मध्ये दुबईत सुरू झालेल्या Bombay Bites ची पाळेमुळे जमिनीत खोलवर रुजली आणि त्यातून आलेला नवांकुर म्हणजेच

Mumbaikars हे नवीन रेस्टॉरंट आणि त्याच्या जाहिरातीसाठी मेहेनत घेणारी ही विनता! असे हे झपाटलेपण, एखादी गोष्ट यशस्वी करण्यासाठी हा झोकून देण्याचा स्वभाव, ह्याच गोष्टी यश खेचून आणतात.

मी म्हटले विनता परदेशात, दुबईसारख्या वाळवंटात कोणताही व्यवसाय सुरू करून तो यशस्वी करणे सोपे नाही. तू तर त्या वृक्षाच्या जमिनीत पसरलेल्या मुळातून आलेल्या नवांकुराची जोपासना करत आहेस. बॉम्बे बाइट्स ते मुंबईकर्स या तुझ्या पाऊलवाटेवरचे अनुभव, त्यावरील खाचखळगे या व्यवसायात प्रवेश करणाऱ्यांना नक्कीच मार्गदर्शक ठरतील आणि म्हणूनच ते तुझ्याकडून ऐकायचे आहेत.

माझे बोलणे ऐकून भूतकाळाच्या पडद्याआड गेलेली विनता त्यात रमून गेली. जीवनाच्या ह्या वळणावर मागे वळून बघताना तिच्या मनात नेमक्या काय भावना होत्या याचा अंदाज येत नव्हता. 'भूतकाळाच्या कटू स्मृती की वर्तमानातील स्वप्नपूर्तीचा आनंद! तेवढ्यात ती भानावर आली आणि सांगू लागली,

अतिशय गरीब घरात माझा जन्म झाला. मुंबईत ठाण्याला नौपाड्याला आम्ही राहत होतो. ठाण्याच्या 'सरस्वती स्कूल'मध्ये माझे प्राथमिक शिक्षण झाले. घरात गरिबी म्हणजे एवढी होती की दोन्ही वेळेला पानात काय वाढायचे हा प्रश्न असायचा. अनंत वरवटकर म्हणजे माझे वडील! ताजी भाजी घेऊन, ठरलेल्या वेळी, ठरलेल्या ठिकाणी उभी असणारी वरवटकरांची गाडी प्रसिद्ध होती. त्यामुळे वेळेचे महत्त्व बालपणीच माझ्या मनावर ठसले होते. शाळेच्या वेळा व्यतिरिक्त, वडिलांना मदत म्हणून, त्यांच्या बरोबर मी पण भाजी विकायला जाऊन बसायची. संध्याकाळी देवाचे हार, दूर्वांच्या जुड्या विकायची. घरखर्चाला मदत म्हणून! त्याचवेळी तिथे बसून आजूबाजूला बघत असताना माझ्या मनात एक गोष्ट कोरली गेली आणि ती म्हणजे स्वतःच्या व्यवसायाचे स्वप्न! शाळा सांभाळून वडिलांना मदत करून घराला हातभार लावायचे काम मी सात–आठ वर्षे करत होते. पण तरीही तुटपुंज्या मिळकतीमुळे अखेर माझे शिक्षण अर्धवट राहिले. भाजी, हार–दूर्वा यांच्यात बालपण कधी सरले ते कळलेच नाही. शिक्षण अर्धवट राहिल्याची खंत तिच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंवाटे बाहेर पडत होती.

मी तिला हलकेच थोपटले. भानावर येत जिद्दीने विनता म्हणाली, काकू आज जीवनाच्या ह्या टप्प्यावर आल्यावर मी एक सांगते की माणसाच्या जीवनात शिक्षणाचे स्थान अनन्यसाधारण आहे. जर शिक्षण नसेल तर पावलोपावली अडथळा येतो. लोकांवर अवलंबून राहावे लागते. लोकं फसवतात, तुम्हाला गृहीत धरतात, आपल्याला कोणी गृहीत धरतात ही भावना फार त्रासदायक असते. केवळ शिक्षणामुळेच तुमच्यात आत्मविश्वास येतो, जो व्यवसाय करताना अतिशय उपयोगी पडतो आणि म्हणून मला सर्वांना सांगावेसे वाटते की नोकरी करा वा व्यवसाय शिक्षणाला पर्याय नाही!

यशस्वी जीवनाची पहिली पायरी म्हणजे शिक्षण हे स्वतः शिक्षणाला मुकलेली विनता जेव्हा आग्रहाने सांगू लागली तेव्हा असे जाणवले की माणसाला जी गोष्ट मिळत नाही त्याचे महत्त्व किती जाणवते.

शिक्षणाचा आग्रह धरणारी विनता सांगू लागली, १९८२ साली महाराष्ट्रात खेड येथे अभय पाटणे याच्याशी विवाह झाला आणि १९८३ मध्ये दुबईत येण्याचा योग आला. जीवनाची दिशा बदलली आणि एका वेगळ्याच वाटेवरून आमची वाटचाल सुरू झाली. आज जे काही आम्ही आहोत त्यात माझे चुलत सासरे श्री. सुधीर पाटणे यांचे श्रेय फार मोठे आहे. त्यांच्यामुळेच आम्ही दुबईत येऊ शकलो आणि म्हणूनच त्यांचा उल्लेख या प्रवासात आवर्जून करणे आवश्यक आहे. एका छोट्याशा जागेत सासरे. दोन दीर आणि आम्ही असा संसार सुरू झाला. प्रत्येकाला आपल्या जेवणाचे पैसे द्यावे लागत होते, फक्त मी स्वयंपाक करत असल्यामुळे मला जेवण free होते. 'अहमद सिद्दीकी' नावाची कंपनी होती तिथे अभय नोकरीला होता.

सुरुवातीला पगार तुटपुंजा होता. त्यामुळे संसाराला हातभार म्हणून मी साडीला फॉल लावणे, बेबी सीटिंग करणे अशी छोटी–मोठी कामे सुरू केली. त्याच जोडीला जेवणाचे डबे बनवायला सुरुवात केली. त्याकाळी दुबईमध्ये कित्येक पुरुष एकटे राहायचे. पगार कमी होते, फॅमिलीला घेऊन राहिले तर सेव्हिंग काही व्हायचे नाही, तसेच मुलांच्या शिक्षणाची पण खूप चांगली अशी सोय नव्हती. त्यामुळे घरगुती जेवणाचा डबा सर्वांना हवा असायचा. दोन–चार डब्यांवरून संख्या वाढत वाढत ६० डब्यांपर्यंत गेली. 'इमिरेट्स एअर लाईन'च्या स्टाफला डबे करून देत होते. घरात छोटी मुले, इतर सर्वजण त्यात डब्यांचा व्याप! त्यातच अभय त्याच्या स्वभावानुसार भारतातून दुबईत नोकरीसाठी




आलेल्या लोकांना नोकरी मिळवून द्यायला, त्यांना स्थिरस्थावर व्हायला मदत करायचा. ती लोकं पण घर मिळेपर्यंत आमच्याकडे असायची, साहजिकच त्यांच्या जेवणाची जबाबदारी माझीच होती. कारण आम्हाला जाणीव होती की आपल्याला जशी कोणी मदत केली तशीच आपणही इतरांना मदत केली पाहिजे. पण तक्रार कधीच नव्हती, मेहेनत करायची तयारी होती. प्रत्येक डबा भरताना लहानपणचे स्वतःच्या व्यवसायाचे स्वप्न मला खुणावयाचे आणि जणू मला नवीन उमेद द्यायचे की ह्यातूनच उद्या स्वप्नपूर्ती होणार आहे.

हळूहळू अभयचा नोकरीत जम बसला, मोठा फ्लॅट घेतला, दुबईची हळूहळू ओळख होऊ लागली आणि रेस्टॉरंटचे विचार मनात वारंवार येऊ लागले. २००६च्या सुमारास माझ्या दिराने- संजयने गावाला उपाहारगृह सुरू केले होते, दोन वर्षे झाली तरी जम काही बसत नव्हता. त्यामुळे सर्व धंदा गुंडाळून तो पण दुबईत आला. अखेर पैशाची बरीच जमवाजमव केली आणि बॉम्बे बाइट्सची स्थापना झाली आणि अखेर रेस्टॉरंट तर सुरू झाले, पण सुरुवातीचा काळ म्हणजे आम्हाला दिवस-रात्र डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवावे लागे!

अगदी जागा शोधणे, लायसन्स मिळवणे इतर सर्व सरकारी permissions मिळवणे, स्टाफ भारतातून आणणे, त्यांचे visa, मेडिकल्स इ. प्रत्येक गोष्ट मी स्वतः जातीने लक्ष घालून जबाबदारीने पार पाडल्या. ह्याच काळात दुबईची बारीकसारीक माहिती करून घेतली. भाज्या, चिकन, मासे वगैरे मार्केटमध्ये कुठे चांगले मिळतात, मसाले, ग्रोसरी इ. कुठे चांगली मिळते अशा गोष्टी शोधून काढल्या. आज वर्षानुवर्षे एकाच ठिकाणाहून माल आणला जातो. सप्लायर्सबरोबर चांगले संबंध ठेवल्याने माल विश्वासाने आमच्या रेस्टॉरंटमध्ये येऊन पडतो. दर महिन्याला आणि नंतर लागेल तसा माल त्यांना कळवला जातो आणि नंतर तो आमच्यापर्यंत येतो. 'बॉम्बे बाइट्स'ची स्पेशालिटी वडापाव, साबुदाणा वडा, थालीपीठ आणि कोंबडी वडे! आणि सर्वात म्हणजे घरी केलेल्या माझ्या हातच्या पोळ्या. आजपर्यंत रेस्टॉरंटसाठी पोळ्या मी स्वतः घरून करून देत होते. साहजिकच घरच्या पोळ्यांची मजाच काही और! आणि म्हणून त्या पोळीसाठी लोकं यायला लागली. monthly basis वर! इंडिया क्लब, लेडीज असोसिएशन आणि सर्वात म्हणजे महाराष्ट्र मंडळ ह्यांच्या कार्यक्रमांच्या वेळी पाच-सहाशे माणसांसाठी स्टॉल लावायची संधी मिळाली. त्यामुळे 'बॉम्बे बाइट्स'ची प्रसिद्धी झाली. परदेशात महाराष्ट्र मंडळाने दिलेली ही संधी मी कधीच विसरू शकत नाही.

विनता 'बॉम्बे बाइट्स'च्या इतिहासात दंग होती. समाधान तिच्या चेहेऱ्यावर पसरले होते. त्या सुखद आठवणीतून बाहेर काढत तिला मी विचारले, २००८ मध्ये 'बॉम्बे बाइट्स' आणि आता २०१५ मध्ये 'मुंबईकर्स' सुरू केलेस. आता हे रेस्टॉरंट कोण सांभाळते?

माझी मोठी मुलगी श्वेता हे हॉटेल सांभाळते आणि

जावई सुशांत कवळेकर ऑफिसनंतर तिला मदत करतो. अगदी डिलिव्हरी पोचवण्यापर्यंतसुद्धा! रेस्टॉरंट हा फॅमिली बिझनेस आहे आणि त्यामुळे सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. हा cash चा धंदा आहे, त्यामुळे काउंटरवर स्वतः जातीने किंवा विश्वासू माणसाला बसवावे लागते. नाहीतर धंदा तोट्यात जायला वेळ लागत नाही. आता अभय आणि संजय हे 'बॉम्बे बाइट्स'कडे लक्ष देतात आणि मी 'मुंबईकर्स'कडे. मुलीला या धंद्यातील खाचखळगे समजावून सांगू शकते. तिला advertising, पब्लिसिटीसाठी मदत करते. जेव्हा मोठ्या ऑर्डर्स असतात तेव्हा जातीने हजर राहून त्या पूर्ण करून घेते.

मी मधेच विनताला म्हटले, तुझी मुलगी श्वेता बालपणापासून तुझी धावपळ बघत आहे, त्यामुळे कळत-नकळत प्रामाणिकपणा, मेहनत, जिद्द, आत्मविश्वास यांचे संस्कार तिच्यावर झाले आहेत. त्यावर विनता म्हणाली, खरे आहे. आमची धाकटी मुलगी विश्वा ही आता Business Management करते आहे. आमची अर्धवट राहिलेली शिक्षणाची इच्छा आता ही पूर्ण करत आहे. तिला पण मी सांगते, उद्या तू कितीही शिकलीस, कितीही मोठी झालीस तरी नेहमी वाणी गोड ठेव आणि माणसे जोडायला शिक! आज दुबईत आम्ही आमच्या अनेक नातेवाईकांना आणले. आजही रंगपंचमी असो किंवा दिवाळी, दसरा असो किंवा नागपंचमी सर्व सण एकत्ररीत्या आमच्या घरी साजरे होतात. हे फक्त निमित्त असते, त्यामुळे संबंध सलोख्याचे राहतात.

समोरच्या माणसाची पारख करता यायला पाहिजे. अपमान सहन करायचा नाही, पण वाणी गोड असायला हवी. सप्लायर्स, स्टाफ किंवा कस्टमर्स सर्वांशीच प्रेमाने बोला. माणसे जोडली गेली पाहिजेत. आज सर्व मिळून ५५ कामगार आमच्याकडे काम करतात. सर्व स्टाफ हे आपले कुटुंब आहे ही भावना ठेवावी लागते. एका कुटुंबात नाही का बरी-वाईट दोन्ही प्रकारची माणसे असतात? आपण त्यांना कधी प्रेमाने कधी रागावून समजावतोच ना? त्याचप्रकारे यांच्याशी पण वागावे लागते. कधी अतिशय वाईट अनुभवही येतात, तेव्हा नाइलाज होतो. त्यांचा visa कॅन्सल करून त्यांना परत पाठवावे लागते.

मी तिला म्हटले, एखादा असा कटू अनुभव सांग जो कायमचा लक्षात राहतो. जणू काही तो प्रसंग आताच घडत आहे अशा उद्वेगाने ती सांगू लागली. एकदा रात्रीचे १० वाजायला आले होते. ११ वाजता रेस्टॉरंट बंद होणार होते. एक टूरिस्टचा ग्रुप आला १०-१२ जणांचा! आमच्या वडापावची कीर्ती त्यांनी मुंबई-पुण्यात ऐकली होती आणि म्हणून शोधत शोधत ते 'बॉम्बे बाइट्स'मध्ये आले. २५-३० वडापाव तरी लागणार होते. आमच्या कूकला ऑर्डर पूर्ण करायचा कंटाळा आला होता. त्याने मला येऊन सांगितले, बटाटे नाहीत. बाजारातून नवीन बटाटे आणून, उकडून ऑर्डर पूर्ण करणे शक्य नव्हते. तो ग्रुप निघून गेला कारण वडापावसाठीच ते आले होते. मला आठवत होते आमच्याकडे नेहमी थोडे बटाटे उकडून ठेवलेले असतात, तर मग ते गेले कुठे? मी सर्वत्र शोध घेतला आणि मला ते उकडलेले बटाटे गार्बेजमध्ये मिळाले!

ह्या कामगारांना कंटाळा आला की ते असा त्रास देतात. त्यांना वेगळे पैसे दिले तर आणखी १०० माणसांचे काम पण ते करतात. असे कामगार जेव्हा असतात तेव्हा त्यांच्याशी त्यांच्याच भाषेत बोलावे लागते. ह्या कूकला काढून टाकले तर त्याने WhatsApp वर Facebook वर 'बॉम्बे बाइट्'सबद्दल बरेच उलटसुलट लिहिले!

काही कामगारांना केलेल्या मदतीची जाणीव असते. वर्षानुवर्षे ते टिकतात. स्वतःचाच धंदा असल्याप्रमाणे ते काम करतात. अडीअडचणीला उभे राहतात; पण अशी माणसे विरळाच! प्रेमाने त्यांची, त्यांच्या कुटुंबाची केलेली चौकशी, सणावाराला घरून गोडधोड जेवण करून मी नेते, आजारपणात त्यांची काळजी घेणे, डॉक्टरकडे घेऊन जाणे हे आम्ही तेवढ्याच आस्थेने करतो आणि माझा असा अनुभव आहे की त्याचा परिणाम नक्कीच होतो. काही मुले भारतातून आमच्या visa वर इथे येतात, दोन-चार वर्षे राहतात, शिकतात, दुबईची माहिती करून घेतात आणि नंतर स्वतःचा धंदा सुरू करतात. पण मला अशा वेळी त्या मुलांचे कौतुक वाटते. त्यांची जिद्द, हुशारी, काही करण्याची धडपड! असे वाटते योग्य मुलाला आपण आणले. त्याने मिळालेल्या संधीचे सोने केले!

तिला वाटत असलेला आनंद तिच्या डोळ्यांतून ओसंडत होता. मी म्हटले विनिता बालवयात भाजी, देवाचे हार, दूर्वांच्या जुड्या विकताना माणसाची पारख करण्याचा गुण पण तुझ्यात आला आणि म्हणूनच योग्य मुलांना तू इथे संधी दिलीस!

तिच्या चेहेऱ्यावर समाधान पसरले व ती अधिकच उत्साहाने सांगू लागली की येणाऱ्या कस्टमरशी आत्मीयतेने बोलणे आवश्यक आहे. कित्येक कस्टमर्स महिन्याचे पैसे


स्वप्नपुर्ती होणार
युनियन होम
व्याज दर 9.50% प्रति वर्ष*
युनियन माइल्स
व्याज दर 9.90% प्रति वर्ष
परतफेड कालावधी
मासिक हप्ता प्रति लाख
युनियन होम | 30 वर्ष | ₹ 841/-
युनियन माइल्स | 7 वर्ष | ₹ 1655/-
*कर्ज ₹ 75 लाखांपर्यंत
0%
प्रक्रिया शुल्क
ऑफर मर्यादित कालावधीसाठी
ऑनलाईन अर्ज किंवा जवळच्या बँक शाखेत भेट द्या.
गौरवशाली भागीदार
युनियन बँक ऑफ इंडिया
Union Bank of India
चांगले लोक, चांगली बँक
Good people to bank with
Member of Banking Codes & Standards Board of India
1800 22 2244 / 1800 208 2244 | 080 2530 0175 | +91 80 2530 2510 | www.unionbankofindia.co.in

देऊन जेवायला येतात. मी त्यांची, त्यांच्या कुटुंबीयांचीही चौकशी करते. ही सर्व एकेकटी राहतात. जेवताना कोणीही प्रेमाने विचारले तर माणसाला चार घास जास्त जातात, बरे वाटते. एक भावनिक नाते निर्माण होते आणि ह्यामुळे कस्टमर्सही जोडले जातात. सुट्टीला भारतात जातात तेव्हा मला नमस्कार करून जातात. खरोखर तेव्हा डोळे पाणावतात. वाटते आपल्याला आणखी काय पाहिजे, पैसे तर सर्व मिळवतातच; पण ही जी पुंजी आहे ना ती अनमोल आहे.

आमच्या 'बॉम्बे बाइट्स'ला अनेक नामवंत मराठी कलाकारांनी भेटी दिल्या. मोहन वाघ, मोहन जोशी, सुनील बर्वे, वंदना गुप्ते, गिरीश ओक असे अनेक जण! नाटकाचा संच जेव्हा देशोदेशी प्रयोग करतात, तेव्हा वाटेत दुबईत थांबले तर 'बॉम्बे बाइट्स'ला भेट दिल्याशिवाय ते पुढे जात नाहीत. बाबासाहेब पुरंदरे हे अभयचे आराध्य दैवत आहे. त्यांनी दोनदा भेट दिली. त्यांच्या संस्कारात अभय वाढला आहे. अशी आपली मराठी माणसे जेव्हा आमच्या ह्या रेस्टॉरंटला भेट देतात आणि कौतुक करतात तेव्हा मन भरून येते.


व्यवहारापेक्षा भावना जपणाऱ्या, आठवणींनी भावविवश झालेल्या विनताला मी म्हटले, अग इथे दुबई म्युन्सिपाल्टीचे नियम कडक आहेत ना? म्युन्सिपाल्टीच्या आठवणींनीसुद्धा ती एकदम सावरून बसली. म्हणाली, महाराष्ट्र आणि दुबई येथील रेस्टॉरंटच्या स्वच्छतेत फार मोठा फरक आहे. तिथे तपासणीसाठी अधिकारी आले तरी ते नुसते नाटक असते, पैसे दिले की गप्प बसतात. अक्षरशः तेथील किचन पाहिले तर कस्टमर्सना खाणे जाणारच नाही. दृष्टीआड सृष्टी असते असे म्हणतात ना त्याची यथार्थता पटते!

पण दुबईत त्याच्या अगदी उलट आहे. हे अधिकारी कधीही न सांगता येतात. रेस्टॉरंटचे छप्पर कुठे उघडे नाही ना हे चेक करतात. किचनमधील भांडी, कामगारांचा युनिफॉर्म, त्यांची नखे, hand gloves, डोक्यावरचे केस कापलेले आहेत ना, कॅप आहे ना, नियमाने त्यांचा health checkup होतो ना ह्याची बारकाईने तपासणी केली जाते. मेन्यूकार्डमध्ये जे पदार्थ दिले आहेत त्याव्यतिरिक्त एकही दुसरा पदार्थ देता येत नाही. म्युन्सिपाल्टीने मोठे ड्रम दिले आहेत. खराब तेल असेल ते त्यात जमवून ठेवले जाते. नंतर म्युन्सिपाल्टीचे ट्रक येतात आणि ते तेल घेऊन जातात आणि त्याचे recycling होते. तसेच ड्रेनेज सिस्टिम वारंवार तपासली जाते आणि पाईपने त्यातून कचरा काढला जातो. जगामध्ये cleanliness मध्ये दुबई जेवढी प्रसिद्ध आहे तेवढेच दुबईचे किचनही प्रसिद्ध आहे. दुबईचे हे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे आणि ही खरोखर अभिमानास्पद गोष्ट आहे.

आज एवढ्या वर्षांच्या अनुभवांतून अनेक गोष्टी लक्षात आल्या. व्यवसाय कोणताही असो, शिक्षण आवश्यक आहे, त्याचबरोबर गोड वाणी! आमचा मुलगा श्रीनील याने स्वतःचे 'बॉम्बे कट्स' म्हणून जेन्ट्स सलून सुरू केले आहे. त्याला पण तेच शिकवतो की व्यवसाय कोणताही असो, आपल्या व्यवसायात कामगार वर्ग, सप्लायर्स, कस्टमर्स, धंद्यासंबंधित सर्व माणसांशी कधी रागावून, कधी समजावून तर कधी प्रेमाने बोलून माणूस टिकवण्याची कला आत्मसात केली पाहिजे. जी आमच्या मराठी माणसाकडे नाही. गुजराथी लोकांनी ह्या गोड बोलण्यावर तर भारतात आणि भारताबाहेर व्यापार काबीज केला आहे. आज दुबईत ४०-५० वर्षे वास्तव्य करून निरनिराळ्या क्षेत्रात स्वतःचे व्यवसाय प्रस्थापित करणाऱ्या उद्योजकांचे कौतुक वाटते. ज्या काळात दुबई म्हणजे फक्त एक ओसाड वाळवंट होते, कोणत्याही सुखसोयी नव्हत्या, दळणवळणाची साधने नव्हती, सरकारी नियमही योग्य प्रकारे तयार केले गेले नव्हते. अशा परिस्थितीत अरबी अधिकाऱ्यांशी जुळवून घेणे म्हणजे तारेवरची कसरत होती. ह्या सर्वांनी आमच्यासाठी, पुढच्या पिढीसाठी वाट सोपी करून ठेवली. आज दुबईचे सर्व चित्रच पालटले आहे आणि त्यात भारतीयांचा वाटा फार मोठा आहे आणि त्या यादीत मराठी उद्योजक आहेत ही अभिमानाची गोष्ट म्हटली पाहिजे! आणि म्हणूनच त्या सर्वांचा इथे गौरवपूर्वक उल्लेख केलाच पाहिजे.

'बॉम्बे बाइट्स'च्या आतापर्यंतच्या वाटचालीत, चढउताराच्या प्रत्येक टप्प्यावर माझे पती अभय आणि दीर संजय यांनी जी मोलाची साथ दिली त्यामुळेच 'मुंबईकर्स' ह्या नवीन रेस्टॉरंटची प्रेरणा मिळाली आणि त्यासाठी मेहेनत करण्याची उमेद मिळाली. त्यांच्या मदतीशिवाय 'बॉम्बे बाइट्'स उभे राहूच शकले नसते! मला विश्वास आहे उद्या 'मुंबईकर्स' सुद्धा यशस्वी होईल, पण मनाच्या तळाशी एक खंत मात्र कायम राहील- अर्धवट राहिलेल्या शिक्षणाची!

▪ **विनता अभय पाटणे**
mumbaikarsdubai@gmail.com






# दुबईचे पेशवा

■ **श्रीया सचिन जोशी**

■ **मुलाखतकार : मेघना वर्तक**
('लोकसत्ता'च्या सौजन्याने)

**रा**त्रीचे १० वाजायला आले होते. 'पेशवा'तील गर्दी आता कमी होऊ लागली होती. 'पेशवा'त काम करणारी सर्व मुलेसुद्धा आता जरा रिकामी होत होती. तेवढ्यात एक माणूस रेस्टॉरंटमध्ये आला. एकदम साधा पेहेराव, पाहून वाटेल की बिल द्यायला तरी त्याच्याकडे पैसे आहेत की नाही! आला आणि त्याने पाच-सहा भाज्या, डाळ-रोटीचे प्रकार अशी बरीच मोठी ऑर्डर दिली आणि सांगितले की बाहेर माझा ड्रायव्हर आहे त्याला पण जेवणाचे विचारा. जेवण झाले, बिल देताना त्याने विचारले आत्ता रेस्टॉरंटमध्ये किती मुले आहेत? एकाने सांगितले बारा मुले आहेत. त्या माणसाने स्वतःचे बिल आणि प्रत्येक वेटरला २०० दिरहॅम टिप दिली. 'पेशवा'च्या स्टाफने एवढी टिप घ्यायला नकार दिला, पण त्याने ते घ्यायला लावले. एका मुलाने त्याला विचारले की आपले नाव काय, आपले कार्ड द्याल का? कारण आम्हाला मॅडमना सांगावे लागेल! तो म्हणाला, तुम्ही गुगलवर बघा अमित पटेल नाव टाकून! तो रेस्टॉरंटच्या

बाहेर आला. बाहेर त्याची S ५०० मर्सिडीज गाडी उभी होती, युनिफॉर्म, डोक्यावर कॅप घातलेला ड्रायव्हर होता, तो त्या गाडीत बसून निघून गेला. त्या माणसाकडे बघून मुलांना वाटले होते की ड्रायव्हरसुद्धा असाच असेल कोणीतरी पठाण वगैरे, त्यामुळे त्यांनी ह्या ड्रायव्हरकडे पाहिलेच नव्हते.

आम्हाला जेव्हा सर्व समजले आम्ही गुगलवर पाहिले तर अमित पटेल ही व्यक्ती म्हणजे ब्रिटनमधील सर्वात श्रीमंत अशी एशियन व्यक्ती ! लंडनमध्ये 'पेशवा'चे नाव, तेथील चविष्ट मराठी पदार्थांचे वर्णन, आदरातिथ्य ऐकले आणि म्हणून दुबईत आल्यावर 'पेशवा'चा शोध घेत तो इथे आला. सर्व ऐकले आणि मन समाधानाने भरून आले. असे हे काही अविस्मरणीय प्रसंग असतात जे मनाच्या कप्प्यात कायम राहतात. जगाच्या कानाकोपऱ्यांत पोचणारे 'पेशवा'चे नाव आणि त्यामुळे शोधात येणारे कस्टमर्स याहून अधिक वेगळी पावती काय हवी? दुबईतील 'पेशवा' रेस्टॉरंटची मालकीण श्रीया सचिन जोशी, भूतकाळाच्या सुखद स्मृतीत रममाण झाली होती.

'डबेवाल्या जोशीकाकू' म्हणून सुरुवातीला उपहासाने माझा उल्लेख करणाऱ्या मराठी माणसांना 'पेशवा'च्या यशाने दिलेले हे उत्तर आहे. अतिशय अभिमानाने श्रीया म्हणाली! मी म्हटले, तुझा डबेवाली ते पेशवाची कर्तृत्ववान मालकीण हा प्रवास तरुण पिढीपुढे मोठा आदर्श आहे! एक डबेवाली स्त्री, बेबी सीटर, रिसेप्शनिस्ट, सेल्स वूमन, ट्रेडिंग अशा अनेक क्षेत्रांत स्वकर्तृत्वावर परदेशातसुद्धा यशस्वी होऊ शकते हे तू सिद्ध केले आहेस.

श्रीया जोशी सांगू लागली– पुण्यातील एका मध्यमवर्गीय कुटुंबात जन्म झाला. वडील वकील होते, पण business चे असे वातावरण घरात नव्हते. शिक्षण पूर्ण झाल्यावर सचिन जोशी याच्याशी लग्न झाले. तो इंजिनीअर आहे. पैसे मिळवण्यासाठी आम्ही दोघे UAE तील दुबईजवळच्या अजमान नावाच्या छोट्याशा इमिरेट्समध्ये आलो. सचिनचा जॉब सुरू झाला. सुरुवातीचे दिवस होते, पैशाची चणचण होतीच! एक पवारकाका म्हणून होते. ते एकदा आमच्याकडे जेवायला आले, त्यांना चव आवडली, त्यांनी डबा द्यायची विनंती केली आणि इथेच एक डबेवाली जन्माला आली. त्यावेळी पगार तुटपुंजे होते, सर्व कुटुंबाला घेऊन इथे राहणे अशक्य होते आणि म्हणून इथे बरीच लोकं बॅचलर्स राहायचे आणि फॅमिली भारतात! साहजिकच घरगुती जेवण मिळाले तर सर्वांना आवडायचेच! बघता बघता एकाचे दोन, दोनाचे चार करत तब्बल १३५ डबे हळूहळू मी बनवून देऊ लागले. मुलगा लहान होता, घर लहान होते, पहाटे ३ वाजता उठून स्वयंपाकाला सुरुवात करायची, दुपारी १२ वाजेपर्यंत डबे तयार व्हायचे. भर उन्हाळ्यात –AC चालायचे नाहीत, पण जिद्द होती, मेहेनत करायची तयारी होती. तीन वर्षे मी एवढे डबे बनवून देत होते. कसलीही लाज वाटत नव्हती. पण तरीही नात्यातले किंवा आजूबाजूचे डबेवालीकाकू म्हणून हिणवयाचे तेव्हा खोलवर कुठेतरी टोचायचे! त्यावेळी मी पंचवीशीसुद्धा ओलांडली नव्हती.

मी म्हटले, आणि म्हणूनच तुझी काहीतरी करून दाखवायची मनातील जिद्द अधिकच वाढली का? ती उत्तरली अगदी खरे आहे, म्हणतात ना 'निंदकाचे घर असावे शेजारी!' अशा या निंदकांमुळे आपली कसोटी पणाला लागते आणि त्या यशातून मिळणारा आनंद अवर्णनीय असतो .

श्रीया सांगू लागली, त्याचवेळी सचिनचा दुसरा जॉब सुरू झाला. तो होता शारजात! तिथून अजमानला डबे पोचवणे शक्यच नव्हते. त्यामुळे मग मी छोटेमोठे इतर part time job करायला सुरुवात केली रिसेप्शनिस्ट म्हणून! त्यानंतर सलग पाच वर्षे एका शिपिंग कंपनीत मी काम केले. एकदा एका प्रॉपर्टी exhibition ला गेले होते. तिथे निलोफर वालिया नावाची एक पारसी बाई नाशिक–पुणे रोडवर कसारा येथील प्लॉट्स विकत होती. आम्ही एक प्लॉट विकत घेतला. आमचा प्लॉट बघून आणखी ओळखीतून १० जणांनी प्लॉट्स घेतले. त्या बाईने मला कमिशन दिले आणि तिच्यासाठी मार्केटिंग करण्याविषयी विचारले. भरपूर पैसे एकदम मिळाले होते, स्वतःच्या सोयीने काम करू शकत होते, जाण्या–येण्याची कटकट नव्हती, वेळेचे बंधन नव्हते, मी शिपिंग कंपनीची नोकरी सोडली आणि इथे पूर्ण वेळ देऊ लागले. सहा महिन्यांत ३५० प्लॉट्स विकले. नंतर मुंबई–पुण्यातील बिल्डर्ससाठी काम केले. २००८–९ च्या सुमारास 'दुबई प्रॉपर्टी'चे पुण्यात Sun n Sand मध्ये exhibition भरवले. Hunter & Hunter, Damac साठी काम केले.

डबेवाली, रिसेप्शनिस्ट, sales woman अशा निरनिराळ्या भूमिका मी पार पाडल्या. प्रत्येक क्षेत्र भिन्न! पण त्यातून बरंच काही शिकता आले, स्वयंपाकाच्या खाचा–खोचांपासून ते समोर येणाऱ्या माणसाला पारखण्याची दृष्टी तल्लख झाली आणि या सर्वांचा फायदा मला 'पेशवा' सुरू करताना झाला. कितीही वेगवेगळी कामे केली तरी



स्वयंपाकाची हौस मनामध्ये होतीच, फक्त संधीची वाट बघत होतो.

आणि सुदैवाने तशी संधी चालून आली. आमचे मित्र आनंद जोग यांनी रेस्टॉरंट चालू करण्यासाठी पुण्याचे डेक्कन जिमखान्यावरील जनसेवा भोजनालयाचे सचिन देवधर यांचे नाव सुचवले. सचिन देवधरच्या आईने हे भोजनालय सुरू केले होते. ७० वर्षे जुने होते! आनंद म्हणाला, तुला स्वयंपाकातील कळते; पण रेस्टॉरंट कसे चालवायचे हे कळण्यासाठी सचिनचा ७० वर्षे जुन्या रेस्टॉरंटचा अनुभव उपयोगी पडेल. योग जुळून आला आणि सचिन देवधर, आनंद जोग आणि मी अशा तिघांनी मिळून रेस्टॉरंट सुरू केले. मी 'चावडी' नाव म्हणत होते कारण मी साईबाबा भक्त आहे, पण ह्याच नावाचे दुसरे रेस्टॉरंट असल्याने ते नाव मिळाले नाही. त्याचवेळी सचिन देवधरने 'पेशवा' हे नाव सुचवले आणि 'पेशवा'चा जन्म झाला.

आम्ही १६००-१७०० sq feet एरियाची जागा बघत होतो. पण जी जागा आम्हाला पसंत पडली ती होती ४५०० sq. feet. हे सर्वच दृष्टीने जास्त होते. कारण एवढी जागा म्हटल्यावर तेवढे rent, इंटिरियर, furniture, तेवढा स्टाफ! सर्व गोष्टी वाढणार होत्या, पण आनंदने सल्ला दिला की मोठेच रेस्टॉरंट काढू या आणि अखेर २०१२ मध्ये सर्व सोपस्कार पूर्ण होऊन 'पेशवा' चालू झाले. पंजाबी, गुजराथी जेवण तर ठेवायचे नव्हते फक्त महाराष्ट्रीयन मराठी जेवण ठेवायचे होते; पण मग नुसते ब्राह्मणी ठेवून पण चालणार नव्हते, म्हणून मग महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या प्रांतातील जेवण ठेवायचे ठरवले. जसे नागपुरी, कोल्हापुरी, वऱ्हाडी, मालवणी-कोकणी व्हेज आणि नॉनव्हेज! आज आमचा सर्व मिळून ५५ जणांचा स्टाफ आहे. सचिन देवधरने सर्व स्टाफला पुण्याला ट्रेंड केले. सचिन देवधरची आई दोन महिने पुरणपोळी आणि उकडीचे मोदक सर्व मुलांना शिकवत होती. आज दुबईतच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यांत 'पेशवा'च्या पुरणपोळ्या पोहोचल्या आहेत. उकडीच्या मोदकांची ऑर्डर घेणे शेवटी आम्हाला बंद करावी लागली. 'पेशवा' सुरू केल्याच्या पहिल्या दिवसापासून कस्टमर्सनी भरलेले आहे. आज मराठी लोकं तर येतातच, पण अमराठी लोकांची संख्या अधिक आहे.आज मुंबई-पुण्यात नोकरी, शिक्षण, धंद्याच्या निमित्ताने अनेक अमराठी लोकं राहत आहेत. साहजिकच मराठी संस्कृती, खाद्यपदार्थ यांची त्यांना

आवड असते आणि म्हणूनच परदेशात मराठी पदार्थ मिळाले म्हणून त्यांना पर्वणीच वाटते.

'पेशवा' हे नावाप्रमाणेच अस्सल मराठी संस्कृती, मराठी परंपरेचे प्रतीक आहे. दुबईच्या वाळवंटातही आपली परंपरा जतन करून त्याची पाळेमुळे जगभर पसरवत आहे. महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थ हे तर प्रमुख वैशिष्ट्य आहेच, पण त्याचबरोबर मराठी राज्याचे पेशवेकालीन वातावरण, त्याला साजेलसे मराठी संगीत आणि सणावारी चांदीच्या ताटवाटीत बसणारी पंगत अमराठी लोकांनासुद्धा अतिशय भावते!



मराठी संस्कृतीत सणांची परंपरा फार मोठी आहे. दहीहंडी, गुढीपाडवा, गणपती, दिवाळी, संक्रांत हे सर्व आपले प्रमुख सण! पेशवात दहीहंडी बांधून गोपाळकाला होतो. गुढी उभारून पूजा करून गुढीपाडवा साजरा होतो. पाच दिवसांचा गणेशोत्सव होतो. सकाळ-संध्याकाळ दुबईच्या वाळवंटात टाळ्या आणि झांजाच्या गजरामध्ये गणरायाच्या आरत्या होतात, सहस्त्रावर्तने होतात, महाप्रसाद होतो. दीपावलीत दिव्यांच्या रोषणाईने 'पेशवा' सजते, संथपणे तेवणाऱ्या पणत्यांच्या रांगा आणि मनमोहक रंगांनी शोभणाऱ्या रांगोळ्या, आकाश कंदील, दारावरची आंब्याची तोरणे आणि फराळांनी भरलेली ताटे! आपल्या कुटुंबापासून, घरापासून दूर आलेल्या सर्व भारतीयांना इथे सणांचा आनंद मिळतो आणि नात्यांचे प्रेम मिळते. खरोखरच 'पेशवा' हे नाव सार्थ ठरले आहे. दरवर्षी आम्ही 'पेशवा सन्मान पुरस्कार' देतो. यूएईमध्ये राहून उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मराठी माणसाला हा पुरस्कार देतो. भारतातून आलेल्या प्रतिष्ठित व्यक्तींच्या हस्ते समारंभपूर्वक हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. घरादाराला सोडून, पैशांसाठी दुबईच्या वाळवंटात वर्षांनुवर्षे वास्तव्य करणाऱ्या मराठी लोकांच्या, भारतीयांच्या जीवनात थोडातरी आनंद फुलवण्याचा प्रयत्न 'पेशवा' करते. आज ह्या भारतीयांमुळेच भारतातील लाखो घरात आशेची पहाट उगवली आहे हे कधीच विसरता येणार नाही.

इथे पूजेचा स्वयंपाक हा वेगळ्या पातेल्यातून, वेगळ्या जागेत होतो. आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणावर श्री सत्यनारायण पूजा, गणपती पूजा, अशा सर्व पूजांच्या प्रसादाच्या जेवणांची ऑर्डर लोकं अतिशय विश्वासाने देतात. महाशिवरात्रीला उपासाची थाळी मिळते. रेस्टॉरंट सुरू झाल्यापासून दररोज तयार होणाऱ्या प्रत्येक पदार्थाची चव मी, सचिन किंवा ओंकार घेतो आणि नंतरच पदार्थ थाळीत येतो. एवढे करूनही एखादी तक्रार येते तिखट आहे किंवा मीठ कमी आहे! पण सर्वसाधारणपणे सर्वांना अमराठी लोकांनासुद्धा 'पेशवा'चे जेवण, वातावरण, आदरातिथ्य आवडते.

इथे दुबईत बलदियाचे म्हणजेच म्युन्सिपाल्टीचे नियम अतिशय कडक आहेत. वारंवार अधिकारी येऊन तपासणी करतात. इथे व्हेज-नॉनव्हेज बनवण्यासाठी काउंटर्स वेगळे असतात. भांडी, सुऱ्या, काटे, चमचे, इतकेच काय पण बेसिनसुद्धा वेगळी असतात. व्हेजला वेगळे, नॉनव्हेजला वेगळे, फिशसाठी वेगळे! सर्व नियम तुम्हाला पाळावेच लागतात. नाहीतर खूप फाईन असतो किंवा रेस्टॉरंट बंदसुद्धा ठेवावे लागते. आम्हालासुद्धा दंड झाला, पण तो एका वेगळ्याच कारणासाठी. आमच्या किचनमध्ये दारावरती देव्हारा लावला आहे. दररोज आमची मुले कपाळी गंधाचा टिळा लावून सकाळी पूजा करतात. एक अधिकारी आला, त्याने काही आक्षेप घेतला नाही, पण नंतर दुसरा अधिकारी

आला. तो सुदानी होता. तो म्हणाला, दारावरती काही लावायचे नाही. त्याला आम्ही खूप समजावले, आपल्या रीतीरिवाजांबद्दल सांगितले; पण त्याने काही ऐकले नाही, त्याने सरळ ५००० दिरहॅम फाईन मारला. आमच्या स्टाफचे washroom, त्यांची सामान ठेवायची जागा वेगळी ठेवली आहे, त्यांचे कपडे तिथेच वाळत घातले होते आणि म्हणून कपडे कुठेही वाळत घालायचे नाहीत म्हणून हा फाईन! किचनमधील सर्व टाईल्स चांगल्या असल्या तरी दोन वर्षांनी बदलाव्या लागतात. ड्रेनेज सिस्टीम, गार्बेज व्यवस्था याबाबतीत अतिशय कडक नियम आहेत. इतकी स्वच्छता भारतात कुठेही दिसत नाही.

'पेशवा' हे आमचे एक कुटुंब आहे आणि म्हणूनच ह्या कुटुंबाच्या सदस्यांची सुखदुःखंही वाटली जातात. स्टाफच्या घरगुती अडचणी आम्ही समजून घेतो, त्यांना लागेल ती मदत करतो. ती सर्व आपल्या कुटुंबापासून दूर राहतात ही जाणीव नेहमीच मनात असते आणि छोट्यामोठ्या सणांमध्ये त्यांना सामील करून घेतो. मराठी कामगारवर्गाला आपल्या गटारी अमावास्येचे नेहमीच आकर्षण असते. हे लक्षात घेऊन तीही साजरी केली जाते, पण प्रत्येक मुलगा अतिशय जबाबदारीने वागतो आणि गटारी साजरी होते. मला असे वाटते की स्टाफबरोबरचे नाते जर कौटुंबिक ठेवले तर त्यांना कामाला स्फूर्ती मिळते. आपले घरचे कार्य या भावनेने ते काम करतात आणि मग ते नोकरीत टिकून राहतात. आमच्याकडचा बहुतेक सर्व स्टाफ दोन वर्षांचा visa renew करून नोकरी करत आहे.

अर्थात त्याला अपवाद एक उदाहरण घडले. आमच्या spa मधे एक मराठी मुलगी काम करत होती. ती सारखी विनवण्या करत होती, हातापाया पडून सांगत होती की माझ्या नवऱ्याला 'पेशवा'मध्ये नोकरी द्या. तो सर्व काम नीट करेल. त्याला तिकडे नोकरी नाही, घरात खाणारी तोंडे बरीच आहेत, खूप उपकार होतील! मराठी माणसाला मदत होईल या हेतूने पुरेसा स्टाफ असतानासुद्धा आम्ही तिच्या नवऱ्याला visa दिला आणि इथे आणले. चार-सहा महिने त्याने चांगले काम केले आणि नंतर एक दिवस सांगू लागला की, मला एका कॅफेमध्ये जास्त पगार मिळतो आहे, मी नोकरी सोडतो. मी सांगितले, तू आमचे visa चे पैसे दे आणि जा किंवा दोन वर्षांचे कॉन्ट्रॅक्ट पूर्ण करून जा. त्याने सरळ लेबरमध्ये जाऊन complaint केली. त्याला आमचे visa चे पैसे द्यावे लागलेच; पण आमच्या डोक्याला त्रास झाला. वाईट याचे वाटते की त्यांना केलेल्या मदतीची किंमत नसते, मेहेनत करायची तयारी नसते.

'पेशवा' आता उत्तमप्रकारे चालू लागले आहे. शारजामध्ये त्याची दुसरी शाखा उघडली आहे. तेही हळूहळू स्थिरस्थावर होत आहे. त्यामुळे आणखीन काही वेगळे सुरू करावे ही इच्छा होती. अचानक एक योग जुळून आला आणि आम्ही 'निवांत' या नावाने Spa सुरू केला. खरंतर आम्हाला फॅमिली spa सुरू करायचे होते, पण परमिशन फक्त लेडीज spa साठी मिळाली.

त्याबरोबर आता general trading चे license मिळाले आहे. त्यामुळे ट्रेडिंग पण सुरू केले आहे. आफ्रिका आणि इराणला इंडियन मसाले, इतर पदार्थ export करतो. तसेच सचिन इंजिनीयरिंग items एक्स्पोर्ट करतो. दुबईतच ग्रोसरी शॉप पण सुरू केले आहे. हे सर्व नवीन व्यवसाय बाल्यावस्थेत आहेत. पण मिळणाऱ्या संधीचा फायदा घ्यायचा, त्यासाठी मेहेनत करायची हे आम्हा पती-पत्नीचे आयुष्याचे सूत्र आहे.

२०१३ मध्ये 'गल्फ मराठी बिझनेस फोरम'ने श्रीयाला पुरस्कार देऊन गौरविले. त्यासंदर्भात बोलताना श्रीया म्हणाली, या पुरस्काराचा वाटेकरी माझा नवरा सचिन आहे. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्याने मला जी साथ दिली त्यामुळेच डबेवालीची झालेली पेशवीण तुम्हाला दिसत आहे. श्रीया अतिशय अभिमानाने हे बोलत होती. मधेच तिला मी म्हटले, एका यशस्वी पुरुषाच्या पाठी नेहमी त्याची बायको असते. तद्वतच आजच्या २१व्या शतकात यशस्वी स्त्रीच्या पाठी तिचा नवरा असतो असे म्हणायला काहीच हरकत नाही. त्यावर श्रीया पटकन् म्हणाली पती-पत्नी ही संसाररूपी रथाची दोन चाके आहेत आणि ती समांतर रेषेतच चालावी लागतात नाही का? आणि म्हणूनच 'पेशवा'चे श्रेय हे माझा नवरा सचिन आणि माझे एकत्रित आहे!

मी श्रीयाला म्हटले, एक मराठी म्हणून सर्व दुबईकरांना तुमचा अभिमान वाटतो की मराठी साम्राज्याच्या सीमा अटकेपार नेण्याचे कार्य पेशव्यांनी केले. त्याच पेशव्यांचे नाव भारताबाहेर नेण्याचे कार्य श्रीया-सचिनच्या दुबईतील 'पेशवा' रेस्टॉरंटने केले!

■ **श्रीया सचिन जोशी**
shriyajoshi@gmail.com




# दुबईची मराठी रंगभूमी

दुबईच्या महाराष्ट्र मंडळाच्या रंगभूमीला खरे मूर्त रूप दिले ते श्रीकांत राळे आणि उमा राळे या दाम्पत्याने! आपला अमूल्य वेळ व शक्ती खर्च करून, मंडळाचे सांस्कृतिक रूपच बदलले. बागोपाळांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचे मनोरंजन केले. लहान-मोठ्यांसाठी स्वलिखित किंवा व्यावसायिक नाटके सादर करून मराठी पावले मंडळाकडे वळवली!

त्यांची परंपरा पुढे चालवत आहेत ते प्रज्ञा प्रसाद पाठारे आणि नीलेश देशपांडे!

– मेघना वर्तक



# माझा दुबईतील नाट्यप्रवास

■ डॉ. प्रज्ञा प्रसाद पाठारे

**ना**टकात काम करायची आवड शाळा-कॉलेजपासूनच सुरू झाली. कॉलेजात असताना दरवर्षी बक्षिसं मिळायला लागली आणि जेव्हा इंटरकॉलेजिएट स्पर्धेतही बक्षिस मिळालं तेव्हा खूपच कौतुक झालं आणि माझा उत्साह वाढला. पुढच्या आयुष्यात नाटकात काम करायला मिळेल यात शंका होती. पण दुबईत महाराष्ट्र मंडळाने माझी आणि प्रसादची ही इच्छा पूर्ण केली.

महाराष्ट्र मंडळासाठी आम्ही चौदा-पंधरा नाटकं केली, एकांकिका केल्या, हिंदी नाटक केलं, मुलांसाठी नाटकं केली, महाराष्ट्र दर्शनचे कार्यक्रम केले, मंगळागौरीचे नृत्यनाट्य केलं, अगदी फॅशन शोसुद्धा केला. आम्ही आमची हौस पुरवलीच; पण सहभागी झालेल्या कलाकारांमुळे आणि त्या त्या वेळी असणाऱ्या मंडळाच्या कमिटीच्या पाठिंब्यामुळे हे सर्व शक्य झालं. वेगवेगळ्या स्पॉन्सर्समुळे मंडळाचे हे कार्यक्रम सहजपणे होऊ शकले. श्रुती-जयंत गोखले आणि किणीसाहेब यांची स्पॉन्शरशीप दरवर्षी असायची.

माझ्या सर्व नाटकांचा आणि इतर सर्व कार्यक्रमांचा प्रसाद दिग्दर्शक होता, शिवाय कलाकार म्हणून बराच मोठा वाटा प्रत्येक नाटकात आणि कार्यक्रमात तो उचलून धरत होता. 'दिनूच्या सासूबाई' ही प्रशांत कुळकर्णीने दिग्दर्शित केलेली माझी दुबईतील पहिली एकांकिका. त्यानंतर श्रीकांत राळे याने दिग्दर्शित केलेल्या 'थीफ-पोलीस' या एकांकिकेत मी आणि प्रसाद दोघेही सहभागी होतो. 'मद्रासीने केला मराठी भ्रतार' या एकांकिकेसाठी जनार्दन प्रभू या दिग्दर्शकाने प्रमुख भूमिकांसाठी आम्हाला दोघांनाही आमंत्रण दिलं आणि मोठ्या आनंदाने आम्ही ते स्वीकारलं.

सर्व नाटकांच्या तालमी आमच्याच घरी रोज रात्री ९ ते ११ असायच्या, पण आमच्या मुली- प्रणाली आणि सम्राज्ञी, साडेआठलाच झोपून जायच्या. शुक्रवारी मात्र जवळ जवळ संपूर्ण दिवस तालमी असल्यामुळे त्यांना सर्व नाटक तेव्हा पाहायला मिळायचं. दोन-तीन आठवड्यातच दोघींचं सर्व नाटक ऐकून पाठ व्हायचं. सर्व कलाकारांना रोजची चहा-कॉफी असे आणि शुक्रवारी दुपारचं जेवण. जेवणानंतरच्या त्या वेगळ्या नाटकाविषयीच्या गप्पाटप्पांना खूपच मजा यायची. कधी कधी सर्व स्वैपाक मी करत असे, फक्त खबूस रोट्या बाहेरून आणत असे. कधी कधी कलाकार स्वेच्छेने एखादा पदार्थ घरून बनवून आणत. कधी कधी मी बाहेरून सर्वांसाठी थाळी मागवत असते; पण शुक्रवारच्या तालमी दुपारच्या जेवणाशिवाय कधीच नसायच्या.

एका शुक्रवारी आम्ही शारजाला नितीन तवकरच्या

घरी तालीम केली. वैजू तवकरने आवर्जून स्वतः सर्व स्वैपाक करून आम्हाला छान व्हेज-नॉनव्हेज जेवण दिलं होतं. वैजू फारच सुंदर कथ्थक नृत्य करत असे. महाराष्ट्र मंडळासाठी तिने नृत्याचा छान कार्यक्रम केला होता. बॅकस्टेजलाही तिची मदत असे. वैजूच्या अकाली अपघाती मृत्यूने आम्ही हादरलो होतो. सर्वच एका हसऱ्या आणि लोभस व्यक्तिमत्त्वाला मुकलो होतो.


दुबईच्या रंगमंचावर प्रथमच 'बसस्टॉप' हे एक मूकनाट्य प्रसादने सादर केलं. त्यात मी एक मिनिटभर रस्त्यावरच्या एका वेडीचा रोल केला होता. माझ्या मुलींना मात्र आपल्या आईला वेडीच्या रोलमध्ये बघून कसंसंच झालं. दोघीही त्यानंतर आजूबाजूच्या प्रेक्षकांना आवर्जून सांगत होत्या My mother is not a mad woman, she is only acting. प्रेक्षकांतल्या लोकांनी जेव्हा मला हे सांगितलं तेव्हा मला मुलींची मानसिकता जाणवली. या मूकनाट्याच्या वेळी आम्हाला विजय राणे, अभय माने, झुटिंग भावंडं असे गुणी कलाकार भेटले.

चि.सौ.कां. चंपा गोवेकर या नाटकात मी चंपा आणि प्रसाद चारुदत्त यांचं अगदी सप्तपदीसह साग्रसंगीत लग्न आम्ही रंगमंचावर सादर केलं होतं. त्या नाटकी लग्नात प्रत्यक्ष रंगमंचावर वऱ्हाडी म्हणून माझ्या बाजूला प्रणाली आणि प्रसादच्या बाजूला सम्राज्ञी आमच्यावर अक्षता टाकायला आल्या होत्या. त्यानंतर लहान असताना मुली नेहमी सर्वांना सांगायच्या, ममा-बाबाच्या लग्नाला आम्ही होतो.

हे नाटक व्हायच्या आदल्या दिवशी रात्री एक-दोन कलाकारांनी निगेटिव्ह बोलायला सुरुवात केली आणि सर्वांवर गदाप्रहारच झाला. ती रात्र दुसऱ्या दिवशीच्या प्रयोगाच्या साशंकतेने आम्ही दोघांनीही तळमळत जागेपणी काढली. पण ते नाटक शेवटी ठरल्याप्रमाणेच झालं आणि प्रेक्षकांच्या टाळ्या-शिट्या घेत अगदी छान झालं.

'वट वट सावित्री' या नाटकात मी भूत असलेली सावित्री माझ्या मृत्यूनंतर दुसरं लग्न केलेला माजा नवरा प्रोफेसर पोफळे (प्रसाद) याला मारून मी त्याला माझ्या बरोबर भूतयोनीत नेण्याचा प्रयत्न करते. त्या दरम्यान माझा भुताटकीचा काय काय खेळ चालतो ते रंगमंचावर बघताना मजा येते.

सुरुवातीला नाटकांच्या तालमीत प्रोफेसरच्या दुसऱ्या लग्नाच्या सासूचा रोल सौ. मंगला काळे करीत होत्या. पण नाटकाच्या सादरीकरणाला फक्त आठ दिवस असताना



त्यांची तब्येत बिघडली आणि त्यांना मुंबईला तातडीने जावं लागलं. तेव्हा कुमुद राळे हिने स्वतःच्या मेहेनतीने आणि हिकमतीने उरलेल्या दिवसांत तो मोठा रोल पूर्ण उभा करून सुंदर काम केलं. माझा भूतयोनीतील रोल पाहिल्यावर बऱ्याचशा बायका काही दिवस रात्री नीट झोपल्या नव्हत्या. ती मला शाबासकीच होती. मी प्रसादला (प्रो. पोफळे यांना) तोंडावर उशी दाबून मारताना बघून त्या घाबरल्या होत्या. नाटकात प्रोफेसरांनाच फक्त मी दिसत असे, इतर कुणालाच नाही. सासू आणि तिला न दिसणारं भूत यांचे रंगमंचावरचे खेळ छान मजा आणि करमणूक करून गेले. गुलाबछकडीचा फार्स १८७५ साली लिहिला गेलेला होता. मुंबईच्या 'मॅजेस्टिक बुक डेपो'त पुस्तकं बघत असताना कचऱ्यात पडलेलं दोन रुपये किंमतीचं ते पुस्तक प्रसादने उचलून घरी आणलं. त्यात गुलाबछकडी या एका विशीतल्या मुलीचं लग्न पंचाहत्तरीतल्या श्रीमंत नवऱ्याशी तिच्या आईवडिलांनी केवळ पैशांसाठी लावून दिलेलं असतं. या नाटकात राजा, प्रधान, कोतवाल, न्यायाधीश, शिपाई आणि मारवाडी अशी त्याकाळच्या समाजातल्या उच्च थरातली पात्रं होती. त्यांचे पेहराव आणि वेशभूषा मुंबईहून आणण्याचं काम माझ्या सासू-सासऱ्यांनी आणि भाचा-भाचीने केलं. मी वयाने विशीत नव्हते तरी मला गुलाबछकडीचा रोल करायचा होता. खऱ्या आयुष्यात माझ्यापेक्षा वयाने लहान असलेली ही समाजातील उच्चभ्रू धेंडं माझ्या प्रेमात पडतात. नववारीतली ही घरंदाज मुलगी या धेंडांची फजिती करून



आपल्या पंचाहत्तरीतल्या नवऱ्याला दाखवून देते आणि त्याचा विश्वास संपादन करते असं या नाटकाचं कथानक.

प्रसादने खूपच मेहनत घेतली हे नाटक उभं करताना. पंधरा वेगवेगळ्या सीन्सचं हे नाटक अखंड दोन तास चालतं. रंगमंचावर जुजबी आणि symbolic अशी नेपथ्यरचना प्रसादने केली होती आणि नाटकाच्या गतीमानतेसाठी प्रसादने वीस-पंचवीस गाणी लिहून ती रंगमंचावर संगीत नाटकांप्रमाणे लाईव्ह सादर केली. त्यासाठी पूर्ण वेळ ऑफिस सांभाळून प्रसाद रोज दोन तालमी घ्यायचा. संध्याकाळी घरी आल्यावर गाण्याच्या तालमी आणि रात्री ९ ते ११ गद्य नाट्य तालमी. या नाटकाला आम्हाला फारच छान प्रतिसाद मिळाला. प्रेक्षकांनी खूपच दाद दिली. कौतुकाचे फोन जवळजवळ दोन आठवडे येतच होते. पुढच्या बारा-पंधरा वर्षांत आम्ही 'कुर्यात सदा टिंगलम्', 'कुर्यात पुन्हा टिंगलम्', 'छूमंतर', 'लग्नाची बेडी', 'शांतेचं कार्ट चालू आहे', 'तो मी नव्हेच', 'एकदा पहावं करून' अशी अनेक गाजलेली मराठी नाटकं दुबईच्या रंगमंचावर सादर केली. 'दिल की दुकान' हे हिंदी नाटक सुद्धा.

'छूमंतर' या नाटकात प्रसादने मला सुनेचा रोल दिला होता. पण या नाटकाची मजा अशी होती की त्यातली जवळ जवळ सर्व पात्रं कथानकाच्या ओघात कधी ना कधी आपल्या आधीच्या जन्मात येतात. मी या जन्मातली साधी भोळी सून आधीच्या जन्मात एक पुरुष पहिलवान असते. त्या रोलमध्ये मी रंगमंचावर बरीच धमाल करून जाते... कुस्ती करून इतरांना पाडते, मारते, कुस्तीच्या फडातली गदाही जिंकून आणते. या नाटकाच्या तालमींनाही सर्वांना प्रत्येकाच्या पूर्वजन्मातलं असं काहीबाही करताना मजा यायची.

अशी नाटकं करताना आम्हाला बरेच गुणी कलाकार मिळाले- रंगमंचावरीलही आणि रंगमंचापाठील जबाबदारी सांभाळणारेही : संगीतकार, प्रॉम्प्टर, नेपथ्य सजावटकार, कपडेपट्टीचे, रंगभूषाकार, ध्वनिमुद्रणकार आणि इतरही कामाला हातभार लावणारे वगैरेही. आता या सर्वांची नुसती नावं घ्यायची म्हटलं तरी अनवधानाने काही निसटतीलच. म्हणूनच त्या सर्वांचं या लेखाद्वारे कौतुक करून आणि अगदी मनापासून हार्दिक आभार मानून त्या सर्व गोड आठवणींना उजाळा देते आहे. पण आवर्जून सांगायचं म्हणजे विजय राणे, दिलीप परांजपे, सुनील हत्तंगडी आणि ज्ञानेश चंदावरकर ही मंडळी दररोजच्या तालमींना वेळेआधी दहा मिनिटं कधीही न चुकता हजर असायची. शिवाय त्यांचं पाठांतरही चोख असायचं.

'मदनबाधा' नाटकामुळे मला कायमची मोठी मुलगी मिळाली- मनीषा चितळे. नाटकात ती माझ्या मुलीचा रोल करत होती. पण तेव्हापासून Lifelong मी तिची 'मम' झाले.

नाटक आम्ही सर्वांनी खूप मेहनतीने उभारलं होतं. पण ऐन वेळी 'रंगमंचावर आणायला स्पॉन्सर मिळत नाही' असं आम्हाला कळवून कमिटी गप्प झाली. तेव्हा मी माझी मैत्रीण श्रुती गोखले हिला नुसतं म्हटलं की स्पॉन्सर नसल्यामुळे नाटक रंगमंचावर यायची शक्यता दिसत नाही. तर तिने त्याच

क्षणी कुठलाही विचार न करता 'मी स्पॉन्सर करते हे नाटक' असं म्हणून कमिटीला कळवायला सांगितलं. या नाटकात दिग्दर्शनाव्यतिरिक्त प्रसादने दोन विरुद्ध प्रकारचे रोल (Double Roles) केले होते- डॉ. टिल्लू आणि बंडोपाध्याय!

पाठांतराच्या बाबतीत मी तेवढी चोख नव्हते. मेहनतीने पाठांतर करूनसुद्धा मी बऱ्याच वेळा ठरावीक ठिकाणी विसरायचेच. प्रसादला माहीत होतं की प्रत्येक कलाकार सुरुवातीला ठरावीक ठिकाणी अडखळतोच. नंतर नंतर तो ध्यानात आल्यावर आपापल्या पद्धतीने आणि स्वतःच्याच प्रयत्नांनी प्रत्येक जण ते टाळू शकतो. तालमीच्या वेळी प्रॉम्प्टरची मदत असते; पण प्रत्यक्ष प्रयोगात प्रॉम्प्टर विंगेत कितीही जवळ असला तरी रंगमंचावर काहीच ऐकू येत नाही हा आमचा अनुभव होता. म्हणूनच प्रसादचा स्वतःच चोख पाठांतर करण्यावर कटाक्ष असायचा. त्यामुळे मी तालमीच्या वेळी वाक्य विसरले की मलाही प्रसादचा ओरडा मिळायचा.

एकदा एका एकांकिकेत दोन लहान मुलांचा प्रवेश होता. त्यातला एक मुलगा त्याचं वाक्य विसरला आणि मी समोर असूनही मला त्याला काहीही मदत करता येईना कारण त्या एकांकिकेत मी रंगमंचावर त्याच्यासमोरच बेशुद्ध होऊन पडले होते. त्यामुळे थोडासा पॉज झाला; पण ते प्रसादच्या लगेच लक्षात आलं आणि त्याने शिताफीने ते निभावून नेलं.

त्याच एकांकिकेत बरेच हसे होते. काही गोळ्या खाल्ल्या की माणसं काही वर्षांनी तरुण व्हायची. सत्तरीचा म्हातारा चाळिशीत यायचा, वगैरे. कुमुदचा नवरा त्या एकांकिकेत चुकून त्या गोळ्या खूप खातो... आणि त्यानंतर काही मिनिटांतच कुमुद तिच्या दोन वर्षांच्या मुलीला (तिचा गोळ्या खाल्ल्यामुळे लहान झालेला नवरा) कडेवर घेऊन प्रवेश करते. त्याक्षणी प्रेक्षकात हशाची जबरदस्त लाट उसळली ती बराच वेळ चालली. आम्हीही रंगमंचावर त्या क्षणांची मजा अनुभवली.

आमच्या शेजारी एक केरळीय कुटुंब राहायचं. एका तालमीच्या संध्याकाळी त्यांच्या घरची मंडळी बाहेर गेली होती. फक्त वृद्ध आजी घरी होत्या. ऐन तालमीत कोणीतरी अगदी घाईत असल्यासारखी दरवाजाची बेल वाजली. मी दरवाजा उघडला तर त्या आजी काळजीत असलेल्या दिसल्या. मला बघून त्या क्षणभर अवाक् झाल्या, मग सावरून काळजीत म्हणाल्या, ''तू का रडत होतीस? काही वाईट बातमी?''... मला क्षणात समजलं काय झालं ते. माझ्या



रोलच्या एका रडवेल्या भागाची तालीम आम्ही करत होतो. माझ्या रडण्याचा आवाज त्यांनी बाहेरून ऐकला आणि घाबरून त्या दरवाजाबाहेर येऊन उभ्या राहिल्या. रडण्याचा आवाज जसा वाढत गेला तशा त्या आणखी घाबरल्या आणि त्यांनी दरवाजाची बेल वाजवली. पण जेव्हा मी हसत दरवाजा उघडला तेव्हा त्या बुचकळ्यात पडल्या. ''म्हणजे तू रडत नव्हतीस?'' असं त्यांनी काही सेकंदानी मला विचारलं. मी त्यांना समजावलं की नाटकाच्या तालमीत मी रडण्याचा अभिनय करत होते. त्यांनी मला घट्ट मिठी मारली आणि मी त्यांना! मग मी त्यांना म्हटलं, ''सॉरी हं, शांत झोपा आता'' आणि त्यांचा हात धरून मी त्यांना त्यांच्या घरी सोडून आले. असे हे सख्खे शेजारी!

सुरुवाती सुरुवातीला मंडळात आम्ही सर्वांना ओळखत नव्हतो, पण नाटकामुळे आम्ही सर्वांना माहीत होतो. एकदा असंच सुपर मार्केटमध्ये खरेदी करत असताना एक जोडपं समोरून येताना आमच्याकडे पाहून हसलं, दोघंही आम्हाला हॅलो म्हणाले. आम्हीही तसाच प्रतिसाद दिला. पण प्रसाद त्यांना म्हणाला, ''सॉरी हं, पण आम्ही तुम्हाला ओळखलं नाही.'' ते म्हणाले, ''पण आम्ही तुम्हाला ओळखतो, स्टेजवर पाहतो'' त्यांची ओळख आम्ही करून घेतली. ते म्हणजे, डॉ. आणि मिसेस धुमाळे. त्यांच्या वृद्ध आईही आमच्या नाटकाला यायच्या. शेवटी आमचा घरोबा इतका वाढला की आमचं एकमेकांच्या घरी येणंजाणं नेहमी होत राहिलं.

एका वर्षी महाराष्ट्र दर्शन कार्यक्रमात मंगळागौरीचे खेळ सादर करण्याचा विचार आम्ही करत होतो. प्रसाद एकदम म्हणाला, खेळ वगैरेच्या सादरीकरणात वेळ आणि कृती या नीट एकत्रित बांधता येणार नाहीत. आपण त्या खेळांचं बांधीव नृत्यनाट्याने सादरीकरण करूया, जे त्याआधी कधीही प्रत्यक्षात किंवा टीव्हीवरही सादर केलं गेलं नव्हतं. आम्ही असा प्रयोग करून पाहायचं ठरवलं. काळ होता १९८७ साल. आमच्या मंगळागौरीच्या नृत्यनाट्याच्या तालमी कुमुदच्या घराच्या गच्चीवर सुरू झाल्या. लहान मुली धरून आम्ही सर्व २४ जणी होतो. आम्ही गाणी म्हणून खेळ करून दाखवले आणि प्रसादने जे अखंड नृत्यात बसू शकतील तेच घेऊन त्यांची योग्य क्रमवारी लावून त्यांची व्यवस्थित बांधणी केली.

प्रसाद या कार्यक्रमाचा दिग्दर्शक होता. तालमीच्या वेळी प्रसाद जमिनीवर नृत्याच्या पदोन्यासाचे आकृतीबंध खडूने जमिनीवर काढत असे. आम्हा सर्व बायकांना त्याच आकृतीबंधात पावलं टाकायला लागायची. त्याच्या हातात एक लांब काठी असायची. तो त्या काठीने दुरून आमची पावलं आकृतीबंधात कुठे पडायला हवीत ते दाखवायचा. आम्ही २४ जणी आणि प्रसाद एकटा पुरुष! तालीम करताना बायकांची बडबड थांबवायची कशी? त्याच्या हातात खडूचे छोटे छोटे तुकडे असायचे. आम्ही कोणी पावलांत चुकलो किंवा बडबड करायला लागलो की तो ते खडूचे तुकडे आमच्या पायावर मारायचा. गाणाऱ्या वेगळ्या चौघी जणी होत्या. त्या काळी मंगळागौरीच्या गाण्याच्या कॅसेट नव्हत्या. सर्व कार्यक्रम गाण्यांसकट लाइव्ह होता. फारच छान झालं होतं ते पूर्ण ३० मिनिटांचं सादरीकरण!

महाराष्ट्र मंडळासाठी आम्ही पहिल्यांदाच पूर्ण तीन अंकी हिंदी नाटक केलं- 'दिल की दुकान!' आजकाल टीव्हीवर जशी 'Comedy Nite' असते तशाच तऱ्हेच्या भरपूर हशा-विनोदाने भरलेलं ते नाटक होतं. ते चांगला सामाजिक संदेशही देऊन गेलं. फॅशन शो हासुद्धा महाराष्ट्र मंडळासाठी पहिलावहिला आगळावेगळा प्रयोग होता. तरुण मंडळी आणि १०-१६ वयाची मुलं धरून २० जणांनी यात भाग घेतला होता. त्यांच्यातल्याच नवोदित संगीतकारांनी त्याची ३०-४० मिनिटांची ध्वनिफीत तयार केली होती. हा शो अगदी प्रोफेशनल पद्धतीने झाला असं बऱ्याच जणांचं कौतुक आम्हाला मिळालं.

जाता जाता काही सांगावंसं वाटतं. नाटकाच्या मुहूर्ताआधी प्रसादने नाट्यसंहितेचा संपूर्ण अभ्यास केला असायचा. नाटक जरी माझ्या आवडीचं असायचं तरी ते उभं करायची तयारी प्रसादची असायची. नेपथ्याची आखणी, प्रत्येक पात्राचं रंगभूमीवरचं दिसणं, त्याची रंगभूषा, वेशभूषा यांची चित्रं त्याने स्वतः काढून ठेवलेली असायची. ती पात्रांना आणि रंगमंचामागील रंगकर्मींना तो द्यायचा. प्रकाश आणि ध्वनिव्यवस्थेसाठी तो त्या सर्वांना अखेरच्या पाच तालमींना बोलवायचा. नेपथ्य मंडळी आणि व्यवस्था विकास म्हात्रे किंवा मुकुंद करी यांच्याकडे असायची. रंगभूषा गोविंदराव यांच्याकडे, प्रकाशयोजना पाटील यांच्याकडे आणि ध्वनिव्यवस्था कामत यांची असायची.

हे सर्व लिहिताना मी पुन्हा जुन्या हृद्य आठवणींत शिरले. त्या सर्व कशा पुन्हा जिवंत झाल्या. इतक्या वर्षांचा माझा तो सारा नाट्यप्रवास मी पुन्हा नव्याने अनुभवला.

■ डॉ. प्रज्ञा प्रसाद पाठारे
prajnya11@gmail.com






# प्रसाद पाठारे

prasadppathare@gmail.com


## ही रेती

गोंदुन घेते ही रेती गाभण मातीचा ठसा
हसत स्वीकारून मनी येथल्या भिन्न मतींचा वसा!

वाळुत आता परकी हिरवळ, परक्या प्रथा
मरूभूमीवर उंची इमारतींचा जथा
जगी निनादे त्यांची ही लखलखती कथा

विप्लवतेचा नवीन इतिहासच हा घडला जसा
गोंदुन इथल्या रेतीवर गाभण मातीचा ठसा!

नकळत रुजल्या व्यवहारी पाश्चात्त्य पद्धती
अन् अंकुरली ऋजुतेची पौर्वात्य संस्कृती
या साऱ्यांसह अवचित रुळल्या स्थानिक रीती

दिशा-दिशांतिल सजीवतेला मिळे किनारा असा
हसत स्वीकारून मनी येथल्या भिन्न मतींचा वसा!

## सांभाळ रे राजा

ओॲसिसच्या वाड्या
आज त्याच वाळूवर
सांभाळ रे राजा ...

एक देश आहे हा
आता होतो आहे
सांभाळ रे राजा ...

तेलखाणी ना येथे
मग परकी संपत्ती
सांभाळ रे राजा ...

होता कधि मानवता
पण आसमंत आता
सांभाळ रे राजा ...

आवरा जरा आता
आवेश प्रवेश नको
सांभाळ रे राजा ...

भवती वाळवंट भटक्यांचं
झालं जाळं इमारतींचं.

आधिच्या सात राजवटींचा
हा पाश्चात्त्य बनावटींचा

तरिही हवेच जीवन शाही
येऊ द्या कुठुनही कशीही

मसुदा इथे सात धर्मांचा
धर्मांध अघोरी कर्मांचा

हा देखावा ऐश्वर्याचा
घातक शक्तींचा कलहाचा!





# नाट्यवेडा अवलिया

■ नीलेश देशपांडे

Show must go on... हे वाक्य ज्याच्या जीवनाचे सार आहे, असा दुबईच्या मराठी रंगभूमीवरील एक नाट्यवेडा अवलिया म्हणजेच नीलेश देशपांडे! दुसऱ्या महायुद्धाच्या काळात गाजलेले हे वाक्य, आज २१व्या शतकातही उदाहरण म्हणून दिले जाते. कितीही अडचणी आल्या तरी हाती घेतलेले कार्य अर्धवट टाकायचे नाही, ते कसेही करून तडीस न्यायचे अशी शिकवण देणारे हे वाक्य अनेकांच्या आयुष्याचे मर्मस्थान आहे. अशा व्यक्तींपैकी एक व्यक्ती म्हणजेच नाट्यवेडा अवलिया नीलेश देशपांडे!

नीलेशच्या आयुष्यातही असाच कठीण प्रसंग आला होता! दुबईत आल्यानंतर श्रीकांत राळे दिग्दर्शित 'तीन पैशांचा तमाशा' हे मोठे नाटक चालू होते. तीन महिने प्रॅक्टिस चालू होती, आपला व्यवसाय सांभाळून प्रत्येकजण मेहनत घेत होता, त्यामुळे कमिटमेंट होती आणि म्हणूनच वडील गेल्याच्या पाचव्या दिवशी तो प्रॅक्टिसला गेला आणि



त्यांच्या दहाव्याच्या दिवशी स्टेजवर ते नाटक पार पडले. कारण नीलेशला माहीत होते की बाबांना कमिटमेंट मोडलेली आवडली नसती. कारण 'शो मस्ट गो ऑन' ही तर त्यांची शिकवण होती आणि आता तर नीलेशच्या आयुष्याची ती Tag Line झाली आहे. खरंच एका मुलाने आपल्या वडिलांना वाहिलेली एक आगळीवेगळी तिलांजली होय!

थिएटर माझे पहिले प्रेम आहे असे आवर्जून सांगणारा, वयाच्या सातव्या वर्षांपासून रंगभूमीशी नाते जुळलेला, बालनाट्य, राज्यनाट्य, कामगार कल्याण केंद्रस्पर्धा अशा अनेक ठिकाणी भाग घेऊन पुरस्कार मिळवणारा, नाट्य शिबिरांना उपस्थित राहून ज्येष्ठ कलाकारांकडून बरेच काही शिकणारा एक मराठी मुलगा! जन्म, बालपण, शिक्षण सर्व डोंबिवलीत झालेल्या ह्या मुलाने केमिकल इंजिनीअरिंगमध्ये डिग्री घेतली असून पुण्याच्या कॉलेजमधून management स्टडीजमध्ये मास्टर्स केले आहे. गेली ११ वर्षे तो दुबईत असून पहिली सहा वर्षे त्याने जॉब केला आणि त्यानंतर त्याने पार्टनरशिपमध्ये chemical trading distribution चा स्वतःचा व्यवसाय सुरू केला.

शाळा-कॉलेजपासूनच त्याला थिएटर आणि म्युझिकची आवड होती. त्यामुळे हार्मोनियम आणि कीबोर्डचे शास्त्रोक्त शिक्षण त्याने घेतले आहे. त्याचे स्वतःचे दोन स्वतंत्र ऑर्केस्ट्राज होते. एक मराठी आणि एक हिंदी! लहानपणी आईवडिलांनी दिलेले प्रोत्साहन आणि आता सर्वार्थाने साथ देणारी सहचारिणी अस्मिता या सर्वांच्या सहकार्यामुळे तो यशाचे एकेक शिखर काबीज करत आहे.

अशा प्रकारे बालवयातच रंगभूमी आणि थिएटरशी एकरूप झालेला, त्यांनाच आपले जीवन मानणारा नीलेश जेव्हा दुबईत प्रथम आला, तेव्हा परदेशात आल्यानंतर प्रथम सर्वसाधारण ज्या काळज्या असतात त्याऐवजी याला सर्वांत मोठी काळजी होती ती दुबईत रंगभूमी आहे का, तिथे थिएटर आहे का! राहत्या घराचा शोध घेण्याऐवजी तो शोध घेत होता की इथे नाटक कोण करतात याचा!

दुबईतील त्याचा आत्तापर्यंतचा नाट्यप्रवास, त्या प्रवासात आलेले विविध अनुभव, विविध कलाकृती सादर करताना त्यातून तो काय शिकला, कलाकार ते दिग्दर्शक आणि नाट्यकृती ते संगीत कलाकृतीपर्यंत त्याने सादर केलेले मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील प्रयोग आणि शेक्सपिअरच्या १००व्या पुण्यतिथी निमित्ताने ब्रिटिश कौन्स्युलेट आणि ग्लोबल थिएटर यांनी सादर केलेल्या 'रोमिओ ज्युलिएट' या नाटकात काम करायच्या मिळालेल्या संधीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेले अनुभव, या सर्वांचे वर्णन वाचूया स्वतः नीलेशच्या शब्दांत!

Theatre has always been my first love. त्याच्याशी संबंधित कुठलीही ॲक्टिव्हिटी करायला मनापासून आवडतं. वयाच्या सातव्या-आठव्या वर्षांपासूनच थिएटरशी कनेक्ट झालो. अनेक बालनाट्य स्पर्धा, शिबिरं अटेंड केली. नंतर राज्य नाट्य स्पर्धा कामगार कल्याण केंद्र स्पर्धांमध्येही भाग घेतला. भारतात असताना बऱ्याच ग्रुपबरोबर काम करायची संधी मिळाली.

नेहमीच ह्या वातावरणात राहिल्यावर दुबईत आलो

तेव्हा तसंच एक्सपोजर मिळेल का हा प्रश्न होता. इथे आल्यावर जेव्हा नीटशी राहायची सोय पण झाली नव्हती तेव्हा इथे नाटक कोण करतं हे आधी शोधलं. महाराष्ट्र मंडळाच्या कमिटी मेंबरला कॉन्टॅक्ट केल्यावर त्यांच्याकडून सुषमा शिंदेंचा नंबर मिळाला. त्या तेव्हा 'आई रिटायर होते' करत होत्या. फोनवरच बोलणं झालं. तेव्हा त्या म्हणाल्या, की तुझा आवाज खूप आवडला. दहा दिवस आधीच एका रोलची गरज होती तरी तू बॅकस्टेजला मदत करशील का? आणि मी प्रॉपर्टी आणि बॅकस्टेज सपोर्ट बघायला लागलो. त्यातल्या एकाला अचानक कामानिमित्त जावं लागलं आणि तो रोल मला मिळाला. पहिल्याच रिहर्सलला सगळ्यांकडून खूप ॲप्रिसिएशन मिळालं. As an actor recognition मिळालेलं हे पहिलं नाटक असल्यामुळे its very close to my heart.

दुसरं नाटक होतं 'डॉक्टर तुम्ही सुद्धा'. ह्यात पण प्रॉक्सी करताना काम आवडलं आणि सुरेश पवारचा रोल मिळाला. जितके मेन रोल लक्षात राहिले तेवढाच सुरेश पवारचा पण राहिला. वेगळी शेड करायला मिळाली, वेगळं काहीतरी दाखवता आलं.

'समोरच्या घरात' हे मेन रोल असलेलं पहिलं नाटक. मी नेहमी कॉमेडी आणि फार्स करायचो. हे सस्पेन्स थ्रिलर होतं. थोडं टेन्शन होतं कारण ह्या genre चं पहिल्यांदाच करत होतो. पण हा रोलही ॲप्रिशिएट झाला. ह्या नाटकाचे दोन प्रयोग झाले. 'केस नं. ९९' हे माझं पर्सनल फेवरेट आहे. ह्या रोलला निगेटिव्ह विथ कॉमेडी छटा होती. आधी माझं कास्टींग मेन रोलसाठी झालं होतं; पण नंतर मी इन्स्पेक्टरचा रोल केला आणि पुन्हा एकदा वेगळं काही तरी करून लोकांना एंटरटेन करायला मिळालं.

'मी लाडाची मैना' हा वग होता. ह्यात मेन रोल करणारा लास्ट मिनिटला येऊ शकला नाही. त्यामुळे तीन रोल केले होते, जे फक्त तीन दिवसांत बसवले. मेन रोल – 'सोकाजी' आणि बाकी दोन 'प्रधानजी' आणि गवळणीमधली 'मावशी'. अर्धे सीन तर प्रॉम्प्टिंगवर केले कारण इतक्या कमी वेळात पाठांतर होणं अशक्य होतं. प्रकाश केळकरनी ह्यात मला उत्तम साथ दिली. 'घेतलं शिंगावर' हे राळेंबरोबर केलेलं पहिलं नाटक. 'तीन पैशांचा तमाशा' हे खूप मोठं प्रोजेक्ट होतं. तीन महिने रिहर्सल्स केल्या होत्या. कमिटमेंट होती त्यामुळे बाबा गेले असूनही पाचव्या दिवशी रिहर्सलला होतो आणि दहाव्याच्या दिवशी प्रयोग केला. खूप कठीण होतं माझ्यासाठी; पण दादांना कमिटमेंट मोडलेली कधीच आवडली नसती. 'मेल्या आईचा चहा' हे मी डायरेक्ट केलेलं पहिलं नाटक. वेगळा विषय होता. It was a black comedy. And this play to like my 1st baby. ह्याच्या नंतर '1 BHK' हे नाटक केलं. 'महाभारताचे उत्तर रामायण' हे पण माझं अतिशय आवडतं नाटक आहे. मी हे १९९३ पासून करतोय. आजही सगळे डायलॉग पाठ आहेत. २० वर्षांनी डायरेक्ट आणि ॲक्ट करायला मजा आली. अमेझींग टीम वर्क आणि को-ऑर्डिनेशनमुळे खूप ॲप्रीशिएट झालं.

'सारं कसं शांत शांत' हे डायरेक्ट आणि ॲक्ट दोन्ही केलं. ह्या वेळेस नवीन लोकांबरोबर काम करायला



मिळालं. पुलंचं इतकं जुनं नाटक बसवून लोकांना एंटरटेन करणं एक चॅलेंज होतं. पण चांगल्या टीममुळे तेही शक्य झालं.

'घाशीराम कोतवाल'च्या अबुधाबीमध्ये रिहर्सल असायच्या. छोटा रोल होता; पण वेगळ्या genre चं नाटक करायला मजा आली. 'मीटिंग' हे शंकर पाटील ह्यांच्या कथानकावर केलेली एकांकिका होती. ह्यात मी शंकर अण्णांचा रोल केला होता.

'ब्रह्मचारी' हे महाराष्ट्र मंडळासाठी केलेलं पहिलं दोन अंकी नाटक – as a director and actor. क्लासिक नाटक होतं त्यामुळे जरा टेन्शन होतं आणि कुठलाही रेफरन्स न

बदलता हे करायचं होतं. ह्या नाटकात बऱ्याच टेक्निकल गोष्टी होत्या. Again it was a good experience. 'धन्य ती मातृभेट' आणि 'तुका झालासे कळस' ही दोन्ही नाटकं मुलांकडून करून घेताना खूप काही शिकायला मिळालं.

'मदारी' हा एक स्टेपींग स्टोन होता. वेगळं काहीतरी करून नेक्स्ट लेवलला जायचं होतं. कारण आत्तापर्यंत फक्त लिमिटेड मराठी क्राऊडसाठीच काम केलं होतं.

'Short & Sweet' ही जगातली सगळ्यात मोठी शॉर्ट प्ले कॉम्पिटीशन आहे जी worldwide conduct होते. ह्यात आम्ही 'मदारी' हे हिंदी नाटक केलं होतं आणि 1st time in the history regional language चं नाटक फायनलपर्यंत गेलं. 'मदारी'ला सहा नॉमिनेशन्स मिळाली. ज्यात मला Best actor आणि Best director चं नॉमिनेशन होतं. 'मदारी'मुळे पूर्णपणे वेगळ्या सर्कलमध्ये गेलो आणि नेटवर्क वाढलं. पहिल्यांदाच कम्फर्ट झोन ब्रेक करून काम केलं.

'मदारी' परत एकदा 'SIKKA' Art Fair मध्ये परफॉर्म करायची संधी मिळाली. Which was again a completly new & different experience. 'मदारी' करत असतानाच 'Romeo + Juliet' मिळालं. ह्या play मुळे international level वर काम करण्याची opportunity मिळाली. शेक्सपीअरच्या '400th डेथ ॲनिवर्सरी'साठी ब्रिटिश कॉन्सुलेट आणि ग्लोबल थिएटरनी मिळून हा प्ले केला होता. पहिल्यांदाच 'Promenade Theatre' एक्सपीरियन्स केलं. ऑडीयन्स-बरोबर डायरेक्ट इंटरॲक्शन होतं. 'Romeo + Juliet' मध्ये मी 'Lord Montaque'चा रोल केला होता. पहिलंच इंग्लिश नाटक होतं. ते पण शेक्सपीअरचं. त्यामुळे इनिशीयली टफ जाईल असं वाटलं होतं; पण वेगवेगळ्या नॅशनॅलिटीजच्या कलाकारांबरोबर आणि ब्रिटिश डायरेक्टरबरोबर काम करताना मजा आली. बरंच काही शिकायलाही मिळालं. सगळ्यात महत्त्वाचं नाटकासाठी लागणारं 'परफेक्ट-प्लॅनिंग' शिकलो. ह्या प्लेसाठी दुबईमधल्या वेगवेगळ्या थिएटरमधल्या नावाजलेल्या कलाकारांची निवड करण्यात आली होती आणि त्यात मला पण कन्सिडर केलं ही माझ्यासाठी खरंच एक प्राऊड मोमेंट होती.

आमच्या सगळ्या ॲक्टिव्हिटीज बघून लोकल थिएटर wanted to work with us. त्यातूनच 'हसी के रंग'चा प्रोजेक्ट मिळाला. ह्यात आम्ही दोन हिंदी प्ले केले- 'मेल्या आईचा चहा' translated as 'ए माँ' आणि 'महाभारताचे उत्तर रामायण' as 'महाभारत एक चीरहरण'. हा आमचा पहिलाच कमर्शिअल प्रोजेक्ट होता आणि पहिल्यांदा करत असूनही खूप चांगला response मिळाला. ह्याचे आम्ही सहा प्रयोग केले. दोन्ही नाटकांत ॲक्ट पण केलं आणि डिरेक्ट ही केली होती. 'हसी के रंग'च्या यशामुळे अजून एक प्रोजेक्ट मिळाला आहे जो ऑक्टोबर २०१६ मध्ये दिवाळीच्या आसपास execute हाईल.

फिल्म्सबद्दल नेहमीच कुतूहल होतं. फिल्मसाठी लागणारं प्लॅनिंग execution सगळंच वेगळं असतं हे 'माझी बँक'च्या प्रोसेसमध्ये लक्षात आलं. ही १७ मिनिटांची फिल्म आम्ही साधारण चार विकएंडस्ना available resources आणि available locations मध्ये शूट केली आहे. नवीन अनुभव असला तरी सगळ्यांनी शंभर टक्के दिलं, शक्य होतं ते सगळं केलं. बरेच technical issues होते; पण त्याच्यामुळेच Film making चा कोर्स करायचं डोक्यात आलं. तीन महिन्यांच्या कोर्सनंतर लक्षात आलं कुठे काम करायला हवं आहे. Next project नक्कीच वेगळं काहीतरी असेल.


ऑक्टोबरमध्ये '48 Hrs film competition'साठी शॉर्ट फिल्म करतानाही आम्हाला ह्याचा नक्की उपयोग होईल.

म्युझिकची आवड असल्यामुळे तेही शांत बसू देत नव्हतं. त्यातूनच 'Malhar chair'चा फाउंडर मेंबर बनायची संधी मिळाली. सगळे म्युझिक लव्हर्स एकत्र येऊन फॉर्म केलेला हा ग्रुप आहे. आम्ही 'जश्ने', 'अवध', 'द्रौपदी', 'ओ गंगा', 'हाय अक्तरी', 'रुहे इश्क', 'बेगम अख्तर' असे म्युझिकल प्रोग्रॅम केले आहेत. ह्यात माझं as an artist पण participation होतं.

हे सगळं करताना जसं appriciation मिळालं तशी कधी निंदाही झाली but it all helped me to grow as an actor, direction and as an individual.

ही सगळी माझ्यासाठी एक Learning Process आहे. अजूनही खूप काही शिकायचं बाकी आहे आणि भरपूर काम करायचं आहे...

▪ नीलेश देशपांडे
nilesh@starchemfze.ae



# दुबईतील वाचन कट्टा

**१९७८** चा काळ! दुबईची ओळख म्हणजे स्मग्लर्सचा देश, बायकांना राहायला सुरक्षित नाही, प्यायला पाणी मिळत नाही, नोकरीचे आमिष दाखवून एजंट लोकं इथे फसवतात. समज-गैरसमज! पण तरीही आखातात सापडलेल्या तेलामुळे इथं देशाची प्रगती सुरू झाली, नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या. मेहेनत करील त्याला पैसे मिळू लागले आणि भारतीयांचा ओघ भविष्याची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी इथे वाहू लागला. थोडीफार आपली मराठी लोकंसुद्धा मोठे धाडस करून देशाच्या बाहेर पडू लागली.

७८ मधील दुबई आणि आता २०१६ मधील दुबईत जमीन-आस्मानाचे अंतर होते. लांबवर पसरलेल्या रणरणत्या वाळवंटाशिवाय तिथे काही दिसतच नव्हते. शेअर टॅक्सी किंवा अब्रा यांच्याशिवाय वाहतुकीचे साधन नव्हते, बसेस आणि मेट्रोज तर दूरची गोष्ट! कायदेकानून नव्हते, सरकारी नियम अस्तित्वात नव्हते आणि म्हणूनच अरबी लोकांशी जुळवून घेऊन एखादा व्यवसाय सुरू करणे म्हणजे खरोखर तारेवरची कसरत होती. पण आपल्या मराठी लोकांनी त्याकाळात इथे धाडस दाखवून आपला व्यवसाय सुरू करून यशस्वी केला. त्यातीलच एक धाडसी स्त्री म्हणजेच मधुरा विनय कुंटे!

एक बावीस-तेवीस वर्षांची भारतीय साडीतली मुलगी लाल रंगाच्या सुबारू स्टेशन वॅगनचे बॉनेट उघडून डोकावून काहीतरी करत होती. रस्त्यावरून जाणाऱ्या पोलिसाला वाटले गाडी बिघडली आहे आणि स्त्री एकटीच आहे, म्हणून त्याने पुढे जाऊन तिला विचारले काही मदत हवी आहे का? टॅक्सीतून जाणाऱ्या प्रवाशानेसुद्धा टॅक्सी थांबवून मदतीसाठी विचारले! गाडीमध्ये विविध भाषेतील क्राईम फिक्शन्स, थ्रिलर्स, कॉमिक्स आणि मॅगेझिन्स बघून दोघेही आश्चर्यचकित झाले. ती गाडी म्हणजे मधुरा कुंटे यांचे दुबईतील पहिले फिरते वाचनालय होते! त्याकाळात अशा प्रकारचे फिरते वाचनालय म्हणजे मधुराच्या धडाडी, चिकाटी, मेहेनतीचे उत्तम उदाहरण होय! या तिच्या कार्यात व्यवसायाने आर्किटेक्ट असलेल्या तिचा पती विनय यानेही तेवढीच साथ दिली. या वाचनालयमुळे दुबईतील साहित्यप्रेमींना आपली वाचनाची तहान भागवता आली.

मधुरा-विनयने १४ वर्षे आपले फिरते वाचनालय चालू ठेवले. त्यानंतर त्यांना भारतात परत जावे लागले. त्यांची मोबाइल लायब्ररी बंद झाली. परत जातानाही त्यांनी डिपॉझिट म्हणून ठेवलेल्या १५ दिरहमऐवजी प्रत्येक सभासदाला दोन पुस्तके दिली. आज इतक्या वर्षांनंतरसुद्धा लायब्ररी म्हटले की ठरावीक दिवशी, ठरावीक वेळी, ठरावीक ठिकाणी उभी असलेली लाल रंगाची सुबारू स्टेशन वॅगन आणि त्या गाडीच्या बाजूला उभी असलेली प्रसन्नवदना मधुरा आठवते! आणि म्हणावेसे वाटते 'झाले बहू, होतील बहू, परंतु तिजसम या!'

- मेघना वर्तक





# A Liberty On Wheels

**■ मधुरा कुंटे**

■ मुलाखतकार : डॉ. क्षमा लिमये

एका महाराष्ट्रीयन गृहिणीने आपल्या छंदाचे रूपांतर समाजकार्य केल्याचे समाधान मिळवून देणाऱ्या नावीन्यपूर्ण व्यवसायात केले आहे आणि तेही कुठे? तर परदेशात दुबईमध्ये! हा व्यवसाय म्हणजे फिरते वाचनालय (मोबाईल लायब्ररी) चालविण्याचा! इथे पुस्तकं अतिशय महाग मिळतात. ती अल्पखर्चात वाचकांना मिळून त्यांची वाचनाची हौस पूर्ण करण्याचा! ही गृहिणी आहे नागपूरची पूर्वाश्रमीची चित्रा जोशी! इथेच शिकली आणि लग्न होऊन सौ. मधुरा कुंटे होऊन दुबईला गेली. जवळ लायब्ररी सायन्सची पदवी होती आणि वाचनाची खूप हौस होती. मधुराचे पती विनय कुंटे हे आर्किटेक्ट आहेत. त्यांनाही वाचनाची दांडगी हौस. मधुरा दुबईला येईपर्यंत त्यांनी पुस्तकं आणि मासिकांवर खूप खर्च केला होता. मधुरा दुबईला आली तेव्हा तिथल्या पुस्तकांच्या किमती आणि त्यावर होणारा खर्च पाहून ती मनातून थोडी घाबरलीच आणि मग ह्या चतुर, कल्पक आणि दूरदृष्टी असलेल्या लायब्ररीयनच्या डोक्यातून फिरत्या वाचनालयाची कल्पना निघाली.

भारतामध्ये घरपोच वाचनालये बरीच लोकप्रिय आहेत. पण तसे इथे काढणे जवळजवळ अशक्यच आहे. तरीपण तिने सहा महिने घरपोच वाचनालय चालविले. इथे घरोघरी जायला बरेच जिने चढावे लागतात. त्यामुळे जसजशी सभासदांची संख्या वाढली तसतसे एवढे जिने चढून त्यांच्या घरी पुस्तके पोहोचविणे अशक्य झाले आणि तेव्हाच तिला

फिरते वाचनालय काढायची कल्पना सुचली. ह्या काळात कुंटे पतीपत्नी दोघांनी मिळून एक प्रश्नावली तयार केली आणि दुबईमध्ये सुमारे दोन हजार फ्लॅट्समध्ये ही प्रश्नावली व ही भरून पाठविण्याकरिता स्वतःचा पत्ता लिहिलेले व तिकीट लावलेले पाकीट दिले. परंतु फारसा प्रतिसाद मिळाला नाही. पण वाचकांच्या सवयी व आवडीनिवडी ह्यांची कल्पना आली. फिरते वाचनालय सुरू करायचे म्हणजे स्वतःच्या गाडीमध्ये पुस्तके ठेवून ती ठिकठिकाणी थांबवून वाचकांनी ठरावीक वेळी तिथे येऊन पुस्तके घेऊन जायची ही तिची कल्पना होती. त्याकरिता म्युन्सिपाल्टीची परवानगी आणि ड्रायव्हिंग लायसेन्स मिळविणे आवश्यक होते. त्यामुळे सर्वप्रथम तिने कार चालविणे शिकून ड्रायव्हिंग लायसेन्स मिळविण्याचा प्रयत्न केला.

दुबईला ड्रायव्हिंग लायसेन्स लवकर मिळत नाही. चार-पाच प्रकारच्या टेस्ट्स द्याव्या लागतात. अनेक समस्यांना तोंड देत देत ते तिने मिळविले. नंतर मग दुबई आणि म्युन्सिपाल्टीकडून आणि मिनिस्ट्री ऑफ इन्फर्मेशनकडून ह्या फिरत्या वाचनालयाचा परवाना मिळविण्याकरता तिने प्रयत्न केला. इथे अशा लायब्ररीची कन्सेप्टच नवी आहे. त्यामुळे त्यांना ते समजावून सांगणे कठीण गेले. इथे नॅशनल कौन्सिलची, इंडियन असोसिएशनची आणि म्युनिसिपल लायब्ररी अशी अगदी तीन-चार वाचनालये आहेत आणि त्यांचाही फारसा फायदा वाचकांना मिळत नाही. लायब्ररी म्हणजेसुद्धा एक व्यापारच असे समजून त्यांनी तिला Mobile trading in books and magazines ह्याकरिता परवाना दिला. तो मिळाल्यावर तिने एक स्थानिक भागीदार घेतला. इथे कोणताही व्यवसाय सुरू करायचा तर असा भागीदार घेणे आवश्यक असते आणि त्याची ५१ टक्के भागीदारी असते. तो बाकी काही कामं करीत नसला तरी लायसेन्स रिन्यु करण्याचे जे थोडे कटकटीचे काम आहे ते तो करतो. त्याला ते सहज शक्य असते.

दुबई शहरातील वेगवेगळ्या भागांमध्ये ठरलेल्या ठिकाणी, ठरलेल्या वारी व ठरलेल्या वेळी मधुरा आपली लाल रंगाची फियाट गाडी घेऊन जाते. पुस्तकं आणि मासिकं ती आपल्या गाडीमध्ये आणि डिकीमध्ये ठेवते. डिकीमध्ये एक इलेक्ट्रिक लाईट लावलेला असतो. त्या लाईटमध्ये पुस्तकं देण्याघेण्याचे व्यवहार ती अतिशय कौशल्याने व झटपट करते. प्रत्येक वाचकाला आठवड्यातून दोनदा दोन पुस्तके मिळू शकतात व त्याकरिता त्याला २० दिरहॅम्स वर्गणी आहे. डिपॉझिट म्हणून १५ दिरहॅम्स आहेत. अलीकडे पुस्तकांच्या किमती वाढलेल्या असल्या तरी गेली बारा वर्षे ती एवढीच वर्गणी आकारतेय. त्यामध्ये तिने वाढ केली नाही हे विशेष!

घर, संसार सांभाळून तिला हा व्याप सांभाळावा लागतो. हा ताप तिच्या पतीला उपद्व्याप तर वाटत नाही ना, त्यांच्याकडून कितपत सहकार्य मिळतं? असं मी जेव्हा तिला विचारलं, तेव्हा ती चटकन् म्हणाली, ''१०० टक्के को-ऑपरेशन मिळतं. त्यांच्या सहकार्यामळे आणि प्रोत्साहनामुळेच मी हे काम करू शकते.'' पुस्तकांची गाडी घेऊन घराजवळ असलेल्या करामा विभागात मधुरा दोन दिवस जाते व इतर दिवशी बाकीच्या ठिकाणी विनयच जातात. तिची ही गाडी दुबई भागात बऱ्याच ठिकाणी संध्याकाळी ६ ते ९ पर्यंत सभासदांच्या संख्येनुसार कुठे अर्धा तास तर कुठे फक्त पंधरा मिनिटे अशी असते. काही ठिकाणी मात्र एक तासभर गाडी उभी असली तरी तिचे सभासद सारखे येत असतात.


घरपोच वाचनालयाच्या वेळीसुद्धा घरपोच पुस्तके पोहोचविण्यात विनयने खूप मदत केली होती आणि पुस्तकांना कव्हर्स घालणे, नंबर्स घालणे वगैरे तर तेच तिच्यापेक्षा जास्त करतात. मासिकं आणि पुस्तकांमध्ये लायब्ररीचे नियम व माहितीचे कागद तसेच या लायब्ररीविषयी इतर मासिकांतून किंवा वर्तमानपत्रांतून आलेल्या मजकुराच्या फोटोप्रती लावण्याची कल्पना त्यांचीच आहे.

'धूम्रपानाविरोधी लेखाच्या फोटोप्रती लावण्याची कल्पना बहुधा त्याचीच असावी', असे म्हणताच ती म्हणाली 'अर्थात ती त्यांचीच आहे. त्यांचे कार्यालय स्मोकलेस करण्यात ते यशस्वी झाले आहेत. स्मोकलेस दुबई करण्याचे त्यांचे स्वप्न आहे. ते स्वतः स्मोकिंग कधीच करीत नाहीत. पण दुसऱ्यांनी ओढलेल्या सिगारेटच्या ह्या धुराचे दुष्परिणाम त्यांना सहन करावे लागले. दुसऱ्यांवर अशी वेळ येऊ नये म्हणून अशा प्रती ते मासिकांमधून लावतात. विक्रमादित्य आणि हर्षवर्धन ही तिची दोन हुशार आणि चुणचुणीत मुलं अजून लहान आहेत. त्यांचा ह्या कामात काही त्रास होतो की ते मदत करतात असं विचारलं तेव्हा ती म्हणाली होती की ह्यांच्यामुळे तिच्या कामाला कधी कधी मर्यादा पडतात. पण त्यातूनही मार्ग निघतात आणि त्यांनी आजपर्यंत ती अगदी लहान असतानासुद्धा लायब्ररीचे एकही पुस्तक फाडले नाही. एखादे आवडलेले पुस्तक वाचले तरी ते वाचताना ती अतिशय काळजीपूर्वक वापरतात ही मदतच म्हणायची. मुलं अगदी लहान असताना आणि मधुराच्या वेळी गरोदर असताना मात्र हा सर्व ताप विनयनीच सांभाळला. पहिला मुलगा तान्हा असताना त्याला ती प्रॅममध्ये घेऊन जात असे पण तो जेव्हा प्रॅममध्ये राहीनासा झाला तेव्हा त्याला घरीच ठेवावे लागे. त्याला आणि नंतर दुसऱ्या मुलाला घरी


तीन वर्षांत इंकिंग इनोव्हेशन्सतर्फे रसिक वाचकांसाठी ३६हून अधिक पुस्तके प्रकाशित

## रुचीच्या वाचकांसाठी दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

एक दिवा तेजाचा, एक दिवा उत्कर्षाचा, एक दिवा ज्ञानाचा, एक दिवा वाचनाचा!




**खास सवलतीच्या दरात**



इंकिंग इनोव्हेशन्सने सामाजिक बांधिलकी जपून आरोग्यविषयक, वैद्यकिय, राजकीय, वाईल्ड लाईफ तसेच मनोरंजक विषयांचे विविध पैलू उलगडणारी अनेक पुस्तके वाचकांसाठी प्रकाशित केली आहेत.

INKING INNOVATIONS

# इंकिंग इनोव्हेशन्स

India Printing House, Ground Floor, 42, G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400 031
Tel: +91 22 2412 2755 • Email : anand@inkinginnovations.com • Website : www.inkinginnovations.com

संध्याकाळी सांभाळण्याऐवजी लायब्ररी सांभाळणं विनय पसंत करीत असत. पण जेव्हापासून मुलं शाळेत जाणारी झाली तेव्हापासून मात्र तीच जास्तीत जास्त काम करते. वेगवेगळ्या भागात गाडी उभी करून एकटीने पुस्तकं देताना भीती वाटली का? किंवा लोकांकडून काही त्रास झाला का? असं विचारलं असता ती म्हणाली की, इथले लोक साधारणपणे स्त्रियांना मानाने, आदराने वागवतात. तरीपण हेरॉल्ड रॉबीनची पुस्तके आहेत का ही चौकशी करण्याच्या निमित्ताने दोघंतिघं दोन-तीन वेळा तिच्या लायब्ररीजवळ आले होते. ह्या पुस्तकांना इथे बंदी आहे त्यामुळे ही पुस्तके ती ठेवतच नाही. त्यांनी तिला ती पुस्तके देऊ केली होती. परंतु तिने ही फेकून देईन सांगताच ते निघून गेले. पूर्वीची तिची गाडी थोडी वेगळ्या प्रकारची म्हणजे समोर डिकी आणि मागे इंजिन अशी होती. लायब्ररीच्या जागेवर ती डिकी उघडून उभी राहिली आणि आजूबाजूला दोन-चार सभासद दिसले की, तिथून जाणाऱ्यांपैकी काहींना गाडी बिघडली आहे की काय ही शंका येऊन नको एवढी मदत करायला लोक यायचे. एकदा तर पोलीससुद्धा येऊन चौकशी करून गेला. ती मोटार ड्रायव्हिंगच्या क्लासमधली काही माहिती देतेय असं काहीजणांना वाटून ते तिथे चौकशी करायला आले होते. ती गाडी आता जुनी झाल्यामुळे आणि वाचनालयाचा पसारा वाढल्यामुळे तिने आणखी दुसरी एक गाडी घेतली आहे. त्या लोकांमध्ये तिचे वाचनालय तसे लोकप्रिय झाले आहे. किंबहुना ह्या नावीन्यपूर्ण वाचनालयामुळे तिथले खूप लोक तिला ओळखू लागले आहेत.

सध्या तिच्या वाचनालयात ती २० इंग्रजी मासिकं आणि १२ हिंदी मासिकं घेते. मराठी आणि मल्याळम् भाषेतील काही निवडक मासिकं आणि पुस्तकंही ती मागवून घेते. जास्त मागणी असलेल्या पुस्तकांच्या आणि मासिकांच्या ती दोन दोन प्रती घेते. मुलांकरिता कॉमिक्स आणि एनीड ब्लॉयटनची पुस्तकंही ती ठेवते. तसेच खूपसे दिवाळी अंकही ती घेते. सध्या तिच्या वाचनालयात सुमारे ४००० पुस्तकं आहेत. शुक्रवारी वाचनालयाला सुट्टी असते तेव्हा त्या दिवशी जुनी झालेली काही मासिकं आणि पुस्तकं ती दोघं बाजारात विशिष्ट ठिकाणी विशिष्ट वेळेला कमी किमतीत विकतात. त्यालासुद्धा चांगला प्रतिसाद मिळतो.

तिचे वाचनालय सध्या दुबईमध्ये १५ ठिकाणी फिरते व एकूण सभासद सुमारे ५०० आहेत. त्यापैकी पुष्कळसे महाराष्ट्रीय आहेत. पण काही पाकिस्तानी, अरबसुद्धा आहेत.

बारा वर्षांच्या अनुभवामुळे कामाच्या पद्धतीमध्ये काही बदल करावे वाटले का असं विचारलं तेव्हा ती म्हणाली की, मासिकातील काही पानं विशेषतः खाद्यपदार्थांच्या कृती किंवा शिवणकाम, भरतकामाचा नमुना, स्वेटर्सच्या कृती इत्यादींची पानं काही वाचक फाडून घेतात असं आढळलं. त्यांनी ती पानं फाडू नये आणि त्यांना तर ती माहिती मिळावी म्हणून ती प्रत्येक पानाला ५० फिलर्स ह्याप्रमाणे दर आकारून त्या आर्टिकलची फोटोप्रत हवी असल्यास करून देते. एरवी हा दर प्रत्येक पानाला एक दिरहॅम म्हणजे दुप्पट आहे. ह्या सोईमुळे पानं फाडण्याचे प्रमाण पुष्कळ कमी झालं आहे. दुसरा बदल तिने पुस्तकाची कव्हर्स घालण्यामध्ये केला.

लायब्ररीच्या काही जागांमध्येसुद्धा तिने बदल केला. पूर्वी वाचकांच्या सोयीकरिता एक-दोन ठिकाणी जरा आतल्या बाजूला ती पुस्तकांची गाडी उभी करीत असे. ती जागा तितकीशी सुरक्षित न वाटल्यामुळे तिथे तिने थांबू नये असा तिच्या मैत्रिणींनी तिला सल्ला दिला. त्यामुळे ती साधारणपणे गर्दीच्या ठिकाणी एखाद्या सुपर मार्केटसमोर असलेल्या कारपार्कमध्ये लायब्ररीकरिता जागा निवडते. तिथेसुद्धा जर कधी रात्री एकटं राहायची वेळ आली, सहसा तशी येतच नाही, सभासदांची ये-जा चालूच असते. पण आलीच तर तिच्या वाचक मैत्रिणी तिच्याशी गप्पा करीत थोड्या वेळ उभ्या राहतात. त्यांचाही वेळ तिथे छान जातो. भारतामध्ये वर्ष-दोन वर्षांनी हे भारतीय दुबई रहिवासी येतच असतात. तेव्हा यायच्या वेळी हे वाचनालयाची काय व्यवस्था करतात. त्याविषयी विचारले असता ती म्हणाली, की साधारणपणे ते दोघं आणि मुलं असे सर्वजण भारतामध्ये जात नाहीत. अगदी जरुरीचं काम असलंच तर दोघांपैकी एकजण जातं आणि दोन वर्षांनी सर्वांनी जाण्यापूर्वी ते त्यांच्या सभासदांना एक महिन्याची १६ पुस्तके देऊन जातात. ह्या व्यवस्थेवर त्यांचे नेहमीच वाचक खूष असतात.

वाचनालय आणखी वाढविण्यासंबंधी पुढचा काही प्लॅन आहे का हे समजून घेण्याकरिता प्रश्न विचारला असता ती म्हणाली की, सध्या तरी ह्यापेक्षा जास्त वाचनालय वाढवायचे नाही कारण मोठा मुलगा अकरावीत गेला की तिला काही वर्षांकरिता भारतामध्ये येऊन राहावं लागणार आहे. तिथे १८ वर्षांपेक्षा मोठ्या मुलांना राहाताच येत नाही आणि तशी शिक्षणाची सोयही नाही तेव्हा त्यावेळी एकट्या विनय कुंटे त्यांनाच हा व्याप पूर्णपणे सांभाळावा लागणार आहे. सध्याच्या वाचनालयातील कामसुद्धा तिला पुष्कळ बिझी ठेवते आणि भरपूर समाधान मिळवून देते.

■ मधुरा कुंटे

(डॉ. क्षमा लिमये यांनी १९९० मध्ये घेतलेली मधुरा कुंटे यांची मुलाखत 'लोकप्रभा'च्या सौजन्याने या अंकात देत आहोत)

madhuravinaykunte@gmail.com

# आध्यात्मिक दुबई

**शां**त, प्रसन्न मूर्ती, त्याहूनही शांत, हळुवार बोलणे, चेहेऱ्यावरील प्रेमळ भाव, असे दुबईतील एक वडीलधारे व्यक्तिमत्त्व म्हणजेच डॉ. किशोर निमखेडकर! बालवयातच अध्यात्माचे संस्कार त्यांच्यावर झाले आणि म्हणूनच व्यवसायाने डॉक्टर असूनसुद्धा अध्यात्माची बैठक लाभलेल्या डॉक्टरांचे मन आपल्या व्यवसायाइतकेच अध्यात्मातही रमते.

'अध्यात्माचा अभ्यास' हे जीवन सुखी करण्याचे अनुभव सिद्ध ज्ञान आहे. या ज्ञानाच्या साहाय्याने, आपल्या मानसिक जीवनातील गोंधळ थांबवून नीतिमत्तेचा पुरस्कार स्वतःच्या आणि समष्टी जीवनात करता यावा, यासाठी २००१ मध्ये डॉक्टरांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत दासबोध वर्गाची स्थापना केली. एक तपाहून अधिक काळ दर शुक्रवारी सकाळी नियमितपणे संपन्न होणारा दासबोध वर्ग म्हणजे साधकांना पर्वणीच होय! दुबईतील मराठी मनाला, समाजाला अध्यात्माची ओळख होऊन तुकोबांच्या उक्तीप्रमाणे 'आनंदाचे डोही आनंद तरंग' याची अनुभूती व्हावी, यासाठी डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली संत सोहळा, कीर्तन सोहळा, दासनवमी आणि संत कबीर समागम सोहळा आणि तुकाराम बीज सोहळा संपन्न झाला आणि दुबईच्या वाळवंटात टाळमृदुंगाचा गजर झाला. अध्यात्माची परंपरा पुढील पिढीपर्यंत पोचली जाऊन मराठी संस्कृतीचे जतन व्हावे यासाठी तत्पर असलेल्या डॉक्टर निमखेडकरांशी गप्पा मारल्या आहेत संजीवनी पाटील यांनी!

**– मेघना वर्तक**





# आध्यात्मिक डॉक्टर

## ■ डॉ. किशोर निमखेडकर

■ मुलाखतकार : संजीवनी पाटील

**जी**वनात आपण घडत असताना अनेक व्यक्ती आपल्या बरोबर वावरतात. मग ती आपली रक्ताची नाती असोत, मित्र मंडळी असोत किंवा अनोळखी व्यक्ती असोत. प्रत्येकातून आपण काही शिकत असतो. किंबहुना त्यांचा आपल्याला घडवण्यात बहुतांशी मोलाचा वाटा असतो.

माझ्या दुबईतील वास्तव्यात अशी अनेक व्यक्तिमत्त्वं जी मला वेगळ्या प्रकाराने मार्गदर्शन करत राहिली, राहत आहेत आणि चांगलं माणूस म्हणून जगण्यासाठी मार्गदर्शक आहेत, त्यातील एक व्यक्ती म्हणजेच 'डॉ. किशोर निमखेडकरकाका!'

आज त्यांच्याशी गप्पा मारण्यासाठी मी त्यांच्या क्लिनिकला गेले. डॉ. काका गडबडीतच होते. अनेक पेशंट्स त्यांची वाट पाहत होते. ६७ वर्षांचे डॉ. निमखेडकर पण पेशंटची काळजी घेण्यासाठी त्यांची चाललेली धडपड मी खुर्चीत बसून पाहात होते. आलेले patients हे maximum labour class चे होते. पण प्रत्येकाला तेवढ्याच आत्मीयतेने त्यांचं मार्गदर्शन सुरू होतं. एवढ्या गडबडीतही त्यांनी मला भेटण्यासाठी वेळात वेळ दिला.

Al Murjan Clinic दुबईतील Alquoz येथे आहे. त्यातील डॉ. निमखेडकरांच्या consulting room मध्ये आम्ही बसलो.

***संजीवनी – डॉ. काका आपण कोणत्या वर्षी दुबईत आलात?***

डॉ. काका :– जन्म १९४८चा, ग्वाल्हेर येथे झाला. १९७९ पर्यंत भारतात पूर्ण शिक्षण झाले. ८७–८८ पर्यंत वास्तव्य रासल खैमा येथे होते. नंतर ८८–९४ पर्यंत England मध्ये. ९५ नंतर Dubai तच वास्तव्य आहे.

Al Murjan हे स्वतःचं क्लिनिक आहे. तेव्हापासूनच हीच practice आहे.

***संजीवनी – आपल्याला अध्यात्माची आवड कशी निर्माण झाली? आपण स्वतः डॉक्टरी पेशात असूनही अध्यात्मात इतकी प्रगती करावी असं केव्हापासून वाटू लागलं?***

डॉक्टर – आमची आई तिला लहानपणापासूनच भजन, कीर्तन यांची आवड असलेलं पाहिलं आहे. खरंतर आमची सांपत्तिक स्थिती lower middle class चीच होती. पण उच्च संस्काराची मौल्यवान जोड आम्हाला लाभली. घराजवळ नाथ महाराजांचं मंदिर होतं. भागीरथीबाईंचा गुरूमंत्र आईने घेतला होता. तिच्याबरोबर मी रोज देवळात जात असे.

महापतीनाथ महाराज यांचा मठ होता. १२ महिने कथा–कीर्तने तिथे होत असत. तिकडे आम्ही नेहमी जात असू.

***संजीवनी – आपल्या वडिलांचा आपल्या घडण्यात कसा वाटा होता?***

डॉक्टर – माझे वडील मी नववीत असतानाच गेले. त्यांचा सहवास मला फारसा लाभला नाही. पण ते उत्कृष्ट भूपाळी म्हणत असत. ते अकाउंटंट होते. त्यांना शिक्षणाची फार आवड होती. पण त्यांचे देहावसान झाल्याने आईनेच आमची काळजी घेतली आणि संस्काराने आम्हाला घडवलं.





***संजीवनी – दुबईमध्ये दासबोध वर्ग चालू करावा असं केव्हा वाटलं? किंवा इतकी उच्च कल्पना आपल्याला कशी सुचली?***

डॉक्टर – २००१ मध्ये मी महाराष्ट्र मंडळाचा प्रेसिडेंट होतो. त्याआधीच श्री. गिरीश शिरसाळकर, श्री. अविनाश जव्हारकर, श्री. अशोक काळे हे सर्व मधून मधून एकत्र येऊन दासबोध वाचून त्याचं चिंतन करीत असत. पण मलाही त्याची आवड असल्याने कराना येथे दर शुक्रवारी दासबोध वाचनाचं प्रयोजन केलं. यासाठी सर्वांचा सहभाग घेतला आणि श्री. नरगूड यांच्या घरी भेटण्यास सुरुवात झाली.

सहा–आठ महिन्यांनी श्री. दीपक ज्ञानाधीश आले आणि दासबोध संप्रदायातील त्यांच्या जुन्या अनुभवांची त्यांनी आम्हा सर्वांना माहिती दिली. समर्थ संप्रदायाची शिस्त– अनुशासन याची कल्पना देऊन ते कसं आयोजलं जावं याचं मार्गदर्शन केलं.

डॉ. देशमुखकाका हे मुळचे कोल्हापूरचे. त्यांचं शारजा येथे ज्ञायाधीशांकडे प्रवचन आयोजलं होतं. २० दिवस त्यांची प्रवचने चालू राहिली आणि आमच्या दासबोध वर्गाचा पाया मजबूत होण्यास सुरुवात झाली. त्यानंतर चार–पाच वर्षे डॉ. देशमुख येतच राहिले. १२ वर्षे आम्ही दासबोधाचं वाचन केलं. प्रत्येक समास वाचून त्याचं चिंतन अर्थ समजून घेणं हेच दासबोध वर्गाचं उद्दिष्ट आहे.

डॉ. देशमुखकाकांच्या नियमित होणाऱ्या मार्गदर्शनानेच दासबोध कसा वाचावा, कसा आत्मसात करावा आणि अनुकरणाने कसा समाजात पसरवावा हे उत्तमरित्या आम्ही सर्वजण जोपासत गेलो.

***संजीवनी – डॉक्टर आपण फक्त दासबोधच वाचता की...?***

डॉक्टर – नाही आम्ही दासबोध, मनाचे श्लोक, ज्ञानेश्वरी ह्या सर्वांचं पारायण करतो. जवळजवळ १२ वर्षे दासबोध वाचून मग ज्ञानेश्वरी चालू केली. अजूनही त्याचा अभ्यास चालूच आहे.

***संजीवनी – २०१० मध्ये झालेल्या संत सोहोळ्याने एक वेगळीच दिशा मिळाली का?***

डॉक्टर – हो. दुसरे विश्व साहित्य संमेलन चालू असताना त्यात संत सोहळा करण्याची कल्पना सुचली व ती खूपच सफल झाली. संत वाङ्मय सोहळा. त्यावेळेस संत ज्ञानेश्वर महाराजांची पुण्यतिथी होती.

त्यावेळेस संतगोविंदगिरी हे अध्यक्ष होते. सुनील चिंचोळकर, डॉ. शंकर अभ्यंकर अनेक संत मंडळी उपस्थित होती.

त्यानंतर कीर्तन सोहळा नरसोबाच्या वाडीतील गोखले गुरुजी, डॉ. शंकर अभ्यंकर या सर्वांची कीर्तने होऊन उत्तमपणे सोहळा झाला आणि कीर्तन म्हणजे काय हे आता समाजामध्ये दुबईतील मंडळींना समजले आणि उत्तम मार्गदर्शकही ठरले आणि अध्यात्माला उत्तम जोड मिळाली.

***संजीवनी – नंतर दासनवमीचाही सोहळा झाला?***

डॉक्टर – हो. दासनवमीच्या सोहळ्याला श्रीमती मंदाताई गंधे या प्रथमच परदेशात आल्या आणि आपल्या रोजच्या बोलीभाषेत आईच्या भाषेत आम्हाला अध्यात्म समजावून गेल्या.

याचवेळी समाजसुधारक डॉ. प्रकाश आमटे आले होते. त्यांनीही या सोहळ्याला भेट दिली.

***संजीवनी – 'तुकाराम बीज' हा कार्यक्रम आपण नुकताच आयोजित केला!***

हो. 'तुकाराम बीज'च्या निमित्ताने तुकारामांची गाथा याचं वाचनही दासबोध वर्गात केलं गेलं. तुकारामांची वचने,

त्यांचे अभंग यांचा वाचन, अर्थ याचा अभ्यास केला गेला आणि तुकाराम बीज सोहळ्याने सर्वांच्या मनात तुकारामांचे संस्कार–साध्या बोलीभाषेतूनच सर्वांपर्यंत पोहोचले. यासाठी डॉ. देशमुख, शहाबाजकर बुवा या मंडळींनी तुकोबांची भजने सादर केली.

***संजीवनी – अशी अनेक संतमंडळी दुबईसारख्या आखाती देशात येणं आणि ह्यांचं मार्गदर्शन आम्हा सर्वांना लाभणं हे सर्वांचं भाग्य घडवून येण्यात आपला खारीचा वाटा आहे.***

डॉक्टर – घडविणारा मार्गदर्शक कोणी असतो. जो समाजात हे सर्व जागृत ठेवतो. डॉ. शंकर अभ्यंकर, डॉ. देशमुख, डॉ. पठाण, कीर्तनकार जोशी, मिसेस जोशी ज्यांनी दासबोध इंग्रजीमध्ये लिहिला आहे. नाना दातार हे कॅनडातून आले होते. ज्यांनी Geeta for my grandson हे नातवासाठी गीतेचं मार्गदर्शक पुस्तक लिहिलेलं आहे. ही सर्व मंडळी समाजाला जागरूक करण्यासाठी परमेश्वराने बनवलेली व्यक्तिमत्त्वं आहेत.

***संजीवनी – डॉ. काका या कार्याचा मूळ उद्देश काय आहे?***

डॉक्टर – मुख्य उद्देश सामाजिक सेवा निःस्वार्थीपणे करणे; पण ते अत्यंत कठीण आहे. स्वतःचं जीवन सात्विक ठेवून हे गुण समाजात पसरविणे हाच त्याचा मुख्य हेतू आहे.

***संजीवनी – आपल्या पत्नी व कुटुंबाची दासबोधामध्ये किती involvement आहे?***

डॉक्टर – सौ. निमखेडकर या Gynacologist आहेत. त्यांच्या कुटुंबात लहानपणापासून मेहरबाबांचे अनुयायी आहेत. अहमदनगर येथे त्यांचे दरवर्षी जाणे होते. मेहरबाबांचा त्या कुटुंबाला पूर्वाप्रसाद आहे. संपूर्ण कुटुंब सात्विक आहे.

अध्यात्म आणि समाजसेवा याची चांगली सांगड आहे. अनेक गरजू लोकांना मेडिकल कँप, चेकअप फ्री करतात. महाराष्ट्र मंडळातील मंडळींना फ्री ट्रीटमेंट, अचानक मृत्यू झाल्यास सर्वतोपरी साहाय्य केले जाते. अबुधाबी येथे गरज असल्यास मदत कायम चालूच असते.

समाजात चांगले गुण वाढवणं आवश्यक आहे. अध्यात्मातून स्वतः सर्व आत्मसात करणं महत्त्वाचं आणि समाजाला उदाहरण द्यावे. एक व्यक्ती घडली तर– कुटुंब तयार होते. कुटुंब झाले की समाज तयार होतो आणि महाराष्ट्र तयार होतो. त्यासाठी अध्यात्म आणि समाजसेवा दोन्हींची गरज आहे.

मुमुक्षत्त्व आपल्यात आलं पाहिजे. वेळेनुसार कृती करणं, वेळेनुसार परिस्थितीला अनुसरून करणं, धर्म–जात–पंथ, अध्यात्म चिंतन करत ठेवले पाहिजे. एकच संप्रदाय–एकच गुरू–एकच चिंतन–एकाच गुरूमध्ये आपला भाव असावा आणि त्या विश्वासानेच तो दृढ करावा. म्हणजे जेथे–तेथे आपल्याला आपल्याच गुरूचे दर्शन होते, हीच अध्यात्माची गुरुकिल्ली आहे.

जसं रामदासांनी रामावर भाव ठेवला. जेथे–तेथे रामच दिसला. विठ्ठलातही रामच दिसत होता. ।। जसा भाव तसा देव ।।

जशी आईची भावना उदात्त असते तीच सर्व काम करून जाते.

हेच अध्यात्म हाच भाव नवीन पिढीला–मुलांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे दुबईतही संजीवनी पाटील यांनी चालू केलेल्या शाळेत वेळोवेळी संतांचे मार्गदर्शन केले जाते. निरनिराळ्या सत्पुरुषांना पाहून, चरित्र ऐकून त्यांचा आदर्श त्यांना ठेवता येईल.

***संजीवनी – तुम्ही भारतात याचं काही कार्य करता का?***

डॉक्टर – नाही. आमचं वास्तव्य इथे असल्याने असलेल्या कम्युनिटीमध्येच जागरूकता निर्माण करणं शक्य आहे. असलेल्या परिचित कुटुंबांमध्ये जितका प्रचार करता येईल त्याचा प्रयत्न चालू आहे.

संजीवनी – अध्यात्म आणि सामाजिक सेवा यांचं संगनमत करून आपलं आयुष्य निरपेक्षपणे कसं जगावं ह्याचं महत्त्वाचं मार्गदर्शन आज मला मिळालं! दर शुक्रवारी स्वतःच्या उद्योगातून वेळ काढून नियमितपणे ११.३० वाजता दासबोध वर्ग arrange करणं हेच leadership चं काम डॉ. निमखेडकर करत आहेत. आखाती देशांतही पैशांच्या छानछौकीमधून समाधानी, तृप्त आणि जमिनीवर पाय ठेवून करणारा विधाता आहे. प्रारब्ध हेच जीवनाचं सत्य आहे. हे सर्व आत्मसात करून कसं जगावं? समाजासाठी सर्व काही करावं ही उच्च भावना निर्माण करणारे आमचे गुरू–मार्गदर्शक डॉ. निमखेडकरकाका असल्याने आमची व पुढची पिढी नक्कीच उच्च विचारांची घडेल आणि आखाती देशांतही वैराग्याचा झेंडा उभारलेला राहील असा विश्वास आहे.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

■ डॉ. किशोर निमखेडखर
kishor555@hotmail.com









# परंपरा महाराष्ट्र मंडळ दुबईची...!

■ मेघना वर्तक

**प**रंपरा नात्यांची, परंपरा सौहार्दाची, परंपरा परदेशातील माहेरघराची!

महाराष्ट्र मंडळ, दुबई 'परदेशातील माहेरघर' असे सार्थ उपमा असणारे आपले मंडळ! आपल्या माणसांपासून, घरादारापासून, वर्षानुवर्षे दूर राहणाऱ्या मराठी माणसांना प्रेमाची सावली देण्याचे, मराठी मने जोडण्याचे कार्य हे मंडळ करत आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीत माहेराची परंपरा थोर आहे. माहेर म्हणजे मन मोकळे करण्याचे, रुसवेफुगवे करण्याचे, एकमेकांशी स्पर्धा केली तरी अखेर सामंजस्याने राहण्याचे हक्काचे ठिकाण! महाराष्ट्राच्या माहेराची ही परंपरा गेली ४२ वर्षे दुबईचे मंडळही जोपासत आहे.



परंपरेनुसार मंडळाचे नवीन वर्ष गुढीपाडव्याला श्रीसत्यनारायणाच्या पूजेने सुरू होते. नवीन कमिटी, नवे अध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार... नवी विट्टी नवा दांडू पण खेळ तोच! ह्याप्रमाणे निवड झालेली नवीन कमिटी एक वर्षासाठी मंडळाच्या कार्याची सूत्रे हाती घेते आणि अतिशय उत्साहाने मंडळाची परंपरा जोपासत पुढच्या वर्षी येणाऱ्या नवीन कमिटीच्या हाती सूत्रे सुपूर्द करते.

परंपरेप्रमाणे पुढचा कार्यक्रम म्हणजे गणेशोत्सव. मराठी संस्कृतीच्या परंपरेप्रमाणे, महाराष्ट्र मंडळाची स्थापना १९७३ साली श्री. नाना शहाणे यांच्या घरी श्री गणेशाच्या स्थापनेने झाली. या कार्यक्रमाचे स्वरूप घरगुती होते. पण हळूहळू दुबईत येणाऱ्या मराठी लोकांची संख्या वाढू लागली. घर अपुरे पडू लागले त्यामुळे गणेशोत्सवाच्या स्थानामध्ये बदल होऊ लागला. त्यानंतर 'इंडियन हायस्कूल'चे पटांगण, श्री. भारत नारायण यांचा व्हिला आणि आता 'सिंधी सेरिमोनियल हॉल' येथे गणेश उत्सव होतो. गणेशोत्सवाच्या स्थानामध्ये बदल झाला पण आजही पाच दिवसांचा उत्सव असतो. सर्वांनी एकत्र जमून केलेल्या सहस्रावर्तनांचा नादमधुर गजर वाळवंटाच्या आसमंतात भरून राहतो. मराठी मन महाराष्ट्राच्या मातीत पोहोचते. प्रतिष्ठापना, पूजा, आरती, प्रसाद-महाप्रसाद आणि विसर्जन ही प्रथा-परंपरा वर्षानुवर्षे जपली जात आहे .

ह्यानंतर येते दीपावली! भारतीय संस्कृतीचे प्रतीक! सनईच्या मंगलमयी सुरांमध्ये आकाश कंदील, रांगोळ्या, निर्मलतेची ग्वाही देणाऱ्या, संथपणे तेवणाऱ्या पणत्यांच्या सावलीमध्ये, 'दिवाळी पहाट' पासून कार्यक्रम साजरे होतात. लाडू, चिवडा, चकली, करंजी अशी फराळाची मेजवानी असते तर कधी महाराष्ट्रीयन पंचपक्वान्नाची पंगत बसते.

मनातील भावना, विचार व्यक्त करण्याचे, मराठी मनांपर्यंत पोहोचण्याचे साधन म्हणजे दिवाळी अंक! दीपावलीचा आनंद द्विगुणित करणारा, साहित्याच्या विविधांगाने नटलेला दिवाळी अंक म्हणजे वाचकांसाठी फराळाची जणू मेजवानीच! मराठी साहित्याच्या उच्च अभिरुचीचे प्रतिक असलेला दिवाळी अंक म्हणजे महाराष्ट्राची परंपरा! ही परंपरा दुबईचे मंडळ परदेशातही जतन करत आहे. मंडळाचा पहिला दिवाळी अंक १९८७ साली मेघना वर्तक यांनी संपादित केला. त्याकाळी मराठी मुद्रण दुबईत सहज उपलब्ध नव्हते .त्यामुळे हा अंक हस्तलिखिताच्या स्वरूपात काढावा लागला. माधुरी पारकर आणि चित्रा मेहेंदळे यांच्या सुवाच्य अक्षरात हा अंक प्रकाशित झाला. दिवाळी अंक म्हणजे फक्त जाहिराती असे स्वरूप न ठेवता स्थानिक लेखक-कवी यांच्या साहित्याला वाव देऊन अंक वाचनीय केला. त्यानंतर दिवाळी अंकाची ही परंपरा प्रत्येक वर्षी अतिशय उत्साहाने जोपासली जात आहे.

प्रत्येक वर्षी दिवाळीच्या कार्यक्रमाचे स्वरूप बदलते, पण त्यापाठीमागील प्रेम, एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा देण्याची ओढ, आनंद द्विगुणित करण्यासाठी दिवाळी अंकाची भेट ह्या सर्व रुढी-रीती सतत जपल्या जात आहेत. परदेशातही आपली परंपरा जोपासली जावी, पुढील पिढीपर्यंत वारसा पोचवला जावा म्हणून प्रत्येक कमिटी प्रयत्नशील असते.

ह्यानंतर खास स्त्रियांसाठी असलेला कार्यक्रम म्हणजे संक्रांतीचे हळदीकुंकू. 'तिळगूळ घ्या गोड बोला' असे म्हणत, एकमेकांना शुभेच्छा देत संक्रांत साजरी होते. येणारी प्रत्येक कमिटी, मराठी परंपरेत असलेले, परंतु आता सामाजिक परिस्थितीमुळे हळूहळू कालबाह्य होत असलेले, कधी मंगळागौर तर कधी भोंडला, कोजागिरी पौर्णिमा अशा प्रकारचे कार्यक्रम सादर करून विस्मृतीला उजाळा देते.

अशा या मुख्य सणांना जोडण्याचे कार्य करतात ते स्वर्गीय सुरांचा आनंद देणाऱ्या पंडित भीमसेन, पंडित जसराज, पंडित प्रभाकर कारेकर यांच्यासारख्या दिग्गज गायकांच्या मैफिली! हास्यविनोदाने रंगलेली मराठी रंगभूमीवरील व्यावसायिक नाटके, तसेच स्थानिक कलाकारांनी मेहनत घेऊन बसविलेली मराठी नाटके! इथे राहणाऱ्या लहान मुलांना आपल्या मातृभाषेची ओळख व्हावी आणि ओढ राहावी म्हणून उमा आणि श्रीकांत राळे यांनी सुरू केलेली बालरंगभूमीची परंपरा आजही सांभाळली जात आहे.

मराठी संतसाहित्याची परंपरा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. संतसोहळा, कीर्तन सोहळा, दासनवमी, तुकारामबीज सोहळा असे संतांच्या कार्याची महती सांगणारे सोहळे संपन्न करून, मराठी संस्कृती आणि साहित्याचे जतन करून हा आध्यात्मिक वारसा नवीन पिढीपर्यंत पोचवण्याची परंपरा महाराष्ट्र मंडळ सांभाळत आहे.

अशा प्रकारे गायनवादन, नृत्यनाट्य अशा विविध कलाविष्कारांद्वारे मराठी मनाला रिझविण्याची परंपरा गेली ४२ वर्षे मंडळ अव्याहतपणे जपत आहे.

अर्थात या प्रवासात परंपरेला आव्हान देणारी काही वादळे पण आली आणि तडेही गेले. पण अध्यक्ष, सहकारी, ट्रस्टी यांनी वादळांवर स्वार होऊन त्यास यशस्वीपणे तोंड दिले. या वटवृक्षाची मुळे एवढी खोलवर रुजली आहेत की तडे सांधले जाऊन परंपरा जोपासली गेली.

शेवटी परंपरा म्हणजे तरी काय? आपल्या पूर्वजांनी पिढ्यान्‌पिढ्या आलेल्या अनुभवांच्या मुशीतून निश्चित केलेली जीवनशैली म्हणजेच परंपरा! वर्षानुवर्षे ह्या जीवनशैलीचे पालन करत असताना, ज्या पध्दती पडल्या, त्यांनाच रुढी म्हणतात, त्यांनाच रीतिरिवाज म्हणतात!

मराठी संस्कृतीची थोर परंपरा आज परदेशात जपली जात आहे. अर्थातच परिस्थितीनुसार, कालानुरूप त्यात बदल केले पाहिजेत. परंपरा जोपासताना रीतिरिवाज, रुढी जपाव्या लागतात. पण रुढी जर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी जाचक असतील तर त्यात बदल केले पाहिजेत. परंपरा आणि रुढी यात एक धूसर रेषा आहे. ती समजून घेऊन परंपरा जतन झाली पाहिजे.

आज २१व्या शतकात बदलत्या कालानुरूप घराघरातून मुले परदेशात जात आहेत. जीवनाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन रुंदावत आहे. डबक्यातून बाहेर पडून, हजारो मैलांवरून जर आपण आपली संस्कृती पाहिली तर आपल्या संस्कृतीतील उणीवा लक्षात येतात. केवळ रुढीरिती आहेत म्हणून एखाद्या गोष्टीला चिकटून राहणे हे स्वतःच्या आणि समाजाच्या विकासासाठी घातक आहे आणि म्हणूनच त्यात बदल घडवण्याची आवश्यकता वाटते. जीवनात श्रद्धा हवी पण अंधश्रद्धा नको. रुढी, रीतिरिवाज हे अंधपणे पाळले जाऊ नयेत.

जसे गणेश मूर्तीचे विसर्जन हे नदीत, विहिरीत, समुद्रात होते; पण पर्यावरणाचा विचार करून विसर्जन बालदीत पाणी घेऊन केले तरी हरकत नसावी. दहीहंडी ही आपली परंपरा आहे. पण जर आता त्यात राजकारण शिरून त्याला बाजारी आणि घातक स्वरूप येत असेल, उंच उंच हंड्या लावून त्यात बालके अपंग होत असतील, मृत्युमुखी पडत असतील तर जोपर्यंत गोपाळांच्या सुरक्षिततेच्या योग्य योजना होत नाहीत तोपर्यंत दहीहंडीच्या उंचीवर मर्यादा घालणे योग्य! दीपावलीच्या दिवशी वाजवल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे पर्यावरण आणि ध्वनी प्रदूषण होते हे लक्षात घेऊन रिवाज बदलण्याची जबाबदारी आपली आहे. रुढीरीतींमध्ये समर्पक बदल करून परंपरा जपण्यातच शहाणपण आहे.

आज जेव्हा आपण परदेशात राहत आहोत तेव्हा हे मात्र सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे की आपण जिथे ज्या देशात राहतो त्या देशांच्या रितीरिवाजांचा आणि संस्कृतीचा योग्य तो मान ठेवला पाहिजे. त्यांची परंपरा बदलण्याचा अधिकार आपल्याला नाही. 'रमझान'मध्ये रोझा पाळणे ही त्यांची परंपरा आहे आणि या रिवाजाचा योग्य तो आदर ठेवला पाहिजे. आज दुबईत मूर्तिपूजा मान्य नाही, पण तरीसुद्धा येथील सरकारने सौजन्य दाखवून मंदिरासाठी जागा दिली, आपल्याला जे स्वातंत्र्य दिले आहे त्याचा अतिरेक होऊ न देणे हे आपले मराठी माणसाचे कर्तव्य आहे.

गेली ४२ वर्षे महाराष्ट्र मंडळ आपली परंपरा जतन करत आहे. बदलत्या कालानुसार, स्थलानुसार, स्वतःच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी घातक असलेल्या रुढी, रीतिरिवाज यांच्यात डोळसपणे बदल घडवला तर, मराठी संस्कृतीची नीव खऱ्या अर्थाने पक्की होईल आणि महाराष्ट्राची परंपरा अधिक थोर होईल यात शंका नाही!

जय मराठी! जय महाराष्ट्र!!

■ मेघना वर्तक
meghana.sahitya@gmail.com

# वाळूचे दुःख...!

वाळू गेली, आत्मा हरवला, दुबईच्या वाळवंटाचा प्राणच गेला
वाळूचे वाळवंट होते, पण त्यातच आपलेपण होते
मेट्रो नव्हत्या, बसेस नव्हत्या, टॉवर नव्हते, मॉल नव्हते
आधुनिकता नव्हती, सुखसोई नव्हत्या, पण वाळूचे बंध दृढ होते
रंग तिचा हलका तपकिरी, मधूनच हिरव्या झुडपांची नक्षी
स्पर्श होता मऊमुलायम, दुधावरच्या साईची देई आठवण
पाय ठेवता वाळू सरके, रेशीम लडी हळू उलगडे
उंटाच्या पायाखाली मखमल पसरे, उद्यम त्यांचा उंटावरून चाले
वाळूचे नाते उंटाशी गाढ, एकमेकांना सामावत छान
डोईवर छत नव्हते, पण मैत्रीचे बंध अतूट होते
माध्यान्हीचा सूर्य डोक्यावर तळपे, लांबवर वाळूत मृगजळ चमके
जवळून पाहिले तर भास असे, वाटसरूंच्या चेहेऱ्यावर निराशा दिसे
अनेक चेहेऱ्यांना दिलासा दिला, सहनशीलतेचा धडा शिकवला
वाळू नेहमीच शांत होती, परिस्थितीला सामोरे जात होती
ह्याच वाळूचे कण रगडिले, अरबीयांनी कष्ट साहिले
तेल त्यातून गाळून काढले, सागरातून मोती मिळवले
जगाच्या कानाकोपऱ्यातून, मायदेश, नाते मागे ठेवून
स्वप्न उराशी घेऊन, या वाळूत अनेकजण आले
या वाळूनेच प्रेम दिले, माया दिली, वाळूतच जागा दिली
स्वप्न साकारण्याची संधी दिली, स्वप्नपूर्तीसाठी उमेद दिली
दुबईला प्रगतीची दिशा दाखवली, सुखसमृद्धी भरून गेली
आधुनिकतेने नटली-सजली, पण स्वतःचा आत्माच हरवून बसली
वाळू गेली, रस्ते आले, डांबरी रस्त्यांचे जाळे पसरले
टॉवर-ब्रीजने शहर भरले, वाळूला मात्र सर्व विसरले
वाळूचे दर्शन नकोसे झाले, सरकारने नियम केले
सिमेंटचे जंगल झाले, वाळूचे अस्तित्वच हरवले
बघता बघता दिन सरले, मास सरले, मुठीतून वाळू निसटू लागली
सिमेंटच्या जंगलात दिसेनाशी झाली, पण घराघरात प्रकाश उजळून गेली
शहर बदलले, माणसे बदलली, आपलेपण गेले, आत्मीयता गेली
वाळूने दुःख गिळून सर्वस्व अर्पिले, जगाच्या नकाशावर दुबईचे नाव कोरले!

अगं दुबई, स्वतःची ओळखच विसरलीस का गं? दुबई म्हणजे वाळवंट आणि वाळवंट म्हणजेच दुबई असे जळी-स्थळी, काष्ठी-पाषाणी अलिखित सत्य होते! तेल सापडले आणि तुझा कायापालट झाला की गं! वाळवंटाचे रूपांतर नंदनवनात झाले. हा बदल चांगलाच झाला. तुझे नाव जगाच्या नकाशावर कोरले गेले. अनेकांची स्वप्नपूर्ती केलीस. जीवनाला आकार दिलास... पण अगं स्वतःची ओळखच विसरलीस. तुझे आणि वाळूचे अद्वैताचे नाते होते ना? मग अशी साथ सोडून कुठे चाललीस? अजूनही ह्या वेड्या वाळूला आशा आहे, तू कितीही मोठी झालीस तरी तुझ्या जीवनातील वाळूचे स्थान अढळ आहे!



■ मेघना वर्तक



संपूर्ण कुटुंब हार्ट हेल्दी कुटुंब!
माधवबाग प्रस्तुत
मिशन हेल्दी हार्ट 2016
* मर्यादित कालावधी करिता
दृढ निश्चय हृदयस्वास्थ्याचा!
चालताना दम लागणे, पायावर सूज, उच्च रक्तदाब, मधुमेह किंवा थकवा जाणवत असेल तर घरातील 30+ वयाच्या व्यक्तींची 'कार्डियाक रिस्क असेसमेंट' करुन घ्या, अगदी नाममात्र शुल्कात आणि लाइफ जगा बिनधास्त!
तपासणी अंतर्गत: इ सी जी, ब्लडप्रेशर, आर बी एस (रँडम ब्लड शुगर)
एस पी ओ 2, बी एम आय
सर्व टेस्टस् फक्त ₹150
सोबत एक्सपर्ट डॉक्टर्सचे कन्सल्टेशन,
डाएट चार्ट आणि 'हृदयाची गुरुकिल्ली'
डी व्ही डी फॉर हेल्दी हार्ट
नाव नोंदणी आवश्यक,
अधिक माहितीसाठी आजच मिस कॉल द्या
022-33494950
ग्रंथाली प्रकाशित आणि सुमेध वडावाला लिखित
'हृदयस्पर्शी माधवबाग'
हे पुस्तक सवलतीत मिळण्यासाठी मिस्डकॉल द्या
022-39971919
माधवबाग
YouTube /Madhavbaug
www.madhavbaug.org
120 क्लिनिक्स् • 2 हॉस्पिटल्स्

# डॉ. दहिफळे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

• युरॉलॉजी • सेक्सॉलॉजी • प्लास्टिक सर्जरी • लेसर • बर्न • ट्रॉमा सेंटर

**उपलब्ध सुविधा**

- दुर्बीणीद्वारे प्रोस्टेट ग्रंथीची शस्त्रक्रिया (टी.यु.आर.पी.)
- दुर्बीणीद्वारे मुतखड्याची शस्त्रक्रिया (पी.सी.एन.एल.युरेटरोस्कोपी)
- पुरुष वंध्यत्व व नपुंसकता यांचे निदान व उपचार
- नवजात शिशू व लहान मुलांच्या लघवीचे आजार
- मूत्रपिंड, मुत्राशय, प्रोस्टेट आणि पुरुषांचे इंद्रिय व अंडकोषाच्या कर्करोगाचे निदान व उपचार
- शिघ्रपतन, कमजोरी, ❖ स्वप्नदोष, लहान लिंग
- पेनाईल इंप्लाट ❖ फिमेल सेक्सशुअल डीसफंक्शन
- लिथोट्रिप्सी ❖ मूत्रपिंड प्रत्यारोपण
- रिकान्स्ट्रक्टिव्ह सर्जरी
- मूत्रमार्गातील व्यंग दुरुस्त करणे
- हायपोस्पेडियस रिपेअर

**लेसर उपचार**

- शरीराच्या कोणत्याही भागावरील नको असलेल्या केसांसाठी कायमस्वरूपी उपचार
- तारुण्यापिटीका किंवा मोळ्या व त्यामुळे पडलेले खड्डे
- रक्तवाहीन्यांना जाळ्या
- काळ्या निळ्या जन्म खुणा व डाग
- काळे व तपकिरी लाल-ल्हासे
- शस्त्रक्रियेचे अथवा मार लागुन झालेले व्रण
- किलॉईड ❖ प्रस्तुतीपश्चातचे स्ट्रेचमार्क
- चामखीळ ❖ चेहऱ्यावरील वांग ❖ गोंदण
- उतार वयातील सुरकुत्या
- पायावरील फुगलेल्या शिरा

**प्लास्टिक सर्जरी**

- जन्मत:चे व्यंग
- लघवीच्या जागेतील व्यंगे
- भाजल्याने तयार झालेले व्यंगे व आखडलेले सांधे
- हातावरील दुखापत व इजा
- फाटलेले ओठ व टाळु
- त्वचेवरील डाग व व्रण
- लिंगबदल शस्त्रक्रिया
- वंध्यत्वावर मायक्रोसर्जरी
- व्हजायनोप्लास्टी

**कॉस्मेटिक सर्जरी**

- अनावश्यक चरबी काढुन शरीर सुडौल बनविणे
- नाकाचा व्यंग दुर करण्याकरीता शस्त्रक्रिया
- हेअर ट्रान्सप्लान्ट (केशरोपण)
- स्तनवृद्धी व स्तनाचा आकार बदलणे
- चेहऱ्याला नवकांती देणे

**स्टेम सेल थेरेपी सुविधा**

- किडनी फेल्युअर
- नपुंसकता, लैंगिक शिथीलता व लिंगाचा आकार बदलणे
- त्वचेची सुंदरता, कॉस्मटीक ट्रीटमेंट व टकलेपणा आणि ॲन्टीयेजींग
- स्तन वृद्धी (ब्रेस्ट इम्प्लांट), बट्स एनलार्जमेंट
- डायबेटीज (मधुमेह) व त्यामुळे होणारे दुष्परिणाम
- मधुमेहामुळे न भरणाऱ्या जखमा
- ऑस्टीओ-आर्थरायटीस (संधी वात)
- स्पायनल इंजुरीज (मणक्याचे आजार, इजा)
- अव्हास्क्युलार नेक्रोसीस (ए व्ही एन) कमरेचे हाडाचा जॉईंट
- टेंडोनायटीस (पायाच्या किंवा हाताचे टेंडॉन)
- हृदयाचे विकार
- मेमरी लॉस (अलझीमरस)
- पारकिन-सोनिझम
- दम्याचे आजार, फुफुसांचे आजार

**दुभंगलेले ओठ व टाळूवर वर्षभर मोफत शस्त्रक्रिया**

**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना उपलब्ध • महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना उपलब्ध**

StemRx™
Life is evolving...

डिस्ट्रीक्ट कोर्ट समोर, अदालत रोड,
बाबा पेट्रोल पंपाजवळ औरंगाबाद.
फोन : 0240-2364858, मो.: 9822326248, 9850822648
Email : drvijaydahiphale@gmail.com,
ujwala.dahiphale@gmail.com
www.dahiphalecosmeticurology.com

## • व्हिजीटिंग कन्सलटंट •

सेव्हन हिल्स् हॉस्पिटल, अंधेरी (ई), मुंबई
रबाळे स्टेम आर एक्स हॉस्पिटल, नवी मुंबई
श्री बालाजी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मलाड (ई), मुंबई
दहिफळेज् सेक्सॉलॉजी, युरॉलॉजी क्लिनिक, कोरेगावपार्क, पुणे
माहेर मल्टी स्पेशालिटी क्लिनिक, कोथरुड, पुणे